# प्रेरणा चिपकोची
# भटकंती गढवालची

जगदीश गोडबोले

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



REFBK-0024274

संदर्भ भूप्रवास
६५२
२४२७४
१७।८।९४

# प्रेरणा चिपकोची : भटकंती गढवालची

जगदीश गोडबोले

REFBK-0024274

वार्ता प्रकाशन

प्रेरणा चिपकोची : भटकंती गढवालची

© जगदीश गोडबोले
सीमा, ७-ब, शिरोळे मार्ग, पुणे ४११ ००४

प्रसिद्धी : ८ जून १९८४

मुखपृष्ठ / छपाई : सुभाष अवचट / मुद्रा, पुणे

प्रकाशक :
भ. मा. राजर्षि
वार्ता प्रकाशन
२/२४, लोकमान्यनगर
पुणे ४११ ०३०

मुद्रक :
सौ. कमल रामचंद्र पळसगासी
संजीव मुद्रणालय
४६९, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

मूल्य : अठ्ठावीस रुपये

प्रिय भाऊ —

थोर माणस खरोखरच थोर असतात
असा माझा विश्वास होता,
पण थोरपणाचा कसलाही बडेजाव न मिरवणाऱ्या
तुम्ही किंवा गीतासारख्या माणसातली थोरवी
नुसती जाणवली तरी विश्वासाचा गाभारा अखंड राहतो

जगदीश

# मनोगत

एकेक मजा असते. ' इंद्रावती मोहीम ' कल्पनेचा उगम झाल्यापासून झपाट्याने पार पडली. पण पुस्तक मात्र अनेक वर्षे रेंगाळलं. ' गढवालची भटकंती ' प्रत्यक्षात यायला काही काळ लागला, पुस्तक मात्र झपाट्याने तयार झाले.

' गढवालची भटकंती ' म्हणजे ' इंद्रावतीची मोहीम ' आणि माझ्या गेल्या पाच-सात वर्षातल्या भटकतीची—अभ्यासाची स्वाभाविक परिणती आहे. १९७५ च्या सुमारास चंद्रपूर—बस्तरचे भरदार घनदाट जगल प्रथम पाहिले आणि तत्क्षणीच त्याच्या प्रेमात पडलो. पुढे काही वर्षे त्या जंगलात मुक्कामच ठोकला. जंगलाचे प्रेम हरघडी वाढतच होते, पण गंभीरपणे असा जंगलाचा विचार केला नाही. अर्थात प्रेमात असे गांभीर्य अपेक्षित नसतेच !

पुढे पुण्याच्या ' आदिवासी जाणीव-जागृती केंद्रा 'तर्फे आदिवासी, विशेषतः वनविषयक आंदोलनाचा अभ्यास करण्याची संधी मिळाली. गढवालमधील चिपको आंदोलन, बिहार झारखंडमधील साल विरुद्ध साग लढा याची प्रत्यक्ष माहिती घेता आली. शिवाय डॉ. माधव गाडगीळ यांच्या बरोबर केंद्र सरकारच्या पर्यावरण खात्यातर्फे मध्यप्रदेश- बस्तरमधील पाइनची वादग्रस्त लागवड, तसेच महाराष्ट्रातील संमिश्र नैसर्गिक जगले आणि वनखात्याने केलेल्या साग, नीलगिरी आदि एकप्रजातीय लागवडी यांचा तुलनात्मक अभ्यास करता आला. त्यामुळे हे जंगलप्रेम ( माझ्या समजुतीप्रमाणे ) थोडेफार डोळस होण्यास मदत झाली.

साहजिकच पहिले आभार आदिवासी जागृती केंद्र आणि त्याच्या प्रा. शरद कुलकर्णींचे. मग आमच्या महाराष्ट्र मानवविज्ञान परिषदेचे विशेषतः श्री. गं. बा. सरदार, प्रा. रामचंद्र मुटाटकर, डॉ. अनिल गोरे आणि इतर पदाधिकारी सहकाऱ्यांचे. नाशिकची वनविषयक परिषद असो, ' हाकारा 'चा खास वनविशेषांक असो वा गढवालची भटकंती. परिषदेने आणि ह्या सर्वांनी

मला नेहमीच भक्कम पाठिंबा दिला. केंद्र सरकारच्या शिक्षणखात्याने आमच्या या भटकंतीला अनुदान दिल्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार. सांगलीच्या श्रीमती प्रभाताई कुलकर्णी आणि मुंबईचे श्री. शंकर रंगनाथन् यांनीही बहुमोल आर्थिक मदत केली.

आमची ही भटकंती यशस्वी होण्यासाठी सर्वश्री चंडीप्रसाद भट, प्रताप शिखर, विजय जडधारी, सुंदरलालजी बहुगुणा आणि श्रीमती विमलाजी बहुगुणा आदि 'चिपको' आंदोलकांनी तसेच गढवालमधील अनेक भाईबंदांनी मनापासून साथ दिली. त्यांच्या ऋणातून उतराई होणे खरोखरच कठीण आहे. तसेच राष्ट्रीय वनसंशोधन संस्थेतील श्री. माधवराव गोगटे, श्री. कृष्णमुरारी तिवारी यांनी ज्या आस्थेने आमचे आगतस्वागत केले त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे. दिलीप काळे, राजीव पाटील, शेखर या मित्रांनीही भटकंतीच्या तयारीत बहुमोल मदत केली.

भटकंतीमधील साथीदारांचे– 'डालियोंका दगडया'चे औपचारिक आभार मानणे मला खरोखरच जमणार नाही व त्यांनाही भावणार नाही. मात्र त्यांनी ज्या समर्थपणे आणि उमदेपणे साथ दिली त्याचा उल्लेख केल्यावाचून राहवत नाही. शिवाय, हे पुस्तक लिहिताना माझ्या सर्व साथीदारांनी सादर केलेले अहवाल, नोंदी, रोजनिशा आणि त्यांच्याशी झालेल्या चर्चा यांचाही खूप उपयोग झाला.

राजस्थानातील हकिकतीवर डॉ. माधव गाडगीळांनी 'हाकारा'मधे लेख लिहिला होता. तो इतका अप्रतिम होता की मी तो जवळजवळ जसाच्या तसा पुस्तकात घेतला आहे! या 'वाङ्मय चौर्या'च्या परवानगीबद्दल आणि या 'भटकंती'ला प्रस्तावना लिहिल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार.

पुस्तकातील छायाचित्रे पापा पाटील, अशोक यादव, नागेश हाटकर आणि रवी यादव या माझ्या हक्काच्या मित्रांची आहेत.

'भटकंती' लेखमालेच्या स्वरूपात प्रथम 'माणूस' साप्ताहिकातून प्रकाशित झाली होती. माझे अर्वाच्य अक्षर वाचून लिखाणावर संपादकीय संस्कार केल्याबद्दल मी मेघा राजहंस आणि श्रीभाऊ माजगावकर यांचा आभारी आहे.

लेखमालेला 'रा. न. सबनीस वाङ्मय-पारितोषिक' देऊन कौतुकाची पहिली

थाप पाठीवर मारणाऱ्या नारायणगावच्या श्री. श्रीकांत सबनीस यांचाही मी आभारी आहे.

माझ्या या सर्व उपद्व्यापात घरातील मंडळींची नेहमीच भक्कम साथ असते. विशेषतः मंडळींचा—गीताचा उल्लेख मुद्दाम करायला हवा. गढवालची भटकंतीच काय, माझी एकूण मुशाफिरीच तिच्या भक्कम आणि जिवाभावाच्या साथीशिवाय अशक्य आहे.

काय गमत असते ! पुस्तकाची ‘ प्रसूती ’ प्रकाशकाच्या शांत जागेत झाली. तेव्हा द्यायचा तेवढा भरपूर त्रास दिला. आता पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने मैत्रीचा अंत पाहीन असं स्वप्नातही वाटलं नव्हतं.

पुस्तकाची छपाई सुबकतेने आणि तत्परतेने करणारे ‘ सजीव मुद्रणालया ’चे श्री. मधुसूदन घळसासी आणि त्यांचे सर्व सहकारी, तसेच मुखपृष्ठाची छपाई अल्पावधीत करून देणारे ‘ मुद्रा ’चे श्री. सुजीत पटवर्धन आणि त्यांचे सहकारी यांचेही आभार.

‘ मोहीम इंद्रावतीची ’ या पुस्तकाच्या वेळी आणखी काही ‘ बिघडावे ’ अशी इच्छा केली होती. या पुस्तकाच्या निमित्ताने आणखी काही ‘ डोळस ’ पणे बिघडले तर परमानंदम् !

जगदीश गोडबोले

# प्रस्तावना

गेल्या दहा वर्षांत साऱ्या जगभरच परिसराच्या समस्याबाबत एक नवी जाणीव निर्माण झाली आहे. साहजिकच वेगवेगळ्या देशात या जाणिवेचे स्वरूपही वेगवेगळे आहे. युरोपामधली नैसर्गिक जीवसृष्टी तीन-चार शतकांपूर्वीच नष्टप्राय झाली. त्यानंतर त्या खंडावर आधुनिक उद्योगप्रधान समाज उभा राहिला. त्यामुळे तिथली परिसरविषयक चळवळ ही मुख्यतः औद्योगिक प्रदूषणाच्या समस्यावर केंद्रित झालेली आढळते.

गेल्या तीन–चार शतकात भरभराटीला आलेल्या या युरोपीय संस्कृतीने सारे जग पादाक्रान्त केले. जिथे मूळ लोकसंख्या तुरळक होती त्या उत्तर अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया खंडात नवी उद्योगप्रधान राष्ट्रे उभारली. उलट जिथे जुनी संस्कृती होती, बरीच लोकसंख्या होती, अशा आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका खंडात आपली सत्ता प्रस्थापित करून तिथल्या निसर्गसंपत्तीचे ह्या संस्कृतीने यथेच्छ शोषण केले. या तथाकथित तिसऱ्या जगातल्या परिसराच्या समस्यांचे स्वरूप युरोप, उत्तर अमेरिकेतल्या समस्यापेक्षा अगदी वेगळे आहे. पण या देशातल्या सत्ताधारी वर्गाला हे सहज समजणे ही मोठी अवघड बाब आहे. कारण हा सारा वर्ग युरोपीय संस्कृतीच्या अर्ध्या हळकुंडाने पिवळा होऊन बसलेला आहे. अशा परिस्थितीत या तिसऱ्या जगताच्या परिसरविषयक समस्यांचे खरे स्वरूप जगापुढे मांडण्याचे, त्या दृष्टीने काहीतरी हालचाल सुरू करण्याचे फार मोठे श्रेय हिमालयातल्या चिपको आंदोलनाचे आहे, आणि ही जाणीव महाराष्ट्रापर्यंत पोचवण्याचे श्रेय आहे जगदीश गोडबोल्यांचे.

एकमेकांशी वागताना लोक जे काही डावपेच वापरतात त्याचा अभ्यास करण्यासाठी आधुनिक गणितज्ञांनी 'गेम थिअरी' नावाचे एक खास शास्त्र उभे केले आहे. डावपेचाच्या ह्या शास्त्रात 'कैद्याचा पेचप्रसंग' नावाचे एक प्रख्यात कूट आहे. या कूट-नाट्यात एका कोठडीत डांबलेले दोन कैदी असतात. या कैद्यापुढे असतात दोन पर्याय एकमेकावर विश्वास ठेवून, जोडीने

एक गुन्हा कबूल करून सुटून जायचे किंवा अविश्वासात राहून सात वर्षे कोठडीत काढायची. असा अविश्वास दाखवायला सबळ कारण असते. जर गुन्हा कबूल करताना एका कैद्याने विश्वासघात केला तर त्याला स्वातंत्र्य आणि वर बक्षीस मिळते, तर दुसऱ्या कैद्याला जन्मभर तुरुंगात खितपत पडावे लागते. डावपेचाच्या शास्त्रानुसार बहुतेक वेळा अविश्वासाचा विजय होतो आणि दोन्ही कैदी सात वर्षे कारावास भोगतात.

आपल्या परिसराच्या समस्या ह्या बऱ्याच अशी या कैद्यांच्या पेचप्रसंगाप्रमाणे उद्भवलेल्या आहेत. एखाद्या राखीव जंगलाचेच उदाहरण घ्या. जर सगळे लोक सहकार्य द्यायला तयार झाले तर त्या जंगलातून भरपूर उत्पादन निघू शकेल. पण असे सहकार्य देऊन ते जंगल राखायला कोणीच तयार होत नाही. कारण आज मी जर माझी गुरे जंगलात घातली नाहीत, तर दुसरे कोणी घालणार नाहीत, किंवा मी जर लाकूडफाटा तोडला नाही तर दुसरे तोडणार नाहीत असा कोणाचाच विश्वास नसतो. आणि समजा, सगळ्या गावकऱ्यांनी संयम राखला, तरी उद्या सरकारी कंत्राटदार त्या जंगलाचे वाटोळे करणार नाही, असा तर कोणालाच भरवसा नसतो. शेवटी या बेभरवशाच्या राज्यात सगळेच त्या जंगलाची कत्तल करण्यात सामील होतात.

अशा पेचप्रसंगात अडकल्याने आज आपल्या देशाची अफाट हानी होत आहे. आपल्याला उपलब्ध असलेल्या भूमीपैकी तिसरा हिस्सा तरी जमीन अगदी निरुपयोगी, उजाड पडलेली आहे. जर आपण या जमिनीची नीट व्यवस्था करायला शिकलो तर आपली काहीही खर्च न करता तिच्यातून कितीतरी जळण आणि चाऱ्याचे उत्पादन करता येईल, आणि ग्रामीण जनतेला रोजगार उपलब्ध करून देता येईल. पण हे प्रत्यक्षात उतरवणे महाकर्मकठीण आहे.

निसर्गसंपत्तीच्या उपभोगाबाबत आज अशी दुर्दैवाची परिस्थिती आहे. मग पूर्वी तर ती कशी असेल ? इंग्रज अवतरण्यापूर्वी आपला देश हा शेकडो छोट्या-मोठ्या राज्यांत विभागलेला होता. त्या सगळ्यांना अंकित करून, सारा देश एकछत्र साम्राज्याखाली आणून इथे शांतता प्रस्थापित करण्याचे श्रेय इंग्रजांना द्यायला हवे असे आपला इतिहास सांगतो. तेव्हा इंग्रज येण्यापूर्वी निसर्ग संपत्तीबाबतची ओढाताण अधिकच तीव्र असणार असे साहजिकच वाटेल. पण हा निष्कर्ष संपूर्ण चुकीचा आहे. कारण इंग्रज येण्यापूर्वी आपला देश हा हजारो स्वतंत्र खेड्यांखेड्यात संघटित होता. या ग्रामरचनेत अनेक दोष होते हे खरेच पण तरीही या ग्रामसंस्था परस्परावलंबनाच्या आणि

विश्वासाच्या पायावर घट्ट उभ्या होत्या. या ग्रामसंस्थानी त्यांच्या त्यांच्या प्रदेशातील निसर्गसंपत्तीचा उपभोग संयमाने आणि शहाणपणाने घेण्याच्या अनेक परंपरा जतन केल्या होत्या. परिणामी, इंग्रजांचे राज्य प्रस्थापित होण्यापूर्वी सारा भारत वनराजींनी नटलेला होता. हे चित्र अठराव्या एकोणिसाव्या शतकातील इंग्रजांच्या गॅझेटियर्समधे आणि प्रवासवर्णनात अगदी स्वच्छ पाहायला सापडते.

असे हे त्या काळच्या मानाने प्रगत, शेतीप्रधान संस्कृती जोपासलेले, नैसर्गिक साधनसंपत्तीशी संतुलित असलेले भारतीय खंड, एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला इंग्रजांच्या कब्जात गेले. ही घटना अपेक्षित होती, कारण या वेळेपर्यंत युरोपियांनी विज्ञान आणि तंत्रविद्येत मोठीच आघाडी मारलेली होती. या नव्या ज्ञानामुळे त्यांना नैसर्गिक संपत्ती अधिक परिणामकारकरीत्या वापरता येऊ लागली होती. शिवाय त्यांचे सैनिकी बळही खूपच वरचढ बनलेले होते. चारसहा हजार वर्षांपूर्वी मध्यपूर्वेत निर्माण झालेल्या कृषिसंस्कृतीने जसे बहुतेक सर्व जगावर वर्चस्व प्रस्थापित केले होते, तसेच नव्या औद्योगिक संस्कृतीचे वर्चस्व सर्वच जगावर प्रस्थापित होणे अटळ होते. यातूनच भारतीय सरंजामशाही समाजाचा बीमोड होऊन आधुनिक विज्ञानाधिष्ठित समाज निर्माण होईल, अशी अटकळ कार्ल मार्क्ससारखे विचारवंत बाळगून होते.

●

दुर्दैवाने तसे झाले नाही. भारतीय समाजाला प्रगतिपथावर नेण्याची इंग्रजांची बिलकुल इच्छा नव्हती. केवळ या खंडाच्या समृद्ध निसर्गसंपत्तीचा उपयोग स्वतःच्या बुभुक्षित अर्थव्यवस्थेला करून देण्याकडेच त्यांचे सारे लक्ष केंद्रित झालेले होते. कारण त्यांच्या नव्या उद्योगधंद्यांना कच्च्या मालाची प्रचंड गरज होती, आणि त्यांच्या स्वतःच्या छोट्याशा बेटावरची निसर्गसंपत्ती ही गरज पुरी करणे शक्यच नव्हते. उदाहरणार्थ, एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला त्यांच्या देशाच्या फक्त चार टक्के जंगल शिल्लक होते. आणि त्यांच्या आरमारासाठी आणि व्यापारी नौकांसाठी त्यांना मोठ्या प्रमाणावर लाकडाची टंचाई भासू लागली होती.

तेव्हा भारताला आधुनिक विज्ञान–तंत्रविद्येला वंचित ठेऊन येथील संपत्तीची शक्य तेवढ्या स्वस्तात लूट करणे हे इंग्रजांच्या राजवटीचे मुख्य सूत्र बनले यात काहीच नवल नाही. या धोरणाचाच एक भाग म्हणजे सामूहिक मालकी नाकबूल करणे. पूर्वीच्या राजवटीत ग्रामसंस्था राज्यकर्त्यांना सामूहिक कर भरत आणि गावाभोवतीची चराऊ आणि जंगल जमीन सामूहिक जबाबदारीने

उपभोगात असत. इंग्रजांनी जमिनीचे वैयक्तिक वाटे केले पाहिजेत आणि गावाची सर्व सामूहिक जमीन ही सरकारच्या ताब्यात दिली गेली पाहिजे असा आग्रह धरला. या धोरणाने ग्रामव्यवस्था भराभर मोडकळीला आली. शेतावरच्या जबरदस्त साऱ्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आणि काही दशकातच जमिनीची मालकी, कसणाऱ्या शेतकऱ्याकडून जमीनदार-सावकार वर्गांच्या ताब्यात गेली. याच्याच जोडीला सामूहिक गोचर-जंगल जमिनीवरचे हक्क रद्द झाल्यामुळे शेतकऱ्याची हलाखी आणखीनच तीव्र झाली. यातून महाराष्ट्रात १८७० च्या सुमारास मोठे दुष्काळ पडले.

याच जोडीला इंग्रजांनी भारतात तथाकथित आधुनिक विज्ञानाधिष्ठित वनव्यवस्था राबवायला सुरुवात केली पण या वनव्यवस्थेचे विज्ञानाधिष्ठान हे नावापुरतेच होते. कारण खऱ्याखुऱ्या विज्ञानाधिष्ठित वनव्यवस्थेला जी शास्त्रीय बैठक हवी ती तेव्हाही नव्हती आणि आजही नाही. वनसंपत्तीचा उपयोग ग्रामीण जनतेच्या गरजा पुरवण्याकडून काढून घेऊन, इंग्रजांच्या आरमाराच्या, लष्कराच्या, उद्योगधंद्यांच्या गरजा पुरवण्याकरता करणे हेच या नव्या वनव्यवस्थेचे एकमेव उद्दिष्ट होते. ही पद्धती इतकी उघडउघड अन्याय्य होती की मद्रासच्या इंग्रज राज्यपालाने १८६० साली नवी वनव्यवस्था हे वनसंरक्षण नव्हे, तर वनसंपत्तीवर जबरदस्तीने कब्जा बळकावणे आहे असे स्पष्ट नमूद करून ठेवले आहे.

अर्थात गावाच्या सामूहिक मालकीच्या सर्वच जमिनीवर कब्जा करणे सरकारला शक्य झाले नाही. त्यातील काही जमीन गावासाठी गोचर, परमभोग, महसूलखात्याच्या अखत्यारीतील जमीन म्हणून ठेवण्यात आली. परंतु या जमिनीचा चांगला वापर व्हावा म्हणून सरकारने काहीही प्रयत्न केला नाही. तोपर्यंत कोलमडलेल्या ग्रामव्यवस्थेकडूनही हे होणे शक्य नव्हते. परिणामी अशी ग्रामीण गरजा भागवण्यासाठी राखलेली जमीन हळूहळू अनियंत्रित वापराने उघडी-बोडकी होत चालली. या गोष्टीकडे विचारवंतांचे लक्ष गेले नाही, असे नाही. तब्बल शंभर वर्षांपूर्वी डॉ. व्होल्कार या इंग्रज कृषिशास्त्रज्ञाने या गोष्टीकडे लक्ष वेधले. सरकारी जंगलखात्यांनी मुद्दाम प्रयत्न करून जळाऊ लाकूड आणि चाऱ्याच्या उत्पादनासाठी राखीव जंगले निर्माण केली पाहिजेत अशी सूचनाही मांडली. परंतु ग्रामीण गरजांचा विचार करण्यास इंग्रजांचे जंगलखाते मुळीच तयार नव्हते आणि या महत्त्वाच्या सूचना दुर्लक्षित राहिल्या.

इंग्रजांच्या आधीच्या काळात वनसंपत्ती टिकून राहण्याचे एक कारण असे की त्या संपत्तीला खूपच कमी मागणी होती. नव्या औद्योगिक युगात ही मागणी खूप वाढल्यावर निसर्गसंपत्तीचा आणि अर्थव्यवस्थेचा जो एक जुना समतोल होता, तो बदलणेही अनिवार्य होते. असा एक बदल होताना सुरुवातीला युरोप खंडात निसर्गसंपत्तीची मोठी नासधूस झाली होती, तशीच आपल्याकडेही होणे हे अपेक्षित होते. परंतु हळूहळू युरोपात एक नवा समतोल निर्माण झाला. मात्र तो इतर खंडातल्या निसर्गसंपत्तीच्या लुटीवर अवलंबून राहिला. या नव्या समतोलात युरोपातील सर्वसामान्य जनतेचाही मोठा फायदा झाला. याउलट भारतात असा समतोल कधीच निर्माण झाला नाही आणि आधुनिक तंत्रविद्येचा काहीही लाभ आपल्या प्रजेपर्यंत कधीच पोचला नाही.

भारताच्या दृष्टीने, निसर्गसंपत्तीचा आधुनिक वापर म्हणजे सर्वसामान्य प्रजेची दुर्दशा असेच समीकरण इंग्रजांच्या राज्यापासून ठरले. ही सारी प्रजा जळण, घरबांधणी, गुरांना चारा या साध्या गरजा भागवण्यासाठी नैसर्गिक वनस्पतिसृष्टीवर अवलंबून होती. पण त्यांच्या या साध्या गरजा अयुक्त, किंबहुना अवैध ठरवण्यात आल्या. वनसंपत्तीच्या व्यवस्थापनेत मजूर म्हणूनही त्यांच्या हाती फारसे काहीच लागले नाही आणि वनसंपत्तीच्या उपयोगातून होणारा खरा फायदा गावकऱ्यांना चकवून, थेट राज्यकर्त्यांच्या खिशात पोचू लागला. परिणामत', सरकारी राखीव जंगल हे रयतेचे शत्रू ठरले. त्या जंगलातील जेवढी जमीन बळकावता येईल, तेवढी बळकावावी एवढे एकच उद्दिष्ट लोकांपुढे राहिले. अशा राखीव जंगलाच्या व्यवस्थापनेत रयतेचे सहकार्य मिळण्याची सुतराम् शक्यता नव्हती. तेव्हा ह्या जंगलाचे व्यवस्थापन करणारी सरकारी यंत्रणा आणि स्थानिक जनता यांच्यात कायमचे वैर निर्माण झाले आणि आपल्या दुर्दैवाने ते आजवर टिकून आहे. या वैरामुळे आणि स्थानिक जनतेच्या पूर्ण असहकारामुळे राखीव जंगलाचीही हळूहळू दुर्दशा होऊ लागली.

आपल्या राजवटीच्या पहिल्या पूर्ण शतकभर इंग्रजांनी भारतातील औद्योगिक प्रगती मुद्दामच रोखून धरली. परंतु पहिल्या महायुद्धानंतर हे धोरण हळूहळू बदलत गेले. तरीही, स्वातंत्र्याच्या वेळी आपला देश औद्योगिक दृष्ट्या अगदी मागासलेला होता. तेव्हा स्वातंत्र्य मिळताच, औद्योगीकरण करून विज्ञान आणि तंत्रविद्येची फळे भारतीय जनतेपर्यंत पोचवणे हे आपले प्रधान उद्दिष्ट मानण्यात आले आणि ते सर्वथैव योग्यच होते. या औद्योगिकरणासाठी आपल्याला निसर्गसंपत्तीच्या वापराचा वेग खूपच वाढवणे आवश्यक होते. हे करताना दोन दृष्टींनी काळजी घ्यायला हवी होती. एकतर हा वापर करताना

या निसर्गसंपत्तीच्या मुळावर घाव घातला जायला नको होता. त्या संपत्तीला जपून, तिच्या भांडवलावरच्या व्याजापुरता वापर करून मूळ संपत्ती टिकवून धरायला हवी होती. दुसरे म्हणजे या आधुनिक विकासाचे लाभ गरीब लोकांपर्यंत पोचतील याकडे खास लक्ष पुरवायला हवे होते. कारण आपल्या देशातील बहुसंख्य जनतेचे जीवनमान सुधारणे हे आपल्या विकासाचे मुख्य ध्येय मानायला हवे होते. परंतु या दोनही बाबतीत आपण अयशस्वी झालो. आपली औद्योगिक विकासाची प्रगती ही निसर्गसंपत्तीची दिवाळखोरी ठरली आहे. आणि हे दिवाळे काढताना केवळ समाजातील धनिक वर्ग अधिक गबर झाला आहे. त्याचे फायदे गरीब जनतेपर्यंत अजिबातच पोचलेले नाहीत.

दांडेलीच्या कागदगिरणीचेच उदाहरण घ्या. आपल्या देशाला शिक्षणप्रसारासाठी भरपूर कागद नक्कीच हवा आहे. तेव्हा स्वतंत्र भारतात कागद उत्पादनाला उत्तेजन देणे योग्यच होते. दांडेलीला कागदगिरण काढण्यासाठी जेव्हा बांगड-सोमाणी पुढे आले, तेव्हा त्यांना कर्नाटक सरकारतर्फे एक रुपया टनाने बांबू देण्याचे कबूल करण्यात आले. आता याच वेळी उघड्या बाजारात बांबू हजार-दोन हजार रुपये टनाने विकला जात होता हे सोडा. या जवळजवळ फुकट मिळालेल्या बांबूची किंमत कारखानदारांना साहजिकच वाटली नाही. त्यांना फक्त तात्कालिक फायदा हवा होता. तेव्हा त्यांनी या बांबूची वाटेल तशी तोड सुरू केली. परिणामी, ज्या बेळगाव-कारवार जिल्ह्यातून या गिरणीला कायमचा बांबू पुरवठा होईल अशी अपेक्षा होती तो बांबू पुरवठा लवकरच संपुष्टात आला. आज हीच गिरण आपल्याला लागणारा बांबू अरुणाचल प्रदेश-जम्मू-काश्मीरातून आणवते.

आता या गिरणीमुळे स्थानिक जनतेचा काय लाभ झाला ? काहीही नाही. गिरणीने लोकांची तमा न बाळगता काळी नदीचे पाणी प्रदूषित केले. हवेत धूर ओकला. स्थानिक जनतेच्या निकडीच्या गरजा पुरवणारा बांबू सफाचट करून बुरुडांना बेरोजगार केले. उलट, नवे रोजगार शक्यतोवर राजस्थानातून आलेल्या लोकांना पुरवले. फक्त बांबू तोडण्याचे काम स्थानिक जनतेसाठी आपोआपच राखले गेले. पण त्यांना औद्योगिक कामगारांना मिळतात ते कोणतेही फायदे न मिळावेत म्हणून गिरणीच्या मालकांनी एक वेगळीच एजन्सी निर्माण केली. अशा नाना शकलांनी हा नवा उद्योग म्हणजे त्या जिल्ह्याला वरदान न ठरता शापच ठरावा याची निश्चिती केली.

भारतासारख्या तथाकथित विकसनशील देशातल्या परिसराच्या समस्यांचे स्वरूप हे अशा रीतीने अगदी वेगळे आहे. या देशातील बहुसंख्य जनता अजूनही जळण, चारा, झोपड्यासाठी बांधकामाचे साहित्य अशा मूलभूत गरजांसाठी नैसर्गिक वनस्पतिसृष्टीवर अवलंबून आहे. परंतु देशाच्या विकासयोजनात या गरजा पुरवण्याचा विचारही केला जात नाही. विचार केला जातो तो केवळ औद्योगिक नागर गरजा पुरवण्याचा. या रस्सीखेचीत या देशातील जंगलांची चराऊ रानांची नासाडी होत आहे. देशातील मोठा भूभाग अनुत्पादक आणि पडीक होत चालला आहे. त्यामुळे जमिनीच्या धुपेच्या, भू-स्खलनाच्या, नद्या, तलाव गाळानी भरण्याच्या समस्या वाढत आहेत, आणि आधुनिक विकासाच्या फळांना वंचित राहिलेला बहुजनसमाज अधिकाधिक दुर्दशेकडे वाट चालत आहे.

स्वातंत्र्यानंतरची पहिली पंचवीस वर्षे या दुःस्थितीकडे पूर्ण दुर्लक्ष करून आपली वाटचाल चालू होती. काय होत आहे, याची सत्ताधारी, नागर वर्गाला तरी अजिबात जाणीव नव्हती, कारण विकासाचे सारे फायदे या वर्गाकडे वाहत होते. तर सारे तोटे ग्रामीण भागातील गरीब प्रजेला सहन करावे लागत होते. ही परिस्थिती अणुभर तरी का होईना, बदलण्याची, वस्तुस्थितीची थोडीफार जाणीव सत्ताधारी वर्गापर्यंत पोचवण्याची मोठी कामगिरी हिमालयातील ' चिपको ' आंदोलनाने केली, हे या आंदोलनाचे युगपरिवर्तक कार्य होय.

पण ही जाणीव झाल्यावर पुढची दिशा कोणती ? याबाबत या आंदोलनात दोन विचारप्रवाह आहेत. सुंदरलाल बहुगुणांची एकूण धारणा आधुनिक औद्योगिक विकासाविरुद्ध अशी आहे. निसर्गाशी समतोल राखणारी, शेतीवर, पशुपालनावर आधारित अशी अर्थव्यवस्था त्यांना हवी आहे. ग्रामीण भागातील जंगलाचा वापर सर्वतः ग्रामीण भागातील जनतेच्या नित्याच्या गरजा भागवण्यासाठी व्हावा, असे त्यांना वाटते. याउलट, चंडीप्रसाद भट हे हळूहळू औद्योगिक विकास व्हावा असे मानतात. परंतु हा औद्योगिक विकास होताना निसर्गसंपत्तीची धूळधाण होऊ नये आणि या विकासाचा फायदा समाजाच्या सर्व वर्गांना पोचावा अशी चंडीप्रसादजींची धारणा आहे.

माझ्या मते चंडीप्रसादजींची भूमिका जास्त ग्राह्य आहे. विज्ञान आणि तंत्रविद्येतून मानवी जीवन खरोखरीच उंचावू शकते, आणि आज कोणताही समाज यापासून दूर राहू शकणार नाही. विशेषतः आधुनिक सेना आज पूर्णपणे विज्ञान–तंत्रविद्येवर निर्भर आहेत. अशा परिस्थितीत प्रत्येक देश आपल्या संरक्षणासाठी तरी औद्योगीकरणाच्या मागे राहणारच. तेव्हा औद्योगीकरणालाच

विरोध करणे फोल आहे, अनुचित आहे. विरोध हवा ज्या पद्धतीने औद्योगीकरण चालले आहे त्याला.

सुंदरलालजींचे मुख्य काम आहे जाणीवजागृतीचे. पण त्यांनी ग्रामीण पातळीवर संघटन करून प्रत्यक्ष काम करण्यावर भर दिलेला नाही. उलट, चंडीप्रसादजींनी अलकनंदेच्या खोऱ्यात, अशा कामात स्वतःला गाडून घेतले आहे. खेड्यापाड्यातून लोकांना जोडून उघड्या-बोडक्या झालेल्या डोंगरावर झाडांची लागवड करणे, अतिशय चढ-उतारावरची शेती थांबवून तेथे फळबागा निर्माण करणे, गुरांचे अनिर्बंध चरणे बंद करणे, लघुविद्युत्-प्रकल्प ग्रामस्थांतर्फे सुरू करून त्यावर कुटीरोद्योग चालवणे, छोट्या सहकारी क्षेत्रात वनाधिष्ठित उद्योगधंदे चालू करणे अशा अनेक विधायक कार्यक्रमांत ते मग्न आहेत. माझ्या मते, अशा या विधायक कार्यक्रमातूनच अखेर एका नव्या, निसर्गाशी संतुलित, पण न्याय्य आणि विकसनशील समाजव्यवस्थेकडे वाटचाल सुरू होणार आहे. जगदीश गोडबोल्यांनी नुसती या वाटचालीची ओळखच करून दिली नाही, तर ते स्वत. पवनेच्या खोऱ्यात असेच कार्यक्रम राबवीत आहेत. आजच्या रात्रीच्या गर्भात हीच उद्याच्या उषःकालाची चिन्हे आहेत !

पुणे, ५ जून १९८४

माधव गाडगीळ

मराठी ... ग्रंथालय ठाणे
८५२
दा. क्र. २३-२-०७
ग्रंथ, शाखा (स्थळ प्रत)

वाघ मानगुटीवर बसल्याच्या शिकारकथा तुम्ही वाचल्या असतील, कल्याही असतील; पण माझ्या मानगुटीवर एक शिकारी बसून आहे. गेली कित्येक वर्षे !

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट, शिकत होतो तेव्हाची. सालाबादप्रमाणे परीक्षा संपली णि रात्री सहज जिम कॉर्बेटचे 'मॅन इटिंग लेपर्ड ऑफ रुद्रप्रयाग' (रुद्र-प्रयागचा नरभक्षक चित्ता) वाचायला घेतलं. अगदी आरामात. पलंगावर हात-पाय पसरून. मात्र रात्र चढत गेली आणि आराम गेला जहन्नममध्ये. पाय पोटाशी केव्हा आले कळलं नाही. खोलीच्या आजूबाजूला लपेटलेल्या अंधारा-तून चित्त्याचे रोखलेले डोळे दिसायला लागले. आठ वर्षं गढवालमध्ये आतंक जवणारे. शेकडो माणसांचा बळी घेणारे. चित्ता आणि त्याच्याशी जिवाच्या कराराने झुंजणारा जिम कॉर्बेट. रात्रभर झुंज चालू होती. पहाटेपहाटे जिम कॉर्बेटने त्या नरभक्षकाला टिपला. पार उजाडेपर्यंत पलंगाखाली उतरण्याची आपली मात्र हिंमत झाली नाही ! मग रुद्रप्रयागचा चित्ताच काय गढवाल-कुमाऊँ-मधील पौडी-चावन, चौगड आदि ठिकाणचे एकसोएक महाखतरनाक वाघ सलाम झाले; पण तो जिम कॉर्बेट आणि त्याचा लाडका गढवाल-कुमाऊँ काही मानगुटीवरून खाली उतरले नाहीत. अगदी वाघीण येऊन बसली तरीसुद्धा !

शिक्षण संपलं. वर्षं आली-गेली. आम्ही मार्गाला लागलो. मार्ग सोडूनही लते झालो. मात्र गढवाल-कुमाऊँच्या वाटेला जाणं काही जमलं नाही आणि दिवस अचानक वर्तमानपत्रात बातमी वाचली- उत्तराखंडातील (गढवाल-ऊँ) पहाडी-आदिवासी लोकांनी आपले जंगल वाचविण्यासाठी 'चिपको'

नावाचे अभिनव आंदोलन सुरू केले आहे. आता 'चिपको 'आणि 'आंदोलन' दोन्ही शब्द नवीन नव्हते. मात्र आंदोलनाच्या संदर्भात 'चिपको' बापजन्मात प्रथमच ऐकत होतो! त्यातून नष्ट होणाऱ्या जंगलाबाबत बहुतांश लोक कमालीचे बेफिकीर असताना या पहाडी-आदिवासी लोकांनी हा काय उद्योग आरंभला आहे याची उत्सुकता वाटायला लागली. त्यातून आदिवासी आणि जंगल- दोन्ही आमचे 'वीक पॉइन्ट्स्' रादर लव्ह पॉइन्ट्स्!' गेली पाच-सहा वर्षे बिहार-ओरिसा मध्यप्रदेश- महाराष्ट्र केरळातील जंगल पालथी घालण्यात गेली. चंद्रपूरच्या सागवनातून, बस्तरच्या 'बस्तरी 'तून (बांबूच्या राज्या) मनमुराद भटकणे झाले होते. अबूझ माड-काली हांडीच्या अनवट रानात पार हरवलेल्या माडिया-गोंडांच्या अटकर वस्त्यातून मुक्काम ठोकून राहिलो होतो. शेकोटीशी शेकताना सुख-दुःखाच्या गोष्टी केल्या होत्या. महुवाच्या मदहोषात रानच्या कच्च जीवनाचा कैफ अनुभवला होता. साहजिक बातमी वाचली आणि झपाटल्यागत झालो. और हम वह नही जो बैठेंगे खाली हाथ—!

सुदैवाने एक संधी चालून आली. पुण्याच्या 'आदिवासी जाणीव-जागृती केंद्रा 'तर्फे वन-आंदोलनांचा अभ्यास करण्याची योजना ठरत होती. सिंग-भूमच्या 'साग विरुद्ध साल' आंदोलनापासून 'चिपको 'पर्यंत अनेक आंदोलनांची प्रत्यक्ष जाऊन माहिती घ्यायची होती. प्रा. शरद कुळकर्णींनी त्याबाबत विचारणा करताच क्षणार्धात होकार देऊन टाकला. सुरुवात 'चिपको 'पासून करावी असं ठरल. साथीला माझे जानी दोस्त आणि उत्तम छायाचित्रकार पापा पाटील आणि अशोक यादव सांगलीच्या 'रिव्हर व्हॅली एक्स्पिडिशन अँड रिसर्च सोसायटी ऑफ इंडिया' तर्फे येणार होते.

आम्ही उत्साहाने तयारीला सुरुवात केली. हिमालय मला तसा नवा नव्हता. गिर्यारोहणासाठी सिक्कीम-हिमालय अथवा गुलजारीसाठी काश्मीर भटकून झाले होते; पण उत्तराखंड प्रत्यक्ष माहितीच्या दृष्टीने नवीन होता. त्यामुळे मोसम, सामान सुमानाचा नीट अंदाज येईना. म्हणून उत्तराखंडात नेहमी मुशाफिरी करणाऱ्या मित्रांना गाठले; पण आम्हाला नेमक्या कोणत्या व किती उंचीवरच्या गावात जायचे आहे हे खुद्द आम्हालाच माहीत नसल्याने काही सल्ला द्यायला ते असमर्थ होते. बर, आंदोलनाची काही माहिती घ्यावी तर पॉप सॉंगपासून डिंग-डॉंगपर्यंतच्या अगम्य शिखराची धडाधड सहस्रनामे घेणाऱ्या वीरांनी

'चिपको' नाव ऐकलेही नव्हते. अर्जुनाच्या इमानाने शिखर आणि केवळ शिखर हे त्याचे लक्ष्य असे. आजूबाजूचे जन-जीवन, परिस्थिती यांच्याशी त्याना कर्तव्य नव्हते. 'चिपको' आंदोलक प्रामुख्याने सर्वोदयी आहेत असं कुठून तरी समजल्याने पुण्यातील विंचूरकर वाड्यातील सर्वोदयकार्यालयाकडे मोर्चा वळवला. आम्ही चौकशीला तोंड उघडताच कार्यालयातील सद्गृहस्थाने पलीकडच्या ओसरीवरील दोन वृद्ध सद्गृहस्थाकडे आमची पाठवण केली.

'आम्हाला चिपको आंदोलनाची माहिती ' मी.

'तुम्ही प्रथम गोपुरीला जा ' पहिले सद्गृहस्थ

'अहो, पण उत्तराखंड कुठे आणि गोपुरी कुठ–' मी एकदम दचकून मनातल्या मनात बिगरी ते मॅट्रिकपर्यंत आठवतील ते सर्व नकाशे पालथे घातले.

'मग असं करा, आधी पवनारला जा. तिथे तुम्हाला कसलीही माहिती समजेल ' दुसरे सद्गृहस्थ.

बाप रे ! तेवढी एक जागा सोडून जगाच्या पाठीवर कुठेही जाण्याची आमची तयारी होती. एक तर 'अत्योदय' या शब्दाची आणि 'वाल्यां'ची मला भयकर भीती वाटते आणि दुसरी गोष्ट म्हणजे आश्रमातली पाटी फुटली असेल तर 'चिपको' विथ् ॲक्शन दाखवायचे म्हणजे आली का आफत ! पण देवाने संकटात टाकल्यावर जसा देवच धावून येतो तसेच श्री. गोविंदराव शिंदे व श्रीमती इंदुताई टिकेकर हे प्रख्यात सर्वोदयी कार्यकर्तेच आमच्या मदतीला धावले त्यानी आवश्यक ती माहिती, ओळख-पत्र वगैरे दिली. सुप्रसिद्ध निसर्ग-शास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ याच्याकडून काही माहिती घेतली आणि आम्ही जून १९७९ अखेर डेहराडून गाठले

डेहराडून गाठायचे उद्देश दोन. एक तर सबधित वन–अधिकाऱ्याची मुख्यालये तिथे होती आणि मुख्य म्हणजे तेथील विख्यात वन–संशोधनसंस्था (Forest Research Institute) बघायची होती. शिवाय आमचा दोस्त दिलीप काळे तिथे होता. त्यामुळे काही कशाची कमतरता नव्हती. डेहराडूनला आवश्यक ती प्राथमिक माहिती घेतली आणि पाऊस कोसळायच्या आत हिमा-लय गाठला. गढवालमधील उत्तरकाशीपासून कुमाऊँमधील आलमोरा-नैनिताल-पर्यंत आंदोलन क्षेत्र पसरले होते. आम्हाला आंदोलनाचा उगम, प्रभावक्षेत्र, विविध आदोलन–केंद्रे, नेते–कार्यकर्ते, त्याची कार्यपद्धती, लोकाचा सहभाग, वनमजूर–वन ठेकेदाराची प्रतिक्रिया वगैरे सर्वांगाने माहिती सर्वांकडून घ्यायची

होती. पाठीवर पिट्टू ( रॅकसॅक ) टाकून भटकंती सुरू केली.

चीडच्या गर्द हिरव्या राईत रमलेला सिल्याराचा देखणा नवजीवन आश्रम, दूर पहाडातील लस्यालगाव, सफरचंदाच्या बागेतलं धारगाव, मनीऑर्डरवर जगणारे बढ्यारगड, अलकनंदेच्या हाहाकारातून जेमतेम सावरलेले पाखी, शहरीपणाला अजून न सरावलेले गोपेश्वर, बर्फातले बेमरू, धुक्याच्या घुंघटमध्ये सरोवराआड दडलेले स्वप्निल नैनिताल-महिनाभर मुशाफिरी चालू होती. परत फेब्रुवारीमध्ये नागेश हाटकरबरोबर भटकून आलो. गावागावातून भटकलो. घरात–दारात–अंगणात–शेतात बाजारात लोकांना भेटत होतो, बोलत होतो, ऐकत होतो. व्यापारी जंगलतोडीमुळे लोकांचे अतोनात नुकसान झाले आहे हे जाणवत गेले. लोक दुःखी आहेत, पण आणखी एक गोष्ट जाणवली. आपल्यावरील आपत्तींनी लोक दुःखी आहेतच, पण त्याहूनही दुःखी आहेत आपल्या सुखदुःखाची कोणाला पर्वा नाही म्हणून ! उत्तराखंड म्हणजे गंगोत्री-जमनोत्री-केदारनाथ-बद्रीनाथसारख्या तीर्थक्षेत्रांचे आगर. देशभरचे लाखो यात्रेकरू तिथे दरसाल येतात वा नंदादेवी-कामेत-नीळकंठासारख्या गिरिशिखरांवर चढाई करायला गिर्यारोहक येतात, पण सुंदरलाल बहुगुणांपासून छोट्याशा खेड्यातील शकुंतलादेवीपर्यंत गढवाली माणसाचे दुःख होते हमारा दर्द न जाने कोई ! जो तो येतो तो पुण्य जोडायला नाही तर शिखर चढायला धावतो, पण आमच्या अडी-अडचणी, सुखदुःखं जाणून घ्यायला कोणाला फुरसद नाही, इच्छाही नाही !

गोष्ट खरी होती. गंगोत्रीच्या दर्शनाने लाखोजण पावन झाले. हरिद्वार–ऋषिकेशच्या गंगेच्या विशाल पात्राने आकंठ तहान शमवली; पण वर दूर डोंगरातील अनेक गावं जंगलतोडीमुळं पाण्याच्या घोटालाही दुरावली आहेत हे आपल्या लक्षात आले नाही. उत्तुंग गिरिशिखरे पादाक्रांत करण्याची मर्दुमकी अनेकांनी गाजवली; पण भगवताने 'स्थावराणाम् हिमालयः' म्हणून गौरवलेला हिमालय ठायी–ठायी कोसळत आहे याची आपण तमा बाळगली नाही. सर्वात दुःखाची गोष्ट म्हणजे गढवालची– हिमालयाची सुखदुःख केवळ त्यांच्यापुरतीच मर्यादित नव्हती, तर गंगा–यमुनेच्या मैदानातील लाखो लोकांचे जीवन हिमालयाच्या सुख–दुःखाशी निगडित होते. प्रत्यही त्याचा प्रत्यय येत होता. १९७०

चा अलकनदेचा हाहाकार आणि १९७८ ची भागीरथी–दुर्घटना हे त्याचे भरभक्कम पुरावे होते.

केवळ हिमालयातच नाही तर अँडीज पर्वतातील व्हेनेझुएला, कोलंबिया, इक्वेडोरपासून दक्षिण–पूर्व आशियाच्या पहाडी भागापर्यंत सर्व विकसनशील देशात हीच परिस्थिती होती. जगाच्या एकूण भूभागापैकी हा पहाडी प्रदेश एकचतुर्थांश असला किंवा जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी एकदशांशच लोक पहाडी प्रदेशात राहत असले तरी जीवन–दायी नद्यांचे उगम व पहाडी पर्यावरणाच्या निसर्ग–बधावर होणारा परिणाम यामुळे केवळ या दहा टक्के पहाडी लोकांचेच नाही तर मैदानातील कोट्यवधी लोकांचे जीवन पहाडी–पर्यावरणाच्या सुदृढतेवर अवलंबून आहे. पहाडी पर्यावरण आधीच कमालीचे संवेदनशील, त्यातून 'जवान' हिमालयासारखी भूगर्भशास्त्रदृष्ट्या आधीच नाजुक हालत असली तर गर्भवतीप्रमाणे जपायला पाहिजे–भविष्याशी संकेत असेल तर ! नुसत्या धरणांचाच विचार केला तरी मनाचा थरकाप उडतो. १९७० साली अलकनंदेच्या प्रलयामुळे हरिद्वार ते पट्टानीपर्यंत दहा किलोमीटर गंगा–कालवा गाळाने भरला. नुसता गाळ काढायला एक कोट रुपये लागले ! भाक्रा–नांगल धरणात आत्ताच अपेक्षेपेक्षा चौपट वेगाने गाळ भरतो आहे. हिमालयातील नद्यांवर आज कोट्यवधी रुपये खर्चून आपण डझनवारी धरणे बांधतो आहोत. भारतातील इतर बावीस धरणांच्या पाहणीचा निष्कर्ष वेगळा नाही. त्यातील अनेक धरणांना पर्यायी जागा नाही. एकदा ती अक्षरशः गाळात गेली की, कपाळाला हात लावून बसायचं का ? निदान त्यासाठी तरी नद्यांच्या पाणलोट–क्षेत्राचा विचार व्हायला नको का ?

उत्तराखंडाच्या भटकंतीनंतर झोप उडाली, साफ उडाली ! मी जंगलात राहिलो होतो, भटकलो होतो. वनसंवर्धन, निसर्ग–संतुलनावर थोडेफार वाचत होतो, चर्चा करत होतो; पण सुंदरलाल बहुगुणा वा चंडीप्रसाद भटासारख्या आंदोलकांशी बोलल्यानंतर लक्षात यायला लागलं, आपण प्रत्यक्ष जगण्याच्या पातळीवर जंगलाचा फार कमी विचार केला आहे. उत्तराखंडासारखा पर्यावरण व मानवी जीवन यांचा इतका जिता–जागता अनुबंध आपण पहिल्यांदाच अनुभवत आहोत. दूर डोंगरावरच्या एखाद्या अनसूयादेवीला आम्ही मुद्दाम डिवचायचो 'तुम्हाला इकॉलॉजी–बिकॉलॉजी काय समजत ? मग कशाला या 'चिपको'च्या भानगडीत पडता ?' हमखास उत्तर यायचं, 'भाईसाब, आप

जो बोलते हैं, हम नहीं समझता । मगर माथे के मंजराखाल का जंगल काट दिया और अगले साल रोडे-खाडोंके ( दगड-माती ) नीचे गाँव दब गया । '
अथवा ल्हाशीचा एखादा विश्वभरबूढा थरथरत्या हाताने गावच्या ओढ्याकाठी घेऊन जायचा आणि डोळ्यात पाणी आणून सांगायचा, ' भाईसाब, नालवा-सारखं गावाचं बोट धरून वर्षानुवर्षे वाहात होता हा. डोंगरमाथ्यावरचं जंगल कापलं आणि हा एकदम गावच्या जिवावर उठला ! '

अभ्यासक शास्त्रज्ञ, निसर्गशास्त्रज्ञ सांगायला लागले की, समजतं; पण अशी ही साधी-सुधी माणसं पोटातून बोलायला लागली की, पार अंत:करणाला जाऊन भिडतं, शास्त्र जिवंत होतं. गावोगावच्या अनसूयादेवींची अन् विश्व-भराची कहाणी ऐकून वाटायला लागलं आपण जे पाहिलं-अनुभवलं ते मित्रांना कार्यकर्त्यांना सांगायला पाहिजे. मी बोलबहाद्दर तर पापा-नागेश कॅमेराबचीं ! आम्ही लेख, स्लाईड-शोचा सपाटा लावला. वर्तमानपत्र, मासिक, सभासंमेलन-शिबिर जिथे चान्स मिळेल तिथे ' चिपको ' ! थोड्याच काळात ' पर्यावरण नको पण याना आवरा ' अशी गंभीर परिस्थिती झाली. एकेक मजा असते. जामखेडला एका मित्राबरोबर डॉ. दादा गुजरांचे चीन-दौऱ्याचे अनुभव ऐकत होतो दादा अगदी पोटतिडकीने चीनची माहिती सांगत होते. कदाचित मित्राला ओव्हर-डोस झाला असावा. तो हळूच म्हणाला, ' साल, कठीण झालं आहे. दादा हो-हाग हो मध्ये पार बुडाले आहेत. तिकडे कुमारला ( सप्तर्षी ) ह्या कुमारी वाभळीने ( आता सुमारी ) झपाटलं आहे आणि तू उठ-बस ' चिपको.' अरे. माणसासारखे चार शब्द सरळ बोलाल की नाही ! '

गोष्ट खरी असली तरी आम्ही मजबूर होतो. निदान मी तरी. एखादी गोष्ट मनाला पटली-भिडली की, सर्वांना सांगेपर्यंत जिवाला चैन नाही. मग इतरांची चैन हराम झाली तरी बेहत्तर ! गमतीचा भाग सोडला तरी याबाबत बोलताना प्रकर्षानं लक्षात यायला लागलं की, आपल्यातील अनेक जण पर्यावरण निसर्ग-संतुलनाला काही मूठभर लोकांची चैन समजतात. पण ही चैन फार काळ परवडणारी नाही. विशेषत: वनवासी-आदिवासी माणसांचा हा जीवन-मरणाचा प्रश्न आहे, हे समजून घ्यायला पाहिजे !

आपल्याकडे हा प्रश्न समजावून सांगताना एक बाधा यायचा. हिमालयात जंगलतोडीचे परिणाम तावडतोब आणि ठळकपणे दिसतात. डोंगर-कडे कोसळले की, अगदी नाट्यमय रीतीने ते दृग्गोचर होतात आपल्या ' राकट देशा, कणखर

देशा ' महाराष्ट्रात अगदी पहाडी भागातही विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीमुळे हे दुष्परिणाम लगेच जाणवत नाहीत. (नुकतेच ते कोकणातही प्रकर्षाने जाणवले!) कोसळणारा कडा मृत्यु–घटा दणाणून सोडतो; पण सुपीक माती वाहून काळा पत्थर उघडा पडायला कैक वर्षे जावी लागतात हळूहळू भिनणाऱ्या विषाप्रमाणे ही प्रक्रिया घडते, म्हणून जास्त धोकादायक आहे. कारण आपल्या अस्तित्वाचा आधार असलेली लाख मोलाची माती एकदा पायाखालून सरकली की, परिणाम एकच–सत्यानाश! हा धोका वेळीच ओळखला पाहिजे, सावध झाले पाहिजे. इतराना केले पाहिजे. या विषयाचा अभ्यास करणाऱ्यांची मुख्य म्हणजे अभ्यासाला जोडून प्रत्यक्ष काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची, निसर्ग–प्रेमीची एकसध फळी उभी राहिली पाहिजे.

उत्तराखंडातील ' चिपको ' आदोलनाने व केरळातील ' सायलेंट व्हॅली ' प्रकल्पाने पर्यावरण–विषयक चर्चेला देशभर थोडे-फार तोंड फुटले होते; पण पर्यावरण व निसर्ग–सतुलन जे खरोखर तारू वा मारू शकतील अशा आदिवासी मित्रांपासून, कार्यकर्त्यांपासून या गोष्टी दूर होत्या. महाराष्ट्रात ठाणे–धुळे–चंद्र–पूरसारख्या आदिवासीवनवासी भागातून आम्ही ' जगल–बचाव परिषदा ' घेत होतो; पण जगल-बचावासाठी साधा–सुधा माणूसही किती प्रचड काम करू शकतो हे प्रत्यक्ष पाहाणं महत्त्वाच होत. उत्तराखडात जगलतोडीचे दुष्परिणाम आणि ते थोपविण्यासाठी स्थानिक लोक करत असलेले उपाय दोन्ही जवळून बघण शक्य होत. लेख–भाषणं–स्लाइड-शोपेक्षा प्रत्यक्ष बघणं जास्त अर्थपूर्ण होतं. नागेशशी बोलताना सहज विचार सुचला, महाराष्ट्राच्या आदिवासी–वनवासी भागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना घेऊन उत्तराखडाची अभ्यास–मोहीम आखली तर? आमच्या ' महाराष्ट्र मानव–विज्ञान परिषदे'च्या प्रा. मुटाटकरांना ही कल्पना बोलून दाखवली आणि त्यानी क्षणार्धात ' आगे बढो ' चा हिरवा कदिल दाखवला!

' महाराष्ट्र मानव – विज्ञान परिषदे 'ची ( Maharashtra Association of Anthropological Sciences ) स्थापना पाच-सात वर्षापूर्वीची. शास्त्रीय ज्ञानोपासनेला जिवत अनुभवाची–वास्तवाची जोड मिळावी या विचाराने ' परिषदे'ची स्थापना झाली आहे. दलित–आदिवासीच्या प्रश्नांमध्ये ज्याना

आस्था आहे असे शिक्षक–प्राध्यापक–कार्यकर्ते–शासनकर्ते याना एक राज-कारण–निरपेक्ष मुक्त व्यासपीठ उपलब्ध व्हावे ही परिषदेच्या स्थापनेमागची भूमिका. दलित–आदिवासींच्या जीवन–विकासाच्या विविध पैलूसबधी परिषदेने परिसंवाद, चर्चासत्रे आयोजित केली होतीच. ' हाकारा ' त्रैमासिकाचे प्रकाशनही सुरू केले होते. वनसवर्धनाच्या प्रश्नात परिषदेला विशेष आस्था. भूत–वर्तमान व भविष्यकाळ आणि सर्व 'वादा 'ना ( isms ) जोडणाऱ्या वन-संवर्धनासारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नाचा सर्वांगीण व समतोल अभ्यास व्हावा अशी परिषदेची धारणा. या भूमिकेतूनच परिषदेने वन–कर्मचारी व कार्यकर्ते याच्या सयुक्त बैठकी, नाशिक वन–विभागाचा अभ्यास–दौरा आदि कार्यक्रम अगोदरच आयोजित केले होते. मुख्य म्हणजे वन–कर्मचारी व कार्य-कर्ते यांच्यामध्ये ' सवाद ' घडावा यासाठी परिषदेची धडपड होती. कारण बहुताश वेळी वनकर्मचारी व कार्यकर्ते आमने-सामने येणार, एखाद्या तणावाच्या वेळी नाही तर हाणामारीच्या ( शाब्दिक ) प्रसंगी. अशा वेळी साधक–बाधक चर्चा अशक्यच. यातून मार्ग काढण्यासाठी परिषदेने प्रयत्न केले. सबधित वनकर्मचाऱ्यांनीही चागला प्रतिसाद दिला. आणि नाशिक वनकार्यकर्त्यांशी आमने सामने रोख–ठोक चर्चा केली. अगदी ' जगल म्हणजे काय– फक्त झाडे की, झाडासकट जगलामध्ये राहाणारा यच्चयावत जीवितमात्र ' पासून ' आता करायचे ते सामाजिक वन–सवर्धन, मग पूर्वीचे वा इतर असामाजिक वन–संवर्धन समजायचे काय ? ' पर्यंत सर्व मुद्द्यांवर ठोकाठोक झाली. अगदी खुल्लम् खुल्ला. मात्र अतिशय उमदेपणे. चर्चिलने म्हटल्याप्रमाणे युद्ध ही केवळ लष्करी अमलदाराच्या हातात सोपवण्यासारखी मामुली बाब नाही. त्याप्रमाणे नुसत्या वन-खात्याकडे सोपवण्यासारखी वनसंवर्धन ही मामुली बाब नाही. अर्थातच समाजकार्यासारखी गभीर बाब नुसत्या समाजकार्यकर्त्यांकडे सोपवायला वन-अधिकाऱ्याची तयारी नव्हती. अशी आमची एकमेकाची भूमिका. असो.

अशा या प्रयत्नाचीच स्वाभाविक परिणती ही मोहीम होती.

' मोहिमे 'च्या गाडीला परिषदेकडून हिरवी झेंडी मिळाली खरी आणि नेहमीप्रमाणे आमची गाडी सुसाट सुटायला पाहिजे होती. ' इद्रावती मोहिमे '-चा तसा अनुभव होता. द्रुतगतीने ती पूर्ण झाली होती; पण उत्तराखंड–

मोहिमेची गत खिळखिळीच लागली गाडी ठेसनातून बाहेर पडेना. मी अनंत उपद्व्यापात अडकलो होतो. ( बेकारोंको फुरसद कहाँ ! ) आणि मुख्य बाधा पैशाचा होता. हिमालयात इतक्या दूर, वेळ आणि पैसा खर्च करून जायच म्हणजे मोहीम किमान दोन-तीन आठवड्याची तरी पाहिजे आणि गढवाल-कुमाऊँ एवढ्या व्यापक प्रदेशातले वास्तव-दर्शन घडावे म्हणजे पथकही मोठे पाहिजे. एक तर परत-परत तिथे जाणे मुष्कील होते आणि महत्त्वाची गोष्ट या निमित्ताने महाराष्ट्रातील पन्नास वनवासी-आदिवासी कार्यकर्ते एकत्र राहणार होते, बोलणार होते; पण या सगळ्या भानगडीसाठी किमान पन्नास हजार खर्च येणार होता ! परिषदेकडे इतका पैसा नव्हता आणि वैयक्तिक वर्गणी वसूल करावी तर आमच्या अनेक कार्यकर्त्यांची दोन वेळा पोटभर जेवणाची मारामार ! म्हणजे आमची गाडी नुसती हवेतच शंटिंग करत होती !

भिक्षा देहीला सुरुवात केली. अगदी दिल्लीपासून गल्लीपर्यंतच्या अनेक मान्यवर संस्थाकडे. मजेमजेचे अनुभव आले. काही जणाकडे पैसा आणि इच्छा नव्हती. काही जणाकडे पैसा आणि इच्छा दोन्ही होते, पण इतक्या लोकाना इतक्या दूर घेऊन जाण्यापेक्षा त्यांनी आपापल्या भागात निलगिरी-सुबाभळीची चार–दोन झाड लावावी असा त्याचा भोळा–भाबडा सल्ला होता. काही जण वन–संवर्धनावरील 'सेमिनार' साठी पाहिजे तेवढा पैसा द्यायला तयार होते, पण सेमिनारच्या कुरणाबाहेर उडी मारणे त्याना पसत नव्हते. पर्यावरणाचा उद्घोष करणारी एक नावाजलेली संस्था तर आमच्या अध्यक्षांना पत्र लिहाय-च्याऐवजी सचिवाना पत्र का लिहिले म्हणून रुसून बसली. आता राहता राहिले आपले मायबाप सरकार ! पण 'इंद्रावतीमोहिमे' वेळचा अनुभव काही विशेष उत्साहवर्धक नव्हता. आदिवासींच्या प्रश्नात रस असलेल्याना आदि-वासींचे जीवन अगदी जवळून घडावे म्हणून ओरिसा-मध्य प्रदेश-महाराष्ट्राच्या आदिवासी भागातून वाहणाऱ्या इंद्रावतीनदीच्या काठाने आम्ही परिभ्रमण करणार होतो. पार मंत्र्यापर्यंत वशिला लावून भरघोस मदतीचे आश्वासनही मिळवले होते; पण 'ओरिसा, मध्य प्रदेश, महाराष्ट्राच्या वन-विभागातून वाहणारी इंद्रावती नदी' असं लाख वेळा स्पष्टीकरण दिल्यानतरही 'इंद्रावती' की 'इंद्रायणी' यामध्ये फायली गटांगळ्या खात राहिल्या. तोपर्यंत आमची सदेह वैकुंठाची तयारी झाली होती ! अखेर मोहीम संपल्यावर दोन महिन्यांनी चुकीच्या पद्धतीने आणि तेही थातुर–मातुर अनुदान आले. म्हणजे माणूस

आजारी पडला म्हणून औषधाला जावे तर त्याच्या श्राद्धदिनी ॲस्प्रोची अखंड गोळी मिळावी त्यातला प्रकार! पण करणार काय? मजबुरीका नाम महात्मा गांधी!

केंद्र सरकारच्या शिक्षण-खात्याची अशा प्रकारच्या अभ्यास कम् साहस वा साहस कम् अभ्यास मोहिमांना मदत करण्याची योजना आहे. अर्ज मात्र राज्य सरकारच्या युवक–कल्याण विभागामार्फत करावा लागतो. पुण्यातील संबंधित कार्यालयातून योग्य माहिती आणून ११ जून १९८० ला रीतसर फॉर्म वगैरे भरून दिला 'पंधरा दिवसात तुमच्या केसचा निकाल लागेल!' असे छातीठोकपणे तिथल्या अधिकाऱ्याने सांगितले. सरकारी यंत्रणेत अगदी माणसाचाही 'निकाल' इतक्या झटपट आणि निकाली लागणे अशक्यच याची कल्पना होती. त्यातून आमची केस पुणे-मुंबई–दिल्ली शिखर गाठत जाणार म्हणजे गेला बाजार दोन महिने तरी मनाची तयारी होती. फक्त सप्टेंबरचा मुहूर्त गाठायचा होता. कारण उत्तराखंडात जायला सोयीचे महिने दोनच--ऑगस्ट--सप्टेंबर वा मार्च--एप्रिल! अलीकडे–पलीकडे मोसमाचा नाही तर यात्रेकरूंचा त्रास. जून संपला. जुलै आला--गेला. 'कम् सप्टेंबर' ओसरला; पण कृपावंत सरकारचा मेघ बरसण्याची काही लक्षणं दिसेनात! पुण्यात कार्यालयामध्ये चौकशी केली तर 'केस'ची मुंबईला पाठवणी केल्याचे उत्तर मिळायचे आणि सचिवालयात विचारावे तर फाइल आली नाही म्हणून कानावर हात ठेवले जायचे! आता आमची ही हिमालय मोहिम खंडाळ्याच्या घाटातच 'निकाली' व्हायची धटका आली! एक दिवस अगदी खनपटीलाच बसलो तेव्हा पत्ता लागला की कसल्या तरी मामुली स्पष्टीकरणासाठी (फोन-वरूनही जे अर्ध्या सेकंदात मिळवता आले असते!) फाइल पुण्यातच पडून आहे! अखेर एकदाची फाइल मुळा–मुठेतून बाहेर पडली. आम्ही जरा निःश्वास टाकेपर्यंत सचिवालयाच्या महासागरात आमची केस 'मोहीम' (Expedition) की 'पदयात्रा' (Trek) या भोवऱ्यात सापडली. 'नाव किनारे लगाव' म्हणून आम्ही दिसेल त्या प्रभुजी आणि बाबूजीला साकडे घालायला सुरुवात केली. अखेर सचिवालयातली माझी मैत्रिण अरुणा बागची आमच्या आर्त हाकेला धावून आली. आमच्या केसची दिल्लीला पाठवणी झाली!

आता महाराष्ट्राच्या राजधानीतल्या मुंबईत ही हालत मग देशाच्या राज-धानीतल्या दिल्लीत काय असेल! पण दिल्ली आणि दिल्लीकराची जमातच

मोठा विलक्षण ! आलेल्या फायलींशी आणि भेटलेल्या माणसाशी ती कधीच उर्मटपणे ( जाज्वल्य मराठी बाण्याने ) वागत नाही. मात्र 'तुम फिक्र मत करो अभी काम बन जाएगा !' असं मिट्ठास तुपात घोळवत महिनोन्महिने काम करीत नाहीत. यात दुष्टपणाचा भाग नसतो, एकेकाचा स्वभावच ! आता उर्मट माणसाशी निदान तात्त्विक भाडता तरी येत, पण असल्या मिट्ठासपणापुढे आपला तर पार फालुदा होतो ! धड अविश्वास दाखवता येत नाही की धड विसबून राहाता येत नाही. महिनोन्महिने याच सभ्रमात गेले. आम्ही नित्य–नेमाने स्मरण–पत्र नाही तर स्मरण–यात्रा करायचो आणि नित्य–नेमाने 'पुढे व्हा, अनुदान पाठोपाठ पाठवतोच' असा आशीर्वाद मिळायचा. शेवटी उत्तराखडाची अभ्यासमोहीम नाही तरी म्हातारपणात बद्रीनारायणाची यात्रा घडायच्या वेळेपर्यंत तरी मजुरी येईल अशी आपली आम्ही मनाची समजूत काढत होतो आणि आम्ही असे गाफील असतानाच दिल्लीश्वरांचे पत्र आले मोहिमेला अशत: अनुदान मंजूर झाले आहे. ( त्यातीलही अशतःच भाग प्रथम मिळेल ) अमुक–अमुक कागद–पत्र तावडतोब पाठवा !' चलो, कीं फरक पैदा है ! दिल्ली दरबारमें देर है, मगर अंधेर नही !

दिल्लीश्वरांच्या मजुरीचे शिक्कामोर्तब इसवी सनाच्या १९८१ साली १८.९ या रोजी झाले, तरी प्रत्यक्ष हुकुमनामा हातात पडेपर्यंत डिसेंबरची दहा तारीख उजाडली. म्हणजे मूळ अर्ज केल्यापासूनच्या दीड वर्षाच्या कालावधीत सर्वच अनिश्चित होते. पण माणूस प्राणवायूपेक्षाही आशेवर जास्त जगतो. आम्हीही आशा सोडली नव्हती. मधल्या काळात गढवाल-उत्तराखडातल्या कार्यकर्त्यांशी संपर्क राखून होतो. पुढच्या मोसमाचे वादे करीत होतो. आदोलनासंबधी मिळवता येईल तेवढी माहिती जमवत होतो.

या प्रयत्नात असतानाच बगलोरचे डॉ. माधव गाडगीळ आणि त्याचे मित्र डॉ. कैलाश मल्होत्रा यांच्याकडून एक लोकविलक्षण हकीकत ऐकायला मिळाली. 'चिपको' आदोलनाची मुळ इतिहासात इतकी खोलवर रुजली असतील याची कल्पनाच नव्हती. विसाव्या शतकातील 'चिपको' आंदोलनाचा इतिहासातील 'चिपको'शी प्रत्यक्ष संबध असेल–नसेल, पण जनमानसात रुजलेल्या भावना केव्हा आणि कशा उफाळतील, कोणी सागाव ! आपली

झाड वाचविण्यासाठी पहाडी गढवाल लोक प्राणपणाने झाडांना चिपकून बसत होते, तर अडीचशे वर्षांपूर्वी मारवाडातील बिश्नोईंनी आपले खेजडी वृक्ष वाचवण्यासाठी प्राणाची आहुती दिली होती. एक दोन जणानी नव्हे तर तब्बल ३६३ स्त्री-पुरुषानी ' खेजडीच्या वृक्षाबरोबर त्यांचीही खांडोळी उडाली होती.

माधवराव मारवाडातून आले ते भारावूनच. निसर्गशास्त्राच्या अभ्यासाची आणि निसर्गाच्या रक्षणाची मनस्वी तळमळ असणारा हा जातिवंत माणूस. झाडांच्या रक्षणासाठी रक्ताचे सडे शिंपणाऱ्या बिश्नोईंच्या कुर्बानीने अंतर्बाह्य थरारून गेलेला. त्यानी आवर्जून सांगितले, ' जगदीश, खेजडलीला जाऊन प्रत्यक्ष बघच. बलिदानाच्या घटनेला यंदा अडीचशे वर्षं पूर्ण होत आहेत. निसर्गप्रेमी एक छोटासा समारंभ करणार आहेत. चुकवू नकोस— ' त्यानुसार १८ सप्टेंबर १९८० ला जोधपूर गाठले.

राजस्थानचे रेगिस्तान बघण्याची माझी बऱ्याच वर्षांची इच्छा होती. मन मोठं विचित्र. सिक्कीमच्या दऱ्याडोंगरात भटकता भटकता खुल्या मैदानाची ओढ लागली होती आणि गेली काही वर्षं रानावनातून फिरता–फिरता वाळवंटाचे डोहाळे लागले होते !

जोधपूर विद्यापीठातील डॉ. मक्वानाना साथीला घेतलं आणि आमची मोटर–सायकल बावीस किलोमीटर अंतरावरील खेजडली गावाकडे भरधाव निघाली. ( दुर्दैवाने माझा हा गुणी मित्र थोड्या दिवसानी मोटरसायकल अपघातातच गेला. ) जोधपूरपासून खरं-खुरं रेगिस्तान दूर असलं तरी वाळवंट आणि वाळवंटाच्या जहाजाची झलक पाहायला मिळेल अशी अपेक्षा होती. पण खेजडली जवळ यायला लागलं आणि एकलकोंड्या उंटाऐवजी कृष्णमृगाचे कळपच्या कळप आम्हाला सामोरे यायला लागले. आता हरण ( किंवा हरिणाक्षी काय ! ) मला नवीन नव्हती. बडीपूरच्या जंगलात रात्री अनगिनत तेवत्या निरांजनाची आरती उतारताना अनुभवलं होतं. राहुरीच्या सहाऱ्याला आलेल्या हरणाच्या खिळल्यात रात्री गुजारल्या होत्या. इंद्रावतीच्या किनारी गुमसुमक्षणी एखादी चुकार हरिणी काळजाचा ठोका चुकवून गेली होती. पण, राजस्थानात स्वागताला हरण सामोरी यावी म्हणजे कवठे–महांकाळच्या एस्टीत हेमा मालिनी भेटावी, तसं झालं ! आणि ही मुलाकातही पल–दो–पलची नाही तर आम्ही अगदी जवळ जाईपर्यंत ही हरणं बेगुमानपणं आम्हाला निरखत उभी राहायची

आणि आम्ही फारच सलगी केली तर कल्का वादा करून हळूच सटकायची! आपली तर पार शिकार झाली! हे अप्रूप मनात साठवीत खेजडलीला पोचलो आणि रात्री बुजुर्गांच्या मैफिलीत इतिहासाचं एक-एक पान उलगडत गेलं.

खूप-खूप वर्षांपूर्वीची गोष्ट. मारवाडचा इतिहास एके काळी फुला-पानांनी डवरला होता. माणसाने रेगिस्तान जन्माला घातले नव्हते, रेगिस्ताननं आजच्याएवढे हात-पाय पसरले नव्हते—तेव्हाची गोष्ट, म्हणजे शेकडो वर्षांपूर्वीची! मारवाडच्या माळरानात खेजडी, बोरी, केर, सांगरीची अमाप झाडं पसरली होती. काळवीट, चिंकारे, नीलगायींचे मस्त कळप यातून विहार करत होते. भिल्लाच्या टोळ्याही वस्ती करून होत्या. बोरी-केरं चवदार फळांनी लगडायच्या, खेजडीला भरपूर शेंगा यायच्या. शिकार रगड होती. खावे-प्यावे, उद्याची फिकीर न करता मस्तपैकी जगावे असा सिलसिला हजारो वर्षं चालला होता.

सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी मध्य आशियातून माणसाच्या धाडीवर धाडी येऊ लागल्या. हे होते मुख्यत गुराखी. यातील अनेक जाट आणि राजपूत हळूहळू मारवाडात पसरले. भिल्लांशी मारामाऱ्या करून हातपाय पसरू लागले. मारवाडची आबादी वाढू लागली. मुलुख तसा भरपूर, त्यामुळे तसा काळजीचा प्रश्न नव्हता.

पण शतकामागून शतके लोटली तसा गुरा-माणसांच्या या प्रचंड दबावाचा भार खेजडी-बोरी-सांगरींना पेलवेना. झाड-झाडोरा झपाट्याने कमी व्हायला लागला. त्याची पैदास कमी झाली. गुराख्यांच्या कुऱ्हाडीने जंगल ओसाड व्हायला लागले. वनवासी-आदिवासी भिल्ल परागंदा होऊ लागले. अखेर तेराव्या शतकात कनोजच्या राठोडांनी भिल्लांचा पराभव करून मारवाडात आपले राज्य स्थापले आणि त्यांच्याबरोबर आलेले राजपूत सर्वदूर पसरले.

इसवी सनाच्या पधराव्या शतकापर्यंत राठोडाचे राज्य मारवाडात पक्के पाय रोवून होते. त्यांच्यातल्या एका पराक्रमी राजाच्या-राव जोधाजीच्या-कारकीर्दीत जोधपूर राज्यातील नागोर परगण्यातील पीपासार गावी १४५१ मध्ये एका लोकविलक्षण आसामीचा जन्म झाला. बापाचे नाव लोहाटा. आई हसादेवी. ठाकूर लोहाटजी होते ग्रामपती. व्यवसायाने शेतकरी आणि पशु-पालक. खाऊन-

पिऊन सुखी-संपन्न. मुलगा एकुलता एक. लहानपणी कमी बोलायचा म्हणून सगळे ' गुंगा ' म्हणून चिडवायचे. राना-वनात जावे, गुरं वळावी आणि झाडा-झुडपात निवांत पडून काळवीट-चिंकाराचे कळपच्या-कळप निरखीत राहावे हा शौक. वय वाढू लागले तसे हे गुंगे पोर अचाट काम करू लागले म्हणून गमतीने सर्व जण त्याला ' जाम्भा ' ( अचम्भा ) म्हणू लागले. त्याचेच पुढे जंबाजी झाले.

जंबाजी पचवीस वर्षांचा झाला आणि सबंध मुलखावर संकट आले. थोडा-फार का होईना; पण नेमाने पडणारा पाऊस येईनासा झाला. एक वर्ष-दोन वर्षं घरातील साठवलेला दाणा-पाणी-कडबा संपला. तिसरं वर्ष-चौथं वर्षं. गुरं-माणस झाडा-पाला ओरबाडू लागली; पण आठ वर्षं लोटली तरी अवर्षण चालूच ! दुष्काळाने हाहाकार केला. खेजडीच्या शेंगांवर आणि बोरीच्या बियाच्या पिठावर गुजारा करण्याचे दिवसही गेले. लोक सागरीच्या झाडाची साल कुटून खायला लागले. भुकेल्या लोकानी भुकेल्या काळविटांचा केंव्हाच फडशा पाडला होता. आता उरली-सुरली बोरं-सागरीही संपली. आकाशात आणि पोटात जाळ पडला. लोक चारी दिशाना वणवणू लागले.

जंबाजीच्या आजोबाच्या लहानपणीही असाच दुष्काळ पडला होता; पण ते म्हणायचे की, असे हाल झाले नाहीत. गवत सुकले तरी खेजडी अमाप होती. तिच्या पाल्या-शेंगावर गुरं-माणसानी जीव जगवला होता; पण असा हा कल्पवृक्ष दोन पिढ्यात नाहीसा होत गेला होता. आणि जंबाजीच्या डोळयांदेखत तर त्याचे वेणच संपुष्टात आलं होतं.

जंबाजींचं संवेदनाशील मन दुष्काळाच्या आगीनं पोळलच; पण त्याहीपेक्षा होरपळले ते अफू – दारूच्या धुंदीत आपसात निरर्थक झुजणाऱ्या जाट–राज-पुताच्या वणव्यात ! दुष्काळाचा आतंक फैलावला होता, त्यातच व्यभिचार-व्यसनाला ऊत आला होता. लोक जबान आणि लंगोटाचे पक्के राहिले नव्हते निसर्गाशी फारकत घेऊन टेढी पगडी बांधून अहंपणाने आपलीच छाया निरखत चालले होते. जंबाजीने हे सगळ बदलायचं ठरवलं. मारवाडात जर पुन्हा आयुष्य उभं करायचं असेल तर माणसातलं माणूसपण जागं करायला पाहिजे होत. खेजडी – बोर – केराचे आच्छादन घालायला हवे होते. काळवीट, चिंकारा वागडायला हवे होते. १४८१ मध्ये जंबाजीने आपला धर्म जगाला सांगायला सुरुवात केली.

जबाजीच्या 'धर्माज्ञा' त एकोणतीस मूलभूत आज्ञा होत्या म्हणून त्याच्या अनुयायांनी नाव पत्करले बिश्नोई – बीस और नोई. दोन प्रमुख आज्ञा होत्या 'हिरवे झाड केव्हाही तोडू नये आणि प्राणिहत्या कधीही करू नये!' जबाजीचा भूतदयेचा आणि मानवतेचा संदेश फैलावत चालला. जाट, राजपूत ब्राह्मण मोठ्या प्रमाणात त्याच्या पथात सामील झाले. जबाजीने आयुष्याची पुढची एक्कावन वर्षे मननात, चिंतनात आणि आपल्या सदेशाचा प्रसार करण्यात घालवली. दिल्लीच्या सिकंदर लोदीला भेटून गोहत्या बंद करवली. आपल्या अनुयायांमार्फत धरतीला सुजलाम्–सुफलाम् बनविण्याचे कार्य सुरू केले. हळूहळू बिश्नोईंच्या खेड्याभोवती वृक्षवल्ली दाटी करू लागले. जमिनीचा कस वाढू लागला. गुरा-ढोरांना चारा मिळू लागला. काळवीट – चिंकाराचे कळप बागडू लागले. मोर साद घालू लागले. बिश्नोईला जीवनाचा सूर आणि निसर्गाची लय सापडली. जीवन हरे – भरे झाले. बिश्नोई पंथ मारवाडातून राजस्थानच्या इतर भागात, मध्य-प्रदेश-हरयानात पसरू लागला.

मारवाडच्या मरुभूमीत परत एकवार हिरवळ दाटली, तरी इतरत्र रेतिस्तान पसरत होते. आणखी – आणखी रखरखीत होत होते. लोकांना कळत नव्हते. पिढ्यामागे पिढ्या गेल्या राठोडाचे स्वातंत्र्य जाऊन ते मोगलांचे माडलिक झाले. राव जोधाजीच्या वंशातल्या आठ पिढ्या लोटल्या आणि महाराज अजितसिंग गादीवर आले.

अजितसिंग मोठा पराक्रमी राजा. औरंगजेबाने त्याना पकडायला जग–जग पछाडले; पण शेवटी वयाच्या अवघ्या एकोणिसाव्या वर्षी त्यांनी जोधपूरची गादी पुन्हा मिळवली. सतत लढायाना तोंड देत गादी राखली. जन्म लढायाच्या धामधुमीत गेला. आयुष्याच्या शेवटी इसवी सन १७३० मध्ये त्यानी जोधपूरला एक मोठा राजवाडा बाधायचं ठरवलं. जोधपूरच्या सुंदर लाल दगडाचा राजवाडा. तो बाधायला चुना हवा. तसा चुना या प्रदेशात भरपूर, पण एवढ्या चुन्याची कळी करायला जळणही भरपूर हवे. आता या वाळवटात एवढ्या प्रचड भट्टीसाठी जळण पैदा करायचे म्हणजे काही सोपी गोष्ट नव्हती; पण जोधपूरपासून सोळाच मैलांवर बिश्नोई लोकाचे खेजडली गाव होते. या खेजडली गावाजवळ चुन्याच्या खाणी होत्या आणि खेजडीची शेकडो झाडेही होती. झाल! दिवाणांचा हुकूम निघाला 'खेजडली गावी चुन्याच्या भट्ट्या सुरू करा!'

कामगार कुऱ्हाडी घेऊन खेजडलीला पोहोचले. झाडावर घाव घालणार एवढ्यात गावचे बिश्नोई आडवे आले. त्यांनी विनविले, 'आम्ही ही झाडं जिवाभावाने वाढवली आहेत, जपली आहेत. ती तोडणं आमच्या धर्माविरुद्ध आहे. कृपा करून असा अधर्म करू नका!' कुऱ्हाडी म्यान करून कामगार परतले. हकीम ( दिवाण ) भंडारी गिरधरदासच्या कानावर ही हकीकत गेली. महाराजांचे काम - हकिमाचा हुकूम आणि त्याची अशी ही अवज्ञा! हकिमाचे माथे भडकले. फौज - फाटा घेऊन हकीम जातीने खेजडलीला पोहोचला. कामगारांना हुकूम केला- 'बिश्नोईंचे ऐकू नका, झाडं तोडा!'

कामगार कुऱ्हाडी घेऊन सरसावले. सारा गाव खेजडीच्या वनात जमा झाला. हकिमाच्या विनवण्या करू लागला. 'झाडं तोडू नका. आमचा धर्म बुडवू नका!' हकीम हट्टाला पेटलेला. तो गरजला, 'घाव पडणारच, झाडं तुटणारच!' पण हकिमाला माहीत नव्हतं की गावात होती एक रणचंडी-बिश्नोई रामखोडची बायको- अमृतादेवी. ती हकीमावर कडाडली, 'झाडं तुटतील आम्ही तुटल्यावरच, आधी नाही!' तिने आणि तिच्या मुलींनी झाडांना मिठ्या घातल्या! एवढा अपमान आणि एका यःकश्चित बाईकडून? हकिमाचे माथे भणाणले! 'बघता काय? घाला घाव-' हकिमाचा हुकूम पुरा व्हायच्या आत चौघींचे झाडासकट तुकडे उडाले! पण पुढचा कामी आला म्हणून मागे हटणारी अवलादच नव्हती ती! अमृतादेवी आणि मुली धारातीर्थी पडल्यावर पुढे धावला रामखोड, मग चाचोजी, उधोजी, कान्होजी, किसनोजी. सर्वस्वाच्या या 'तागात' ( त्यागात ) गावच्या बायकाही काकणभर मागे नव्हत्या. अमृतादेवी अपवाद नव्हती. पुरुषांच्या बरोबरीनेच गावच्या दामी, देऊ, चिमाने उभे आयुष्य भिरकावून दिले. गावकऱ्यांना उचंबळून आलं. झाडा-झाडाला त्यांनी मिठ्या घातल्या. हकिमाच्या मस्तकात खून चढलेला! बघता-बघता ३६३ बिश्नोई वीरांगना-वीर खेजडीच्या झाडासकट तोडले गेले!

खेजडलीच्या बलिदानाची वार्ता चोहो दिशांना वाऱ्यासारखी फैलावली. गावोगावचे बिश्नोई खेजडलीला धावत आले. दरबारात महाराजांना वर्दी गेली. महाराज जातीने घोड्यावर स्वार होऊन खेजडलीला आले. पाहातात तो काय शेकडो बिश्नोईंची जमात आक्रोश करीत आहे आणि हजारोंनी 'तागा'ला सिद्ध आहे. महाराज सुन्न होते. तिथल्या तिथे लोकांची माफी मागून महाराजांनी वचन दिले, 'यापुढे बिश्नोईंच्या गावापासचे एकही हिरवे झाड तुटणार नाही.

पशुहत्या होणार नाही. एवढेच नाही तर कोणी बिश्नोई दुसऱ्या गावी गेला आणि त्याला कोणी झाड तोडताना वा शिकार करताना दिसला तर मना करण्याचा अधिकार आहे. सर्वांनी तो मानलाच पाहिजे!'

खेजडलीचे बिश्नोई आजही आपल्या तेजस्वी परंपरेला जपत आहेत. हुतात्म्यांच्या स्मरणार्थ उभारलेल्या ध्वजस्तंभापेक्षा खेजडलीच्या आसमंतात बहरलेले खेजडी-बोरी आणि त्यातून निर्भयपणे विहरणारे कृष्णमृगांचे कळप आपल्याला खूप काही सांगून जातात!

मोहिमेच्या अनुदानाचे मंजुरी पत्र डिसेंबरमध्ये हाती पडले तरी संबंधित करारनामे वगैरे ताबडतोब पाठवायचे होते आणि मुख्य म्हणजे मोहीम सरकारी आर्थिक-वर्ष पूर्ण व्हायच्या आत म्हणजे मार्च अखेरपर्यंतच आटो-पायची होती. म्हणजे अक्षरशः रात्र थोडी सोंग फार अशी स्थिती आली! पण आमची मित्रमंडळी, विशेषतः 'मंडळी' आमच्या या नसत्या उठाठेवींना सरा-वलेली होती. त्यांच्या भरवशावर किल्ला लढवायचा ठरवला!

अनुदानाच्या आघाडीवर थोडी निश्चितता लाभल्यावर आता मुख्य काम-गिरी होती मोहिमेतले साथीदार निवडण्याची. इंद्रावतीमोहिमे'चा थोडा-फार अनुभव गाठीला असला तरी दोन्ही मोहिमांच्या उद्दिष्टांमध्ये मूलतः फरक होता. 'इंद्रावती-मोहिमे'द्वारा आम्हाला लोकांचे लक्ष आदिवासींच्या प्रश्नाकडे वळ-वायचे होते व ज्यांना या प्रश्नात आस्था होती त्यांना आदिवासी-जीवन जवळून दाखवायचे होते. उत्तराखंड-मोहिमेतून आम्हाला आदिवासी-वनवासी भागात अगोदरच कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांचे पर्यावरण, निसर्ग-संतुलन व मानवी जीवनसंबंध यांकडे लक्ष वेधायचे होते. साहजिकच साथीदार मुख्यत: सामाजिक संस्था-संघटनांतील कार्यकर्ते राहणार होते व त्यांच्या जोडीला इतर पर्यावरण-प्रेमी असणार होते.

मोहिमेतील साथीदार अशा संस्था-संघटनांतून येणार होते. प्रत्येक संस्था-संघटनांनी दोन किंवा तीन कार्यकर्ते पाठवावेत व त्यामधील एक आदिवासी कार्यकर्ता / कार्यकर्ती असावी असं आम्ही सुचवलं होतं. निवड अर्थातच संघट-नांनी करायची होती. मोहिमेसाठी दरडोई कमीत कमी पाचशे रुपये खर्च येणार होता आणि अनुदानातून काही खर्च भागला तरी प्रत्येकाने कमसे कम

दीडशे रुपये वर्गणी भरावी अशी अपेक्षा होती.

सामाजिक कार्यकर्त्यांबरोबरच आम्हाला इतर पर्यावरणप्रेमी-अभ्यासक मोहिमेसाठी निवडायचे होते. उद्देश दोन-एक तर कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष कार्य-अनुभवाला काही शास्त्र-सिद्धांताची जोड मिळावी आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे निसर्गसंतुलन, वनसंवर्धनासारख्या व्यापक विषयात ग्रामीण-आदिवासी-शहरी भागातील लोकांची सांगड घातली जावी. उल्हास राजज्ञ या कार्यकर्त्या मित्राने याबाबत एकदा फार सुंदर लिहिले होते आदिवासी भागात काम करताना आणि शहरी भागात त्याविषयी चर्चा करताना अनेकदा जाणवायचं की, माणूसपणाची जाण आणि आच असलेले काही लोक सोडले तर बाकीच्या लोकांचे अनुभव-विश्व, हितसंबंध इतके वेगवेगळे आहेत की या दोघात काही समान धागाच गुंफता येत नाही. वन-संवर्धनाचा प्रश्न हाती घेतल्यापासून मात्र आम्ही शहरी बाबाला बजावून सांगतो, ' निसर्ग-संतुलन बिघडले तर वनवासी-आदिवासी बरबाद होतीलच; पण तुझीही कबर खणली जाईल. स्वतःच्या स्वार्थासाठी तरी जागा हो ! '

मोहिमेसाठी वर्तमानपत्रातून केलेल्या आवाहनालाही जोरदार प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून, समाजाच्या सर्व थरातून. बगाराम तुळपुळ्यासारख्या अनुभवी कार्यकर्त्यापासून ते हडपसरला मटणशॉप चालविणाऱ्या अब्दुल शेखपर्यंत नानाविध लोकांची पत्रं आली. अगदी बोटभर कार्डावर गिरवलेल्या अक्षर-ओळखीपासून निसर्ग-ग्रंथावर लिहिलेल्या प्रकांड निबंधापर्यंत ! वय-शिक्षण-अनुभव आदींबाबत आम्ही माहिती मागवली होती. ही माहिती असायचीच, आणखी खूप काही असायचे. अशी पत्र वाचणं हा एक विलक्षण अनुभव असतो. काही पत्र मुद्देसूद असतात आणि फक्त मुद्देसूदच असतात. काही आपल्याशी बोलतात तर काही स्वतःशीच बोलत असतात. कुणाला अनुभव असतो. अधिकार असतो. अनुभवाचा अधिकार असतो. आम्हाला ' निवडणारे ' तुम्ही कोण चे आक्रमण शब्दाशब्दांतून व्यक्त होत असते. तर काही अनुभवी, अधिकारी असून आर्जवी असतात. अशा या पत्रांतूनच काही वेळा नकळत ऋणानुबंध फुलत जातात आणि काही वेळात उमललेल्या कळी मारखे मिटलेही जातात !

मवरनाकडून आलेली नाव सोडून निवड करताना अनुभवपात्रतेबरोबरच साडेचारशे रुपये वर्गणी भरू शकणाऱ्या उमेदवारांचा अग्रक्रमाने विचार

करायचा होता शिवाय एक घटक होता महिलांच्या निवडीचा. मोहिमेत महिला असाव्यात की नसाव्यात असा सवालच नव्हता. किंबहुना ' चिपको ' आंदोलनात महिलांचा जास्त सहभाग असल्याने त्यांच्याशी संवाद-संपर्क साधायला पथकामध्ये महिलांचा समावेश अपेक्षित होताच. संघटनांकडून महिला कार्यकर्त्यांची नावंही आली होती; पण ती पुरेशी नव्हती पथक पुढे पाच गटांमध्ये विभागले जाणार होते. म्हणजे प्रत्येक गटाबरोबर दोन या हिशेबाने महिलांची संख्या किमान दहा तरी हवी होती. जाहीर आवाहन करताना आम्ही जरा साशंकच होतो. किल्ले रायगड-राजगड वा कुलू-मनाली सफरीच्या वाटा रुळलेल्या असतात, पण या अनोख्या मोहिमेत कोण सहभागी होणार आणि तेही मार्च-एप्रिलच्या ऐन परीक्षेच्या मोसमात? पण ' इंद्रावती 'प्रमाणे याही वेळेस काही बहाद्दर निघाल्या. उत्तराखंड मोहीमच कशाला, हिमालयातील इतर मोहिमांचा अनुभवही असाच आहे. आपण मात्र तोंडाने व्हॅलेंतिना तेरेस्कोवाचे कौतुक करत मुलींच्या ' जाती 'ला पदराखाली किती झाकणार देव जाणे!

साथीदारांच्या निवडीबरोबरच आणखी एक महत्त्वाचे काम पार पाडायचे होते– मोहिमांच्या भागातील तयारीवर शेवटचा हात फिरवण्याचे. अशा मोक्याच्या वेळी मदतीला धावला आमचा आलापल्लीचा दोस्त शेखर! शेखर मूळचा बंगलोरचा उत्तम औषधव्यवसाय असलेला. घरचा सुख-संपन्न. खूप हिंडला-फिरलेला. सर्व शौक-मौज केलेला. एक दिवस उठला आणि सरळ भमरागडच्या लोकबिरादरी प्रकल्पामध्ये दाखल झाला. विरक्ती म्हणून नाही, तर खऱ्या-खुऱ्या जीवनावर आसक्ती म्हणून. मुलूख नवीन. माणसं नवीन. भाषा नवीन; पण आदिवासींमधील एक झाला. आपल्याला रुचतील आणि पटतील असे प्रयोग शेखर करत आहे. सर्व प्रतिकूल परिस्थितीत. जिगरीने!

शेखर आला आणि आम्ही निर्धास्त झालो. माणस तीन प्रकारे काम करतात. काही डोक्याने, काही अंत:करणापासून आणि काहीजण दोन्ही मिळून!

मोहिमेची सुरुवात डेहराडूनपासून होणार होती. पुण्याहून डेहराडूनला जायचं तर झेलम एक्स्प्रेसने दिल्लीला जाऊन रात्रीची मसुरी क्वीन पकडायला

लागली असती. दोन्ही गाड्या तडाख्याने जातात; पण दोघींच्या वेळामध्ये जेमतेम दोन-तीन तासाचे अंतर आणि दोघींची तऱ्हाही उफराटी. एक वर्तमान-काळात संपणार तर दुसरी भूतकाळात निघणार. (नवी दिल्ली–जुनी दिल्ली स्टेशन) त्यातून पन्नास जणाची सर्कस! मुंबईहून डेहराडून एक्स्प्रेस थेट मुक्कामी जाते; पण मुंबईत एक तर एकत्र जमायचे कुठे आणि दुसरी गोष्ट म्हणजे डेहराडून 'एक्स्प्रेस' तब्बल चाळीस-पंचेचाळीस तासाच्या प्रवासाने मुक्काम गाठणार. म्हणजे रिझर्व्हेशन असल तरी माणसाचा रायता व्हायचा! आणि अजून रिझर्व्हेशनचा पत्ता नव्हता. रिझर्व्हेशनसाठी नावांची अंतिम यादी आवश्यक होती आणि अनेकांच्या अनंत अडचणी सुटेपर्यंत नाव पक्की करता येत नव्हती. अखेर फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात यादी घेऊन मुंबईला धडकलो. आम्हाला २८ फेब्रुवारीला निघायचे होते. म्हणजे अजून वीसबावीस दिवस हाती होते. शिवाय सुट्ट्यांचा हंगाम दूर होता; पण मुंबईच्या महा-नगरीत हंगाम एकच– तोबा गर्दीचा! अथपासून इतिपर्यंत. २८ तारखेच्या डेहराडून एक्स्प्रेसला स्लीपर-बर्थ मोजकेच शिल्लक होते. एजंटांकडून मिळ-ण्याची शक्यता होती; पण आम्ही बहुसंख्य साथीदाराकडून प्रत्येकी फक्त दीडशे रुपये घेतले होते आणि मुंबई-दिल्ली-डेहराडून-मुंबई या नुसत्या प्रवासाचेच दीडशे रुपये होत होते. स्लीपर परवडला असता; पण वर कमिशन मुष्कील, गरिबी वाईट! सर्व चौकशा-विनंत्या केल्या; पण उत्तर एकच–सॉरी! अखेर माहिती समजली. 'विभागीय वाणिज्य अधिक्षकाला' (Divisional Commer cial Superintendent) बैठकीच्या चाळीस जागा द्यायचा अधिकार (कोटा) असतो. आता डेहराडूनपर्यंत बसून जायचे म्हणजे आमचा 'बैठा पारसी' व्हायचा! पण विलाज नव्हता. राजीव पाटील ह्या मित्राला बरोबर घेऊन विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते श्री. ग. प्र. प्रधान ह्यांना गाठले. विरोधी पक्ष-नेता म्हणजे बडी आसामी! कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याच्या तोडीची. साहजिकच कामांची-माणसांची अनेक अवधाने. तरीही प्रधानमास्तरांनी आमच्या विनंती-नुसार आवश्यक ते शिफारसपत्र तातडतोब द्यायची व्यवस्था केली. आम्ही ते पत्र आणि नावांच्या यादीच्या चार प्रती सर्व काही विभागीय वाणिज्य-अधीक्षक मजकूर दरबारी रीतसर दाखल केले. हुकूम मिळाला, प्रवासाच्या दोन दिवस आधी येऊन तिकीट घेऊन जा!

प्रवासाच्या दोन दिवस आधीपर्यंत हातात तिकीट नाही म्हणजे डोक्यावर

टागती तलवारच ! पण कार्यालयातील मेहरबान बाईसाहेबानी खुलासा केला तिकीट पक्के आहे; पण सगळे सोपस्कार करायला एवढे दिवस लागतीलच !

'आम्हाला अर्जाची निदान पोच तरी द्याल का ?'– आम्ही.

'आमची तशी पद्धत नाही. विश्वास नसेल तर अर्ज परत घेऊन जा—' बाईसाहेब.

आता आली का पंचाईत ! हातात तिकीट नाही की अर्जाचा साधा पोहोच पुरावा नाही. मागावा तर एकदम भरोसेका सवाल ! तोही मॅडमसाहेबाकडून ! जास्त आग्रह धरण्यात अर्थ नव्हता. नाही तर अर्जासकट आपणही केराची टोपली गाठायची गॅरटी. गुमान माघारी फिरलो !

प्रवासाच्या चार दिवस आधी राजीवचा पुण्याला एकाएकी फोन– 'तावड-तोब मुंबईला ये. तिकीटाचा वाधा झाला आहे. आपल तिकीट दुसऱ्याना दिल आहे !'

'अरे, पण अस कसं होईल ?–' मी.

'कसं होईल काय ? झाल आहे. इथे ये आणि बघ -' राजीव.

वास्तविक आयत्या वेळी काही घोळ नको म्हणून राजीव प्रवासाच्या दोन दिवस नाही तर चार दिवस आधी तिकीट घ्यायला गेला होता, पण तरीही काही तरी घोटाळा झाला होताच. आता त्याला एकट्याला पिटाळण्यात काही अर्थ नव्हता. कारण एक तर बिचाऱ्याची एल.एल.बी.ची परीक्षा जवळ आलेली. त्यातून घरी बहिणीचं लग्न चार दिवसावर आलेलं आणि हा लढतोय 'आधी लगीन कोंडाण्याच' या थाटात !

दुसऱ्या दिवशी सकाळी-सकाळी राजीव आणि मी बॉम्बे सेंट्रलला दुबे-साहेबांच्या केबिनमध्ये हजर. मनात गोंधळ–आश्चर्य-संताप यांचे कॉकटेल. कोणत्याही क्षणी स्फोट होईल असं– पण मना दुर्जना शांतिपथेचि जावे.

'साहेब, आम्ही २८ फेब्रुवारीच्या डेहराडून एक्स्प्रेससाठी ग्रुप तिकिटाचा अर्ज केला होता'– मी.

'माहीत आहे मला. तुमचे तिकीट आम्ही 'चुकून' आमदार भाई बदरकर आणि पार्टीला दिले आहे.'– दुबे.

'पण साहेब, अशी चूक कशी होईल ? संस्थेचे नाव, प्रवाशाची नाव, जायच ठिकाण सर्व वेगळ आहे -' मी.

'मला माहीत आहे. तुमच्या 'ऐवजी' दिलं आहे'– साहेब.

दीडशे रुपये वर्गणी भरावी अशी अपेक्षा होती.

सामाजिक कार्यकर्त्यांबरोबरच आम्हाला इतर पर्यावरणप्रेमी-अभ्यासक मोहिमेसाठी निवडायचे होते. उद्देश दोन-एक तर कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष कार्य-अनुभवाला काही शास्त्र-सिद्धांताची जोड मिळावी आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे निसर्गसंतुलन, वनसंवर्धनासारख्या व्यापक विषयात ग्रामीण-आदिवासी-शहरी भागातील लोकांची सांगड घातली जावी. उल्हास राजज्ञ या कार्यकर्त्या मित्राने याबाबत एकदा फार सुंदर लिहिले होते आदिवासी भागात काम करताना आणि शहरी भागात त्याविषयी चर्चा करताना अनेकदा जाणवायचं की, माणूसपणाची जाण आणि आच असलेले काही लोक सोडले तर बाकीच्या लोकांचे अनुभव-विश्व, हितसंबध इतके वेगवेगळे आहेत की या दोघात काही समान धागाच गुफता येत नाही. वन-संवर्धनाचा प्रश्न हाती घेतल्यापासून मात्र आम्ही शहरी बाबाला बजावून सांगतो, ' निसर्ग-संतुलन बिघडले तर वनवासी-आदिवासी बरबाद होतीलच; पण तुझीही कबर खणली जाईल. स्वतःच्या स्वार्थासाठी तरी जागा हो ! '

मोहिमेसाठी वर्तमानपत्रातून केलेल्या आवाहनालाही जोरदार प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून, समाजाच्या सर्व थरातून. बगाराम तुळपुळ्यासारख्या अनुभवी कार्यकर्त्यापासून ते हडपसरला मटणशॉप चालवि-णाऱ्या अब्दुल शेखपर्यंत नानाविध लोकांची पत्र आली. अगदी बोटभर कार्डावर गिरवलेल्या अक्षर-ओळखीपासून निसर्ग-बचावर लिहिलेल्या प्रकांड निबंधापर्यंत ! वय-शिक्षण-अनुभव आदींबाबत आम्ही माहिती मागवली होती. ही माहिती असायचीच, आणखी खूप काही असायचे. अशी पत्र वाचणं हा एक विलक्षण अनुभव असतो. काही पत्र मुद्देसूद असतात आणि फक्त मुद्देसूदच असतात. काही आपल्याशी बोलतात तर काही स्वतःशीच बोलत असतात. कुणाला अनुभव असतो. अधिकार असतो. अनुभवाचा अधिकार असतो. आम्हाला ' निवडणारे ' तुम्ही कोण चे आक्रमण शब्दाशब्दांतून व्यक्त होत असते. तर काही अनुभवी, अधिकारी असून आर्जवी असतात. अशा या पत्रातूनच काही वेळा नकळत ऋणानुबंध फुलत जातात आणि काही वेळात उमललेल्या कळी मारखे मिटलेही जातात !

संघटनाकडून आलेली नाव सोडून निवड करताना अनुभवपात्रतेबरोबरच साडेचारशे रुपये वर्गणी भरू शकणाऱ्या उमेदवाराचा अग्रक्रमाने विचार

करायचा होता शिवाय एक घटक होता महिलांच्या निवडीचा. मोहिमेत महिला असाव्यात की नसाव्यात असा सवालच नव्हता. किंबहुना 'चिपको' आंदोलनात महिलाचा जास्त सहभाग असल्याने त्यांच्याशी संवाद-संपर्क साधायला पथकामध्ये महिलाचा समावेश अपेक्षित होताच. संघटनांकडून महिला कार्यकर्त्यांची नावही आली होती, पण ती पुरेशी नव्हती. पथक पुढे पाच गटामध्ये विभागले जाणार होते. म्हणजे प्रत्येक गटाबरोबर दोन या हिशेबाने महिलाची संख्या किमान दहा तरी हवी होती. जाहीर आवाहन करताना आम्ही जरा साशंकच होतो. किल्ले रायगड-राजगड वा कुलू-मनाली सफरींच्या वाटा रुळलेल्या असतात; पण या अनोख्या मोहिमेत कोण सहभागी होणार आणि तेही मार्च-एप्रिलच्या ऐन परीक्षेच्या मोसमात ? पण 'इन्द्रायणी'प्रमाणे याही वेळेस काही बहाद्दर निघाल्या. उत्तराखंड मोहीमच कशाला, हिमालयातील इतर मोहिमांचा अनुभवही असाच आहे. आपण मात्र तोंडाने व्हॅलेंतिना तेरेस्कोवाचे कौतुक करत मुलींच्या 'जाती'ला पदराखाली किती झाकणार देव जाणे !

साथीदारांच्या निवडीबरोबरच आणखी एक महत्त्वाचे काम पार पाडायचे होते- मोहिमांच्या भागातील तयारीवर शेवटचा हात फिरवण्याचे. अशा मोक्याच्या वेळी मदतीला धावला आमचा आलापल्लीचा दोस्त शेखर ! शेखर मूळचा बंगलोरचा. उत्तम औषधव्यवसाय असलेला. घरचा सुख-संपन्न. खूप हिंडला-फिरलेला. सर्व शौक-मौज केलेला. एक दिवस उठला आणि सरळ भमरागडच्या लोकबिरादरी प्रकल्पामध्ये दाखल झाला. विरक्ती म्हणून नाही, तर खऱ्या-खुऱ्या जीवनावर आसक्ती म्हणून. मुलूख नवीन. माणसं नवीन. भाषा नवीन; पण आदिवासींमधील एक झाला. आपल्याला रुचतील आणि पटतील असे प्रयोग शेखर करत आहे. सर्व प्रतिकूल परिस्थितीत. जिगरीने !

शेखर आला आणि आम्ही निर्धास्त झालो. माणस तीन प्रकारे काम करतात काही डोक्याने, काही अंतःकरणापासून आणि काहीजण दोन्ही मिळून !

मोहिमेची सुरुवात डेहराडूनपासून होणार होती. पुण्याहून डेहराडूनला जायचं तर झेलम एक्स्प्रेसने दिल्लीला जाऊन रात्रीची मसुरी क्वीन पकडायला

'साहेब, 'चुकून' दिलं की, 'ऐवजी' दिलं? 'ऐवजी' दिलं असेल तर मग आम्हाला तिकीट पक्कं झाल्याचं आश्वासन का दिलं? आणि बदल केला तर साधं कळवायचीही तसदी घेतली नाही!'- मी.

'हे पहा त्यानीही प्रधानाचं पत्र आणलं होतं आणि हा माणूस असाच पत्र देत राहिला तर माझाही निरुपाय आहे. तुम्हाला पाहिजे असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो. नंतरच तिकीट पाहिजे असेल तर कोणत्या तारखाना रिझर्व्हेशन मिळेल याची अगोदर चौकशी करा!'- दुबे.

प्रधानमास्तरानी आणखी एक पत्र दिले आहे हे ऐकून आम्ही चाट पडलो आणि हा बाबा तर 'तुम्हाला पाहिजे असेल तर दिलगिरी व्यक्त करतो'चे नक्राश्रू ढाळणारा! तरीही मन आणि आवाज काबूत ठेवून मी परत दुबे-साहेबाना म्हटलं-

'साहेब, आम्हाला खूप दूरचा प्रवास करायचा आहे. पुढचे सर्व कार्यक्रम ठरलेले आहेत. पन्नास माणसाचा काफिला आहे. आपल्या दिलगिरीऐवजी सहकार्यानं प्रश्न सुटेल-'

'मी एकदा काय ते सांगितलं. आपण जाऊ शकता!'- दुबे.

साहेबानी ब्रह्मवाक्य म्हटलं डोस्कं असं सनकलं होतं की, वाटलं या माणसाच्या कानाखाली सणकन जाळ काढावा आणि मग सांगावं तुला पाहिजे असेल तर तुझी माफी मागतो- चुकलो, दिलगिरी व्यक्त करतो! करू शकलो असतो. सहज करू शकलो असतो; पण असला चोख 'असंस्कृतपणा'करण्याचे दिवस हिरव्या जवानीबरोबरच संपले असावेत. एरवी उगाच आगाऊपणा करणाऱ्या प्रोफेसराचे ब्रकोट धरणारे रक्त उसळल्याबाचून राहिले नसते. कसं तरी मन आवरलं. साहेबाच्या निर्विकारपणाचा खुन्नस आला होताच; पण प्रधानमास्तराच्या पत्राचे कोडे काही उलगडेना. त्यांना भेटल्याशिवाय ते सुटणार नव्हते. एकदाचे ते फोनवर भेटले.

'सर, आपण आम्हाला प्रवासाबद्दल एक पत्र दिलं होतं. त्याचा घोटाळा झाला आहे.'

'हो. भाई बंदरकर मच्छीमाराना घेऊन दिल्लीला मोर्चासाठी जात आहेत. दोन महिन्यापूर्वी मी त्यांना पण पत्र दिलं होतं.'

'पण सर, आपण आमच्या पत्रात संस्थेचं नाव, प्रवासाची तारीख, गाडी अगदी स्पष्टपणे नमूद केलं आहे '

'हे पहा, आता विरोधी पक्षनेता रेल्वे रिझर्व्हेशनचं काम करणार की त्रिविमंडळाची काम बघणार.'

'पण सर, आपल्या पत्रानुसार त्यानी आम्हाला पक्क तिकीट द्यायच कबूल केल होत.'

'अहो गोडबोले, आम्ही पत्र दिल तरी तो काही आमचा अधिकार नाही. आम्ही फार तर त्या अधिकाऱ्यांना विनती करू शकतो.'

मास्तराच म्हणण खरं होत. ते फक्त विनती करू शकत होते. आम्हाला उगाचच वाटत होतं की, विनती असली तरी ती कॅबिनेट दर्जाच्या एका जबाबदार अधिकारी व्यक्तीची आणि तीही शभर टक्के कायदेशीर गोष्टीसाठी, कायदेशीर रीतीने केलेली आहे. झालेल्या चुकीबद्दल मास्तर संबंधित अधिकाऱ्याला सनदशीर मार्गानेच निदान जाब विचारतील, पण मास्तराचे सुसंस्कृत समाजवादी मन विनतीच्या आचार-संहितेबाहेर पडायला तयार नव्हते. आमचंच चुकलं. काम करावी आणि राज्य करावं काँग्रेसवाल्यानीच! ना. य. डोळ्यानी 'झोत' मध्ये एक अतिशय मार्मिक गोष्ट लिहिली होती. आठवते तशी सांगतो.

एक शेतकरी त्याची म्हैस विकण्यासाठी जनावराच्या बाजारात गेला. म्हैस अगदी काळीभोर, जाडजूड, धिप्पाड होती. शिंगही हवी तितकी वेडीवाकडी होती.

म्हैस विकत घेणाऱ्याचे लक्ष या म्हशीन चांगलच वेधून घेतल. त्या शेतकऱ्यान म्हशीची किंमत चार हजार रुपये सांगितली.

गिऱ्हाइकान प्रश्न विचारला— 'म्हैस दूध किती देते?'

'दूध मुळीच देत नाही.'

'सध्या गाभण आहे वाटत?'

'नाही!'

'का? गाभण होत नाही का?'

'नाही!'

'का?'

'तिचा गाभण होण्याचा विचार नाही!'

'असं का बुवा?'

'तिचा आणि माझा दोघाचा विरोध आहे.'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. . . . . .
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

‘ मग दूध कस देणार ? ’

‘ दूध देणारच नाही ! ’

‘ मग चार हजाराला तुझी म्हैस खरेदी करावी अस तुझ्या म्हशीत आहे तरी काय ? ’

‘ चारित्र्य ! अत्यत विशुद्ध चारित्र्यसपन्न जीवन जगण्याचा तिचा निश्चय आहे ! ’

प्रधान मास्तरानी आमचा दोर कापला तरी आम्हाला शहाणपण सुचलं नाही. अन्याय-निवारणार्थ आम्ही दीड दिवस धडपडत राहिलो. रेल्वेचे वरिष्ठ –कनिष्ठ अधिकारी, पत्रकार-सत्रकार, आमदार–नामदार सर्व काही पालथे घातले, पण एखादा अपवाद वगळता परिस्थितीचे गांभीर्य कोणी लक्षात घेईना! एक तर प्रत्येकाच्या अन्यायाच्या कल्पना सोयिस्कर वा एकदम सर्वव्यापी होत्या. म्हणजे ‘ जगात असं चालायचंच ’ किंवा एकदम ही ‘ व्यवस्था ’ बदलल्याशिवाय काही होणार नाही ! अनेकांच्या गाड्या दुबेसाहेबांच्या ‘ डेड एन्ड ’ला थाबत होत्या ! शेवटी सन्माननीय माघार घेतली आणि निमूटपणे १ मार्च सकाळचे फिरोझपूर जनतेचे तिकीट घेतले !

दिनांक २८ फेब्रुवारी. वार रविवार. दुपारी बारा वाजेपर्यंत सर्व साथीदारांना ताडदेवच्या जनताकेंद्रात बोलावलेले. दाही दिशांतून साथीदार येणार !

एकेक साथीदार जमत होते. सलाम–झिंदाबाद झडत होते. मी वर-वर उत्साहात इकडे–तिकडे दौड–धूप करत होतो; पण खरं तर मनातल्या मनात पार घाबरलो होतो. आता पुढचे तीन आठवडे पन्नास जणाची ही सर्कस साभाळायची. नाना प्रकृतीचे-पार्श्वभूमीचे साथीदार. काही वयाने-अनुभवाने-( ज्ञानाने ) श्रेष्ठ त्याचे एकमेकाशी, आपल्याशी पटेल का ? जुळेल का ? की कामापेक्षा नस्ती उस्तवारच जास्त करावी लागेल ? कशाला या झझटीमध्ये पडलो ? मी भटकलो खूप होतो; पण ‘ इद्रावती मोहिमे ’चा एखादा अपवाद वगळता बहुतेक वेळा ‘ एकला चलो रे ’ वा एखाद्या जोडीदाराला घेऊन ! त्यातून आताच्या साथीदारापैकी बहुसख्य कार्यकर्ते. काही भलतेच कडक कार्यकर्ते ! प्रत्येकाचे ठाशीव रंग. मी तर कोणत्याही सघटनेचा टिळा न

लावलेला वा 'वादात' न पडलेला. रक्तातच नाही. ही मर्यादा की ताकद ? आता पुढचे तीन आठवडेच ठरवतील. आता माघारी फिरणे नाही, दोर कापलेले !

प्रवासाला निघण्यापूर्वी एक अनौपचारिक निरोप-समारंभ ठरला होता. एका भरवशाच्या मित्राने जबाबदारी स्वीकारली होती; पण कसचं काय ? आयत्या वेळी मित्र लापता ! आता निरोप द्यायला-घ्यायला उरलो आमचे आम्ही, काही जवळची मित्र-मंडळी आणि 'आजच्या बातम्या' कव्हर करण्यासाठी आलेली टी. व्ही. ची मंडळी. सामानाची तपासणी, परस्पर परिचय, सूचना, गाणी वगैरे कार्यक्रम पार पडले आणि मंडळी गप्पा-गोष्टी-जेवण करेपर्यंत नागेश, अनिल गोरे आणि मी सभासदांचे पाच गट पाडण्याच्या महत्त्वाच्या उद्योगाला लागलो.

डेहराडूनच्या सामायिक मुक्कामानंतर पथकाची पाच गटात विभागणी होणार होती आणि भागीरथी-अलकनंदेच्या खोऱ्यातील खेड्यात ते गट स्वतंत्रपणे दहा दिवस फिरणार होते. मोहिमेच्या यशासाठी प्रत्येक गटाची निवड महत्त्वपूर्ण ठरणार होती. प्रत्येक भागाच्या व सभासदाच्या वैशिष्ट्यानुसार गट-विभागणी करायची होती. मोहिमेच्या निमित्ताने वेगवेगळ्या संघटनातील कार्यकर्ते एकत्र यावेत-राहावेत-बोलावेत म्हणून शक्यतो एकाच संघटनेतील वा विभागातील कार्यकर्ते एका गटात येऊ नयेत असा आमचा कटाक्ष होता. प्रकृतीची स्वभावाची समीकरणे पण सांभाळायची होती. पहिल्या पत्रापासून वा भेटीपासून आम्ही साथीदारांविषयी काही आडाखे-आराखडे मनात बांधत होतो. काही जणांनी पहिल्या सलामीलाच धोक्याचा कंदील दाखवला होता तर काहींशी न बोलताच आश्वासकतेचा इशारा मिळाला होता. नागेशने गट-विभागणीची यादी वाचून दाखवली मात्र आणि एकच हंगामा झाला ! कोणाला अमुक एकाचीच कंपनी पाहिजे होती, तर कोणाला अमुक एका भागातच जायचे होते. कोणाची तक्रार तार-स्वरात होती तर कोणाची नाराजी डोळ्याच्या कोपऱ्यातून बोलत होती. यादी अंतिम नव्हती; पण आता तसं सांगणं म्हणजे गोंधळात भर पडली असती आणि सर्वांच्या पसंतीची गट-विभागणी जगाच्या अंतापर्यंत शक्य नव्हती ! एकदर पुढच्या कार्यक्रमाच्या दृष्टीने 'नेते'पण गाजविण्याचा आणि दाखविण्याचा हाच क्षण होता आणि कितीही अप्रिय असला तरी मी तो पकडण्याचा ठरविला. सर्व हरकती-तक्रारी क्षणार्धात बाद केल्या आणि सर्वांना पहाटे चारला तैय्यार होण्याचे फर्मान सोडून शांतपणे

झोपी गेलो. माझ्या सार्थदारांचा मोठेपणा असा की, कितीही अडी-अडचणी आल्या, तणाव आले तरी त्यांनी सुखाची घडी कधीही विघडू दिली नाही !

गाडी सकाळी पावणे सातला होती. आम्हाला बैठकीच्या चाळीस आरक्षित जागा मिळाल्या होत्या; पण बाकी डबा बिगरराखीव होता. त्यामुळे पदरात पडतील तेवढे बर्थ पकडायला स्टेशनवर लौकर जाणे भाग होते. सगळेजण बरोबर चारला तयार झाले. मी मोठ्या रुबाबात 'क्विक मार्च 'चा हुकूम सोडला आणि आघाडीच्या वीराने शुभ-वार्ता सांगितली 'इमारतीच्या दरवाजाला बाहेरून कुलूप आहे ' म्हणून ! धावपळ करून आम्ही वॉचमनच्या घर-वाल्यांना उठवले, पण तेही आमच्याप्रमाणेच बंदीवान-पहिल्या मजल्यावर ! ' नवरा गस्त घालायला गेला आहे, येईल एवढ्यातच ! ' वॉचमनच्या बायकोने माहिती पुरवली. पधरा मिनिट झाली, अर्धा तास झाला, पाऊण तास झाला; पण ते कुलूप उघडेना की तो वॉचमनचा बच्चा येईना ! 'बापाला शोधायला पोराला पायपावरून उतरून पाठवू ! ' असं मी नुस्त म्हणताच ' माझ्या पोराच्या जिवावर उठलेऽऽत ! ' म्हणून त्या महामायेने एकदम मोठ्यादा गळाच काढला ! आमच्यातले काही हौशी वीर गिर्यारोहण करायला उत्सुक होतेच. दोन-चार जणाचे ठीक आहे; पण सामानसुमानासकट पन्नास जणांना पहाटेच्या अंधारात पायपावरून उतरवायला प्रत्यक्ष तानाजीची पण माय व्यायली नसती ! त्यातून शेवटी निघताना कोणाचा पाय-बीय घसरला तर ' गड गेला आणि सिंहही गेला ' अशी हालत ! पहाटेच्या पवित्र वेळी येतील त्या भाषांतील सुचतील ती 'मंगल स्तोत्र ' मी आळवत असताना शांतपणे काठी आपटीत आणि शिव्या फुकीत वॉचमनसाहेब आले ! सगळ्यांना कोंडून घालण्याची आपली जबाबदारी आपण व्यवस्थित पार पाडली अशा थाटात त्याने दार उघडले आणि वर कडकडीत सलाम ठोकला ! माणूस चूकही इतक्या इमानाने आणि मनापासून करतो तेव्हा रागाचा कापूर भुर्कन उडतो !

आमच्याकडे गाडी धुवायला एक छोटा नेपाळी पोरगा यायचा. थंडी असो पावसाळा असो हा भल्या पहाटे साडेसहा-सातला हजर ! एक दिवस वैतागलो आणि म्हटलं, ' उद्यापासून आठच्या आधी आलास तर तंगडी मोडीन ! ' दुसऱ्या दिवशी हा परत भल्या पहाटे हजर ! संतापाने मी बिथरणार तेवढ्यात त्याने शांतपणे विचारले, ' साहेब, किती वाजले ? '

डब्यातले बर्थ मिळायची आशा आता आम्ही सोडली होती. निदान आपला

डबा तरी शोधून काढावा या विचाराने मी आणि नागेश संबधित साहेबांना त्याच्या केबिनमध्ये गाठले. जणू काही ते आमची वाटच पाहत असावेत. ' या, तुम्हाला स्लीपर्स दिले आहेत. स्लीपरचे प्रत्येकी आठ-आठ रुपये काढा !' आम्ही काही बोलायच्या आतच त्यांनी फर्मावले.

आम्हाला बर्थ हवेच होते; पण ते सुरुवातीला मधल्या तिकीटाच्या गोंधळात आमच्या प्रवास-बजेटने मार खाल्ला होता. आता स्लीपर-बर्थ घ्यावे तर आणखी तीन-चारशेचा फटका होता. साहेब तर बर्थचा आग्रह सोडत नव्हते; पण मामला जरा गडबडीचा वाटला. ' स्लीपर आम्हाला परवडणार नाही ' म्हणून आम्ही सांगितल्यावर साहेबांनी सौदा सुरू केला. ' एवढे गर्दीचे दिवस असतानाही तुम्हाला स्लीपर-बर्थ देत आहे आणि तेही मस्त गाद्यागिर-द्यावाले ! आता जास्त न बोलता शंभर रुपये देऊन टाका ! ' असं म्हणून त्यांनी सौदा पक्काही करून टाकला. नुस्ता तोंडी नाही तर इतमानाने आम्हाला डबा दाखवून त्यावर चार ठिकाणी आमचे नाव खरडले. ' प्रवासात कोणी अडवणार नाही, अडविले तर बापाचे नाव सागणार नाही ! ' अशी चोख पावतीही दिली आणि खरोखर स्लीपरची कसलीही पावती नसताना, प्रवासात कोणी काहीही विचारले नाही ! कदाचित दिल्लीला परत-पाठवणीच्या स्लीपर-डब्यामध्ये नशिबाने आम्हाला आरक्षण मिळाले असेल व त्या भल्या माणसाने मधल्या-मधे ते पैसे लाटले असतील ! ते काही असो, ज्याच्यासाठी जिवाचा एवढा आटापिटा केला ती गोष्ट शेवटी अशी आणि अशा तऱ्हेने मिळावी. परमेश्वरा, तुझ्या आत्म्याला शांती लाभो !

मोहिमेतील बहुतेक साथीदार बॉंबे-सेंट्रललाच आले होते. वाटेत डहाणू-सजाणला कष्टकरी-संघटनेचे दोघेजण सामील होणार होते, पण त्या आधी अगदी अनपेक्षितपणे आणखी एक साथीदार मिळाला. गाडीने दादर सोडल्या-पासून आम्ही तिकीट आणि माणसांची संख्या याचा मेळ घालण्याचा प्रयत्न करीत होतो. ग्रुप-तिकीट चाळीस जणांचे होते. वरची सहा तिकिटे होती. अनिल गोरे आणि त्याचा एक स्नेही भरतपूरपर्यंत साथ करणार होते. म्हणजे एकूण अठ्ठेचाळीस तिकिटे होती सर्वांनी सर्व प्रकारे ' एकसाथ गिन्ती ' करून पाहिली; पण एक तिकीट जास्तीचे निघत होते. या गोंधळातच पालघर स्टेशन आले. स्टेशन आले की, ' जंगल बचाव, मानव बचाव ' वगैरे नारे व्हायचे. कर्जतचा प्रकाश मात्र आमच्याच गाडीत होता. घोषणाचा आवाज ऐकून

सहज डब्याकडे आला. त्याला पालघरलाच उतरायचे होते.

' काय रे, कुठे निघाली सर्व कंपनी ? '– भावे.

' हिमालयात अभ्यास–मोहिमेला येतोस का ? एक जास्तीचे तिकिट आहे '– मी.

' किती दिवस लागतील ?' – भावे.

' तीन आठवडे '– मी.

' पण माझ्याकडे सामान–कपडे काहीच नाही !'– भावे.

' काही तरी बदोबस्त करू. फिकीर करू नकोस ! '– मी.

गाडीने शिट्टी फुंकली. भावे गमतीचे बोलत असेल म्हणून निरोपासाठी मी भावेचा हात हातात घेतला, पण प्रकाश भावे पवनारच्या भाव्यांचे आचार्य निघाले ! बरोबरच्या कमलकडून प्रवास–खर्चासाठी काहीसे पैसे घेतले आणि सरळ गाडीत चढला. अगदी दादरहून चर्चगेटला जाऊन यावे इतक्या सहज–तेने. अक्षरश कसलीही फिकीर न करता. केवळ सुरुवातीलाच नाही, तर पुढे सबंध प्रवासातही सामान नाही म्हणून कुरकूर- किरकीर नाही. हम मान गये उनको !

डहाणू–सजाणला उरलेले दोन साथीदार आले. आणखी एक साथीदार आला. काही बडोंसाठी; पण या अनोख्या साथीदाराने आपल्या सुरांनी आमच्या मोहिमेत रंग भरला. आरपार सूर भरले. निरोप–समारंभाला लता मंगेशकर याव्यात अशी आमची फार इच्छा होती, तसा प्रयत्नही केला होता. त्या आल्या नाहीत; पण या अनजान कव्वालच्या सुरूपाने त्यांचे आशीर्वाद लाभले. आमच्यातही बहारु-सीताराम-प्रदीप-काळूराम असे कलाकार होते. त्यांची कलाकारी जाणून होतो, पण कुसुम-मुलाणी-मुन्ना अशी आणखी काही झाकली रत्न निघाली ! रत्न सर्वार्थान. कारण प्रत्येकाची गायकी आणि गायकीतून व्यक्त होणारा स्वभाव अगदी वेगवेगळा. ( माझा मित्र अनिल ' सुंदरा मना-मध्ये भरली ' आणि ' घनश्याम सुंदरा श्रीधरा ' नुसत्या एकाच सुरात नाही तर एकाच वृत्तीत गातो. विलक्षण अलिप्ततेने ! जग माया आहे या. असो. ) गाणी वेगळी, ढंग वेगळा; पण प्रत्येकजण अस्सल कलाकार ! ' चिपको ' आंदोलनात तर घनश्याम रतौडींनी आपल्या सुराशब्दानी अलौकिक किमया घडवलेली. अशा वेळी असे आणि इतके सुरेले साथीदार मिळणे परम भाग्यम् !

सर्व साथीदार जमले. ओळखी - पाळखी, गप्पा–टप्पा–गाण्याचे सूर जमले.

मी आणि अनिल हळूहळू इतर महत्त्वाच्या कामाला लागलो. दिल्लीपर्यंतच्या प्रवासात आम्ही दीड दिवस गाडीत घालवणार होतो. हा प्रवास आणि पुढची एकूण मोहीमच कारणी लागावी म्हणून आम्ही कार्यक्रमाची तपशीलवार आखणी केली होती. अभ्यासपाहणीच्या मार्ग-दर्शक प्रश्न-पत्रिकेबरोबरच गट-चर्चा, अहवाल, रोजनिशी याची रूपरेषा ठरवली होती. जास्तीत जास्त माहिती मिळविण्याबरोबरच कोणतेही डोके रिकामे राहता कामा नये हे मुख्य सूत्र होते. अनिल वाटेतल्या भरतपूरपर्यंतच येणार होता. मी शेवटपर्यंत असलो तरी पाचही गटांना पुरा पडणार नव्हतो. ठरल्याप्रमाणे सर्व गोष्टी पार पाडायची जबाबदारी मुख्यत. प्रत्येक गटनेता व उपनेत्यावरच होती. प्रवासात त्यांच्या-पासूनच सुरुवात केली.

प्रवासातला दीड दिवस अनिलची साथ खूपच उपयोगास आली. अनिल हाडाचा शिक्षक. त्यातून सख्याशास्त्राचा प्राध्यापक. सगळे विचार-सूचना स्पष्ट. कसला घोळ नाही. आम्ही अगोदर चर्चेचे टिपण तयार केले होते, पण त्याच्याही पलीकडे जाऊन पुढे करायच्या व न करायच्या सर्व गोष्टी, मुद्दे त्याने पिसून काढले. करावयाच्या गोष्टी सांगणे तसे सोपे होते; पण आमच्या-तील बहुसंख्य साथीदार कार्यकर्ते, आपापल्या भागात प्रबोधनाचे जोरदार काम केलेले, प्रबोधनाची सवय असलेले. उत्तराखंड सामाजिक-धार्मिकदृष्ट्या तसा पिछडाच. त्यामुळे डोळे-कान उघडे ठेवून माहिती जमा करण्यापेक्षा 'प्रबो-धनाची' ऊर्मी येण्याची शक्यता जरा जास्त. अर्थात तेथील कार्यकर्त्यांशी वैचारिक देवाण-घेवाण अपेक्षित होती; पण प्रतिपक्षाचा रागरंग पाहून. सुदैवाने गटनेते व साथीदार समजदार होते. एखाद-दुसरा अपवाद वगळता परिस्थितीचे भान सुटले नाही.

आम्ही गट-नेत्यांना 'ब्रीफ' केले आणि मग त्यांनी आपापल्या गटाला. गटातील सभासदांनी विचारलेले प्रश्न-खुलासे विचारात घ्यायला परत आम्ही गट-नेत्याबरोबर चर्चा केली.

सकाळी पक्ष्यांचे अभयारण्यवाले भरतपूर आले आणि आमच्यातले दोन पक्षी उडाले! अनिलचा निरोप घेताना काहीसं जिवावर आलं होतं. एक तर कामाच्या दृष्टीने त्याच्या साथीची जरुरी होती; पण मुख्यतः काही माणसं नुस्ती असणंच खूप काही असतं. शेवटी आकाश एक असलं तरी दिशा वेगळ्या असतात.

चर्चा-गप्पांत दिल्लीपर्यंत मजल मारली आणि आता नवीन घोर लागला.

दिल्लीहून आम्हाला लगेच बस पकडून जास्त रात्र होईपर्यंत डेहराडून गाठायचे होते. मी दिल्लीहून डेहराडूनला दोन-तीनदा गेलो होतो; पण प्रत्येक वेळा गाडीने. बस आयत्या वेळी ठरल्याने त्याची पूर्ण कल्पना नव्हती आणि डेहराडूनच्या बसेस कुठून सुटतात, काश्मिरी गेट की ' इंटर स्टेट बस टर्मिनस '-वरून की दोन्ही जागा एकच आहेत याबाबत नेहमीप्रमाणे जाणकारां'त एकमत नव्हते. शेवटी मुंबईहून माझ्या एका मित्राने त्याच्या दिल्लीच्या मित्राला फोना-फोनी केली आणि पुढची बसची चौकशी-व्यवस्था करण्याचे त्याने कबूल केले. त्यासाठी नवी दिल्ली स्टेशनवर तो आम्हाला भेटणार होता. आम्ही एकमेकांना पाहिले नसले तरी आमचा पन्नास जणांचा काफिला लपण्यासारखा नव्हता.

नवी दिल्ली स्टेशन आले. आम्ही जंगल बचाऽव मानव बचाऽवचे नारे लावायला सुरुवात केली. प्रथम धीमे-धीमे, मग अगदी बेंबीच्या देठापासून. आमच्या मित्राच्या मित्राला–सिद्दिकीला समजेल या आशेने. मग ' वुइ वॉन्ट सिद्दिकी ऽ सिद्दिकी 'च्या आरोळ्याही ठोकून झाल्या; पण सिद्दिकीचा पत्ता नाही. काही तरी घोटाळा झाला होता. गाडी पुढे जुन्या दिल्लीला निघाली. बस टर्मिनस जुन्या दिल्लीजवळ असेल, सिद्दिकीमहाराज तिथे येतील या आशेने आम्ही गाडीत बसून राहिलो. जुने दिल्ली आले. परत एकदा नारे झाले. इतक्या जोरांनी की सिद्दिकीच काय पण दिल्लीच्या थडग्यांतले तमाम अहमद महमद-खान-खिलजी जागे झाले असतील; पण आमच्या सिद्दिकीबाबाचा पत्ता नाही ! आता ' जंगल बचाव ' ऐवजी हमको बचाव 'ची पाळी आली ! कारण बसची सगळी व्यवस्था करण्याचे त्यांनी भरवोस आश्वासन दिल्याने आम्ही निश्चित होतो. आता आयत्या वेळी आफत झाली होती. आम्ही पडते चेहरे मात्रत प्लॅटफॉर्मवर उतरलो.

डब्यातील एक बुढा आमची मजा पाहत होता. त्यालाही दिल्लीला उतरायचे होते. आमचा सिद्दिकी सोहळा ' आटपेपर्यंत तो तसाच एका कोपऱ्यात उभा होता आणि मग हळूच पुढे होऊन म्हणाला, ' डेहराडूनची बस तुम्हाला इंटर स्टेट बस टर्मिनसवरूनच मिळेल. चला दाखवतो ! ' आम्ही निमित्तालाच टेकलो होतो. त्याचे वाक्य पुरे व्हायच्या आतच त्याची बाही पकडून निघालो. दोन-तीन फर्लांगावरील टर्मिनसकडे. जुन्या दिल्ली स्टेशनजवळील जुन्या पुलापासून टर्मिनसपर्यंतची आमची दांडीयात्रा ज्यांनी बघितली असेल ते जीव

धन्य झाले असतील !

या दुनियेचं आणि माणसाचं काही खरं नाही. सुतासारखं वागायला गेलं की, भुतासारखी वागतात आणि भुताची अपेक्षा केली की, सुतासारखी सामोरी येतात. तलाठी-हवालदार कंडक्टरसाहेबाकडून मी कधी एका सरळ शब्दाची अपेक्षा करत नाही; पण अनेकदा गाफील क्षणी हे धक्का देऊन जातात आणि दुनियेतील आतिथ्यशीलता-सौजन्य वगैरे वगैरेच्या समूर्त रूप असणाऱ्या हवाई-सुदऱ्या नुसत्या शुष्क-कोरड्या नमस्कारातच मारतात. आता दिल्लीसारख्या ठिकाणी वा एखाद्या दिल्लीकराकडून आम्ही मदतीची-मार्गदर्शनाची-प्रेमाच्या चार शब्दाची बिलकुल अपेक्षा केली नव्हती, पण आम्हाला रस्ता दाखवणाऱ्या सचदेवचाचानी पुढच्या स्पेशल बसची व्यवस्था केलीच; शिवाय वर आम्हा सर्वांना प्रेमाने चहा पिलवण्याचा हट्ट धरला. अशी ही साधीभोळी, जगाच्या दृष्टीने भाबडी पण जातिवंत माणसं भेटली की माणूसपणाचं अप्रूप जाणवतं. दिल्लीला केवळ सचदेवचाचांनीच सुखद धक्का दिला असं नाही तर परतीच्या तिकीटासाठी मागे राहिलेल्या साथीदारांनाही केवळ तासाभरातच परतीच्या रिझर्वेशनचे सर्व सोपस्कार पूर्ण करून दिल्लीकरानी मोकळे केले !


मुंबईहून दिल्ली व दिल्लीहून पुढे डेहराडूनपर्यंत सहा तासांचा बस-प्रवास तडाख्यात पूर्ण करून डेहराडूनला पोहोचलो तेव्हा पावसाला सुरुवात झाली होती. आभाळ गच्च भरून आलं होतं; पण मन हलकं हलकं झालं होतं !

डेहराडूनला पोहोचेपर्यंत रात्र झाली होती, पण बेताची. धर्मशाळा गाठली, पण धर्मशाळेत लग्नाची प्रचंड धामधूम. शादी आटोपली होती, पण गाड्या-माणसं-सामान-सुमान आवराआवरीची धमाल उडाली होती. एका बसवर वधू-पक्षाच्या वसुलीचे प्रचंड पेटारे चढवले जात होते-शिवाजीमहाराज सहज बसले असते अशा आकाराचे ! कोणी तरी एक मोहन कोणा एका मोहिनीची आणि तिच्या बापाची लूट करून निघाला होता. दोन्हीकडचे भरदार-भरजरी वऱ्हाडी उरी भेटून एकमेकाचा निरोप घेत होते. पावसाबरोबर शराबही बरसली असावी. कारण निरोप समारंभ जरा जास्तच ओला-दर्दभरा जाणवत होता. ओला-सुका काही असो, तूर्तास आम्हास त्याच्याशी कर्तव्य नव्हते; पण या गोंधळात आणि आमच्या या वेशात ( या क्षणी आमचा अवतार हिंदी सिनेमात लग्नात

घुसलेले दरवडेखोर, दिल्के टुकडे उडालेले प्रियकर आणि टुकड्यांची याचना करणारे भिकारी याच्यामधला होता ! ) आमचा निभाव लागेल की नाही का आमची ' पाठवणी ' भलतीकडेच होते, या विवचनेत आम्ही होतो. पावसानेही जरा मनावर घेतले होते, पण सुदैवाने दिलीप काळे आणि शेखरने चोख व्यवस्था ठेवली होती. हात-पाय पसरायला ऐसपैस जागा मिळाली. मस्तपैकी गरमा-गरम जेवणही मिळाले आणि आम्ही आडवे झालो ! पोटात अन्न होते. चाळीस तासाच्या प्रवासाचे गाठोडे होते. कल्पना अशी की, जरा आडव झाल्यावर ब्रह्मानंदी टाळी लागेल ! पण कसच काय ! जरा निवांतपणा मिळाल्यावर थंडी बोलायला लागली. आता मार्च सुरू झाला तरी थंडी संपली नव्हती. आमची थडीला ना नव्हती; पण ही पावसाची ओली थडी. हाडाहाडातून भिनणारी. इथला काही भरवसा नाही, पहिल्या ट्रिपला नुसत्या ' हिमालय ' या कल्पनेने भाराभर गरम कपडे आणले होते आणि गढवालमधील उकाड्याने जीव अक्षरशः गुदमरवला होता. नुसत्या उकाड्याने नाही तर येड्यासारखे गरम कपड्यांचे ओझे आणले, या स्वतःवरील रागाने ! ' हिमालयातील उष्ण हवेची ठिकाणे मोजून शोधून काढल्याबद्दल ' पापाने तर मला भाजून खाल्लं होत. वाटल होतं थंडी परवडली. आता ही अशी ओली थडी ! पण उन्हाळा-उकाडा, थडी ओली सुकी म्हणजे काही खर नाही. दाढदुखी-कानदुखीसारखे असतात ते. एक झाल की वाटत दुसरं परवडल !

डेहराडूनला मुख्य कार्यक्रम होता–राष्ट्रीय वन-संशोधन संस्थेस भेट व तेथील वन-अधिकाऱ्यांशी चर्चा, जमल्यास राष्ट्रीय मृद्-संधारण संस्थेसही ( Institute of Soil Conservation ) भेट द्यायची होती. डूनला अशा ' संस्था-नाची ' ( हिंदीत संस्थाचे ' संस्थान ' करतात आणि अनेक ठिकाणी ते होतेच ! ) कमी नाही. ' संरक्षण अकादमी ' पासून ' फोटो इंटरप्रिटेशन संस्थे ' पर्यंत अनेक संस्थान इथे आहेत. डेहराडून म्हणजे गोऱ्या साहेबाचे आवडते गाव. थडी–पावसात खालचे मैदान आणि उन्हाळ्यात डोक्याशी मसुरी मसुरी–डून एके काळी देखणे असावेत. डूनचे आठवत नाही, पण मी लहानपणी पाहिलेली मसुरी नितांत सुंदर होती. अटकर. झाडा-झुडपात स्वतःशीच पार हरवलेली. सिमला-दार्जिलिंगचा बाजारूपणा नव्हता. नंतर भेट झाली नाही; पण आता दुरूनही दर्शन घडले ते धक्कादायक होते. मसुरी–पहाडाच्या अंगावर खाणी-खोदकामाचे चट्टे उठले होते. एखादी रूपगर्विता

खरजेने भरावी तशी! खत कोण आणि कशाची करणार? 'विकास' पाहिजे आहे ना, मग हे 'अपरिहार्य' स्वीकारले पाहिजे! असो.



राष्ट्रीय वन-संशोधन केंद्रा'तील अधिकारी श्री. माधव गोगटे ह्यांच्याशी बातचीत करताना (डावीकडून) कुसुम कर्णिक, काशिनाथ तावे, जगदीश गोडबोले, हिरामण देवरे, नामा ओव्हाळ

वन-संशोधन परिसर चौदाशे एकरांवर ऐस-पैस पसरलेला आहे. चीड देवदार आदि वृक्षाचे भरदार ॲव्हेन्यूज. देशोदेशींच्या वृक्ष-लतांनी सजवलेल्या रोपवाटिका. वन-संशोधनाशी संबधित विविध ज्ञान-शाखाच्या इमारती. वन-अधिकाऱ्याच्या प्रशिक्षणाचे महाविद्यालय. सर्व परिसराला एक मनस्वी देखणेपण आहे. आम्ही संस्थेत पोचलो तेव्हा पावसाने दडी मारली होती. लुसलुशीत कोवळी उन्ह सर्वत्र पसरली होती. सर्वजणही खूप उत्साहात होते. श्री. माधव गोगटे नावाचे महाराष्ट्रातील एक वन-अधिकारी सध्या संस्थेत डेप्युटेशनवर आले होते. आम्ही येताच, कसल्याही शासकीय उपचाराची वा सोपस्काराची वाट न पाहता माधवराव स्वतः जातीने सामोरे आले. स्वतःची ओळख करून दिली. आमची करून घेतली. संस्थेची थोडक्यात माहिती सांगितली. दोन दिवसात पाहायच्या-करायच्या कामांची व्यवस्थित आखणी करून दिली.

संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून दिला आणि गरज पडेल तेव्हा आमच्या मदतीला तत्पर राहिले. केलेपणाच्या कसल्याही गमजा वा बडेजाव न करता !

सर्वप्रथम मुख्य इमारतीमधील सामाजिक वन-संवर्धन, वनौषधी, गौण वन-उपज ( minor forest produce ) आदि विषयाची सग्रहालये पाहायचे ठरले. निरनिराळ्या प्रशस्त दालनांतून संबधित विषयाचे नमुने, माहिती आकर्षकपणे मांडून ठेवली आहे. नुसत्या बांबूचेच नाना प्रकार आहेत. अगदी करंगळी-एवढ्या बांबूपासून माडीभर जाडीच्या बांबूपर्यंत. एका दालनात सातशे चार वर्षांच्या जुन्या देवदार वृक्षाचा प्रचंड ओंडका ठेवला आहे. सर्वात थक्क केले दुसऱ्या दिवशी पाहिलेल्या काष्ठ-सग्रहालयाने (Xylarium) ! देश-विदेशाच्या १९,००० झाडाच्या लाकूड-तुकड्यांचे हे अद्ययावत संदर्भालय आहे. लाकडाचे वजन, रग, वास आदि ढोबळ गोष्टींबरोबरच हस्तरेषेप्रमाणे वृक्ष-रेषेवरून ( कपॉझिटर साहेब संभाळा, गोंधळ कराल ! ) झाडाची जात ओळखता येते. काही प्रकारच्या गुन्ह्याच्या शोधात याचा खूप उपयोग होतो. तेथील अधिकारी फार गमत्या होता. सुगधी लाकडाच्या गोष्टी सागत त्याने आमच्या हातात हळूच एक लाकडाचा तुकडा ठेवला. सुगध लुटण्यासाठी. सर्वजण मारे सुगध लुटायला सरसावले आणि ती होती ' गुकी लकडी '. अगदी पुरेपूर ' सु ' गध की ' शी ' गध असलेली ! असो.

दुपारी वन-अधिकाऱ्याशी चर्चेचा कार्यक्रम होता. सामाजिक वनसवर्धन, वनप्रभाव आदि विषयानुसार सभासदांचे चार गट पाडण्यात आले. प्रत्येकाला आपल्या आवडीचा गट निवडायचा होता.

श्री. गुलाटी नावाचे अधिकारी गौण-वन-उपज-विभाग-प्रमुख आहेत. त्याच्याशी झालेली चर्चा खूप रंगली. गौण वन-उपजांचे डिंक, राळ, तेलबिया, वनौषधी, चर्मशोधक असे अनेक प्रकार आहेत. त्याच्यापासून उत्पन्नही भरपूर मिळते ( नुसत्या साल वृक्षाच्या बियापासून वर्षाला १० कोटी मिळतात. उरलेल्या केकपासून मिळणारे ५ कोटी वेगळेच ); पण एकूण वन-नीतीमध्ये वा वन-धोरणामध्ये या वन-उपजाचा गंभीरपणे विचार होताना आढळत नाही. मुख्य विचार होतो जंगलाच्या मुर्दा-उपजाचा ( Dead-produce ) ! सातत्याने सोन्याचे अंडे देणाऱ्या कोंबडीला सोडून, एकाच झटक्यात अंडे आणि कोंबडी दोन्ही खलास करणाऱ्या योजनाचा !

डॉ. ब्रह्मदेव शर्मांनी गौणवन-उपज ( हा ' गौण ' शब्द ' किरकोळ ' की

'दुय्यम' या अर्थाने वापरतात, याची उमज आम्हाला अजून पडली नाही ) व आदिवासी-वनविकास यासंबधात फार मूलगामी आणि महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत.

आदिवासी-वनवासींचे संपूर्ण जीवन, अर्थव्यवस्था वनाशी, वनउपजाशी निगडित आहे. डॉ. शर्मा आवर्जून सांगतात, खरोखरच वन-विकास, आदिवासी-विकास घडवायचा असेल तर व्यापार-उपयोगी झाडाच्या लागवडीच्या संबंधात नाही तर वन-उपजाच्या संबधात एकूण वननीतीचा विचार व्हायला पाहिजे. आदिवासींचा वन-उपज जमा करण्याचा व विकण्याचा अबाधित हक्क मान्य केला पाहिजे. मुख्य गोष्ट म्हणजे वन-उपजाना वाजवी किंमत दिली पाहिजे. त्यामुळे पोटासाठी जंगल तोडण्यात नाही, तर राखण्यात आदिवासींचे हितसंबंध गुंतले जातील. त्यायोगे वनविकास व आदिवासीविकास दोन्ही साधले जातील; पण सोन्याचे अंडे देणारी कोंबडीच मारून खाणाऱ्या या जमान्यात हे अरण्य-रुदन कोणाच्या कानावर जाणार ? एक वेळ झोपलेल्याच्या जाईल; पण झोपेचे सोंग घेणाऱ्याच्या ?

श्री. गोगटे व श्री. माथूर यांच्याशी झालेल्या सामाजिक वनसंवर्धना-संबधीच्या अभ्यास-गटातही अनेक महत्त्वाचे मुद्दे चर्चेस निघाले. आज सरकार म्हणजे सरकारची वन-विकासमहामंडळे जागोजाग नैसर्गिक 'किरकोळ' जंगले साफ करून त्यावर 'मूल्यवान' वृक्षाची लागवड करत आहे. उदाहरणार्थ, बस्तर-बिहारची साल व इतर मिश्र 'किरकोळ' जंगले साफ करून त्यावर मूल्यवान' चीड वा सागाची लागवड करण्याच्या महत्त्वाकांक्षी योजना आखण्यात आल्या. या एकप्रजातीय लागवडीचे निसर्गसंतुलनावर होणारे परिणाम एक वेळ बाजूला ठेवले, तरी या 'किरकोळ' जंगलातील झाडापासून आदिवासींना अन्न, वस्त्र, औषधी, निवारा सर्व काही थेट आणि हमखास मिळत होते. चीड-सागाच्या मूल्यवान जंगलापासून तोकड्या आणि बेभर-वशाच्या रोजगारापेक्षा पदरात काही पडत नव्हते. मिश्र-जंगलाच्या नाशा-बरोबर त्याचे सर्वस्व उद्ध्वस्त होत होते. बस्तर-बिहारमधील आदिवासींचे असे उद्ध्वस्त जीवन मी जवळून बघितले होते, अभ्यासले होते, पण 'किरकोळ' आणि 'मूल्यवान' ठरविणार कोण—तर आपल्या हक्कांची-ताकदीची पुरेपूर जाण असलेला संघटित समाज नाही तर व्यवस्था ! असंघटित गोर-गरीब आदिवासी-वनवासी जनतेचा जंगलावरील न्याय्य हक्क डावलून, सामाजिक वनीकरणाच्या

नावाखाली काही तुकडे फेकण्याचा खटाटोप 'राष्ट्रीय हिता'च्या नावाखाली आज सर्वत्र चाललेला !

सर्वात सुखद धक्का दिला संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णमुरारी तिवारी यानी. राष्ट्रीय वन-संशोधन संस्थेचा अध्यक्ष म्हणजे बडी आसामी ! एक तर कामात व्यग्र ! मुख्य म्हणजे वनखात्यासारख्या निमलष्करी खात्यातील अमलदार ! त्यामुळे सर्वसाधारण समाजकार्यकर्त्यांना भेटण्यास त्याना किती वेळ आणि इच्छा असेल याबद्दल आम्ही जरा साशंकच होतो; पण चांगली दोन तीन तासाची सवड काढून त्यानी सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. मनमोकळी चर्चा केली.


तिवारीसाहेबाच्या सुरुवातीच्या भाषणानेच आमच्यातील गरमातील गरम कार्यकर्त्यांनाही गारद केले. वनसंवर्धनाच्या योजना मुठभर पुंजीपतींसाठी नाहीत तर वनावर निर्भर असणाऱ्या सर्वसामान्य वनवासी-आदिवासींच्या हितासाठी आखल्या पाहिजेत, बहुसंख्य लोक दारिद्र्याच्या खाईत खितपत पडले असताना मूठभर लोक चैनीत राहू देता कामा नये आदि मुद्दे मांडून त्यानी जहाल कार्यकर्त्यांच्या शिडातील हवाच काढून घेतली. तिवारीसाहेबाना गमतीने 'नेताजी' म्हणून ओळखले जाते. यातील 'नेते'पणाचा थोडा भाग वगळला तरी त्यांच्याशी व इतरही अधिकाऱ्यांशी बोलताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवत होती की, लोकांशी संवाद-संपर्क साधण्याची त्यांना मनोमन इच्छा आहे, तळमळ आहे. महाराष्ट्रात-मध्यप्रदेशातही अनेकदा असा अनुभव आला होता, पण तेथे सरकारी अधिकाऱ्यांची-विशेषतः वनअधिकाऱ्यांची-गोची होते.

'कायदा आणि सुव्यवस्थे'च्या कारभार-यंत्रणेचा वारसा आपण 'साहेबा'-कडून उचललेला. साहेब गेला. कारभार-यंत्रणाही कायदा-सुव्यवस्थेपुरतीच मर्यादित राहिली नाही; पण 'साहेबी संस्कृती'चे जोखड काही आपल्या अमलदाराच्या मानेवरून उतरायला तयार नाही. जनसंपर्काबद्दल मनात एक विचित्र अहंगंड किंवा न्यूनगंड कायम ! वनकर्मचाऱ्याचे बहुतांश जीवन 'वनवासात'. जनसंपर्काची जुजबी ओळख. शिवाय सारा जन्म ज्या आदिवासी-वनवासी विभागामध्ये घालवायचा त्या भागातील लोकजीवनाशी-संस्कृतीशी परिचय नाही. त्यामुळे परस्पर समज-गैरसमजुतीचे रान भरपूर माजलेले. श्री. तिवारीसाहेबाशी बोलताना साहजिकच हा विषय निघाला. संस्थेत भारत

भरच्या वरिष्ठ वनअधिकाऱ्याचे प्रशिक्षण होते. या प्रशिक्षणामध्येच आदिवासी जीवन-प्रश्नांची निदान सैद्धान्तिक ओळख करून देणे किती अगत्याचे आहे हा विचार तिवारीसाहेबांना मनोमन पटला. प्रत्यक्षात काय घडत पाहू या; पण एकूण चर्चेतून आम्हा कार्यकर्त्यांना जाणवले की यंत्रणेच्या मर्यादा मान्य करूनही माणसाला माणूस पाहायला शिकले पाहिजे. आपण जर शिक्केबाजी करत बसलो तर चाकोरीबाहेर विचार-आचार करणारी भली माणसं परत 'चाकोरी'त नाही तर 'वनवासा'त ढकलली जातील आणि ते कोणाच्याच हिताचं ठरणार नाही.

संस्थेतील वनस्पति-संग्रह (Herberium), काष्ठअभियांत्रिकी विभागही (Wood Engineering Section) बघण्यासारखे आहेत. पूल, घर आदींच्या बांधकामात लोखंड–सिमेंटऐवजी लाकडाचा कसा वापर करता येईल व तो किती किफायतशीर ठरेल याचे नमुने व माहिती व्यवस्थितपणे मांडून ठेवली आहे; पण खरी अडचण अशी आहे की, आज लाकूड लोखंड–सिमेंटएवढेच किंबहुना त्याहूनही जास्त दुर्मिळ आणि महाग झाले असता हा पर्याय कितपत उपयोगी ठरणार ? संस्थेतील डॉक्युमेंटेशन सेंटरही (Documentation Centre) प्रसिद्ध आहे, पण वेळेअभावी सर्वजणांना केंद्राचा जास्त लाभ उठवता आला नाही अर्थात ही अलिबाबाच्या गुहेची नुसती एक झलक होती. वनविषयक प्रश्नांची आस असलेले आमचे साथीदार या भेटीचा पुरेपूर फायदा उठवतील अशी खात्री आहे.


डेहराडूनची वनसंशोधन संस्था बघितल्यानंतर टेहरी–गढवालच्या वन–अधिकाऱ्यांना पण भेटायचे होते. टेहरी-गढवालच्या अरण्यपालाचे कार्यालय इथेच आहे. या वेळेला त्यांची भेट होऊ शकली नाही. मात्र प्रथम इथे आलो होतो तेव्हा सहायक अरण्यपालांच्या भेटीपासूनच 'चिपको यात्रेला' सुरुवात केली होती. आंदोलनाची एकूण पार्श्वभूमी, वनखात्याची बाजू समजून घेण्याचा प्रयत्न केला होता. ऐकीव अथवा वाचीव माहितीने एकदम सरकारला, वनखात्याला न झोडपता, एखादा माणूस आपलीही बाजू समजून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करतो याचे त्यांना खूप अप्रूप वाटले होते. आता मध्ये काही काळ गेला असला तरी माहितीमध्ये काही विशेष फरक पडणार नव्हता.




मध्यहिमालयातील हा गढवाल-कुमाऊँ अथवा उत्तराखंड या नावाने ओळखला जाणारा विभाग डेहराडून, उत्तरकाशी, टेहरी, पौडो, चामोली, अलमोरा, पिथोरागड आणि नैनिताल या आठ जिल्ह्यांनी मिळून बनला आहे. डेहराडून-हरिद्वार-हृषिकेशचे मैदान सोडले तर बाकी पहाडी प्रदेशात त्रिशूळ, कामेत, नीळकंठ, नंदादेवीची उत्तुंग गिरिशिखरे आकाशाशी स्पर्धा करतात. गिरिराजाच्या अंगा-खांद्यावरून भारताच्या जीवनदायिनी गंगा-यमुना या प्रमुख नद्या व पिलंगना, भिलंगना, मंदाकिनी, अलकनंदा या त्यांच्या उपनद्या उगम पावतात. भारतभूमीचे ऐहिक जीवन संपन्न करणाऱ्या या नद्यांबरोबरच पारमार्थिक जीवनही पावन करणारी गंगोत्री-जम्नोत्री, केदारनाथ-बद्रीनाथ आदि अनेक तीर्थक्षेत्रे इथे आहेत; पण त्रिलोकीच ऐहिक-पारमार्थिक जीवन संपन्न करणारी उत्तराखंडाची ही भूमी स्वतः मात्र पार रंजली-गांजली आहे. प्रत्यही गांजली जात आहे.

एक जमाना असा होता की, चीड-देवदार-बाझ-बुराँझच्या वृक्षराजीचे महासागर इथे पसरले होते. भगवान शंकराच्या घनघोर जटांतून अवतरलेले अगणित ओढे-नाले अवघी सृष्टी सुजलाम्-सुफलाम करीत होते चराचर तृप्त

मनाने त्याच्या कल-रवाला प्रतिसाद घालीत होते. निसर्ग आणि चराचर जीवन याचा सुरेला प्रवाह युगानुयुगे वाहत होता. या नादब्रह्माचा आनंद अनुभवण्यासाठी देशोदेशीचे साधक–तापसी इथे येत होते. गंगा-यमुनाच्या सासरी तक्त आली आणि गेली! माहेर मात्र शांत, निरामय होते; एका गोऱ्या साहेबाचे आगमन होईपर्यंत.




एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास फ्रेडरिक विल्सन नावाचा एक शिकारी इथे आला आणि या शांत, निरामय प्रवाहात भोवरे उठू लागले. गंगोत्रीजवळील मुखवा या गावी विल्सनसाहेबाने मुक्काम ठोकला–कस्तुरीमृगाची शिकार

करण्याच्या निमित्ताने. गढवालच्या राजाला त्याने अतिशय प्रेमभराने चारशे रुपयाचा नजराणा अर्पण केला. नंतर विनम्रभावाने कस्तुरीमृगाच्या शिकारीचे एकाधिकार मागितले. या ' सोनेरी ' माणसाचा विनय व दानत पाहून राजानेही संतुष्ट होऊन ' तथास्तु ' म्हटले. पुढे ' ईस्ट इंडिया ' कंपनीकडून रेल्वेकरता लाकडी ' स्लीपर्स ' ची मागणी आली आणि चीडचे जंगल तोडून स्लीपर्स बनविण्याचे कंत्राट नेमके विल्सनसाहेबाने मिळविले. भागीरथी नदीमधून चीडचे ओंडकेच्या ओंडके वाहून येऊ लागले !

फ्रेडरिक विल्सन केवळ एक निमित्त होता. गोरासाहेब नफा कमवायला या देशात आला होता. साता समुद्रावर पसरलेल्या आपल्या वसाहती आणि औद्योगिक साम्राज्याची गरज भागविण्यासाठी त्याला मोठ्या प्रमाणावर वनसंपत्तीची गरज होती. जंगलाचे स्वामित्व त्याने हळूहळू आपल्याकडे घेण्यास सुरुवात केली. १८६१ साली त्याने वन-खात्याची स्थापना केली. स्थानिक वनवासी-आदिवासी जनतेच्या वन-अधिकारावर बंधने घालण्यास सुरुवात केली. साहजिकच जंगलाचे व्यापारी शोषण करणारे इंग्रज सरकार आणि जंगलावर सर्वस्वी निर्भय असणारे जंगलचे अनभिषिक्त राजे यांचा संघर्ष अटळ होता. गोरासाहेब हुशार होता, धोरणी होता. आदिवासी – वनवासींचा असंतोष शमविण्यासाठी १८६५ साली प्रथम घोषित झालेल्या ' राष्ट्रीय वन – धोरणान्वये ' वन–संपत्तीवरील स्थानिक लोकांचे काही अधिकार मान्य केले; पण कागदावरचे हे अधिकार परिणामकारकपणे प्रत्यक्षात येईनात तेव्हा आपल्या हक्कांसाठी आदिवासी-वनवासींनी वेळोवेळी सरकारविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. रांचीच्या बीरसा मुंडाच्या नेतृत्वाखालील लढा व यमुनातीरीच्या तिलाडीचा संग्राम तर इतिहासात प्रसिद्ध आहेत ! ( तिलाडी संग्रामाला गढवालचा ' जालियनवाला बाग ' म्हणून ओळखले जाते. जंगलावरील आपल्या हक्कासाठी झालेल्या १९३० च्या लढ्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी ३० मे ते ६ जून ' स्मृति–सप्ताह ' पाळण्याची परंपरा ' चिपको ' आंदोलकांनी सुरू केली आहे. ) सरकारच्या अन्यायी धोरणाविरुद्ध वनवासियांनीच नाही तर डाल्येलसारख्या गोऱ्या साहेबानेही प्रखर टीका केली होती; पण तराजूत वन, वनसंपत्ती तोलणाऱ्या साहेबाला असल्या टीकेची, लोकांच्या असंतोषाची पर्वा नव्हती ! वनविद्येत ( forestry ) तो कदाचित पारंगत होता, त्याची त्याला चांगली जाण होती, पण स्थानिक लोकांच्या भावभावनांची, सुखदु:खाची एका मर्यादेपलीकडे त्याला किंमत

नव्हती, कदर नव्हती. साहजिकच त्याने वनसंपत्तीचे मनसोक्त शोषण केलेच, शिवाय वनविद्येच्या नावाखालीही चीड - देवदार आदि व्यापारी-दृष्ट्या महत्त्वाच्या सूचिपर्णी प्रजातींना उत्तेजन देता देता, स्थानिक लोकांच्या आत्यंतिक गरजेच्या बाज, बुराँश, पमनी, मोहरू, खुरसु आदि रुंदपर्णी प्रजातींकडे पद्धतशीर दुर्लक्ष केले. लोकांचा विरोध साम - दाम - दंड - भेदाने मोडून काढला !

साहेब गेला, साहेबाचे राज्य गेले ! स्वातंत्र्य आले; पण दुर्दैवाने उजाडले नाही ! जंगलांचे व्यापारी-शोषण सुरूच राहिले. जंगल भराभर साफ होऊ लागली. अफाट वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येनेही त्यात भर घातली. पोटाची खळगी भरण्यासाठी लोकांनी जंगल तोडून शेती करण्यास सुरुवात केली. वनसंपत्ती झपाट्याने नष्ट होत होती; पण उत्तराखंडाच्या पहाडी भागात दळण - वळणाची साधने अभावानेच असल्याने त्यालाही काही मर्यादा होती, परंतु १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले आणि 'हिमालयाला जाग आली.' सीमा-भागात मोठ्या प्रमाणावर रस्तेबांधणीची, विकास - प्रकल्पाची कामे सुरू झाली. याबरोबर काही जंगल साफ होणे अपरिहार्यच होते. तसेच या रस्त्यावरून आपली 'आधुनिक संस्कृती' उत्तराखंडाच्या अंतर्भागात पोचणेही क्रमप्राप्त होते. अशा परिस्थितीत इतरत्र जे घडले व घडते तेच इथेही घडले. आपल्या 'संस्कृती' च्या अग्रदूतांनी - ठेकेदार—व्यापाऱ्यांनी क्षणाचाही विलंब न लावता उत्तराखंडात आतवर मुसंडी मारली ! कस्तुरीमृगापासून वनौषधींपर्यंत सर्व गोष्टी झपाट्याने नाश पावू लागल्या. ओकचे लाकूड पाण्यात बुडते, त्यामुळे जलमार्गाने त्याची वाहतूक होत नसे. आता रस्ते झाले आणि ओकवृक्षाचे महासागरही रिते होऊन मैदानाकडे जाऊ लागले. आपल्या विश्वात रममाण झालेल्या गरीब - अडाणी - पहाडी माणसाला या झंझावाताने पार चक्रावून सोडले. हिमालयातील साधन-संपत्ती लुटून त्याच्या अंगणातून वाहणारी झटपट सुख-समृद्धीची ही गंगा खालच्या मैदानात आपले भांडार रिते करीत होती, पण या वाहत्या गंगेत हात धुऊन घ्यायचे ज्ञान या पहाडी माणसाला नव्हते आणि भानही नव्हते. एका बाजूला वसाहतवादाचाच वारसा सांभाळणाऱ्या चुकीच्या वनविषयक धोरणामुळे व्यापारी वृक्ष-लागवडीचे नित्याच्या गरजेच्या जंगलावरचे आक्रमण चालूच होते दुसऱ्या बाजूला प्रतिदिनी तुटणाऱ्या जंगल आच्छादनाबरोबर आधीच तुटपुंज्या असलेल्या

शेतीतील उपजाऊ मातीही ( top soil ) खाली मैदानाकडे वाहत होती. अशा कठीण परिस्थितीत पहाडात राहून पुऱ्या कुटुंबाचे पोट पोसणे अशक्य होते. अखेर मानवी पर्यावरणाच्या ( Human Environment ) सिद्धान्ताप्रमाणे उपजाऊ मातीबरोबरच ही पहाडी माणसेही खाली मैदानाकडे वाहून येऊ लागली. त्यांच्या अंगणातून वाहून आलेली ही माती गंगा-यमुनेच्या खोऱ्यात सोने पिकवीत असता, या लोकांच्या नशिबी मात्र मातीमोल जिणे येऊ लागले ! नशीबवान होते ते लष्करात भरती झाले. कमनशिबी होते ते मुंबई-दिल्ली-नागपूरच्या घरा-हॉटेलांतून कप-बशा विसळू लागले, प्रासादाची राखण करू लागले.

चंडीप्रसाद भट आणि त्यांचे साथीदार ही अशीच चामोली जिल्ह्यातील 'प्रवाह-पतित' माणसे ! रोजगारासाठी वणवण भटकणारी, परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडलेली; पण सुदैवाने जयप्रकाश नारायण, सरलादेवी आदि सर्वोदयी कार्यकर्त्यांच्या प्रभावाखाली आल्याने संवेदना, हिंमत न हारलेली. चिनी आक्रमणानंतरच्या व्यापक रस्तेबांधणी कार्यक्रमाचा फायदा घेऊन स्थानिक रोजगार निर्माण करण्यासाठी त्यांनी 'मल्ला नागपूर सहकारी मजूर समिती'ची स्थापना केली. आठ-दहा इयत्ता शिकलेले हे तरुण इतर मजुरांबरोबर तासन् तास रस्त्याच्या कामावर राबू लागले. सक्त मेहनत आणि चोख व्यवस्थापनाच्या बळावर बऱ्यापैकी नफा कमवू लागले. सुरुवातीला या स्थानिक लोकांच्या धडपडीचे कौतुक झाले; पण लौकरच या मजूर-संघाची वाढती कमाई व लोकप्रियता बाहेरच्या धंदेवाईक ठेकेदारांना व त्यांच्या जिवावर चैन करणाऱ्या भ्रष्ट सरकारी यंत्रणेला खुपू लागली. त्यांनी समितीला हरतऱ्हेने नामोहरम करण्याचे प्रयत्न सुरू केले. वनौषधी पुरविण्याचे काम समितीने हाती घेतले; पण इथेही व्यापाऱ्यांनी नाकेबंदी सुरू केली.लोकांकडून नाममात्र किंमतीत वनौषधी विकत घेणारे व्यापारी त्याच वनौषधी औषधांच्या कारखान्यांना विकून भरपूर नफा कमवत असत, पण लोकांनी जरा भाव वाढवून मागताच, व्यापाऱ्यांनी मालच विकत घेण्यास नकार दिला. पहाडातले हे अडाणी लोक जातील कुठे ? दोन-चार दिवसांत झक मारत शरण येतील अशी व्यापाऱ्यांची अटकळ होती; पण समितीने थेट दिल्ली-मुंबईपर्यंत माल नेऊन लोकांच्या मालाला चांगला भाव दिला

आजूबाजूच्या जंगलात अमंल्य उद्योग चालले होते, पण जंगल शेजारी

असले तरी वनखात्याचे संबंधित यमनियमच असे होते की मोठ्या ठेकेदारांशिवाय इतरांच्या आवाक्याबाहेरचे हे उद्योग होते; पण आता यशाबरोबर हिंमत थोडी थोडी वाढत होती. मजुरी कामाच्या मर्यादा ओळखून वन-संपत्तीवर कुटिरोद्योग सुरू करण्याचे समितीने ठरविले. 'दशौली ग्राम स्वराज्य संघा'ची स्थापना करून चीडवृक्षाच्या राळेपासून टर्पेंटाइन बनविणाऱ्या छोट्या प्रकल्पाची तयारी सुरू झाली. पैशाची चणचण 'खादी ग्रामोद्योग मंडळा'ने आर्थिक सहाय्य पुरवून दूर केली. चामोली जिल्ह्यातील गोपेश्वरबरोबर इतरही सात ठिकाणी छोटे प्रकल्प उभारायचे ठरले. या प्रकल्पांची जुळवाजुळवी चालू असतानाच १९७० साली अलकनंदेने पुराचा जबरदस्त तडाखा हाणला. पुराच्या लोंढ्यात २१ पूल, ३० बसेस, शेकडो एकर शेत-जमीन आणि गुरं-ढोरं वाहून गेली! गंगा काळ्याचा १० कि. मी. लांबीचा मार्ग गाळाने भरून गेला. रुद्र निसर्गाच्याच कुशीत राहणाऱ्या पहाडी लोकांना आपत्ती नवीन नव्हत्या, पण त्यांची वाढती गती आणि व्याप्ती स्तंभित करणारी होती. नेहमीच्याच सरकारी धोपट-मार्गाने आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन चालू होते. आपत्तीची 'ढग-फुटी' (cloud burst), वृष्टी आदि कारणमीमांसाही होत होती. तुफान पर्जन्यवृष्टी तर झाली होतीच, परंतु अलकनंदेच्या पाणलोट-क्षेत्रातील (Catchment Area) खेड्यापर्यंत मदत पोचविणाऱ्या ग्राम स्वराज्य संघाच्या कार्यकर्त्यांना मात्र या 'असमानी' आपत्तीचा वेगळाच अर्थ जाणवू लागला होता. पाणलोट क्षेत्रातील गौहना-तलाव भागात गेली काही वर्षे बेसुमार जंगल-तोड होत असल्याचे त्यांनी पाहिले होते. आता जास्त विचार करायला वेळ नव्हता. हाती घेतलेल्या प्रकल्पाचे काम सुरू करायचे होते. कार्यकर्त्यांनी उत्साहाने कामाला सुरुवात केली, पण कुटिरोद्योगांना प्रोत्साहन देण्याची तारस्वराने घोषणा करणाऱ्या सरकारच्या वनखात्याने वेगळेच धोरण अवलंबिले. आठपैकी पाचच प्रकल्पांना, तोही अपुरा कच्चा माल (राळ) वनखात्याने उपलब्ध करून दिला. इतकेच नाही तर बरेलीच्या 'इंडियन रेझिन ॲन्ड टर्पेंटाइन फॅक्टरी' या बड्या कंपनीपेक्षा दर क्विंटलला पन्नास रुपये जास्त दराने घ्यायला लावला. वनखात्याच्या या अन्याय्य धोरणाविरुद्ध साहजिकच असंतोष निर्माण झाला. अर्जे-विनंत्यांनी दाद लागेना म्हणून सत्याग्रह-मोर्चांना सुरुवात झाली, पण याने चिडून जाऊन वनखात्याने आणखी एक दणका हाणला!

'दशौली ग्राम स्वराज्य संघा'चा लाकडी सामान बनविण्याचा एक छोटा कारखाना होता. 'अगु-वृक्षा'पासून (Ash-tree) शेतीची अवजारे तिथे बनविली जात, परंतु 'पर्यावरण रक्षणा'ची सबब सागून वनखात्याने अगु-वृक्षाचा ठराविक पुरवठा करण्यास नकार दिला. लोकांच्या विनंत्यांना न जुमानता 'पाहिजे असेल तर चीडचे लाकूड वापरा' म्हणून वर फर्मावले. 'मायबाप सरकारचा' हा हुकूम ऐकून नांगराचे बैलही फकन् हसले असतील! वजनाने हलके, पण अतिशय मजबूत असे अगु-वृक्षाचे लाकूड पहाडी लोक पिढयान् पिढया शेतीच्या अवजारासाठी वापरत होते; पण सामान्य शेत-कऱ्याच्या प्राथमिक गरजाची माहिती वा पर्वा नसलेले अधिकारी आपल्याच गुर्मीत होते. लोकाची न्याय्य मागणी त्यांनी झिडकारून टाकलीच, वर आणखी जखमेवर मीठ म्हणून तेच अगु-वृक्ष अलाहाबादच्या 'सायमन ॲन्ड कपनी' या खेळाचे सामान बनविणाऱ्या कपनीला विकून टाकले. वनखात्याच्या या दुटप्पी धोरणाने लोक हबकूनच गेले. या धडधडीत अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे जरुरीचे होते; पण कसा? मागील 'राळ-किंमती'च्या प्रकरणातील अर्ज-विनत्या-शिष्टमडळे-आश्वासने याचा घोळ अजून चालूच होता. त्यातून प्रत्यक्ष पदरात काहीच पडत नव्हते. आता तर झाड तोडायचा परवाना घेऊन कपनीचे एजट गोपेश्वरच्या वाटेवर रवाना झाल्याचीही खबर येऊन धडकली होती.

गोपेश्वर या छोटया गावी (मार्च १९७२ मध्ये, आता तिथे चामोली जिल्ह्याचे मुख्य ठाणे आहे. मूळची तीनशे घराची वस्ती दूर कोपऱ्यात ढकलली जाऊन, खाजगी-सरकारी इमारतींचे इमलेच्या इमले उठले आहेत!) लॉज वा निवासाची इतर काही सोय नसल्याने सायमन कपनीचे एजंट, सघाच्या अतिथि-गृहात राहण्याची विनती घेऊन आले. सर्वोदयी तत्त्वाला जागून कार्यकर्त्यांनीही त्याना दिलदारपणे निवारा दिला. बाहेरून कपनीचे मजूरही येण्यास सुरुवात झाली. इकडे लोकाच्या सभावर सभा सुरू होत्या, पण अन्यायाची तातडीने दाद मागण्याचा मार्ग कोणालाच सुचत नव्हता. 'कपनीच्या नोकराना आपण जंगलात जाण्यास प्रतिबध करू या, लाकूड नेणाऱ्या लॉऱ्यापुढे आडवे पडू या, त्या लोकांच्या अगोदर जगलात जाऊन सर्व झाडे कापून आणू या, झाडे जाळून टाकू या' प्रत्येकजण आपल्या परीने मार्ग सुचवत होता, पण 'झाडे नष्ट करणे नव्हे, तर त्यांचे रक्षण करणे हा आपला उद्देश आहे. आपल्याला नेहमीसाठी त्याची गरज पडणार आहे' चडीप्रसाद सर्वांना समजा-

वणीच्या सुरात सांगत होते, पण या समजावणीपलीकडे त्यांनाही काही सुचत नव्हते. इतक्यात एक कल्पना लखकन् चमकून गेली. भावनावेगाने ते म्हणाले, 'आपली विनती ठोकरून हे लोक जर झाड कापायला आले, तर वाघापासून बचाव करण्यासाठी आई जशी पोराला कवेत घेते, तसे कुऱ्हाडीपासून वाचविण्यासाठी आपणही झाडाला 'चिपकून' बसू या! हम पेडोंको 'चिपक' जायेंगे!' सर्व सभा भारावून ऐकतच राहिली. सामान्यातल्या सामान्य माणसालाही समजेल-उमजेल आणि शक्य होईल अशी ही नामी आयडिया वाऱ्यासारखी भिरभिरत आजूबाजूच्या गावांतून पसरली. मात्र कंपनीच्या एजंटांच्या व संबंधित अधिकाऱ्यांच्या कानी जेव्हा हा शब्द पडला, तेव्हा ते पोट धरधरून हसले!

हसणाऱ्यांचे डोळे लौकरच उघडले. पहाडी माणसांच्या मनोमनी जाऊन भिडलेली ही कल्पना साकार रूप धारण करू लागली. २७ मार्च १९७३ रोजी झाड तोडायला कंपनीचे मजूर मंडलच्या जंगलात पोचले, तेव्हा शेकडो लोक आपल्या प्राणाची बाजी लावून झाडाच्या रक्षणार्थ धावून आलेले दिसले. कुऱ्हाडी म्यान करून कंपनीचा नोकरवर्ग निमूटपणे माघारी फिरला. मंडलचा विक्री-करार रद्द झाला. त्याऐवजी फाटा जंगलातील वृक्षाचा करार झाला; पण तिथेही तोच प्रकार! सरधोपट निदर्शनांना धोपट मार्गानेच उत्तर देणाऱ्या सरकारी यंत्रणेची मती या अहिंसक पण बिनतोड निदर्शनापुढे चालेना. मग शक्तीपेक्षा युक्तीचा वापर करण्याचे ठरविले. 'दशौली ग्राम स्वराज्यसंघा'शी सौदाचा घाट घातला. 'कंपनीला दहा झाडे तर संघाला एक झाड' पासून 'समसमान झाडां'पर्यंत मधाचे बोट लावले; पण संघाच्या छोट्या आर्थिक मागण्यातून सुरू झालेल्या आंदोलनाने आता तात्कालिक लाभापलीकडे जाऊन वन-संपत्तीवरील स्थानिक माणसाच्या प्राथमिक हक्कापासून ते पर्यावरणाच्या जाणिवेपर्यंत व्यापक स्वरूप धारण केले होते.

टेहरी-गढवालचे सहाय्यक अरण्यपाल श्री. श्रीवास्तवजींशी चर्चा करताना साहजिकच या सर्व इतिहासाची उजळणी झाली; पण आता अंगुवृक्षाच्या घटनेला खूप वर्षे लोटली होती. शिवाय ती घटना दूरच्या चामोली जिल्ह्यातील, त्यामुळे त्याच्या तपशिलाला महत्त्व नव्हते; पण सरकारची एकूण वननीती, वनखात्याची कार्यपद्धती, त्याबद्दल असलेले समज-गैरसमज यांबद्दल आमचे बोलणे निघाले होते. सुरुवातीला औपचारिक आणि शासकीय चौकटीतून

बोलणाऱ्या श्रीवास्तवजींनी, आमच्या हेतूच्या प्रामाणिकपणाची खात्री पटल्यावर आमच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या होत्या. कसलाही 'साहेबी' भपका नसलेला हा माणूस करड्या वन-अमलदारापेक्षा एखाद्या मवाळ प्राध्यापका-सारखा भासला होता !

उत्तराखंडाच्या पहाडी प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ ४३,००० चौ. कि. मी. आहे. त्यापैकी २७,००० चौ. कि. मीटर भाग जंगलाने व्यापलेला असून बाकीच्या भागात शेती आहे. या जंगलापैकी फक्त १७,००० चौ. कि. मी. जंगल वन-खात्याच्या अखत्याराखाली असून, बाकीचे १०,००० चौ. कि. मी. जंगल 'सिव्हिल-स्वयम-पंचायती वन' आहे. वनखात्याकडील जंगलापैकी ९,८०० चौ. कि. मी. जंगल सरंक्षित-वन ( Reserved Forest ) असून उरलेले उत्पादक-वन ( Productive Forest ) आहे. सरंक्षित वनामध्ये फक्त पुनर्वाढीच्या अथवा सुदृढ वृक्षाना वाव देण्याच्या दृष्टीनेच तोड होते. उत्पादक-वनातील तोडही अतिशय शास्त्रशुद्ध रीतीने आखलेल्या 'कार्य-योजने'प्रमाणे ( Working-plans ) होते. आपल्या म्हणण्याला आकडेवारीचा आधार देत श्रीवास्तवजींनी कैफियत मांडली 'अहो, आज जी जंगल साफ झालेली दिसतात ती प्रामुख्याने ही 'सिव्हिल, स्वयम, पंचायती वनं' आहेत. अनेकाना यातील फरक माहीत नसतो व ते उगाच आमच्याच नावाने ओरड करत असतात. एक तर वाढत्या लोकसंख्येच्या दबावाखाली ही जंगल साफ झाली आणि मुख्यतः जंगलाबद्दल कसलेही ज्ञान-आस्था नसलेल्या महसूल यंत्रणेच्या ताब्यात ही जंगल होती त्याचा व्हावयाचा तो परिणाम झालाच. आता आम्ही या ओसाड भागाचे वनी-करण करण्यासाठी खास वन-विभाग उघडले आहेत. जंगलाच्या नुकसानीबद्दल केवळ आम्हालाच दोषी ठरविणारे लोक रस्तेबांधणी, धरणे, उद्योग-धंदे, शेती, गुरचराई इत्यादि कारणांमुळे किती जंगल साफ झाले याबद्दल चकार शब्दही काढत नाहीत. वन-मजुरीमुळे चाळीस हजार स्थानिक लोकाना रोजगार उपलब्ध होतो व जंगलातून निघणाऱ्या ३,५०,००० घनमीटर लाकूडफाट्या-पैकी, सुमारे ५०,००० घनमीटर लाकूडफाटा स्थानिक लोकानाच हक-हकूक ( वन-अधिकार )च्या स्वरूपात पुरविला जातो हेही ते पद्धतशीरपणे विसरतात. हिमालयात देशभरचे यात्रेकरू येतात, त्याना सरपणाची जरुरी असते. एकट्या बद्रिनाथमंदिराचा प्रसाद शिजविण्यासाठी मे-नोव्हेंबरपर्यंत एक हजार क्विंटल जळाऊ लाकूड लागते. कुठून आणणार आम्ही ही लाकडे ?

जंगल तोडूनच ना ?'

'तुम्ही म्हणता त्याप्रमाणे तुमची धोरणे, कार्ययोजना इतक्या संवेदनाशील, शास्त्रशुद्ध असताना मग लोकात एवढा असंतोष का निर्माण झाला ?' –आम्ही.

'आमचं कर्तव्य व लोकांचे हितसंबंध यात अंगभूत विरोध आहे. शिवाय काही लोक आपलं पुढारीपण मिरवण्यासाठी त्याचा पद्धतशीर फायदा घेत असतात.' –श्रीवास्तवजी.

'पण 'चिपको' आंदोलनानं स्थानिक माणसाच्या अडचणींची, वन-मजुराच्या हलाखीची परिस्थिती प्रकर्षाने पुढं आली, असं तुमच्याच कागदपत्रात लिहिलं आहे' –आम्ही.

'तेवढी गोष्ट त्यांनी चांगली केली. आमच्या सहकार्याने अजूनही किती तरी चांगल्या गोष्टी त्यांना करता येतील. आम्हालाही खूप करावेसे वाटते; पण आमचे हात बांधलेले असतात. अनेक दडपणे येत असतात. तुम्ही चाबाच्या जंगलात राहिला आहात. तुम्हाला याची कल्पना असेलच' –श्रीवास्तवजी.

गृहस्थ कळकळीने बोलत होता. बोलण्यात सराईत उडवाउडवी अथवा छापेबाजपणा नव्हता. अजून खूप प्रश्न विचारायचे होते; पण त्यांना दौऱ्यावर निघायची घाई दिसत होती. मनःपूर्वक आभार मानून निरोप घेता-घेता सहज म्हटलं–

'श्रीवास्तवजी, असं म्हणतात प्रत्येक प्रश्नाच्या तीन बाजू असतात. एक याची, एक त्याची आणि एक खरी'

'आणि चौथी पत्रकारांची!' माझे वाक्य पुरे व्हायच्या आतच त्यांनी मस्तपैकी टोमणा हाणला! गृहस्थ खरोखरच पूर्वाश्रमी प्राध्यापक होता की काय, कोण जाणे!!

५ मार्चला सकाळी-सकाळी डेहराडूनला रामराम ठोकला. आता प्रथम ऋषिकेश. तिथे पथकाची विभागणी होणार. दोन गट भागीरथीच्या खोऱ्यात तर उरलेले तीन अलकनंदेच्या आसमंतात. भागीरथीचे खोरे प्रामुख्याने श्री. सुंदरलाल बहुगुणांचे कार्यक्षेत्र. तिथे जाणाऱ्या गटांना घेऊन जाणारे कार्यकर्ते आले होतेच. श्री. चंडीप्रसादजींच्या कार्यकर्त्यांचा मात्र अजूनपर्यंत पत्ता नव्हता. निरोप नव्हता. त्यामुळे अलकनंदेची तुकडी घेऊन मीच गोपेश्वर गाठणार होतो.

दोन बसेसची व्यवस्था झाली. सामानाची-साथीदारांची विभागणी झाली. आता दहा दिवस फाटाफूट. निरोपा-निरोपी झाली. फिर मिलेंगेचे वादे झाले. ' जगल बचाव ऽ मानव बचाव'चे नारे झाले. बसेस निघाल्या आपापल्या वाटेने. आता पुढची मुशाफिरी हिमालयकी गोदमें. एक अनामिक हुरहूर मनात दाटून आली.

ऋषिकेशाचे मैदान ओलाडून बस हळूहळू पहाड चढायला लागली. डावीकडे पहाड, उजवीकडे गंगा. बालपणीच्या मैत्रिणीसारखी कळत-नकळत दूर सरकणारी. गगातीरीचे असख्य आश्रम आणि मदिरे मागे पडत होती. गीता मदिर, हरेकृष्ण मदिर, स्वर्गाश्रम, लक्ष्मणझुला–कडक्टर आपल्या परीने माहिती पुरवीत होता. मला त्यातले काही नवीन नव्हते. सगळंच पाहिलं होतं असंही नाही, पण गगा मात्र नवीन होती. प्रत्येक क्षणी नवीन भासली होती. प्रत्येक वेळी नवीन भेटली होती. अनेक रूपं. अल्लड-अवखळ-थकलेली-भागलेली-निळी-सावळी आणि मळलेली सुद्धा. पण प्रवाही.

देवप्रयागाला भागीरथी–अलकनदेचा सगम आहे. १९७८ सालच्या दुर्घटनेतून अजूनही भागीरथी सावरलेली नाही. भागीरथीचे गढूळ पाणी आणि अलकनदेच्या निळ्याशार पाण्याचा संगम म्हणजे अपने मन की गगा का जिवत साक्षात्कार. मनातील सत्-असत्च्या सगमाचे अप्रतिम प्रतीक !

देवप्रयागच्या संगमाचे सुख मात्र आमच्यातील अनेकाना लाभले नाही. ऋषिकेश सोडल्यापासून बसने ज्या गिरक्या घ्यायला सुरुवात केली त्या ' गिरकी घेऊन ऽ गिरकी घेऊन ' काही संपेचना. अतापर्यंत ते सपणारही नव्हते पुढच्या प्रवासाची ही तर फक्त झलक होती. पहिल्या अर्ध्या तासातच गाणारी निम्मी तोंड बद झाली आणि निसर्ग-सौंदर्य बघण्याच निमित्त करून मडळी खिडकीबाहेर माना काढून वकावक ' करू लागली. ओकारीची लागण प्लेगपेक्षाही फास्ट असावी. एकाने ' आ ' वासला की दुसऱ्याने तबोरा लावलाच. तरी नशीब, ही बस जरा ऐस-पैस होती आणि आत गर्दी नव्हती. माणसानी खचाखच भरलेली आणि अस्मान ठेंगण झालेल्या पर्वतीय यातायात निगमा 'ची ( व्वा ! काय फिट्ट नाव आहे ! या हिंदीतले किती तरी अनर्थ मराठीत फिट्ट बसतात. उदाहरणार्थ सरकारी लॉटरीचे ' राजकीय लॉटरी, ' सरकारी पशुचिकित्सागृहाचे, ' राजकीय-पशु चिकित्सागृह ' ( वा, हे तर दोन्हीकडे फिट्ट ! ) अर्थात आपल्याकडेही ' शासकीय मुलीं 'ची वसतिगृहे असतातच. असू देत.) बस असायला पाहिजे होती निसर्ग-सौंदर्यात आरपार चिंब व्हायला झाल असत.

आताही बिन-ओकारीच्या गोळ्या खाल्लेले साथीदार अजगरासारखे सुस्तावलेले होते आणि ओक ऽ ओक ओकणारे मनापासून ओकत होते. मात्र ओकारी-सारखी सच्ची आणि अंतर्बाह्य गोष्ट दुनियेत दुसरी कोणती नसेल! त्यातून 'ओली' संपून 'सुकी' सुरू झाली की परमानदम्! शिवाय ओकारी ओळखीचा पाळखीचा ओळखत नाही. बसच्या असल्या या धकाधकीत आचार्य हरिभाऊ पुरोहित मात्र पूर्णपणे शाबूत होते. भगवान रजनीशाच्या या चेल्याने प्रवासाच्या सुरुवातीलाच भक्तगणांना, काय खावे-काय प्यावे, किती खावे-किती प्यावे (बहुधा चहा-पाणीच!) गुरुमत्र दिला होता. भगवानाची आज्ञा मोडणाऱ्या माठाळांची मात्र हे तितक्याच दयाबुद्धीने त्रास्त-पुस्त करत होते. लिंबू-सुपारीची चिरीमिरी अथवा फुटाण्याचा तोबरा देत होते. हरिभाऊच्या सेवाकार्याने असेल अथवा प्रवासाचा पहिला धक्का (आणि पोटातील अन्न) ओसरल्यामुळे असेल, मडळी थोडी सावरली आणि सुस्तावलेले काहीजण सोडले तर बसमध्ये परत एकवार चैतन्य पसरले. निसर्ग आणि सौंदर्य दोन्ही जाणवू लागले!

मार्च सुरू झाला होता. आसमतात ऋतू बहरायला पाहिजे होता. आरुची गुलाबी स्वप्न उमलायला पाहिजे होती. बुरॉंझच्या लाल परीने खुणवायला हवे होते. चुल्ह-पुलमचे लाल-सफेद गालीचे उलगडायला पाहिजे होते. फ्योंलीची पिवळी-धम्मक फुल लगडायला हवी होती; पण कुदरतची मिजास बिघडली होती. शिशिराची थंडी संपली नव्हती एवढेच काय तर वर्षाऋतूची भैरवीच अजून सुरू होती, कुदरतने मिजास धरायची नाही तर कोणी? आणि मिजास बिघडली तरी ती कुदरतच. तिचे बिघडणेही सुदर असते, हवेहवेसे असते. ढगा-धुक्यात हरवणारी दऱ्या-खोरी म्हणजे आधीच एक जीवघेणे प्रकरण. हिमालयाच्या अथागतेची गहिरी धार, बर्फाचे भस्म फासलेले उत्तुंग पहाड आणि खोलवर अलकनदेच्या निळाईची हलकी किनार. बरखाबहारचा शिड-कावा. कधी मुलायम तर कधी जीव ओतून. मुन्नाने जुन्या-नव्या गझलांचा ठाव घेतलेला तर कुसुम मिवलेल्या डोळ्यानी स्वतःशीच गुणगुणत होती, 'हिमा-लय असा डोळे भरून पाहण्याची खूपखूप वर्षांची आस होती. अस स्वप्न जगण्यासाठीच निसर्गाजवळ यायच असतं आणि अशी स्वप्नं जगण्यासाठीच निसर्गाला समजून वागायच असत.'

आसमतात हिरवी-पोपटी शेत डुलत होती. मात्र काही तुरळक भाग सोडला



तर नजरेच्या टप्प्यात भरदार जंगल अभावानेच येत होते. मला उत्तराखंडातला पहिला प्रवास आठवला. आम्ही टेहरीकडे निघालो होतो. हृषिकेशचे मैदान पार झाल्यावर सृष्टिशोभा बघायला आम्ही सरसावून बसलो होतो. सुरुवातीला बऱ्यापैकी झाडी होती. 'वृक्षारोपण कार्य महान, एक वृक्ष दस पुत्र समान' पासून 'देशकी धरती करे पुकार, बच्चे कम हो पेड हजार' पर्यंत वन-खात्याने लावलेल्या पाट्याही जागोजाग अंकुरल्या होत्या तोपर्यंत सर्व काही सुजलाम्–सुफलाम् वाटत होते; परंतु चंबा ओलांडले मात्र; दुतर्फा बोडक्या डोंगराची कतार सुरू झाली होती. हे असले बोडके डोंगर, त्यातून डोकावणारे निवडुंगाचे भेसूर फणे आणि जीव घुसमटून टाकणारी कुंद हवा याने मनाला भयंकर उदासी आली होती हिमालयातील जंगल-तोडीच्या समस्येची माहिती घ्याय-लाच आम्ही गेलो होतो; पण त्याची झलक सुरुवातीपासूनच आणि इतक्या मोठ्या प्रमाणावर मिळेल याची कल्पना नव्हती. एखाद्या सुकेशीने बॉबकट काय बॉयकट केल्याचेही समजू शकते, पण सफाचट मुंडण म्हणजे हद्द झाली! सर्वात दुःखाची गोष्ट म्हणजे तिच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने झालेलं हे मुंडण होतं!

पूर्वीच्या काळातील एखाद्या अभागी विधवेसारख !

गोपेश्वराच्या वाटेवर रुद्रप्रयाग लागते. जिम कॉर्बेटने खतरनाक चित्त्याला खलास केले ती जागा रस्त्याच्या जवळच आहे. ही हकीकत एका फलकावर चितारून ठेवली आहे. पण आता अंधार पडत आला होता. दिवसभरचा प्रवास करून रात्री गोपेश्वर गाठले. श्री. चंडीप्रसादजींना बघताच एकदम हायसं वाटलं. कारण ' दशौली ग्रामस्वराज्य संघा ' चे कार्यकर्ते डेहराडूनला न आल्याने शंका-कुशंकांची पाल मनात उगाचच चुकचुकत होती; पण निरोपाच्या काही तरी घोटाळा झाला होता. आमची वाट पाहत ते तिथेच थांबणार होते. बाकी काही नव्हतं संघाच्या अतिथिगृहात आमची व्यवस्था होती. आमची सुमारे तीस जणांची सेना. त्यामानाने अतिथिगृह छोटेखानी. अगदी साधे, पण संघाच्या जवान कार्यकर्त्यांनी काही उणे पडू दिले नाही. जमेल तेवढी गरम कपड्यांची सोय केली. जवळच्या हॉटेलात जाऊन चार घास खाल्ले आणि जीव गोठवणाऱ्या थंडीत एकदाचे अंथरूण गाठले. मग झोपही गिरक्या-गिरक्यांनी चढत गेली.

गोपेश्वर, तिबेटच्या सरहद्दीवरील चामोली जिल्ह्याचे मुख्य ठाणे. बद्रीनाथ-केदारनाथाची प्रसिद्ध मंदिरे चामोली जिल्ह्यातीलच. जिल्ह्याचे मुख्यालय प्रथम हृषिकेश-जोशीमठ या राजमार्गावरील चामोलीलाच होते; पण १९७० साली अलकनंदेने पुराचा तडाखा हाणला आणि धोक्याची टांगती तलवार टाळण्या-साठी मुख्यालय जवळच्या पहाडातील गोपेश्वरला हलवावे लागले. आद्यगोपे-श्वरचा जीव लहानसाच. डोंगरउतरणीवर विखुरलेले मूळ गाव आणि सरकारी गाव यांचा अजूनही मेळ बसलेला नाही. मूळ गाव अजून बुजूनच आहे. उलट ' सरकारी गावा ' मुळे गावकऱ्यापुढे चारा-पाणी-सरपणाचे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

गोपेश्वरचा पहिला दिवस पावसाच्या धुँवाधार धारांनीच उजाडला. मोसम फार खराब होता. तो सुधारण्याची सुतराम चिन्हेही जाणवत नव्हती. रेडिओवरच्या बातम्यांतही हिमालयात मुसळधार वृष्टी झाल्याची आणि आणखी होण्याची शक्यता वर्तविली होती. ( 'कुठे ऽ कुठे पावसाच्या तुरळक ऽ सरी पडतील ' वगैरे नाही, तर चांगल्या मुसळधार ). सतराशेसाठ ठिकाणी कडे कोसळले होते. माणसं दगावली होती. आनंद आहे. म्हणजे आता सगळ्यांच्या घरच्या मंडळींना घोर. आता हिमालय एवढा ऐस-पैस. कुठे तरी कडे कोसळणारच ! काही



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८५१२

माणसं मरणारच ! शेवटी ज्याचा त्याचा नियतीशी संकेत ठरलेला असतोच, पण हे तत्त्वज्ञान नंतरचे. आपला माणूस असला की, त्या क्षणाला घोर लागतोच. मी एवढा आडमाप भटकतो. पण कधी नव्हे ते एकदा गीता महाबळेश्वरला गेलेली असताना तिला जरा उशीर झाला. पाचगणीच्या घाटात मनाच्या सगळ्या मोटारींचे ब्रेक्स् फेल झाले. टायर पक्चर झाले ! अर्थात याला इलाज नसतो आणि करण्यासारखं काही नसतं. शेवटी थंडी-पावसानं गारठलेल्या साथीदारांना जरा खुलवावं म्हणून मी आणि कुसुमने लोकगीतांचा कोरस मांडला. 'या दाड्यावरून नवरा कुणाचा येतो' पासून 'डोंगरी शेत माझं ग' पर्यंत बघता-बघता फेर मोठा झाला. संघाचे जवान कार्यकर्तेही जल्लोषात सामील झाले. शेवटी छप्पर कोसळेल म्हणून घाबरून खालचा दुकानदार वरती आला तेव्हा आमचा दंगा थांबला; पण हवा तो परिणाम नेमका साधून गेला. मरगळ-बिरगळ पार पळाली !

चंडीप्रसादजीही एवढ्यात आले. चिपको आंदोलनाच्या विचाराची रुजवात या इथेच झालेली. प्रणेते चंडीप्रसादजीच. साहजिकच सर्वजण त्यांच्याकडून



माहिती घेण्यास उत्सुक होते. आमचा सर्वांचा परिचय करून घेतल्यावर आणि आपल्या साथीदाराचा करून दिल्यावर त्यांनी आपल्या संथ–धीम्या आवाजात बोलायला सुरुवात केली.

चंडीप्रसाद एक ठाय लयीतला माणूस आहे. धीमे-धीमे भिनतो. मी इतके वेळा त्याना भेटलो आहे, पण प्रत्येक वेळेस सुरुवातीला एक अनोख संकोची-पण–बुजरेपण अनुभवाला येत. पहिल्या भेटीची गमत आठवते. मी प्रथम सिल्याराला सुदरलालजींना भेटून आलो होतो. सुदरलालजींची वेगळी तऱ्हा. गेल्या–गेल्या ते आपला ताबा घेतात. श्री. बाबा आमट्यांसारखा. बाबाचा स्वभाव आक्रमक, तर सुदरलालजींचा आर्जवी; पण शेवटी ताबाच ! विचार कल्पना–अनुभवांच्या माऱ्याखाली आपल्या डोक्याचे छप्परच काही काळ हरवून जाते. हा ताजा अनुभव घेऊन मी चंडीप्रसादजींना भेटलो होतो. त्यानी प्रेमाने आगत–स्वागत केले, पण बैठक जमवून चार तास झाले तरी जुजबी गोष्टींपलीकडे बोलणे सरकेना. एके काळी सुंदरलालजींचाच चेला असलेला हा भला माणूस काही केल्या खुलत नव्हता. म्हणजे तुटकपणा नाही अथवा उसनी अलिप्तताही नाही. मला खूप विचारायच होत, आणि त्यांनाही खूप सागायच होत; पण समोरचा माणूस खुलला नाही तर मिळते फक्त ढोबळ माहिती; आम्हाला ती नको होती. आंदोलनाच्या इतिहासाबरोबरच आंदोलनातील विविध व्यक्तिमत्त्वाचे, विचार–धारांचे, कार्यपद्धतीचे, गुण–दोषांचे बारकावे समजून घ्यायचे होते; पण परस्पर विश्वासाचा सूर अजून आम्हाला सापडत नव्हता. मी बोलका आहे. थोडा उतावीळही आहे. समोरच्या माणसाला बोलतंही करू शकतो, पण अशा ठाय लयीतील माणसाना त्याच्या गतीनच खुलवाव असं थोड-फार अनुभवल होत. सुरुवातीला जरा कठीण जातं; पण एकदा सूर जमले की मैफिल जमून जाते.

आताही तसंच झाल. चंडीप्रसादजींनी आंदोलनाचा इतिहास थोडक्यात सागितला. विविध टप्पे वर्णन केले. जय सांगितला, पराजय सागितला. एकाच विलक्षण अलिप्तपणाने ! 'मी 'ला पुढे करण्याचा सोस नाही, उगाच लपविण्याचाही आभास नाही. सघातर्फे आसपासच्या गावात चालणाऱ्या कार्याची माहिती दिली. सघातर्फे चीडच्या राळेपासून टर्पेंटाइन बनविण्याचा व शेतीची लाकडी अवजारे बनविण्याचा कारखाना चालविला जातो, त्याची माहिती दिली. कार्यकर्त्यांच्या प्रश्नाना उत्तरे दिली आणि बैठक जाणवायच्या अगो-

दूरच सपूनही गेली. आमच्यातील काहीजणाचं मात्र यावर समाधान नव्हतं. त्यांनी संभाषणाचा धागा पकडून ठेवला. प्रश्नाचं ओझं मोकळं केलं. प्रश्न जरा आडवे असले तरी आंदोलन समजून घ्यायला महत्त्वाचे होते. आम्ही मुद्दाम होऊनच एक तेढा प्रश्न टाकला, 'चंडीप्रसादजी, तुमच्या ग्रामोद्योगाला हव्या असलेल्या कच्च्या मालाच्या बदल्यात, सरकारने तुमच्या सवाला विकत घेतले आहे, असा काही जणाचा आरोप आहे!'

आमचा रोख माहिती घेण्यावर आहे की, कोणत्या पक्षाची बाजू घेण्यावर, याचा क्षणभर अंदाज घेत, जराही विचलित न होता चंडीप्रसादजी म्हणाले,

'विकलेच जायचे होतो, तर आंदोलनाच्या सुरुवातीलाच सरकारने सौदेबाजी सुरू केली होती, तेव्हाच विकले गेलो असतो. थोड्या नफ्या–तोट्यासाठी आपण विकले जाऊ, अशी भीती ज्याना वाटते, त्यानी खरोखरच या फंदात पडू नये. आत्मविश्वासाचा प्रश्न आहे हा. आम्हाला कोण कशाने विकत घेणार? या जंगलसंपत्तीवर आमचा हक्क आहे आणि हक्काने आम्ही ती घेतो. यात कसली आहे कोणाची मेहेरबानी?' आवाजाची पट्टी जराही चढू न देता, पण धारदार आवाजात चंडीप्रसादजी पुढे बोलू लागले. वरून साधा-भोळा-गबाळा वाटणारा माणूस आतून अगुवृक्षासारखा मजबूत आहे, वास्तवाच्या घट्ट पायावर उभा आहे हे जाणवू लागले. 'आज काही लोक आंदोलनाचे पर्यावरणात्मक आणि आर्थिक असे अलग कप्पे करत आहेत; पण ते चूक आहे. आम्ही अडाणी असलो तरी आम्हालाही पर्यावरण थोडे-फार समजते; पण आम्ही ते पुस्तकातून नाही, तर जीवनाच्या रणांगणातून शिकलो आहोत. त्यामुळे आम्ही पर्यावरण, आर्थिक प्रश्न, माणूस असे अलग-अलग कप्पे मानत नाही, तर एका अखंड चक्राचे ते अविभाज्य घटक आहेत असे मानतो. आमचा निसर्गाशी संबंध केवळ भावूक नाही. 'एक पेड दश पुत्र समान' असे पुराणातले दाखले ऐकून मनुष्य एक दिवस माना डोलवेल; पण मग पोटातली भूक त्याला स्वस्थ बसू देणार नाही. म्हणूनच आर्थिक प्रक्रियेतूनच माणसाचा निसर्गाशी संबंध जोडला पाहिजे. मूल जसं आपल्या आईचं दूध पितं, रक्त शोषत नाही, त्याचप्रमाणे एका मर्यादेत वन-संपत्तीचा उपयोग करून घेणाऱ्या छोट्या–छोट्या उद्योगांचा आम्ही आग्रह धरतो. निसर्ग

आणि पहाडी माणूस, दोघाच्याही आवाक्यातले हे उद्योग आहेत. या प्रक्रियेत परस्पर प्रेम वाढीस लागते. सोन्याची अंडी देणारी कोंबडीच मारून खाण्याची बुद्धी आमच्या पहाडी लोकाची नाही, पण या संबंधाचे सोयर-सुतक नसलेले बाहेरचे ठेकेदार लोक उद्या भगवान शंकराच्या जटाही उपटून विकतील— '

आम्ही मध्येच त्याना अडवून म्हटल, ' पण स्थानिक लोकानीही शेतीसाठी जंगलाचा नाश केला आहे. '

' खर आहे ते आम्ही बाहेरच्या लोकाच्या कुऱ्हाडी अडवू शकतो; पण खुद्द आमच्या लोकाचेच काय ? मी कार्यकर्ता आहे तसा गृहस्थही आहे. घरात चूल पेटवायला लाकूड नसताना, वन-रक्षणाच्या गोष्टी बायकोला कोणत्या तोंडाने सांगू ? खरा पेच, व्यक्तिगत गरज आणि सामाजिक हित याच्या गुंत्यात आहे. म्हणूनच त्याची सांगड घालणारी, माणसाला निसर्गाशी जोडणारी वन-शेती-सारखी योजना आम्ही वन-खात्याच्या सहकार्याने राबवत आहोत. सरकारने संघाच्या मागणीनुसार गोपेश्वर गावातील १३३ कुटुंबांना प्रत्येकी एक हेक्टर जमीन ९९ वर्षांच्या लीजने दिली आहे. अटी दोनच : तिथे शेती करायची नाही आणि जमीन विकायची नाही पूर्वीच्या उजाड डोंगर-उतारावर दीवार-बंदी ( दगडी कुंपण ) करून, लोकांनी आतल्या बाजूस खाद्यचारा-पाणी-सरपण देणारे, " पंच-जीवनवृक्ष ' लावले आहेत. लोक डोळ्यात तेल घालून त्यांचे रक्षण करीत आहेत. ही नुसती झाडे नाहीत तर आंदोलनाचे खडे शिपाई आहेत ! हिंमत असेल तर कोणी हात लावून दाखवावा ! '

असे हे खडे सैनिक केवळ गोपेश्वराच्या डोंगरावरच नाहीत, तर अलकनंदा-ऋषिगंगेच्या संवेदनाशील भागातही सर्वदूर पसरले आहेत. ज्या पाणलोट विभागातील जंगल-तोडीने पुराचा जबर तडाखा बसला, त्याच संवेदनाशील भागात जाऊन संघाच्या कार्यकर्त्यांनी विद्यार्थी व खेडुताच्या सहाय्याने मजनु, अंगु, ओक, भीमल, देवदार आदींची सुमारे दीड लाख झाडे लावली आहेत. आपल्या परिश्रमानी निसर्गाचा प्रकोप थांबविण्याचा आत्मविश्वास ते बोलून दाखवत आहेत. विद्यार्थ्यांच्या ' डालियों का दगड्या ' ( वृक्ष-मित्र ) संघटने-मार्फत गावोगाव वृक्षारोपण, वृक्ष-संवर्धनाची शिबिरं होत आहेत !

आम्ही आमच्या भटकतीत या कामाची प्रत्यक्ष ओळख करून घेणारच होतो; पण बोलताना जाणवत होते की आपण केलेले काम फुगवून सांगण्याचा

किंवा उगाच त्याचे अवडंबर माजविण्याचा या मंडळींचा खटाटोप दिसत नाही. आपण लावलेली झाडं, त्यांचे प्रकार याची गाववार व्यवस्थित नोंद त्यांच्यापाशी आहे. तसेच अति-उत्साह व अज्ञान यामुळे पहिल्या काही वर्षांत बरीच झाडं मेली हे सांगण्याचा प्रांजळपणाही आहे. आपली संघटना अजून छोटी आहे, त्यामुळे पुऱ्या उत्तराखंडाची भाषा न करता, अगोदर फक्त चामोली जिल्हा आणि परिसर यापुरतीच आपली ताकद पणाला लावण्याचे भान त्यांना आहे. याबरोबर या विभागात आपल्या संघटनेच्या इच्छेविरुद्ध झाड काय, पण झाडाचे पानही तोडले जाणार नाही याचा जबर विश्वासही आहे. वन-विभागाला आज या भागात कुठेही कटाई करायची असेल तर



चंडीप्रसादजींशी बातचीत करताना जगदीश गोडबोले

प्रथम ते 'ग्राम स्वराज्य संघाला' त्याचा तपशील कळवतात. संघाचे कार्यकर्ते त्या स्थानाची बारकाईने तपासणी करून आपला अभिप्राय देतात. संघाच्या मताचा कधीही अनादर होत नाही. या व अशा गोष्टींना 'सौदेबाजी' म्हणून हिणवणाऱ्या लोकांना चंडीप्रसादजी ठणकावून जबाब देतात 'ही कोणाची मेहेरबानी नाही तर आमच्या ताकदीची पावती आहे. एरवी जंगल-तोडीच्या आपल्या कार्य-योजना अत्यंत शास्त्रीय आहेत, अशा गमजा मिरवणारे सरकार, आमच्याकडे परत मत मागायला कशाला आले असते? शिवाय आमची ताकद निव्वळ उपद्व्यापी, नकारात्मक नाही, तर आम्हालाही वनरक्षणविद्येत गती आहे, याचा आमच्या प्रयत्नांतून प्रत्यय आल्याने आज आमच्या शब्दाला मान आहे!'

आपल्या विरोधकाबद्दल बोलताना त्यांनी एक गमतीदार गोष्ट सांगितली: 'आमच्या शाळेजवळ दोन हॉटेल होती. दोन्ही हॉटेलमालक आवर्जून गिऱ्हाइकाना सांगायचे की दुसऱ्या हॉटेलातले पकोडे तेलातले आहेत. आमचे मात्र शुद्ध तुपातील आहेत!' मग थोडं थांबून हसून ते म्हणाले, 'हमारी हालत कुछ वैसीहि है। मगर सबसे अफसोस की बात यह है कि, हम किसीके पकोडे घीमे बने हुए नहीं है।'

दुपारी जरा उघाड पडल्यावर गावाबाहेर भटकायला गेलो. दोनतीन बोडक्या डोंगरांपैकी, अलीकडच्या डोंगरावर हिरवे हिरवे पुजके दिसत होते, लोकांची वनशेती याच डोंगरावर आहे. आम्ही गोपेश्वरच्या पहिल्या वारीत पाहिलेला हा प्रयोग निश्चितच जोम धरत आहे. गावच्या एका अंगाला बांझ-बुराँशचे गच्च हिरवं जंगल होतं. बुराँशचे एखादं-दुसरं फूल वसंतऋतूची चाहूल देत होते. हे देखणं जंगलही बोडके होणार होतं, पण गोपेश्वरच्या महिला मंगल-दलाने वाचवलं. सर्वार्थाने मंगल असलेल्या या 'मंगल-दलाने' केवळ जंगलच वाचवलं नाही तर गोपेश्वरच्या खाणीतून काढल्या जाणाऱ्या दगडामुळे भूस्खलन होते हे लक्षात आल्यावर आपले महिला-पहारेकरी नेमून, कोसळणारा पहाडही वाचवला आहे. संध्याकाळी संघाचा राळ-कारखाना आणि रोप-वाटिका (नर्सरी) पाहिली. वृक्ष-रोपणाच्या प्रयत्नात केवळ सरकारी रोप-ट्यांवर वा मेहरबानीवर अवलंबून राहण्याची सवय व्हायला नको म्हणून उपलब्ध जागेचा जास्तीत जास्त वापर करून चारा-सरपण-फळ देणाऱ्या अनेक रुंदपर्णी वृक्षांची रोपटी लावली आहेत, स्वावलंबनाने जगवली आहेत.


स्वावलंबनाचे हे रोपटे मला जास्त लोभसवाणे वाटले, विश्वासक वाटले.

सिन्हीसाजेला अतिथिगृहात परतलो. जेवायच्या अगोदर प्रार्थना होती. सर्वांना जबरदस्तीने नाही, अपने मर्जीसे. मला प्रार्थना मनापासून आवडतेही आणि नावडतेही. प्रार्थनेसारखं अपूर्ण काही नसत आणि प्रार्थनेसारख संपूर्णही काही नसतं. आपण आपली केलेली विनवणी असते ती. परमेश्वर केवळ निमित्त असतो. चंडीप्रसादजींनी म्हटलेली प्रार्थना मला अतोनात आवडते. मीरेचे आर्त भजन असो वा गांधीजींचे 'हे नम्रता के सागर—' असो, शब्दाची शांत निरामय निरांजन तेवतात. सूर दरवळतात. आत कुठे तरी शांत–शांत वाटतं आपण आपल्याला भेटतो.

प्रार्थना संपली की सुरू झाली–ही तर प्रार्थनेची सुरुवात–

उद्यापासून आपली यात्रा अलकनंदेच्या तीरावरून तीन क्रमांकाच्या गटाबरोबर!

अलकनंदेच्या खोऱ्यातील पीपलकोटी–जोशीमठ भागातील प्रदेशाचा व त्यातील काही गावांचा अभ्यास करण्याची कामगिरी या तीन क्रमांकाच्या गटाकडे होती. पीपलकोटीपासून बेमरू, स्युण, पोखरी, लांझी, ढिंग, तपोवन या मार्गाने लगसीपर्यंत डोंगरवाटांवरून पायी प्रवास करायचा. नंतर बसने प्रवास करून रेणी आणि पाखी गावांना भेट द्यायची, अशी प्रवासाची सर्वसाधारण रूपरेषा होती. बद्रीनारायणाला जाणारा मोटररस्ता हा या भागातील एकमेव पक्का मोटर-रस्ता. हा रस्ता अलकनंदेच्या डाव्या काठावरून जातो. वरील सर्व गावं या रस्त्यापासून पाच ते दहा किलोमीटरच्या परिसरात आहेत. पाखी अथवा गरुडगंगा हे गाव मुख्य रस्त्यावरच आहे. रेणी गाव जोशी–मठाहून मलारीकडे जाणाऱ्या मोटररस्त्यावर, ऋषिगंगा व धवली- गंगेच्या संगमावर आहे. अलकनंदेच्या उजव्या काठावर बेमरू, पोखरी, ढिंग ही गावे आहेत. अलकनंदेला मिळणाऱ्या मैनागाडच्या ( नाल्याच्या ) काठी स्युण गाव आहे. या सगळ्या गावांची उंची समुद्रसपाटीपासून चार हजार ते सात हजार फुटांच्या दरम्यान आहे. गोपेश्वर, चामोली व जोशीमठ ही या गावांतील प्रमुख डाकघरे. दशौली ग्राम स्वराज्य संघाचे कार्यकर्ते भूपालसिंग (ऊर्फ मामुजी) आणि जगदीश प्रसाद हाटवाल यांना सोबतीला घेऊन सात मार्चला सकाळी गोपेश्वर सोडले




प्रथम पीपलकोटी गाठले. गाव बद्रीनाथ रस्त्यावरच असल्याने दुकान-हॉटेलं वगैरे भरपूर होती. भटकंतीत आमची राहण्या-खाण्याची सोय मुख्यतः गावातल्या घराघरांतून होणार होती; पण अडीअडचणीच्या वेळेस म्हणून किरकोळ किराणामालाची खरेदी केली. प्रत्येकाने आपली टाकी फुल केली. कारण आठ किलोमीटर्स पहाडी चढण चढून पाच हजार फुटावरील बेमरू गाठेपर्यंत पार संध्याकाळ होणार होती. एका प्रचंड उतरणीनंतर अलकनंदा एका झुलत्या पुलावरून पार केली आणि बेमरूची बिकट वाट धरली.

बेमरूची वाट तशी बिकट नव्हती; पण चढण आणि सतत चढण याने जीव सुरुवातीला जरा मेटाकुटीला येतो. मी आणि नागेश आलो होतो तेव्हाची गमत आठवते. आम्ही पीपलकोटी सोडले आणि पावसाची कुरबुर चालू झाली. वर बेमरूला पाऊस-बर्फाचा मारा चालल्याचे दिसत होते. आमच्याजवळ छत्री रेनकोट काही नव्हते आणि आतले गरम कपडे भिजले असते तर बाधा झाला असता. कारण आम्हाला हिमालयात अजून आठ-दहा दिवस काढायचे होते. आमच्याबरोबर दिल्लीची काही मंडळी होती. त्यांचा उत्साह

दांडगा होता. जिगर दाडगी होती. त्यातला एक तरुण पांगळा होता तरी त्याने हेका धरला होता. काही झालं तरी मी बेमरूला जाणारच. त्याला लगेच दिल्लीला परतायच होत; पण आम्हाला असा ॲव्हेडो परवडणार नव्हता वा आमची जिगर गारठली होती म्हणून आम्ही वर जाण्यास तितके उत्सुक नव्हतो. चंडीप्रसादजी सोबत होते. त्यांनी एकूण परिस्थिती ओळखली. त्यांनी आम्हाला वर चढण्याचा आग्रह-बिग्रह केला नाही. ते बेमरूला जाऊन परते-पर्यंत आम्ही खालच्या गावातच थांबावे असं सुचवलं आणि निघण्यापूर्वी सहजपणे एक कोरसगीत सुरू केलं —

'चलता मुसाफिरहि पायेगा मंझील और मुकाम रेऽ ।

वीरोंकी यह बाट है भाई कायर का नहीं काम—नही कायरका काम रे ।'

गीताचे संपूर्ण बोल आता नीट आठवत नाहीत; पण अर्थाने दिलेला झटका अजूनही आठवतो. कसला पाऊस आणि कुठला बर्फ आणि कसले गारठणे ! एका तडाख्यात पहाड चढून गेलो आणि मग मात्र अंगावर अक्षरशः रोमांच उभे राहिले. बर्फा – पावसातही पहाड चढून आलेल्या मित्रांच्या स्वागतासाठी आक्खे गाव ढोल-नगारे-तुताऱ्या घेऊन लोटले होते. आम्ही आमच्याबरोबर अक्रोडाची ५०० रोपं नेली होती. जरा उघाड मिळताच ढोल-नगारे यांच्या निनादात वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. परत हिमवर्षावाला सुरुवात झाली. अक्रोड, कांचुला, पागर आदि पतझडी वृक्षांना हिम व वर्षा दोन्हींची जरुरी असते. दोन्ही जोडीने आल्याने गावकरी खूष झाले. शाळेच्या ओसरीत पेटवलेल्या शेकोटीच्या भोवती आम्ही मस्तपैकी विसावलो. आभाळभर पिंजणारा कापूस धगधगणारी शेकोटी. तोंडात उडदाची गरमागरम भजी आणि हातात वाफाळणाऱ्या चहाचे भरते प्याले ! और क्या होना था-आनंदम् परमानंदम् !

पीपलकोटीहून प्रस्थान ठेवल्यावर प्रथम लागले मठ. नावाप्रमाणेच छोटेखानी. मग थोड्या अंतरावर सुरेडा. आम्हाला बेमरूला मुक्कामाला जायचे होते; पण उगाच मुसंडी मारून वा शिखर गाठायच्या ईर्षेने बेमरू गाठायचे नव्हते. त्यामुळे वाटचाल सावकाश व सर्व बघत-माहिती घेत करायची असं मुद्दामहूनच ठरवलं होतं. हा मुद्दा महत्त्वाचा होता. कारण अनेकदा अशा वाटचालीत (ट्रेक्स्) प्रथम पोचण्याच्या ईर्षेने वा बहादुरीच्या चुकीच्या कल्पनेने मुख्य बघण्याचेच राहून जाते. आम्ही तो धोका टाळण्याचा प्रयत्न करणार होतो.

मठ, सुरेंडा वा आम्ही नंतर पाहिलेल्या या डोंगरउतारावरील गावाचा रचना अगदी वैशिष्ट्यपूर्ण असायची. गाव उतारा-उतारावर विखरून बसलेले असायचे. घरं दुमजली. रुंदीला कमी, लांबीला जास्त. तळमजल्यावर धान्य-पेंढा-चारा वगैरेची साठवणी, वरचा मजला राहण्यासाठी. घरांची बांधणी दगडांची. दोन मोठ्या दगडामध्ये चिखल-मातीऐवजी परत छोट्या दगडाच्या चिपा. वर स्लेटच्या दगडांची पसरट कौले. वरती-आतून लाकडी छत, दारं-खिडक्या ठेंगण्या-ठुसक्या. वरच्या मजल्यावर कमानी कमानींचा सुंदर सज्जा. बाकदार कमानींवर सुंदर नक्षी वा गणपती, हत्ती नाही तर कमळ कोरलेली. सौंदर्यदृष्टीची साक्ष देणारी. घरापुढे लांबट-चौकोनी अंगण. दगडाने माचलेले. मल्टीपर्पज. गुडगुडी ओढत छानपैकी ऊन शेकत निवांत बसायला वा निवड-टिपण-शिवण करायला खूप उपयोगी. एखाद्या कोपऱ्यात धान्य काढायला छोटेसे उखळ. राम-प्रहरी मुसळीचा लयबद्ध आवाज घुमायचा. जोडीला एखादे गुणगुणते गीत. बहिणाबाईचे जाते असो वा इथल्या कुठल्या माय भगिनीचे मुसळ असो, अशा वेळी त्या जात्याला नाही तर मुसळालाच कंठ फुटून त्यातून सुख-दुःख, प्रीती-भक्ती उमटत असेल. पुरुष माणसाच्या हाती मोट आली की ती पण आपलं मनाचं बोल असंच पोटातून मोकळं करते.

आम्ही पाहिलेली बहुसंख्य गावं छोटेखानी. पन्नाससाठ घराची. वस्ती बहुधा जातवार विखुरलेली. ब्राह्मण-ठाकुरांची घरं-गावच्या वरच्या अंगाला, दलित-वस्ती खालच्या बाजूला. जातीयता अगदी उघडी-नागडी नाही वा सावली-वारा लागू नये एवढी कर्मठ नाही, तरी निश्चितच जाणवली. परंपरेने स्वीकारलेली, म्हणूनच कदाचित जास्त धोकादायक. काही वेळा वरच्या सवर्ण वस्तीतले सांडपाणी खाली दलितांच्या वस्तीतून जाते. पावसाळ्यात प्यायच्या पाण्यातही मिसळते, पण खाली गंगेला मिळालं की सर्व पवित्र झाल अशी भावना ! ! उत्तराखंड म्हणजे तीर्थक्षेत्राचे आगर. धार्मिकतेचा व ( म्हणून ) जातीयतेचा पगडा फार. त्यामुळे अस्पृश्यतेच्या जाणिवेने एखादे वेळी रक्त पेटून उठायचं; पण मन आवरावं लागायचं. कारण आमच्या दोन-चार दिवसाच्या मुक्कामात ते काही मोठं साधणार नव्हतं. मुख्य म्हणजे 'उस' देशसे गंगा बहती है और 'इस' देशसे - जाऊ द्या !

गावाच्या आसपास पायऱ्या-पायऱ्याची शेती, खरीपात भात, मुडवा ( नाचणी ), सावा, वरईची पिके तर रब्बीला गहू, उडीद, सरसो वा मका.

कुटुंबाला सरासरी तीस-चाळीस नाली जमीन (१६ मुठी म्हणजे एक नाली, २० नाली म्हणजे १ एकर). आपली जमीन आपणच कसायची. पुरुषवर्ग बहुतांशी दूरदेशी. ह्यामुळे आता काही ठिकाणी नागरही बायकाच धरू लागल्या आहेत. भूमिहीन व शेतमजूर जवळजवळ नाहीच. घरोघरी 'धन' म्हणजे गायी-म्हशी असणारच. गोशाळा गावापासून दूर. सार्वजनिक स्वच्छतेच्या दृष्टीने ही बाब फार महत्त्वाची. पिकाचा, भाजीपाल्याचा नाश करतात म्हणून कुक्कुट-पालन अनेक ठिकाणी नाहीच. सुरेंद्याला प्रथम माल्टा नावाचे संत्र्यासारखे पण संत्र्याहून मोठे फळ चाखले. या भागात प्रत्येक घरी माल्टाचे झाड आढळलेच. मुशाफिरीत पुढच्या दहा जन्माचे माल्टा खाऊन घेतले. नतर खाऊन कटाळा आला, पण लोकाचा प्रेमळ आग्रह मोडवयचा नाही.

बेमरूला पोचायला सध्याकाळचे सात वाजले. आमच्या बरोबरचे 'मामुजी' याच गावचे असल्याने तशी काही अडचण नव्हती. बेमरू गाव चारही बाजूनी पहाडानी वेढलेले आहे. पहाड कठीण दगडाचा असल्यामुळे कडे कोसळणे इत्यादि प्रकार इथे होत नाहीत. शिवाय पहाड प्रचड उतरणीचे असल्याने जगलही कमी आहे. त्यामुळे जंगल-तोडीची समस्या नाही. गावच्या मालकीची दोन गायराने आहेत. आलटून-पालटून या गायरानांचा वापर केला जातो. लाकूडफाटा चार-पाच किलोमीटर दूर जाऊन आणावा लागतो. म्हणून 'चिपको' आदोलकाची या गावातील कामाची दिशा प्रामुख्याने लाकूडफाट्याच्या झाडाची व फळ-झाडाची लागवड अशी दिसली. दशौली ग्रामस्वराज्य संघाची 'डालियोंका दगड्या' म्हणजे वृक्ष-मित्र नावाची तरुणाची एक सघटना आहे. शाळा-कॉलेजातील हे तरुण 'वृक्षमित्र' वृक्ष-सवर्धन मोहिमात भाग घेतात. बेमरूलाही त्यानी १९७८ साली व नंतर शिबिर घेऊन पांगर, पमनी, खरसू, अक्रोड आदि वृक्षाची गावकऱ्याच्या मदतीने लागवड केली आहे. प्रयोग चागल्यापैकी यशस्वी झाल्याचे जाणवले.

पाहणी पत्रकातील मुद्द्यांना अनुसरून अभ्यास व्हावा अशी अपेक्षा असल्याने गटातील प्रत्येकाने आपल्या आवडीनुसार व गरजेनुसार एक-दोन मुद्द्याचा विशेष अभ्यास केला. गावाचे प्रातिनिधिक चित्र मिळावे व एकाच माणसाकडून सर्व माहिती घेण्याचा दोष टाळावा या हेतूने आम्ही जोडी-जोडीने गावात विखरून माहिती घेण्याचे ठरवले होते. सर्वच ठिकाणी ते शक्य झाले नाही; पण प्रयत्नाची दिशा ती ठेवली होती. बेमरू गावात आठवीपर्यंत

शाळा व पोस्टऑफिस होते. गावातील बहुसंख्य तरुण बाहेरगावी नोकरीस व मुख्यत. सैन्यात आहेत. शेतीभातीही असल्याने गावची आर्थिकस्थिती बऱ्यापैकी जाणवली.



गावकरी – बातचीत करताना

'चिपको' आदोलनात एक–दोन जणांनीच प्रत्यक्ष भाग घेतला असला तरी बहुतेक लोकाना आदोलनाची माहिती होती. वनसवर्धनाबाबत लोक सतर्क होते; पण अधश्रद्धा, रूढीप्रियता, जातिभेद या दृष्टीने सामाजिक मागासलेपण फार जाणवले. गावची वस्ती ठाकूर-ब्राह्मण व हरिजनांची. एकूण घरं बत्तीस; पण गावात जर काही गोड–धोड केले तर तीस वाटे केले जातात व तीस कुटुंबाचा हिशोब सागितला जातो. मात्र या हिशोबात दोन हरिजन कुटुबाना धरले जात नाही !

बेमरूहून दुपारी जेवण करून निघालो. वाटेत लोलॉव नावाचे सपूर्ण हरिजन वस्तीचे गाव लागले. इथेच दालचिनीचे जंगल होते व त्याचा सुवास दरवळत होता. गाव हरिजनवस्तीचे, मात्र आर्थिकदृष्ट्या बरे वाटले. मुख्य व्यवसाय शेती व लोहारकाम. लोहाराचा व्यवसाय बलुतेदारीवर चालतो.

गावाजवळ बऱ्यापैकी जंगल होते. हे गाव अंतर्गत भागात असल्याने व्यापारी जंगलतोड झाली नव्हती. त्यामुळे गवत-लाकूड-फाट्याची अडचण नाही. साधी राहणी व पोटापुरते दाणा-पाणी यामुळे लोक एकंदरीत समाधानी दिसले. मात्र काही जणांना क्षयबाधा असावी असे जाणवले. किंबहुना या सर्वच पहाडी भागात विशेषत: स्त्रियामध्ये त्याची बाधा जास्त असावी असे जाणवले.

आमचा पुढचा पडाव स्यूँण या गावी होता. चमोली तालुक्याच्या पहाडी इलाख्यातील ( तसा सगळाच पहाडी इलाखा, पण हा पहाडातील पहाडी भाग ! ) हे शेवटचे खेडे. दोन पहाडांच्यामध्ये ' मैना ' नदी व नदीपलीकडे जोशीमठ तालुका. संध्याकाळी गावात पोचलो तेव्हा आमचे जोरदार स्वागत झाले. होळीच्या नाचात गावातील जवान-पोरे मश्गुल होती. आम्ही पाठीवरची ( आणि मनावरचीही) ओझी भिरकावली आणि नाचात सामील झालो. आमच्यातील आलमगीर मुलाणी, काळुराम धागडा आणि नामदेव ओव्हाळ म्हणजे नामी कलाकार ! काळुराम संघटनेची तशी गंभीर गाणी म्हणणारा; पण आलमगीर आणि नामा म्हणजे हरहुन्नरी ! ' झिंदाबाद ' असो वा ' मथुरेचा बाजार ' असो, यांचं सर्व काम ' जक्शन 'च ! त्यात हरिभाऊचा ढोल आणि पब्लिकचा उत्साह. धमाल नाच झाला. लेझीम-टिपऱ्या झाल्या. मग चहाचे प्याले आले. गरमा-गरम चहाचे घोट घेता-घेता आमच्याबरोबरीच्या भगवतीप्रसादने आम्ही मंडळी कुठून व कशासाठी आलो वगैरे माहिती सांगितली. इतक्या दूरची मंडळी आपल्या गावात येतात याचे गावकऱ्यांना अप्रूप होते. त्यातून आपल्या अडीअडचणींची माहिती घ्यायला आले आहेत म्हटल्यावर त्याचे प्रेम उतू जायचे !

सकाळी जरा उशिराच जाग आली. उठून पाहतो तो आजूबाजूचे बर्फाच्छादित पहाड हात पसरून स्वागताला उभे ! पाहणीचे काम तर करायचे होते; पण हे आमंत्रणही जबरदस्त होते. शेवटी आमच्यातल्या काही जणांनी समंजसदारीने गावात कामाला सुरुवात केली व काही जण बर्फिल्या पहाडात भटकून आले. मग परतल्यावर सर्वांनी मिळून काम पूर्ण केले.

स्यूँण गाव पण छोटेसेच. बावीस घराचे. सर्व वस्ती ठाकूरसमाजाची. गावच्या आसपास सूचिपर्णी व रुंदपर्णी वृक्षांचे भरपूर जंगल आहे. पूर, कडे कोसळणे अशा आपत्ती नाहीतच. एकूण अलकनंदेच्या या उजव्या तीरावर या आपत्ती

अभावानेच आढळल्या. याउलट स्थिती डाव्या किनाऱ्यावरची. गावच्या आसपास वनखात्याचे जगल आहे. तसेच गावच्या मालकीचे पण जगल आहे. या जगलाचे कुटुबाप्रमाणे हिस्से केले आहेत. प्रत्येक कुटुंब आपल्या ठरलेल्या हिस्स्यातील गवत व लाकूड तोडून नेते. हे हिस्से सर्वांना समान आहेत गावाला अजून ' सुधारणे 'चा वारा न लागल्याने परस्परवाटणीची समजस परंपरा अजून टिकून आहे. गावच्या उजव्या बाजूला डोंगरावर संघाने गावकऱ्याच्या मदतीने वृक्षारोपण केले आहे. कागदी लिंबू व इतर फळझाडे लावली आहेत.

गावात तरुण मुले जास्त आढळली. त्यांचे एक ' नवयुवक मगल दल ' आहे. दलातर्फे गावाकरता रस्ता तयार करणे, दीवार बदी ( दगडाचे कुपण ) वृक्षारोपण आदि विकास-कार्यक्रम राबविले जातात. ' चिपको ' आदोलनात गावातले अनेक तरुण सहभागी झाले आहेत. आपल्या गावात तशी विशेष समस्या नसतानाही सामाजिक जाणिवेने व भविष्याचा वेध घेऊन या तरुणानी आदोलनात सहभागी होणे आम्हाला फार महत्त्वाचे वाटले.

गावात दुधापासून तूप करण्याचा व बकरी-पालनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर आढळला. त्यामुळे दुधा-तुपाची रेलचेल होती. अधिक माहिती घेण्याच्या निमित्ताने म्हणा की, दुधा-तुपाचा परिणाम म्हणा, आमचा गावातील मुक्काम एक दिवसाने वाढलाच !

स्यूँणच्या दुधा-तुपाने चढलेली आमची चरबी दुसऱ्याच दिवशी उतरली. सकाळी ढ्रिंगकडे प्रयाण केले तर सुरुवातीपासूनच उभा रस्ता आडवा आला. त्यातून रस्ता नावापुरताच; बाकी बिकट वाट. खाली मुडी घालून घामाघूम होऊन, एकमेकाला आधार देत कशीबशी वाटचाल-वाटचाल कसली-पायपीट करत होतो ! पहाडी लोकांच्या सहनशक्तीला-चिवटपणाला मनातल्या मनात हजारदा शरण जात होतो. एका बाजूला अलकनदा, समोरून गरुडगगा व पाठीमागून मैनानदी आमची फटफजिती पाहून खळाळून हसत होत्या ! बरीच पायपीट केल्यावर एक छोटी वस्ती लागली हरिजनाची; थांबा असं न सागताही एकजात सर्वांनी बैठक मारली. मामुजीने न सागताच आमच्यासाठी फर्मास चहा मागविला ! हा आनद काही औरच होता. ही वस्ती पोखरी गावची होती. लगेचच पुढे पोखरी गाव होते.

डोंगरमाथ्यावर विस्तीर्ण असे मैदान व मध्ये एक छोटेसे तळे होते. तळ्याला पोखरी असे म्हणतात. त्यावरूनच गावाचे नाव पोखरी असं पडल असेल.

१९७० च्या अलकनंदेच्या पुराने गावच्या शेतजमिनीचे थोडे नुकसान झाले आहे. शिवाय गावच्या पाठीमागील कडा कोसळून काही शेतजमिनी नष्ट झाल्या आहेत. अलकनंदेचा पूर वा कडे कोसळण्याचा संबंध गावकरी जंगलाशी जोडताना आढळले, पण तरीही गावकरी जंगल–लागवडीच्या प्रयत्नाबद्दल विशेष उत्सुक दिसले नाहीत. गावठाणाच्या मागचा पहाड कठीण व जास्त उताराचा आहे. तिथे पूर्वीपासून जंगल नव्हते व मृद–सधारण खात्याने तिथे जंगल लावण्याचा केलेला प्रयत्न तीन वेळा फसला हे कदाचित त्याचे कारण असावे. मात्र पोखरी गावातून अलकनंदेच्या डाव्या किनाऱ्यावरील गरुडगंगेपासून पाताळगंगेपर्यंतचा जो प्रदेश एका दृष्टिक्षेपात दिसतो त्या प्रदेशात सुरू असलेल्या भूस्खलनाच्या खुणा जागोजागी दिसतात. भूस्खलनामुळे जागोजागी खंडित झालेला बद्रीनाथचा रस्ता व त्यावरून धावणाऱ्या बसगाड्या फार केविलवाण्या दिसतात. अगोदर या अवाढव्य पसाऱ्यात त्या किडा-मुंगीसारख्या भासतात. त्यातून असा पायाखाली धसणारा रस्ता. आपण अशा वेळी बसमध्ये नसतो याचा किती प्रचंड दिलासा वाटतो !



पोखरी तसे मैदानी व रस्त्यापासून जवळ असल्याने बरेच शहरी वाटले. गावात सुशिक्षिताचे प्रमाण पण चांगले होते. गावकऱ्याचा ओढा पांढरपेशा नोकरीकडे व शहरी राहणीमानाकडे असल्याचे जाणवले. गावकऱ्याची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी वाटली. अनेकांच्या घरात रेडिओ, फर्निचर, पितळ्याची भांडी, तबला-पेटी वगैरे गोष्टी आढळल्या. गावकऱ्याना 'चिपको' आदोलनाची माहिती होती; पण प्रत्यक्ष सहभाग नव्हता. उलट निरुत्साहच जाणवला. पोखरीप्रमाणे पुढच्या लाजी गावातही थोडी-बहुत हीच परिस्थिती आढळली. लाजीची प्राथमिक शाळा मात्र फारच छान वाटली. स्वच्छ पांढराशुभ्र चुना लावलेल्या भिंती, भिंतीवर भारताचा नकाशा आणि थोरा-मोठ्यांची (छोट्यांना न पेलणारी) वचने वगैरे. मैदानाच्या कडेने माल्टाची झाड आम्हाला शहरातील शाळा नामक खुराडी आठवली. अशा शाळा पाहिल्या की परत एकदा बालपण यावेसे वाटते. अगदी भरपूर खाल्लेल्या छड्यासकट आले तरी!

पोखरीहून थेट ड्विग गाठले. (याचा अगम्य उच्चार गढवालीच करू जाणोत! स्यूँणचे तसेच. असो.) आत्तापर्यंत पाहिलेल्या गावापैकी या गावाची आर्थिक स्थिती फारच हलाखीची वाटली. गावातील सर्व पधरा-वीस घरे ठाकुरांची आहेत. १९७० चा अलकनंदेचा पूर व गावाजवळ झालेली दरड-कोसळ ( Land slids ) यामुळे सुमारे पन्नास टक्के शेतजमीन बरबाद झाली. गावकऱ्यांना त्याचे भीषण परिणाम भोगावे लागत आहेत. शेतीला पाणी काय, पिण्याच्या पाण्याचीही बोंब आहे. अनेक गावांमध्ये ही हालत आढळली. सर्व गटाना हिमालयाच्या तोंडचे पाणी पळाले असेल ही कल्पनाच आम्हाला खरी वाटली नसती. दुर्दैवाने तशी वस्तुस्थिती आहे. ड्विगचे दुर्दैव इथेच सपत नाही. गावात शाळा नाही. जवळपास आठ-दहा किलोमीटर्सपर्यंत दवाखाना नाही. डॉक्टर पाच-सहा महिन्यातून कधी तरी तोंड दाखवतात, पण त्याच्याकडे औषधे नसतात! अलकनदा ओलांडायला धड पूल नाही. आहे त्या अर्धवट पुलावरून काही वेळा गुर-ढोरं खाली नदीत पडतात. एकूण काय सर्वसाधारण भारतीय खेड्याच्या वाट्याला जे भोग येतात ते ड्विगाच्या वाट्याला पुरेपूर आले आहेत!

गावाच्या आसपास तीन प्रकारची जगलं आढळली. एक गावचे जगल. इथे गावकऱ्यानी बँकेकडून कर्ज घेऊन फळझाडे व इतर झाडाची लागवड केली आहे. सात वर्षानंतर कर्जाचे हप्ते सुरू होतील. ही योजना खूप यशस्वी

झाल्याचे जाणवले. दुसऱ्या प्रकारचे जगल दशौली ग्राम-स्वराज्य संघाच्या मदतीने अलकनंदेच्या किनाऱ्यावर लागवड केलेले आहे. शिवाय गावकरी व संघाचे प्रयत्न बघून वन–खात्यानेही गावाच्या पाठीमागील डोंगरउतारावर जगलाची लागवड केली आहे, पण हा प्रयत्न तितकासा यशस्वी झालेला दिसत नाही. गावकऱ्यांना पर्यावरण व पर्यावरणात जगलसंबंध याची चागली जाण असल्याचे जाणवले. पूर, दरड–कोसळ थांबविण्यासाठी वनसंवर्धनाचे प्रयत्न करण्यासाठी गावकरी उत्सुक आहेत, प्रयत्नशील आहेत. गावकऱ्याना चिपको आदोलनाची चागली माहिती व सहभाग असल्याचे जाणवले गावातील तरुणानी 'नव-युवक मगल दल' स्थापन केले आहे व त्याच्यातर्फे आपले प्रश्न सोडविण्याची त्यांची कोशिश चालू आहे.

दुसऱ्या दिवशी दुपारी जेवण आटपून डिंवगहून निघालो. अलकनदा पार करून आम्हाला डाव्या किनाऱ्यावरील गणाई गावाला जायचे होते. वाट-चालीला सुरुवातही केली; पण आमच्यातील अलकनंदेची, अलका कुलकर्णींची तब्येत बिघडली. म्हणून तिला तिच्या काकाकडे जोशीमठला पोचवायचे व रात्री जोशीमठला मुक्काम करून दुसऱ्या दिवशी रेणीला जायचे सर्वानुमते ठरले. साडे-सात हजार फूट उचीवरील या गावाबद्दल सर्वांच्याच मनात विलक्षण कुतूहल होते. एक तर तिथल्या आदिवासी भोटिया लोकाबद्दल आणि मुख्य म्हणजे गौरादेवीबद्दल. गौरादेवीने 'चिपको' आंदोलनात एक तेजस्वी पर्व लिहिल होत.

रेणी ही तिबेटच्या सरहद्दीजवळील भोटिया या आदिवासी जमातीची छोटीशी वस्ती. १९६० पासून अलकनदेच्या या पाणलोटक्षेत्रात जंगलतोडीस सुरुवात झाली. १९७० साली अलकनदेने केलेल्या हाहाकारानतरही सरकार–ठेके-दाराचे डोळे उघडले नाहीत साहजिकच आहे. कारण त्याची बायकामुले दूर सुरक्षित होती. रेणी व आसपासच्या गावाच्या डोक्यावर मात्र प्रत्यही असुर-क्षिततेची टागती तलवार होती. त्यातच १९७४ च्या जानेवारीमध्ये रेणीच्या जगलातील पाच-पन्नास नाही तर तब्बल अडीच हजार झाडाचा लिलाव जाहीर झाला! आदोलकानी प्रत्यक्ष लिलावच होऊ न देण्याचा प्रयत्न केला; पण तो फसला. मागील अनुभवावरून सावध झालेल्या सरकार-ठेकेदारानी आपला बेत उघडपणे पुढे न रेटता चालबाजी केली. संघाच्या कार्यकर्त्यांना त्यानी गोपेश्वरला वाटाघाटीत गुतवून ठेवले आणि त्याच वेळी जुने कसले तरी पेमेंट

देण्याचा बहाणा काढून रेणीच्या पुरुष-मंडळींना चामोलीला बोलावून घेतले. कार्यकर्ते-लोक असे गाफील असताना ठेकेदारांचे भाडोत्री मजूर आडमार्गाने गुपचुप रेणीच्या जंगलाकडे निघाले. त्यांचा कट जवळ-जवळ सिद्धीस गेलाच होता; पण त्यांच्या दुर्दैवाने ही अनोळखी फौज जंगलात मेंढ्या चारणाऱ्या एका छोटया मुलीने पाहिली. जीव तोडून धावत येऊन तिने गावाला ही खबर दिली, पण गावात होतेच कोण? फक्त वीस बाया आणि त्यांची कच्ची-बच्ची! पुरुषमंडळींना निरोप पाठवून ते येईपर्यंत, दोन-तीन दिवस जाणार आणि तेवढ्यात झाड कटणार! अशा या आणीबाणीच्या क्षणी गौरादेवी नावाची प्रौढा पुढे आली आणि सर्व बायका-पोरांना घेऊन जंगलाकडे निघाली. आंदोलनाची माहिती सांगायला चंडीप्रसादजी या भागात पहिल्याप्रथम आले होते, तेव्हा याच बायका 'चिपको' ह्या नुसत्या शब्दालाच वात्रटपणे फिदीफिदी हसल्या होत्या. आज मात्र गौरीदेवीच्या नेतृत्वाखाली त्या झपाटल्यागत जंगलाकडे निघाल्या होत्या.

ही फौज पाहताच, इतक्या हुशारीने आखलेला आपला बेत धुळीला जाणार म्हणून ठेकेदाराचे हस्तक भडकले. त्यातून नुस्त्या बायका. बायका पाहताच त्यांच्यातला पुरुष राक्षस जागा झाला. काहीजण दारू पिऊन तर्र होते. बायकांना विवस्त्र करण्याची धमकी देण्यापासून ते गौरादेवीच्या तोंडावर थुकण्यापर्यंत सर्व प्रकार त्यांनी केले. बंदुकीची नळीही छातीवर टेकवली! एका तळीरामाने तर "आम्ही उच्चवर्णीय आहोत. आम्हाला माघारी न्यायचे असेल तर, तुमच्या खांद्यावरून डोलीतून न्या!" असेही फर्मावले. अवघड परिस्थितीत सापडलेल्या बायकांनी त्याला तयारी दर्शवलेली पाहून इतरांनी त्याला आवरले. बायका-पोरांनी झाडाला 'चिपकून' 'पुरुषमंडळींना येऊ द्या, मग पुढचे काय ते ठरवू!' या एकाच मागणीचा धोशा लावला होता. शेवटी त्यांची हिंमत पाहून भाडोत्री मजुरांनी कच खाल्ली. कारण कुठलेही झाड तोडायला गेले की, एवढीशी पोरं पण फटाफट झाडाला मिठी मारून बसत. त्या मजुरानाही बायका-पोरं होती. अखेर या लोकांना पुढं घालूनच बायका जंगलातून माघारी फिरल्या. परतताना त्यांनी एका अवघड जागेवरील छोटा पूल उचकटून फेकून दिला. म्हणजे आता परत कोणी जंगलात गुपचुप जाण्याची धास्ती नको!

सरकार-ठेकेदाराच्या चालबाजीतून सावरलेली चंडीप्रसाद व इतर पुरुष-

मंडळी जेव्हा धास्तावूनच रेणीला पोचली, तेव्हा या शूर बाया धावतच पुढे आल्या आणि त्यांनी मोठ्या अभिमानाने सांगितले, 'हमने हमारा मायका (माहेर) बचाया है!'

गौरादेवींना भेटण्यासाठी आम्ही झपाटल्यासारखे चाललो होतो. त्यांच्याविषयी खूप ऐकले-वाचले होते. वाटेतच एक गोरी तरतरीत प्रौढा भेटली. भगवतीप्रसादने आपल्या गढवाली भाषेत आमच्याबाबत माहिती दिली व आम्ही गौरादेवींना भेटण्यास उत्सुक आहोत म्हणून सांगितले. बोलत बोलत आम्ही एका घराजवळ आलो आणि गौरादेवींची वाट पाहत थांबलो. थोड्या वेळाने त्या सोबतच्या प्रौढेने हळूच सांगितले, 'मीच गौरादेवी-बोला काय बोलायचं ते!' आम्हाला पार गुगली पडला होता, त्यामुळे काय बोलावं तेच सुचेना. गौरादेवी अगदी मनमोकळ्या प्रेमळ वाटत होत्या, पण मनाच्या या गोंधळलेल्या अवस्थेत आमच्यातील काही जणांना काय बोलायचं, कसं बोलायचं सुचलं नसावं. कारण एका साथीदाराने एकदम त्यांचा फोटो घेण्याचा प्रयत्न केला. खरं म्हणजे त्यात विशेष काही नव्हतं. अनेक देशी-विदेशी प्रकाशनांतून त्यांचे फोटो झळकले आहेत. नैरोबीच्या जागतिक ऊर्जा परिषदेत इंदिरा गांधींबरोबरीने गौरादेवींचे फोटो छापले गेले आहेत. पण बाईंचं काही तरी बिनसलं आणि पार्वतीचं दुसरं रूप बघायला मिळालं, 'आमच्याकडे पाहुणे म्हणून आला आहात तेव्हा आता निमूटपणे चहा घ्या आणि चालू लागा! नाही तर माहिती नाही आणि फोटो नाही, पण एकेकाला हाकलून काढीन!' असा त्यांनी खुल्ला दम भरला. अचानक झालेल्या या माऱ्याने आम्ही हादरलोच, पण आमच्यापेक्षा भगवतीप्रसाद जास्त हादरला! झाला प्रकार त्याच्या लक्षात आला असावा. आम्ही कोण-कुठले याबद्दल गौरादेवींना काही तरी संशय आला असावा. कारण मध्यंतरी अशीच कोणी तरी जपानी पाहुणे-मंडळी माहिती वगैरे घ्यायला आली आणि त्यानंतर सी. आय. डी. नी गौरादेवींना फार सतावले. सरकारविरोधी आंदोलन, त्यातून सरहद्दीचा प्रदेश, त्यामुळे मामला जरा नाजुकच. त्यातून भगवतीप्रसादची गौरादेवींशी प्रत्यक्ष ओळख नव्हती. त्या चंडीप्रसादजींना खूप मानतात. आम्ही खरोखर चंडीप्रसादजींकडून आलो आहोत हे परत एकदा नीट पटवून द्यायला लागलं. मग मात्र कसलीच अडचण आली नाही.

गौरादेवींनी अगदी तपशीलवार सर्व घटना सांगितल्या. ठेकेदाराकडून



गौरादेवी, नामदेव ओव्हाळ आणि एक रहिवासी

अजूनही आपल्याला फितवण्याचे, बदनाम करण्याचे कसे प्रयत्न केले जातात त्याची माहिती सांगितली व त्याविरुद्ध खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला, पण एक जाणवलं. एक गौरादेवी ठीक आहे, पण एवढ्या मोठ्या ऐतिहासिक घटनेनंतर गाव–पातळीवर महिलांचं परिणामकारक संघटन उभं राहण्यासाठी जे प्रयत्न व्हायला पाहिजेत ते इथे झाले नसावेत. कारण इतर कोणतेही ठोस कार्यक्रम नाहीत. खुद्द गौरादेवींच्या बोलण्यात वारवार येत होतं की, ' उस समय शंकरजीके शक्तीसे सब हुवा। पता नहीं अभी वैसा होगा या नहीं। '

गौरादेवींनी आम्हाला गुगली टाकला, तसं काहीसं ' भोटिया 'बाबतही झालं

आम्ही भोटियाचं ' आदिवासी ' म्हणून जे चित्र मनातल्या मनात रेखाटलं होतं, त्यापेक्षा वस्तुस्थिती खूप वेगळी आहे. तिबेटच्या सरहद्दीवर राहणाऱ्या या भोटिया वा भूतिया लोकांचे चीनशी पूर्वापार व्यापारी संबंध होते. त्यावर ते चांगले गबरही झाले आहेत. शिक्षणाचे प्रमाणही चांगले आहे. चीन युद्धानंतर

हा व्यापार बंद झाला तरी भोटिया लोकांनी आपल्या हुशारी व कष्टाळूपणाने अंतर्गत व्यापारातही चांगला जम बसवला आहे. उत्तमपैकी लोकरीचे व कला-कुसरीच्या गालिच्यांचे काम ते करतात.

आंदोलन व इतर गप्पा-गोष्टी होईपर्यंत गौरादेवींच्या सुनेने सत्तूचे पीठ व तूप टाकलेला मस्त गरमागरम चहा करून आणला. चहानंतर गौरादेवींनी आपणहून आपल्या नातवाबरोबर व आमच्याबरोबर फोटो काढून घेतले. विश्वासाची खूण एकदा पटल्यावर मग कसलेच आडवळ नव्हते. गौरादेवींना सलाम करून आम्ही निघालो, पार्वतीची नाना रूपं आठवत !

रेणीहून परतताना ट्रक पकडली आणि रात्री नऊ वाजता जोशीमठला परतलो. वास्तविक अशा रात्रीच्या वेळी इथे प्रवास करत नाहीत, पण कसेही करून परतणे भाग होते. रात्रीच्या अंधारात, अंधारात उजळलेल्या अंधुक पहाडातून प्रवास करणे हा एक विलक्षण अनुभव असतो–मृत्यूसारखा. एकाच वेळी ओढ आणि भीती लावणारा !

पाखी गाव बद्रीकेदारच्या रस्त्यावर आहे. आमच्या मुशाफिरीतले हे शेवटचे गाव. गाव अलकनंदेची उपनदी गरुडगंगेच्या काठी आहे. १९७० च्या पुरामध्ये गावची बाजारपेठ, देवालय पार धुऊन गेले ! अजूनही पुराची व कडे-कोसळीची टांगती तलवार डोक्यावर आहे. म्हणूनच आंदोलकांनी गावकऱ्यांच्या मदतीने धोकादायक भागात वृक्षारोपण करून निसर्ग–संतुलन साधण्याची कोशिश चालविली आहे. भजनु–भीमक आदि हजारो वृक्षांची लागवड केली आहे. आंदोलकांची कामाची पद्धतही महत्त्वपूर्ण वाटली. गावकऱ्यांच्या सल्ल्याने कोणते वृक्ष लावायचे, कुठे लावायचे, गुरंचराईच्या जागा व वाटा कोणत्या ठेवायच्या हे ते ठरवतात. 'डालियोंका दगड्या 'च्या सहाय्याने दीवार-बंदी व खड्डे खोदतात. मग मात्र प्रत्यक्ष वृक्षारोपण, खत-पाणी, संरक्षण ही जबाबदारी गावकऱ्यांची. साहजिकच त्यामुळे ' सरकारी वृक्षारोपण ' होत नाही ! मागे नागेश आणि मी पाखी गावच्या वृक्षारोपण शिबिराला आलो होतो तेव्हा खड्ड्यांचे काम पूर्ण झाल्यावर त्यात शेणखत भरायला गावातील बाया–बापड्या अशा उत्साहाने मिरवीत आल्या की लग्नाची एखादी वरात वाटावी. फक्त डोक्यावर कळशाऐवजी पाठीवर शेणखताच्या टोपल्या होत्या !

गावातील अनेक तरुण उत्साही ' वृक्ष–मित्र ' आहेत; पण ब्राह्मण–ठाकूर–हरिजनाची मिश्र वस्ती असलेल्या या गावात ब्राह्मणाचे व ब्राह्मण्याचे प्रस्थ निःसंशयरीत्या जाणवले. संघाचे कार्यकर्ते पण त्याला अपवाद नव्हते. सामाजिक अभिसरणाच्या या अपूर्णतेचे परिणाम आज आंदोलनात थोडेबहुत जाणवतात. भविष्यात ते जास्त प्रकर्षाने जाणवतील. स्वत चंडीप्रसादजी ' चिपको-आंदोलन ' म्हणजे केवळ झाडे वाचवण्याचा व वन–सवलतींचा लढा मानत नाहीत तर सामाजिक अन्याय, आर्थिक शोषणाच्या एका व्यापक युद्धाची एक आघाडी, एक माध्यम मानतात. साहजिकच या दृष्टीने खुद्द आदोलकांना अजून खूप वाटचाल करायची आहे हे जाणवते. अर्थात एकाच वेळी सर्व आघाड्यांवर लढणे शक्य होत नाही; पण निदान याचे जाणीवपूर्वक भान असावे असे मनोमन वाटते.

पाखी आमच्या मुशाफिरीतले शेवटचे गाव. आता वेध लागले होते गोपेश्वरचे. प्रथम गोपेश्वर आणि तिथून पधरा तारखेला श्रीनगरला सर्वांना भेटण्याचे!


पथकातील गटक्रमांक तीन-चार आणि पाचचे अभ्यासक्षेत्र अलकनदा व तिच्या उपनद्याचा पाणलोटविभाग हे होते. त्यापैकी गटक्रमाक तीनसाठी जरा दूर पल्ल्याची पहाडी गावे निवडली होती. गटातील उमेदवारही निवडताना शारीरिक क्षमतेच्या दृष्टीने विशेष लक्ष पुरविले होते. गटक्रमांक चार आणि पाचचे अभ्यास-क्षेत्र प्रामुख्याने गोपेश्वर हे आंदोलनाचे उगमस्थान. दशौली ग्राम-स्वराज संघाचे प्रभाव–क्षेत्र आणि मर्म-क्षेत्रही. त्यामुळे आंदोलनाची–संघाच्या कामाची परिणामकारकता समजून घेण्याच्या दृष्टीने या क्षेत्रातील गावाचा सखोल अभ्यास महत्त्वाचा होता. संघटन व आदोलन या दोन्ही बाजूची चागली जाण असणाऱ्या बहारु सोनावणे वा प्राध्यापक सेठसारख्यांना हा अभ्यास उपयुक्त ठरला असता. दुसरी गोष्ट या विभागातील मुलुखगिरी जरा कमी खडतर होती, त्यामुळे अशा खडतर मोहिमाची पुरेशी सवय नसलेल्या काही साथीदारांना या गटामध्ये सामावून घेणे शक्य होते. ते अपरिहार्यही होते.

अलकनदेची उपनदी बालखिलाच्या खोऱ्यात दोन्ही गटांनी अभ्यासपाहणी केली. बालखिलाच्या पूर्वतीरावर गोपेश्वर, पापडियाना, पाडोली आणि पश्चिम

तीरावर गैर, लगसा. काडई, कठूड, दोगडी, बछेर अशी गावे वसली आहेत. गोपेश्वर हे चामोली जिल्ह्याचे मुख्य ठाणे, या सर्व गावापासून जवळ आहे. किंबहुना गोपेश्वराच्या नजरेच्या विळख्यातच ही गाव आहेत. बरेचजण गोपेश्वरला जाऊन परत येतात. तेथे नोकरी वा व्यापार-धंदा करतात. साहजिकच या गावावर शहराचा परिणाम झालेला जाणवतो.

मध्य—हिमालयातील पाच-सहा हजार फुटावरील हा भाग खूप उंच-सखल आहे. उंच आकाशाला भिडणारे वर्फाच्छादित पहाड आणि पाताळात गायब होत जाणारे नदी-नाले, चीड-बाझ-बुराँश, तून आदि वृक्षांनी भारावलेली धरती, पर्वताच्या अंगा-खांद्यावर पायऱ्या—पायऱ्यांनी बांधलेली खाचरे, खाचरातून कलकल करीत वाहणारे निर्झर, टुमदार गावे याने मन प्रसन्न होते, तर मध्येच कुठे भूस्खलनाने जखमी झालेली धरती बघून मन उदास होते. हिंदीमध्ये अशा जखमी भूभागाला 'धरती की खाल उधेडना' म्हणतात. शब्द फार अर्थग्राही आहेत. धरतीची लोळवलेली चामडी शब्दशः डोळ्यांसमोर उभी करतात !

पाहणी केलेली गावे हमरस्त्यापासून साधारणत' पाच-सात किलोमीटर्सच्या



आत होती. गावे हमरस्त्याजवळ होती याचा अर्थ गावापर्यंत पोचण्याचा मार्ग सोपा होता असा मात्र नाही. काही काही गावाना असलेली पायवाट भयंकर विकट असायची, विशेषत: आमच्यासारख्या सवय नसणाऱ्याना. अशा वेळी वाटायचे की हे गावकरी विशेषत महिला, वृद्ध या अशा रस्त्यानी सतत कशी ये-जा करत असतील ? या रस्त्यांची पण एक गमत आहे. हृषिकेश–जोशीमठ



हा हमरस्ता सरक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा. जोशीमठाच्या पुढे अनेक लष्करी ठाणी आहेत, त्यामुळे त्याना रसद पुरविण्याच्या, संपर्क राखण्याच्या दृष्टीने हा रस्ता वाहतुकीला सदैव खुला ठेवावा लागतो. लष्करी वाहनाचे ताफे सतत यावरून जा–ये करीत असतात, पण घाई-गर्दीने वा अदूरदर्शीपणाने बनविलेल्या या रस्त्याची व ते खोदून काढलेल्या पहाडी चट्टानाची तब्येत मोठी नाजुक. निमित्तालाच टेकलेले असतात ते. जरा कुठे काही खुट्ट झाल की सयुक्त आघाडीच्या मंत्रिमडळापेक्षाही जास्त वेगाने ते धडाधड खाली कोसळतात; पण लष्करातील जवानाना व रस्तादुरुस्तीपथकाला रस्त्याच्या या ढासळणाऱ्या तब्येतीची इतकी सवय झाली आहे की, बुलडोझर वगैरे घेऊन ते तावडतोब धावतात आणि चार-दोन तासात रस्ता मोकळा करून देतात मुख्य

रस्ता सोडून जरा आडमार्गाला गेलं की रस्ता एवढ्या तातडीने चालू होण्याची शाश्वती नसते, पण त्यामुळे खास काही बिघडत नाही. दोन्हीकडची वाहने कोसळलेल्या दरडीच्या, नाही तर ढासळलेल्या रस्त्याच्या दोन बाजूंना उभी राहतात. दरडीच्या ढिगाऱ्यातून एखादी पाऊलवाट बनवलेली नाही तर बनलेली असते. वाहने थांबली की डोक्या-पाठीवर ओझी घेऊन लोक लगालगा त्या अवघड वाटेने पल्याड जातात. अगदी सहजपणे आणि पलीकडे उभ्या असलेल्या वाहनातून चालू पडतात. मुंबईचं पब्लिक जसं आठ-पंचावन्नची डब्बल-फास्ट ऐन टायमाला दोन नंबरऐवजी चार नंबरच्या प्लॅटफॉर्मवर आली तर निवेदिकेच्या ' हमे खेद है ' वगैरेने न पाणावताच सफाईने चालू पडतं, त्यातलाच हा प्रकार ! मात्र आपल्याला हा प्रकार नवीन असला की प्रथम आपण कमालीचे गोंधळतो. मग वेधळ्यासारखे उगाचच इकडे-तिकडे करत राहतो. दरड कुठून कोसळली, कशी कोसळली, का कोसळली याची नुसती चाभार चौकशी करीत राहतो. तोपर्यंत दोन्हीकडची वाहने हाऊसफुल्ल झालेली असतात. काही चालू पडलेली असतात. कारण पुढची कोसळलेली दरड त्यांची वाट बघत असते. असो.

हमरस्ता व इतर महत्त्वाच्या रस्त्यांची निर्माण-निगराणी सरकार करीत असले तरी अभ्यास-पाहणीत काही गावे स्वतःचा रस्ता स्वतःच करीत असल्याचे आढळले. ( एवढेच काय स्वत. स्वत.ची वीजही निर्माण करीत आहेत. त्याबाबत पुढे येईलच ! ) यात काही वेळा सरकार मजुरीचा खर्च उचलते, पण प्रामुख्याने गावकऱ्यांनाच स्वयस्फूर्तीने पुढे यावे लागते. तंगसा गावाचा रस्ता तंग-सा ' म्हणून गावाचे नाव तगसा ! तगसाचा रस्ता गावकऱ्यानीच बांधला. अजूनही काम चालू आहे. कठूड गावचा रस्ता आणि एकूणच जीवन इतके कठीण की म्हणून-कठूड ! दोगडी गावचा रस्ता बनविण्याचे काम चालू होते. आम्ही गेलो तेव्हा गावकऱ्यानी सांगितले की, गोविंदीनदीवरचा साकव त्यांनी गेल्या वर्षी एक शिबिर घेऊन बांधला. मनात आलं की, हा साकव नसताना गावाची काय अवस्था असेल ? नदीने वाट अडविल्याने ' अडलेली ' अनेक गावे महाराष्ट्रात आहेत; पण त्यातील किती गावानी ' आपला रस्ता ' शोधण्याचा प्रयत्न केलाय ?

गोपेश्वरहून प्रथम भेट दिली पापडियानाला. गोपेश्वरच्या खालच्या अंगालाच हे छोटेसे गाव आहे. गावकऱ्याबरोबर वृक्षारोपण-कार्यक्रमात भाग घेतला.

सांस्कृतिक कार्यक्रमही झाला. खूप चर्चा, गप्पागोष्टी झाल्या. त्यामधून व नंतरच्याही पाहणीतून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की या आंदोलनक्षेत्रातील बहुतांश गावकऱ्यांना आंदोलनामुळे भौगोलिक पर्यावरणाची चांगल्यापैकी जाण आली असली तरी सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणाच्या दृष्टीने लोक अजून मागासच आहेत. दलित स्त्रियांच्या बाबतीत हे विशेषच जाणवले. उदाहरणार्थ पापडियाना गावच्या लोकांनी आमच्याशी खूप सहकार्य केले. आदरातिथ्य केले; पण ती सर्व हरिजन मंडळी होती. नेमक्या त्याच कारणामुळे गावातील सवर्ण मंडळींनी आमच्याकडे पाठ फिरवली असावी. आमच्याशी बोलायलाही ती नाखूष होती. म्हणजे संघाचे काम फक्त सवर्णांत वा हरिजनांत आहे असं नाही. मुख्यत. सवर्णांत असले तरी हरिजनातही आहे. मात्र एकाच गावातील सवर्ण व हरिजन एकत्रितरीत्या अभावानेच आढळले !

महिलांच्या बाबतीतले मागासलेपण खूपच जाणवले. वास्तविक आंदोलनात महिला आघाडीवर आहेत. कारणे दोन. एक तर रोजगाराच्या अभावामुळे गावातील बहुतांश बापेमंडळी आपल्या येथील कोकणासारखी दूर शहरात. दुसरी गोष्ट म्हणजे चारा-पाणी-सरपण आणणे ही कामे महिलांची. पूर्वी भात चुलीवर राधायला टाकून शिजायच्या आत बाई मोळी घेऊन परतायची. जंगलं संपत चालली. आता दिवस-दिवस वणवण करावी लागते. पोराला खाटेशी बांधून जावे लागते. राबण्याला सुमार नाही. राबराब राबायचे आणि जिणे असह्य झाले की, आत्महत्या करायची. काही वेळा दोघी-तिघी जणी एकत्र घट्ट बांधून घेऊन नदी जवळ करतात. नयार नदीमध्ये नुकतीच अशी शोकांतिका घडली होती. परिस्थितीच्या अशा चटक्यामुळे साहजिकच महिला या आंदोलनात मोठ्या प्रमाणावर सहभागी झाल्या. गावोगावची महिला मंगलदले वनरक्षणासाठी सिद्ध होत आहेत. गोपेश्वरचे बांझ-बुरांशचे हरे-भरे जंगल अथवा अदवाणी-रेणीचे भरदार जंगल त्याची जिती-जागती निशाणी आहे. आंदोलकांनीही महिलांचा सहभाग वाढविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे; पण आंदोलनात आघाडीवर असणाऱ्या महिलांचे एकूण समाज-जीवनातील स्थान गौणच आहे. एखाद्या पोखरी गावच्या महिला हक्काची साप्ताहिक सुट्टी मागतात अथवा बछेरमधली कलावतीदेवी सर्वांचा विरोध धाब्यावर बसवून सरपंचपदाची निवडणूक लढवण्याची घोषणा करते; पण एरवी मात्र सर्वसाधारणपणे महिला संसाराचा गाडा ओढताना वा पतिदेवाची

सेवाचाकरी करण्यातच कृतार्थता मानत असलेल्या आढळल्या. अमक्याची बायको, तमक्याची आई हीच तिची ओळख आणि या अमक्या-तमक्याच्या परिघातलेच जीवन. सर्वसाधारण लोकच नाही तर आंदोलनातील कार्यकर्तेही स्त्री-मुक्तीच्या जाणिवेपासून सात जन्म दूर !

अर्थात आमचीही परिस्थिती काही फार वेगळी नव्हती. उलट आमच्या-मधेच धमाल गमत होती. आमची दोन पथके एकत्र वावरत होती. त्यात कार्यकर्ते व बिगरकार्यकर्ते असे दोन प्रमुख गट. कार्यकर्त्यांमध्ये डावे-उजवे-मधले वगैरे आणखी उपगट असले तरी स्त्री-मुक्तीबद्दल बोलताना व विशेषतः बोलल्याप्रमाणे वागताना तीन सरळसोट गट पडायचे. एक कट्टर; दुसरा स्त्रीमुक्ती तत्वतः मानणारा; पण परिस्थिती आणि व्यवहाराच्या संदर्भात सबुरीची ( आणि पहिल्या गटाच्या मते पलायनवादी ) भूमिका घेणारा आणि तिसरा स्त्री-मुक्ती सरळ-सरळ थोतांड मानणारा. एरवी आमने-सामने चर्चेच्या वेळेस काही हरकत नव्हती. प्रश्न यायचा गावात वावरताना. गट क्रमांक चार आणि पाच एकत्र वावरायचे. प्रत्येक गटाला स्वतंत्र मार्ग व मार्गदर्शक मिळवून देण्याचा आम्ही खूप प्रयत्न केला, पण संघाची व्यवस्था वा आमचा आग्रह याबाबतीत तोकडा पडला. त्यामुळे दुर्दैवाने दोन सुटसुटीत गट न राहता एका विस्कळीत समूहामध्ये त्याचे रूपांतर झाले. साहजिकच अपेक्षित सुटसुटीत भेट वा चर्चा शक्य व्हायची नाही. आपण कसलीही मुक्ती वा क्रांती करायला उत्तराखंडात जात नाही आहोत ही भूमिका सर्वांच्या मनावर ठसवली असली तरी परिस्थितीनुसार लोकांशी- कार्यकर्त्यांशी चर्चा अपेक्षितच होती. आता 'परिस्थितीनुसार' हा सापेक्ष शब्द झाला. प्रत्येक जण आपल्या मतानुसार त्याचा अर्थ लावायचा प्रयत्न करायचा. त्यामुळे हा नाजूक विषय काढावा की नाही, नाही काढल्यास का नाही, वा काढल्यास किती मर्यादेपर्यंत याविषयी मतभेद व्हायचे आणि ते अपरिहार्यच होते; पण गटक्रमांक तीनच्या साथीदारांप्रमाणे याही गटाचे वा इतरही गटातील साथीदाराचे मोठेपण हे की, त्यांनी तुटेपर्यंत ताणले नाही आणि ताणल्याशिवाय मजाही नाही. चलता है ! All in the game !

आमच्या चर्चेत एक महत्त्वाचा मुद्दा यायचा की, परिस्थितीच्या रेट्यामुळे या आंदोलनात महिला आघाडीवर आल्या असल्या तरी इतरही आंदोलनात त्यांना जाणीवपूर्वक सहभागी करून घेण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. केवळ

स्त्री–मुक्तीसाठी नाही तर आंदोलनाच्या यशासाठीही ही गोष्ट महत्त्वाची आहे. पुरुषाचा फ्यूज (अगदी शारीरिकदृष्ट्याही) लौकर उडतो. स्त्रिया चुली-सारख्या असतात. पेटायला अवघड आणि धीमे मात्र आग पकडली की सथ आणि ज्वलंत सहजा-सहजी विझायची-बुझायची नाही !

आमच्या भटकंतीत गावोगावच्या तपशिलापेक्षा अथवा प्रत्येक दिवसाच्या वाटचालीपेक्षा काही महत्त्वाच्या घटना वा प्रसंग दोन. दोन्ही प्रसंग केवळ अविस्मरणीय, एक होळीच्या दिवशीच्या वृक्षारोपणाचा आणि दुसरा ' आमचे पाणी–आमची वीज ' संकल्पना साकार करणाऱ्या भगीरथ–पुत्राच्या भेटीचा !

तंगसा गावी पोचलो होळी-पौर्णिमेच्या दिवशी. गावात ' उल्हास 'ही अतोनात होता; पण रूढार्थाने ' फाल्गुन–मासा 'चा नाही. ढोलनगारे–वाजंत्री–ताशे सर्व काही होते, पण एका अनोख्या उन्मादासाठी. आज वृक्षाच्या चिता धडाधडा जळणार नव्हत्या तर धगधगत्या प्रायश्चित्ताचे प्रतीक म्हणून छोटे–छोटे अंकुर पृथ्वीच्या कुशीत विसावणार होते घट्ट उभे राहण्यासाठी. इतरांना उभे करण्यासाठी. रवींद्रनाथांनी शांति-निकेतनामध्ये मातेच्या वात्सल्याने ' बाल-तरूंची ' पालखी मिरवली, पण होळीच्या दिवशी वृक्षारोपणाच्या कल्पनेचे बीज ज्या कोणा जातिवंत प्रतिभावंताच्या मनात अंकुरले असेल त्यालाच खुद्द गुरुदेवांनी पालखीतूनच झुलवीत नेला असता. गीतांची अंजली नाही तर बौछार केला असता. होळीपौर्णिमेला गावकऱ्यांबरोबर आम्हीही वृक्षारोपणात सहभागी झालो. ग्रामसभासस्थानपासून गावापर्यंत पॉपलस्–मजनू–देवदार–चीडची रोपे लावली. आजही त्या होळी-पौर्णिमेचे रंग ताजे आहेत, जिवंत आहेत. नुसत्या आठवणीने अंगावर रोमांच उभे राहतात !

तंगसाच्या या आनंदोत्सवात एक विसंवादी सूर लागला. खरे तर संवादी–विसंवादी आम्हीच होतो. आमच्या कार्यक्रमात एक दारुडा घुसला, तोही शिक्षक. शिक्षकाने दारू प्यावी ही कल्पनाच आमच्यातील अनेकांना मंजूर नव्हती. म्हणजे इतरांनी ' चालेऽल ' पण शिक्षकाने नको. शिक्षक-डॉक्टर–पत्नी वगैरे मंडळींबद्दल आपण ज्या काही जुन्या आदर्शवादी–भोळ्या-भाबड्या कल्पना जोपासल्या आहेत त्याला तोड नाही. म्हणजे इतरांनी लाख धंदे करावेत मात्र डॉक्टर-शिक्षक-पत्नीने कसे सेवाभावी असावे. ते असो. आमचा दारुडा

शिक्षक 'टाइट्' असला तरी he was talking sense in a way! त्याच्या बोलण्याचा थोडक्यात अर्थ असा की, हे वृक्षारोपण वगैरे सर्व ठीक आहे. पण होळीच्या 'पवित्र' सणाला अशा अहिंसक-रंगहीन-रूपहीन गोष्टी बऱ्या नव्हेत. शोभा देत नाहीत. एकेक सणाचे एकेक माहात्म्य असते. पुरुषार्थ असतो. तो असा कमी होऊ देता कामा नये. इथेही शिक्षकाशी मी संपूर्णपणे सहमत होतो. फक्त माहात्म्य-पुरुषार्थ यांच्या व्याख्या बदलायला पाहिजेत. श्री. बाबा आमट्यांशी गप्पा मारताना ते एकदा सहज म्हणाले होते की, 'पहिल्यांदा वाघाशी अथवा दरवडेखोराशी झुजण्यातच केवळ पुरुषार्थ वाटायचा. नंतर लक्षात आलं अंगभरच्या जखमात अळ्या पडलेल्या कुष्ठरोग्याला मलमपट्टी करण्यास, सातत्याने उपचार करण्यासही पुरुषार्थच लागतो. पराकोटीचा पुरुषार्थ लागतो!' अशी जाण आल्यावर जीवनाचा संदर्भ बदलतो. अर्थ बदलतो. मात्र अशी जाण येण्यासाठी जीवनाला सामोरे जावे लागते. चाकोर-वाट सोडावी लागते!

तगसाची ही रीत तर दोगडी-काडई या जुळ्या गावाची रीत आणखी मुलुखावेगळी. या गावच्या लोकांनी आमचे गाव-आमचे पाणी एवढीच संकल्पना नाही तर स्वपराक्रमाने साक्षात विजेलाच धरून आणली. गावकऱ्याशी, श्री. आनंदसिंह बिष्ट यांच्याशी बातचीत करताना पराक्रमाची गाथा प्रत्यक्ष ऐकायला-बघायला मिळाली. आमच्यातील प्राध्यापक सेठ ह्यांनी त्याचे सुंदर टिपण तयार केले आहे.

चमोली जिल्ह्यात पाच हजार फूट उंचीवर दोगडी गाव आहे. दोगडीचं जुळं भावंडं काडई गाव सहा हजार फूट उंचीवर आहे आणि शेजारचं बनियाल गाव अगदी जीवघेण्या कड्यावर पाइनच्या गर्द झाडीत सात हजार फूट उंचीवर विसावलं आहे. या तीन गावांची संयुक्त ग्रामसभा आहे. रस्ता नाही. गोविंदीनदीचे सुसाट वेगाने वाहणारे विपुल पाणी आहे.

या गावातील खेडुतांना समोरच्या पापडियाना, पाडुली, गोपेश्वर गावातील विजेचे दिवे लुकलुकताना दिसत. आपलेही गाव विजेने उजळून जावे असे वाटू लागले आणि अर्ज-विनंत्या सुरू झाल्या. १९७७ सालापर्यंत अर्जांची भेंडोळी केराच्या टोपलीत गेली!

गरीब खेडुतांचा स्वाभिमान जागा झाला. मने प्रक्षुब्ध झाली, सरकारला धडा शिकविण्याची भाषा सुरू झाली. सभा झाली. कुणी म्हणाले, 'आम्ही

रस्ता उडवून देऊ, पूल तोडू, विजेचे खांब कापू, कालवे नष्ट करू! उत्तराखंडातील आनदसिंह बिष्ट हे सर्वोदयी कार्यकर्ते या सभेला हजर होते. त्या सभेचे वातावरण विध्वंसाकडे जात आहे, हे पाहून ते उभे राहिले. त्यांनी ग्रामस्थांना सांगितले, 'मशालीचा जुलूस नको, कालवे तोडू नका! सरकारकडून प्रतिकाराच्या दबावाने मिळवलेली वीज न मिळाल्यासारखीच आहे आपण स्वतःची वीज निर्माण करू. गोविंदीनदीच पाणी ईश्वराची देणगी आहे. आमचे पाणी आमची वीज.' सर्वोदयाच्या योजनेत सरकारला स्थान नाही!'

आनदसिंह बिष्टच्या भाषणाने सभेला वेगळे वळण लागले.

ग्रामस्थानी अशिक्षित असूनही त्वरित अनेक वीज-निर्मिती-केंद्राना भेटी दिल्या. व्यावहारिक शहाणपणाने तंत्र शिकले आणि आझाद हिंद फौजेतील निवृत्त सैनिक बचनसिंह रावत, खादी ग्रामोद्योगाचे कार्यकर्ते पीतांबरदत्त तिवारी, चंद्रसिंह राणा, केदारसिंह बिष्ट असे लोक आनदसिंह बिष्टच्या नेतृत्वाखाली गोविंदी नदीच्या उगमापासून प्रवाहाची पाहणी करण्यास निघाले. त्यांनी बाकोर्डी गावाजवळ २०० फूट उंचीच्या कड्यावरून गोविंदी नदीचे पाणी वळवून वीज–निर्मितीचा प्रयोग करण्याचे ठरवले. गोविंदनदीचे पाणी ८०० फूट लांब कालव्यातून, कातळ कापून, चार इंच व्यासाच्या दोनशे फूट लांबीच्या पाइपमधून खाली नेण्याचा निर्णय त्यानी घेतला. या कामी कानपूरच्या आय्. आय्. टी. मधील प्राध्यापक योगेशकुमार यांनी तांत्रिक मदत पुरवली. त्वरित टरबाइन खरेदी केला. ८ मे १९८१ ला गावच्या अशिक्षित अशा कुंदनसिंहने टरबाइन चालवून विजेचा प्रकाश दाखविला. गावकऱ्याच्या आशा फुलल्या. सरकारला दिलेले आव्हान प्रत्यक्षात आले!

आपल्याच गावच्या जंगलातील लाकूड तोडून खांब उभे केले. या सबंध कामामधे जवळजवळ पन्नास हजार रुपये खर्च आला. बँकेचे कर्ज काढले. बँकेचे व्याजाचे आकडे पाहताच पुन्हा प्रश्नचिन्हे निर्माण झाली; परंतु आनदसिंह हरले नाहीत! ग्रामस्थानी ८१ ८२ सालात सरकारचे ठेके घेऊन कर्जफेड केली आणि ८१च्या दसऱ्यालाच कर्जमुक्त होऊन आपल्या स्वतःच्या विजेच्या प्रकाशात राम-लीला केली!

वीज घरात आली पण वीज ही उद्योगनिर्मितीसाठीही वापरली पाहिजे याची जाण या कार्यकर्त्यांना होती. प्रथम त्यानी या विजेवर पिठाची चक्की सुरू केली. ३५ किलोवॅट वीज निर्माण करण्याचे त्याचे स्वप्न होते. आपले शोषण

अनेक जळवांनी होते हे त्यांनी अनुभवले होते. खाद्यतेल हे तर आवश्यक. आपल्या शेतात थोडीशी सरसो (मोहरी) पिकवून आपल्या घरापुरते तेल निर्माण करण्याची त्याची धडपड होती. पूर्वी या बायाना चार चार दिवस तेलाच्या घाण्यावर जावे लागत असे. दोन किलो सरसोचे तेल काढण्यासाठी ५ ते ७ किलो गहू मजुरी म्हणून द्यावा लागत असे. हे शोषण थांबविण्याचा निर्णय आनदसिंह बिष्टने घेतला आणि विजेच्या बरोबर तेलाचा घाणा सुरू केला. विजेवर चालणारा हा घाणा चालवायचा तर त्याला सतत काम हवे. हिमालयातील शेतकरी या भागात सहा महिने शेती ओसाड ठेवतात. आनंदसिंह बिष्टने लोकांना समजावले, 'सहा महिने आपण येथे सरसो (मोहरी) लावू या आपण पारंपरिक शेती सोडू या!'

सरसोमुळे प्रत्येक शेतकऱ्याला किमान तीन क्विंटल मोहरीचे तेल मिळेल. एक क्विंटल आपल्यापुरते ठेवून, दोन महिने शेतकरी ते विकून आपल्या अन्य गरजा भागवेल. आज दोगडी, काडई गावात सरसोच्या पिवळ्या फुलाची शेती बहरली आहे. आनदसिंह बिष्टने याचबरोबर आपल्या गावातील तरुणाना खादी ग्रामोद्योगाच्या लाकूड आणि लोकरीशी संबंधित व्यवसायाचे प्रशिक्षण घेण्यास पाठविले आहे.

आनदसिंह बिष्टच्या बरोबरीने टकसाच्या पीतांबरदत्त तिवारीजींनीही याच गोविंदी नदीच्या पाण्यावर वीज-निर्मिती सुरू केली. गोविंदीच्या तीरावर त्यांनी सॉ-मिल सुरू केली. कारण 'चिपको' आदोलन फार काळ भावनिक पातळीवर टिकून राहणार नाही, जंगलाशी संबंधित रोजगारही उपलब्ध केला पाहिजे हे त्याना कळून चुकले आहे. आनंदसिंह बिष्ट व पीतांबरदत्त तिवारींनी नर्सरी उभ्या केल्या. यातून त्यानी माल्टाची झाडे लावली. प्रत्येक शेतकऱ्याला माल्टाची रोपे ते देतात. एका झाडावर १००० ते १५०० माल्टा येतात. या माल्टाचा ज्यूस निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

या विजेच्या वापरावरही त्यांनी नियंत्रण घातले आहे. संध्याकाळी सहापासून रात्री बारापर्यंत व सकाळी पाच ते सातपर्यंत वीज घरी वापरली जाते. चैनीसाठी वीज नाही. तसेच येणारा खर्च समान स्वरूपात वाटून घेऊन वीजनिर्मितीच्या ठिकाणी काम करणाऱ्या ग्रामस्थ बंधूना ते मेहनताना देतात.

उत्तरप्रदेश सरकारने या ग्रामस्थांच्या प्रयोगावर आक्षेप घेतले; परंतु आनदसिंह बिष्ट जिद्दीचे सर्वोदयी कार्यकर्ते आहेत. त्यांनी त्वरित नियोजन मडळाचे

सदस्य डॉ. स्वामीनाथन् याच्याशी संपर्क साधला. डॉ. स्वामीनाथन् यांनी या प्रकल्पाला भेट दिली. त्यांनी ग्रामस्थांचे कौतुक केले आणि उत्तरप्रदेश सरकारला समजाविले. इतकेच नव्हे तर दिल्लीतून त्यांनी एक किलोमीटर लांबीची विजेची तार देणगी म्हणून मिळवून दिली. काही उद्योगपतींनाही आवाहन केले. आनंदसिंह बिष्टच्या समोर एक आव्हान उभे आहे. 'बनियाल' या गावी वीज कशी न्यायची! कारण सरळसोट कड्यावर हे गाव उभे आहे. यासाठी त्यांना तज्ञाची व आर्थिक मदतीची गरज आहे.

असे हे प्रचंड काम उभे केल्यानंतर कोणाचीही छाती गर्वाने फुगेल; परंतु आनंदसिंह बिष्टजींजवळ नम्रता आहे. ते म्हणाले, 'हे प्रचंड काम लोकांच्या सहयोगाने झाले. जनतेचे प्रेम माझ्यावर असल्याने ती मागे आली. या जनतेत आत्मविश्वास आहे. ती अडाणी असली तरी स्वाभिमानी आहे. प्रत्येकाला हे काम आपलेच वाटते. गाव एका कार्यकर्त्यामुळे घडत नसते तर गाव घडते कार्यकर्त्यांच्या मागे उभ्या असलेल्या जनशक्तीमुळे! गावही कार्यकर्त्याला पारखते. माझी भूमिका नफ्याची नाही याची खात्री पटल्यावरच गाव आपल्या शक्तीनिशी उभे राहिले. किडुक-मिडुक विकून बँकेच्या कर्जातून ग्रामस्थांनी मला मुक्त केले!'

आनंदसिंह म्हणतात, 'सरकार आज प्रत्येक धंद्याचे राष्ट्रीयीकरण करून प्रचंड नफेखोरी करत आहे वीजधंदा हा शासनाचा आता जनतेला लुटण्याचा बाजार बनला आहे. सरकारची महामंडळे म्हणजे भ्रष्टाचाराचे अड्डे. गोर-गरिबांच्या सुख-दुःखाशी याचा स्पर्श नाही. त्यांना गरिबांच्या व्यथा कळत नाहीत. नोकरशाही अडाणी-अशिक्षितांना मेंढरासारखी समजते. यातूनच हा विजेचा प्रकल्प आमच्या स्वाभिमानाने उभा केला. आम्हाला कोणतीही 'प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीही उभी करायची नाही गावचं पाणी गावची वीज. सारे गाव विजेचे मालक. ना नोकर ना मालक संबंध ना ग्राहकसंबंध. आम्ही प्रत्येक तरुणाला विद्युत्‌जनित्र चालविण्याचे शिक्षण दिले आहे. मी सर्वोदयी कार्यकर्ता असल्याने माझा विकेन्द्रीकरणावर विश्वास आहे. शासनाने यापुढे केन्द्रीकरणाच्या भूमिकेचा आग्रह सोडावा. एक प्रकारे आमच्या गावाने स्वतःची वीज-निर्मिती करून शासनाला शासकीय मक्तेदारीविरुद्धची सूचना दिली आहे!'

दोगडी-कांडई येथील गावकऱ्यांनी आपल्या छोटेखानी प्रयत्नातून वीज

निर्माण केली आहे, तर सरकारने भागीरथी–अलकनंदेच्या पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्यासाठी एक भला थोरला ' मास्टर प्लॅन ' तयार केला आहे. त्यात विष्णू-प्रयाग, टेहरी, मनेरीसारख्या सुमारे बेचाळीस जलविद्युत आणि पाटबंधाऱ्याच्या योजनांचा समावेश आहे त्यामुळे सुमारे पाच हजार मेगॅवॅट विजेची निर्मिती होईल आणि ३·४ × १०⁵ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

हिमालयाच्या अंतर्गत भागातील पर्यावरणदृष्ट्या अतिशय संवेदनाशील अशा जोशीमठ ते बद्रीनाथ भागात अलकनंदेवर ' विष्णूप्रयाग ' बंधारा बांधण्याची यात योजना आहे. हा बंधारा या प्रकारचा, आशियातील सर्वात उंचावरचा असा बंधारा असेल. सुमारे २६६ कोटी रुपये खर्च करून त्यातून ४८० मेगॅवॅट वीज निर्माण होईल अशी आशा आहे.

मात्र ही केवळ आशाच ठरेल, किंबहुना वेडी वा महाघातक आशा ठरेल असे चंडीप्रसादजींचे म्हणणे आहे. या योजनेच्या अंतर्गत दामबगडजवळ अलकनंदेवर एक मोठा बंधारा बांधण्यात येऊन तिचे पाणी एका बोगद्यातून जोशीमठासमोरील हाथी पर्वतावर आणले जाईल आणि तिथे एक हजार फूट उंचीवरून जोशीमठाच्या पायथ्याशी बांधण्यात येणाऱ्या एका भूमिगत विद्युत्–निर्मिती केंद्रात सोडण्यात येईल. शिवाय ' व्हॅली ऑफ फ्लॉवर्स ' ( पुष्पगाठी ) थे उगम पावणाऱ्या पुष्पावती वा भ्युंडार नदीचे पाणी भ्युंडार गावाजवळ डवून दुसऱ्या एका बोगद्यातून हनुमानचट्टीजवळ अलकनंदेत सोडण्याचा इरादा आहे.

चंडीप्रसादजींसारख्या लोकविकासाभिमुख पर्यावरणप्रेमींचे म्हणणे असे की हे बंधारे किंवा बोगदे यांच्या योग्य जागा निवडण्यासाठी पुरेसे सर्वेक्षण झालेले नाही. या जागी सतत हिमस्खलन होत आहे. शिवाय आनुषंगिक रस्तेबांधणी वगैरेसाठी जे खोदकाम–सुरुंगकाम होईल, या साऱ्यामुळे येथले आधीच डबघाईला आलेले नाजूक पर्यावरण पार बिघडेल. या ' हिमालयाएवढ्या चुकी 'मुळे केवळ गढवाललाच नव्हे तर साऱ्या देशाला अनेक घातक दुष्परिणाम भोगावे लागतील !

चंडीप्रसादजी यासाठी नुसत्या ऐकीव माहितीवरच विसंबून राहिलेले नाहीत, तर त्यासाठी आपल्याला मिळालेल्या ' मॅगसेसे ' पारितोषिकाची रक्कम घालून त्यांनी एका विश्वस्तनिधीची स्थापना केली असून त्यामार्फत दोन तरुण

भूगर्भशास्त्रज्ञाची या भूभागाच्या शास्त्रशुद्ध अभ्यास-पाहणीसाठी नेमणूक केली आहे.

आज मोठ्या धरणाइतकीच किंबहुना जास्तच छोट्या धरणाची गरज आहे. आपल्याकडे छोट्या धरणाचा वापर वीज-निर्मितीसाठी करत नाहीत. प्रचंड धरणांपासून अनेक मैल ताराच्याद्वारे वीज वाहून नेण्यात वीस टक्के ऊर्जा वाया जाते. वीज खर्चिक पडते. या दृष्टीनेच हिमालयात असलेल्या बारमाही पाण्याचा व उंचीच्या वरदानाचा फायदा घेऊन वीज निर्माण करण्याची गरज आहे. भोपाळच्या ' भारत हेवी इलेक्ट्रिकल 'ने छोटी जनित्रे बनविली आहेत. त्याच्या मते पधरा फूट उंचीवरून पडणाऱ्या पाण्यापासून एका टरबाइनद्वारे दोनशे चोवीस वॅट वीज निर्माण होऊ शकेल हिमालयातील बारमाही वाहणाऱ्या डोंगराळ भागातील छोट्या-मोठ्या नद्यावर-धबधब्यावर वीज निर्माण केल्यास ५०० लाख किलोवॅट वीज एकटा हिमालय निर्माण करू शकेल !

दोगडी गावच्या ' जागेश्वर शिक्षण संस्थान 'ने शासकीय मक्तेदारी मोडून देशामध्ये विद्युत्-निर्मितीच्या आदोलनाला नवी दिशा दिली आहे. आनदसिंह बिष्टजींचा स्वावलबी ' सर्वोदयी मार्ग ' कोणाला पसत पडो ना पडो. पण निदान स्वत:च्या तत्त्वाप्रमाणे चोख कामगिरी बजावण्याचे श्रेय त्याना द्यायलाच पाहिजे.

[illegible] दिल[illegible]की काडइ गावाला कोसळकड्यांचा ( land-slides ) [illegible]त बार[illegible]सला आहे. १९५४ साली तिथे मोठ्या प्रमाणावर कडे कोसळले आणि आजतागायत ती टागती तलवार गावावर, लोकजीवनावर आहे. जगलतोडीबरोबरच आणखी एक गोष्ट यामागे आहे. ती म्हणजे तेथील जमिनीत लोह आणि गधक मोठ्या प्रमाणावर आहे. कार्यकर्त्यांनी तिथे झाड लावण्याचा प्रयत्न केला; पण एक तर ती टिकत नाहीत व आपण लावलेली झाडे सरकार तोडून नेणार नाही असा गावकऱ्याना अजून भरवसा वाटत नसल्याने लोकही वृक्षारोपणाबद्दल फारसे उत्साही आढळले नाहीत.

गावातील लोकांना ' कुदरती जला 'संबधी म्हणजे निसर्गदत्त पाण्यासंबधी फार आस्था असल्याचे जाणवते. डोक्यावर जगल असले की, झरे आटत नाहीत याची त्यांना पक्की जाण आहे. ' गैर ' गावी जगलतोड झाल्याने पाणी आटले



मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे ६५१२

व जमिनीची धूप वाढली असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. टेहरीजवळच्या ल्हाशी गावची गोष्ट आठवते. गावाजवळ एक छोटासा नाला होता. डोक्यावरचे जंगल गेले आणि डोंगरावरचे पाणी झपाट्याने नाल्यातून वाहायला सुरुवात झाली. जमिनीची धूप वाढली. माती-मिश्रित पाण्याच्या घर्षणाने काठाचे बंधन झुगारले. तेथील विश्वंभर बूढा डोळ्यात पाणी आणून सांगत होता, 'नातवा-सारखा गावाचा हात धरून वाहत होता हा नाला. जंगलाचा बंध तुटला आणि एकदम गावाच्या जिवावर उठला हा! कोण आणि कुणाला समजा-वणार?'

श्री. चंडीप्रसाद भट आणि त्यांच्या साथीदारांनी लोकांना-सरकारला हे 'समजवण्याचे' काम कसोशीने हाती घेतल्याचे जाणवले; कधी सामोपचाराने तर कधी संघटनेच्या बळावर त्यांनी सरकारला नमविले आहे रेणीच्या घटने-नंतर त्यांनी सरकारला 'रेणी चौकशी समिती' नेमायला भाग पाडले. समितीने अलकनंदेच्या संवेदनाशील पाणलोटक्षेत्राचा अभ्यास करून या बाराशे चौरस किलोमीटर क्षेत्रात किमान दहा वर्षांकरिता जंगलतोडीस संपूर्ण बंदी घालण्याची शिफारस केली व सरकारला ती स्वीकारणे भाग पडले. मात्र युद्धामधील एका चकमकीच्या विजयावर समाधान मानायची तयारी नसलेल्या आंदोलकांनी एवढ्यावरच कृतकृत्यता मानल्याचे जाणवले नाही. विजयातून ताकद आणि ताकदीतून विजय मिळवत जाणाऱ्या या बहाद्दर कार्यकर्त्यांचा हिमालयातील इतरही पाणलोटक्षेत्रातील व्यापारी जंगलतोड थांबविण्याचा निर्धार आहे. कोशिश आहे!

मुशाफिरी संपवून गोपेश्वरला परतताना राहून-राहून मनात विचार येत होता, हिमालयच कशाला, देशातील-आमच्या सह्याद्रीतील संवेदनाशील भागातील जंगलतोड आम्हाला थांबवता येईल का?

हिमालयाच्या जोडीने सह्याद्री ताठ उभा राहील का? खूप-खूप उशीर होण्याआधी- !

अलकनंदेच्या खोऱ्यातील गट आपापल्या मार्गाला लागले आणि आता मला रस्ता पकडायचा होता भागीरथी खोऱ्याचा. अभ्यास-पाहणीतील ही दोन प्रमुख क्षेत्रे. प्रत्येक क्षेत्रात व प्रत्येक गटाबरोबर स्थानिक कार्यकर्ते होतेच. तरी पण

प्रत्येक गटाचे कामकाज, अडचणी वगैरे पाहण्याची, निगराणी ठेवण्याची जरुरी होती. माझ्याबरोबर नागेश, शेखर वा अनिल असता तर अलकनदा–भागीरथीच्या आघाड्या वाटून घेता आल्या असत्या; पण ते जमले नाही आणि दोन आघाड्या लढविणे आले. काम मुष्कील असले तरी अशक्य नव्हते. जोपर्यंत सर्व सुरळीत घडते तोपर्यंत त्याचे विशेष काही वाटत नाही; पण एखादा फासा उलटा पडला की, 'तरी आम्ही सागत होतोच'ची तुणतुणी मागे लागतात. सुदैवाने तशी पाळी आली नाही. असो.

गटक्रमाक तीन–चार–पाचचा निरोप घेऊन गोपेश्वरहून निघालो. वाटेत श्रीनगरला उतरून पधरा तारखेचे धर्मशाळेचे बुकिंग, विश्वविद्यालयातील गाठीभेटी आदि कार्यक्रम पक्के केले आणि दिवसभराचा प्रवास करून सध्याकाळी टेहरी गाठले. मला जायचे होते उत्तरकाशीच्या गटक्रमांक दोनला गाठायला. कारण त्या प्रदेशाची, बरोबरच्या साथीदार कार्यकर्त्यांची नीट माहिती नव्हती. मार्गही बिकट होता; पण टेहरीला पोचेपर्यंत उत्तर काशीच्या बसेस निघून गेल्या. आता टेहरीला मुक्काम करणे भाग होते. सहज बरोबरची डायरी काढून पाहिले. ठरलेल्या कार्यक्रमानुसार गटक्रमाक एक हेवल घाटीतल्या खाडी गावी मुक्कामी पाहिजे होता. मिळेल तो ट्रक पकडला आणि रात्री खाडी गाठली. मित्र-मडळी भेटतात की नाही याचा भरोसा नव्हता. कारण हिमालयात आखीव कार्यक्रम काय, कसलाच भरोसा नसतो; पण मंडळी मुक्कामी होती. हाती-पायी सुखरूप होती. मस्त मजेतही होती. माझे येणे त्याना अचानकच होते. ते सहजच आहे हे समजल्यावर त्यांना हायसे वाटले. गटाबरोबर दोन दिवस राहून ( त्यांची खबरबात नतर )मोर्चा वळवला. दुसऱ्या गटाला गाठण्यासाठी लम्बगावला. आश्चर्य म्हणजे ठरलेल्या दिवशी–ठरलेल्या वेळी ते ठरलेल्या जागी होते. This is मात्र three much !

भागीरथी– २ गटाला उत्तराखंडातील उत्तरकाशी आणि टेहरी या दोन जिल्ह्यातील गावाची अभ्यास पाहणी करायची होती. उत्तरकाशीमधील डाग, पोखरी, कन्सेंट, गगनानी, कनोडिया-गाड, भगेली आणि टेहरी जिल्ह्यातील लम्बगाव, नौघर, रैलिया, पोखरी ( ही अलग पोखरी ), सिल्यारा, चमियाला ही गावे पाहणीसाठी निवडली होती. यातील डाग, पोखरी, कन्सेंट ही गावे

उत्तरकाशी गावाच्या जवळपास आहेत तर गंगनानी, भगेली आदि गावे उत्तर-काशीपासून सुमारे साठ किलोमीटर दूर आहेत

सुरुवातीपासूनच प्रवास फार भन्नाट झाला! आमच्यातील सीताराम पवार नांदेड जिल्ह्यातील मुखेडचा, तर शोभा कोठारवार चंद्रपूर जिल्ह्यातील आल्लापल्लीची. राना-वनाचे वळण अंगी असले तरी पहाड चढायला सुरुवात केली तसतसा सीतारामजींचा चेहरा पडत-पडत चालला. हिमालयाचे सोडा, मागे सीताराम सातपुड्यातील धडगावला आमच्या एका शिबिराला आला होता. तेव्हा त्याने बसने सातपुड्यातील दोनच पुडे (रांगा) फस्त केल्यावर बस-मधून उडी मारून कसा पळणार होतो याची हकीकत सांगून सर्वांना हसता-हसता नाकी-नऊ आणले होते! इथे तर त्याला अक्खा हिमालय आणि हिमालयाला सीताराम गवसला होता! जोडीला खाडीपर्यंत जी जी रे रे.सरकते पहाड आणि कोसळल्या दऱ्या पाहून तो 'अबाऽबा' म्हणून आपल्या बंजारी बोलीत असा काही चित्र-विचित्र आवाज काढायचा, गाणी म्हणायचा की ते ऐकून हसता-हसता हिमालयही पुरा खाली कोसळला असता! झालेही तसेच. ऋषिकेशहून निघालेली आमची बस आम्हाला थेट उत्तरकाशीच्या सर्वोदय आश्रमात पोचती करणार होती, पण उत्तरकाशीच्या दहा किलोमीटर आधी बस गपकन् थांबली. खाली उतरून बघतो तो रस्ता गायब-अगदी लापता! आम्ही जरा हादरलोच. रस्त्यावरची नावाची पाटी वा मैलाचा दगड गायब होणे एक वेळ ठीक आहे; पण रस्ताच गायब म्हणजे काय म्हणाव! पण विशेष काही घडलं नाही, अशा थाटात विजय जडधारी आम्हाला ढिगाऱ्यांतून पलीकडे घेऊन गेला. पलीकडची बस गाठली आणि आश्रमात घेऊन आला. तेव्हाच मनात ओळखलं आपला भिडू एकदम पक्का आहे. कुठेही त्याच्याबरो-बर बिनधास्त जाव!

उत्तरकाशीचा सर्वोदयआश्रम अगदी भागीरथीच्या किनारी आहे. छोटा आणि सुंदर. श्री. सुरेंद्रदत्त भट्ट व त्यांचे कुटुंबीय तिथे राहतात. सुप्रसिद्ध सर्वोदयी कार्यकर्त्या श्रीमती इंदुताई टिकेकरही अधून-मधून तिथे मुक्कामाला असतात. आपल्या कार्याने त्यांनी कार्यकर्त्यांचे-गावकऱ्यांचे प्रेम-आदर संपादन केला आहे. श्री. सुंदरलाल बहुगुणा तर त्यांना खूप मानतात आंदोलनात त्यांनी महत्त्वपूर्ण सहयोग दिला आहे, त्यांचा ऋणनिर्देशही ते करतात.

उत्तरकाशीच्या पहिल्या दिवशी पावसाने झोडपून काढले. बाहेर पाऊस

आणि आत भटजींच्या बोलण्याची बरसात! श्री. भटजींकडून या भागाची– आंदोलनाची खूप माहिती समजली. दुसऱ्या दिवशी पावसाने जरा आराम घेतल्यावर उत्तरकाशीजवळपासच्या गावाकडे निघालो. खुद्द उत्तरकाशी अतिशय रमणीय आहे. चारी बाजूनी पहाड, मध्ये खोऱ्यात गाव आणि गावामधून वाहणारी भागीरथी. प्रसिद्ध नेहरू गिर्यारोहण संस्था गावाच्या परिसरातच आहे. आम्ही भेट दिलेले पहिले गाव डांग उत्तरकाशीजवळच; पण जरा अवघड जागी, पहाडाच्या पोटाशी वसले आहे. सुमारे साडेपाच हजार फूट उचीवर वसलेले हे डांग असो वा नंतरची पोखरी–कन्सेट आदि गावे असोत, पहाडाच्या कुशीत विसावलेल्या किंवा पसरलेल्या या गावाची रचना फार मजेशीर असायची. बहुसंख्य घरे लाकडाची. घर दुमजली असले तर प्रथमदर्शनी जिना घराच्या पुढच्या बाजूने. दुसऱ्या मजल्यावर मध्यभागी लाकडाच्या कोरीव काम केलेल्या तीन कमानी असणारच. मग ते घर लाकडाचे असो वा आधुनिक सिमेंटचे असो. घरावर भेढुन्ता वा पठाल या नावाने ओळखल्या जाणाऱ्या स्टेलच्या दगडाचे ओबडधोबड छप्पर. घराचा खालचा मजला गुरासाठी, चाऱ्याच्या साठवणुकीसाठी आणि वरचा मजला माणसांच्या वावरासाठी. वरच्या मजल्या-वर समोर एक लांबसडक सज्जा. खोल्या छोट्या–छोट्या. खोल्यांच्या खिडक्याही नामके वास्ते. घर आतून खूप ऊबदार. एकमजली घर असले तर काहीसे अंतर राखून गोठे वा गोशाळा बांधलेल्या. अनेक गावात तर उन्हाळ्याच्या दिवसात पशुधन वर डोंगरावरच्या गोशाळेमध्ये हलविले जाते.

आमच्या पाहणीक्षेत्रातील उत्तरकाशी वा लम्बगाव ही तशी मोठी गावे; पण उत्तराखंडातील जिल्ह्याची गावेसुद्धा एखाद्या नेपथ्यासाठी सेटवर मांडलेल्या छोटेखानी गावासारखी दिसतात. गावातील कुटुंबसंख्या सरासरी चाळीस ते पासष्ट, गावामध्ये रजपूत बहुसंख्य. ब्राह्मण, वत्स आणि हरिजनांची दोन-तीन घरं. टेहरीमधल्या पोखरीसारख्या एखाद्या गावाचा अपवाद, तेथील कुटुंबसंख्या शंभर, त्यातील हरिजनांची तीस. नावामध्ये ' सिंग ' असले ( ' नावामध्ये काय ' असे असले तरी! ) की रजपूत, ' प्रसाद वा दत्त ' असले की ब्राह्मण आणि ' लाल ' असले की हरिजन हे साधे वर्गीकरण हळूहळू ओळखीचे होत गेले. आम्ही आपापसात प्रश्नाला मुद्दे वाटून घेतले होते; पण गावात प्रश्न विचार-ताना ही समीकरण लक्षात ठेवावी लागत. उदाहरणार्थ एखादा सिंग वा दत्तच सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ लागला की, आमच्यातील एखादा सभासद हळूच

इतरांकडून माहिती काढायची. गावामध्ये सर्वेक्षण करताना वा माहिती घेताना ही अडचण नेहमी जाणवते. एक तर आपल्या समाजव्यवस्थेची, अगदी कुटुंबसंस्थेचीही उतरंड इतकी पक्की आहे की गावातला सवर्ण पाटील असो, शाळेतला मास्तर असो वा घरातला बाप वा नवरा असो, तो एकटा बोलायला लागला की, इतरांचे आवाज बंद! मोकळ्या चर्चेची सवयच नाही. त्यातून आदर–आदबच्या चित्र-विचित्र कल्पना, आम्ही भेटी दिलेल्या गावात अस्पृश्यता आढळली नाही. काही गावांतून तर रजपुताच्या घरात माडीला माडी लावून हरिजनही चर्चेस बसले होते; पण सगळ्या वागण्या-बोलण्यात एक जाणवत होते. हरिजन 'आपली पायरी सांभाळण्याची' दक्षता घेत आहेत. एखाद्या ठिकाणी मजूर-मालक नात्यामुळे तसे असेल; पण एकदर वृत्ती पायरी सांभाळण्याची. उद्या जेव्हा हे हरिजन मेहरबानी वा सवर्णांचा चांगुलपणा म्हणून नाही, तर समानता हा हक्क म्हणून मागतील तेव्हा खरी परीक्षा होईल.

गावाच्या सभोवार उतारावर पायऱ्या-पायऱ्यांची शेती केलेली असते. खूपशी जंगलजमीन शेती–लागवडीखाली आली असावी. योग्य बांध–बंदिस्ती केली नाही तर अशी डोंगर–उतारावरची जमीन अनुत्पादक ठरते. मग पोटा-पाण्यासाठी लोक आणखी जंगल तोडून जमीन लागवडीखाली आणण्याचा खटाटोप करतात वा उपलब्ध जागेचा इंचन् इंच वापर करण्याच्या उद्देशाने अगदी नदीनाल्याच्या काठापर्यंत शेत नांगरून ठेवतात. निसर्गही मग इंच–इंच सोडत नाही. जंगल–आच्छादन गेल्याने जमिनीची धूप मोठ्या प्रमाणावर वाढते व नदी–नाले काठावरची शेत–जमीन गिळून टाकतात. मग लोक आणखी जंगल तोडून जमीन लागवडीखाली आणतात आणि हे दुष्टचक्र चालू राहते. अखेर मानवी पर्यावरणाच्या सिद्धान्तानुसार धुपणाऱ्या मातीबरोबर वाहत-वाहत एक दिवस माणूस दूर मैदानावर फेकला जातो!

डोंगरउतारावरील शेतीचा हा अवघड सोपान कष्टपूर्ण जीवनाचे वा भविष्यातील अंधकाराचे प्रतीक आहे. जमिनीची योग्य बांध–बंदिस्ती वा वनशेतीने हे संतुलन सावरायला पाहिजे. मात्र पर्यावरणाच्या या समस्यांना केवळ यांत्रिक वा तांत्रिक उत्तरे नाहीत. डोंगर-उतारावरील अनुत्पादक शेतीकडून वन-शेती (Forest farming) वा वन आणि शेतीच्या मिश्रणाकडे (agri-silviculture)

लोकाना जसे वळवावे लागेल तसेच त्याकरिता काही मूलभूत प्रश्नांनाही सामोरे जावे लागेल. कारण ही समस्या लोकसंख्येच्या दबावाशी जशी निगडित आहे, तशीच सामाजिक असमानतेशी—जमीनमालकीच्या प्रश्नाशीही निगडित आहे. सामाजिक सदर्भ सोडून ही समस्या सोडविता येणार नाही. उदाहरणार्थ मूठभर रईस लोकांच्या हातात जोपर्यंत बहुतांश सुपीक जमीन आहे, तोपर्यंत आम गरीब जनतेचे अनुत्पादक (पण उपलब्ध) जगल—पहाडी जमिनीवरचे आक्रमण आणि पर्यायी दुष्टचक्र चालूच राहणार! गोर-गरिबाना अन्य पर्यायच नाही; परंतु सामाजिक असमानता दूर करणाऱ्या जमीन—मालकीच्या नवीन कायद्याबरोबर आपोआपच पर्यावरणाची जाणीव वाढीस लागते असा अनुभव नाही. बोलिव्हिया-पेरूमध्ये जमीनमालकीचे नवे कायदे आले; पण जमिनीची प्रचंड धूप चालूच राहिली स्वामित्वाचे नवीन संबंध आपण निर्माण करू शकतो; परंतु नवीन जमीन निर्माण करता येत नाही! पर्यावरणाच्या गाभ्याला धक्का बसला की मग देश पहाडी वा मैदानी असो अथवा साम्यवादी वा भाडवलवादी असो, निसर्ग कसा ठोकर मारतो ते साहेल देशातील (मॉरिटियाना, सेनेगल, माली इ.) भयानक दुष्काळापासून ते अलकनदा—भागिरथीच्या हाहाकारापर्यंत अनेक वेळा सिद्ध झाले आहे. अमेरिकेतल्या 'द ग्रेट प्लेन्स' व रशियाच्या 'व्हर्जिन लॅण्ड' येथील शेतीच्या धोकादायक प्रयोगातूनही हाच धोक्याचा लाल बावटा दिसला आहे. आपल्या पायाखालची एकुलती एक जमीन हरवू नये म्हणून या प्रयोगाची माहिती खूप मार्गदर्शक ठरेल!

१४ एप्रिल १९३४ रोजी अर्ध्या अमेरिकाखंडावर अक्षरशः धुळीचा वर्षाव झाला. अकरा मैल परत एक धुळीच वादळ झाल. न्यूयॉर्क शहरात दिवसा अंधारून आल. अटलांटिक महासागरात तीनशे मैल आतपर्यंत उभ्या असलेल्या बोटींवरही धुळीचा वर्षाव झाला. या सकटाच मूळ होतं पधराशे मैल दूरवरच्या मोन्टाना भागात—द ग्रेट प्लेन्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विभागात!

अमेरिकेच्या टेक्सासपासून मोन्टाना आणि डाकोटापासून कॅनडापर्यंत पसरलेला विस्तीर्ण प्रदेश द ग्रेट प्लेन्स म्हणून ओळखला जातो. तुफान वाऱ्याच्या या गवताळ प्रदेशात भटके रेड इंडियन्स, म्हशींचे कळप घेऊन हिंडत असत. शेतीपेक्षा पशुपालनावर त्याचे जीवन अवलबून होते आणि प्रदेशाच्या पर्यावरणाशी ही जीवनपद्धती सुसंगत होती. किंबहुना प्रदेशाच्या पर्यावरणाशी सुसंगत जीवनपद्धती त्यानी स्वीकारली होती. एकोणिसाव्या

शतकापर्यंत असा सिलसिला होता.

'विज्ञानयुग' आलं आणि मामला बदलला. निसर्गाची अफाट साधन-संपत्ती आणि तिचे दोहन करण्याची मानवाची अमर्याद बुद्धी याबद्दलचा अपरंपार विश्वास वाढू लागला. १८६० चे यादवी युद्ध झाले आणि मुळातल्या 'द ग्रेट अमेरिकन डेझर्ट'चे नामांतर 'द ग्रेट प्लेन्स' असं झालं. अगदी शहाजोगपणे. रेल्वे कंपन्या आणि जमिनींचे दलाल यांना आपल्या धंद्याला बरकत आणण्यासाठी अशा नामकरणाची गरज होती. त्यांनी वर्तमानपत्रात मोठमोठ्या जाहिराती देऊन 'द ग्रेट प्लेन्स्' मधल्या अफलातून नफ्याचे रंगीत चित्र रंगवले. 'या, जमिनी घ्या आणि थोड्या गुंतवणुकीमध्ये पैसाच पैसा मिळवा!' असा आभास निर्माण केला. अमेरिकन स्वभावधर्माप्रमाणे 'द ग्रेट प्लेन्स'ची एक 'क्रेझ'च निर्माण झाली. आपली आयुष्यभरची कमाई पणाला लावून वा कर्जाऊ पैसे घेऊन लोकांच्या झुंडीच्या झुंडी या मैदानाकडे धावल्या निसर्गाचा, पर्यावरणाचा जराही विवेक न ठेवता त्यांनी जमिनी शेतीसाठी लागवडीखाली आणायला सुरुवात केली. सरकारनेही अनेक आकर्षक योजना जाहीर केल्या. दोन-चार वर्षं हे सुख-स्वप्न टिकलं. प्रदेशाच्या निसर्गचक्रानुसार १८९० साली दुष्काळ आला आणि नित्य नेमाने येतच राहिला. गव्हा-मक्याचे पीक बीजासकट गेले! अनेकांची स्वप्ने अक्षरशः धुळीला मिळाली. कारण नांगरून-नांगरून जमीन भुसभुशीत झाल्याने, दुष्काळाबरोबरच तुफानी वाऱ्याने वरची उपजाऊ माती भिरकावून दिली गेली. निसर्गाचा इतका सरळ-सोट धडाही न शिकता काही लोक ट्रॅक्टरने आणखी आणखी जमिनी लागवडीखाली आणून तोटा भरून काढण्याच्या मागे लागले. अधून-मधून वाढणारा गव्हाचा भाव त्यांना भुलवीत राहिला. परिणाम एवढाच झाला हे लोक मातीत गेलेच; पण त्याचबरोबर या मैदानाचे व आजूबाजूच्या प्रदेशाचे मोठ्या प्रमाणावर वाळवंटीकरण सुरू झाले. १९३३-३४ च्या भीषण दुष्काळाने तर उरल्या-सुरल्या हिंमतवानांचे कंबरडेच मोडले. शेकडो शेतकऱ्यांचे दिवाळे वाजले. गुरं-ढोरं उपासमारीने तडफडू लागली. काही जणांनी हार स्वीकारली आणि पश्चिमेकडच्या आणखी एका नंदनवनाचा-कॅलिफोर्नियाचा रस्ता पकडला. त्याच एका वेड्या आशेने, आंधळ्या विश्वासाने! जॉन स्टाइन-बेकने 'द ग्रेप्स् ऑफ रॅथ' या कादंबरीत त्याचे अत्यंत दर्दभरे वर्णन केले आहे.

अमेरिकेच्या सरकारने अखेर 'मृद् संधारण सेवा' विभाग निर्माण करून या मैदानाचा व इतरही ठिकाणचे निसर्गसंतुलन सावरण्याचा आटोकाट प्रयत्न केला. आजही करत आहे; पण अखेर मनुष्यस्वभावापुढे इलाज नाही. बाजारात जरा अन्न-धान्याचे भाव वाढले की, विज्ञानाच्या जोरावर 'निसर्गावर मात' करण्याची ( दुः )स्वप्ने परत पडू लागतात. परत एकवार 'द ग्रेट प्लेन्स'चे मृगजळ खुणावू लागते !

पण मृगजळामागे कारणे कोणतीही असोत, फक्त भांडवलदारच धावतात असे नाही, तर साम्यवादीही धावतात. रशियात नेमके तेच घडले. १९५३ साली निकिता क्रुश्चेव्हने अधिकारग्रहण केले तेव्हा रशियाची अन्नधान्याच्या आघाडीवर बरोबर क्रांतिपूर्व हालतच होती. अशा स्थितीत आहे त्या शेत-जमिनीतून अधिक धान्य पिकावयाचे असेल तर प्रचंड भांडवली खर्च करावा लागणार होता आणि ते भारी उद्योग-धंद्यांना प्राधान्य देणाऱ्या राष्ट्रीय उद्दिष्टात आणि अंदाजपत्रकात बसत नव्हते. त्याऐवजी उत्तरेकडील कझाकिस्तान, पश्चिम सैबेरिया, पूर्व रशियामधील 'कुवाँर धरती' ( Virgin land ) कामाला आणली तर हमखास फळणार होती. कमी खर्चात, कमी वेळात. निदान तशी अटकळ होती, भरोसा होता.

क्रुश्चेव्हसारखा मनस्वी माणूस ! सर्व यंत्रणा त्याने वेठीला लावली. लोकांच्या राष्ट्रभक्तीला साद घातली. लोकांनीही अनंत अडचणींची पर्वा न करता जोरदार प्रतिसाद दिला. चाळीस दशलक्ष हेक्टर चराऊ जमीन नवीन लागवडीखाली आली. जमिनीचा इंचन् इंच वापरला जाण्याची भाषा सुरू झाली. जमीन 'पडीक' ठेवणाऱ्यांच्या परंपरागत पद्धतीचे वाभाडे काढण्यात आले आणि सुरुवातीच्या काही काळात अन्नधान्याचे उत्पन्न पन्नास टक्के वाढले. त्यात 'ग्रेन फार्मिंग रिसर्च इन्स्टिट्यूट'च्या कॉम्रेड बारयेव्हचा सबुरीचा सूर पार बुडून गेला !

कॉम्रेड बारयेव्हला उत्पादनवाढीची असूया नव्हती. फक्त ही उत्पादनवाढ चिरंतन आणि शाश्वत ठरावी अशी प्रामाणिक इच्छा होती आणि ती इच्छा व्यक्त करण्याएवढे धैर्य होते. एका बाजूस तात्पुरते उत्पन्न वाढत असले तरी दुसऱ्या बाजूस होणारी जमिनीची प्रचंड धूप त्याला अस्वस्थ करू लागली म्हणून त्याने जमिनीची खोल नांगरट न करण्याचा, जमिनीचा मगदूर ओळखून एकतृतीयांश जमीन क्रमाक्रमाने पडीक ठेवण्याचा, तृण-आच्छा-

दनाची पूर्ण विल्हेवाट न लावण्याचा नम्र पण निर्भीड सल्ला दिला; पण ऐकतो कोण ? क्रुश्चेव्हने उघड–उघड बारयेव्हवर टीकास्त्र सोडले. क्रुश्चेव्हला साथ द्यायला अल्ट्राय रिसर्च इन्स्टिटयूटच्या कॉम्रेड नालिव्हायकोसारखे शास्त्रज्ञही मिळाले.

अखेर निसर्गाने आपला हिसका दाखवलाच. १९६३ नतर अन्न उत्पादन झपाट्याने खाली जाऊ लागले. तीन दशलक्ष हेक्टर जमिनीवरील उभे पीक पाण्याअभावी बरबाद झाले आणि वर्षामागून वर्षे ते बरबादच होत राहिले. मॉर्गन या शास्त्रज्ञाच्या मते तर १९६२ च्या दरम्यान 'व्हर्जिन लँड'मधील एकूण सतरा दशलक्ष हेक्टर जमिनीची वाऱ्यामुळे प्रचड धूप झाली आणि त्यातील चार दशलक्ष जमीन तर लागवडीतून कायमची बरबाद झाली.

'लूजिंग ग्राउंड' ('ढासळती जमीन' Losing Ground) या आपल्या उद्बोधक पुस्तकात ही उदाहरणे देऊन एरिक एकहोम हा जगप्रसिद्ध निसर्ग–शास्त्रज्ञ आपल्याला सवाल करतो की इतराच्या घोडचुकावरून आपण काही बोध घेणार आहोत की भावड्या आशावादाच्या आणि खोट्या अहंवादाच्या घोड्यावर बसून 'निसर्गावर मात' करण्याच्या त्याच घोडचुका परत–परत करणार आहोत ?

डाग गावच्या आसपास बांझ बुरॉँश–भीमल, गुरियाडचे जंगल होते. गाव–जगलाचा संबध अगदी निकटचा असल्याचे जाणवले. जंगलाने जमीन वा पाण्याचे सधारण होते ही गोष्ट गावकऱ्यांच्या मनात पूर्णपणे ठसली आहे. त्याबाबत बोलता–बोलता एक वृद्ध शेतकरी दिलपालसिंह आवेशाने म्हणाला, 'जगल क्या है ? जंगल हमारा सर है ! वह कट गया तो क्या हम जिंदा रह सकते हैं ?' साध्या–सुध्या गावकऱ्यामध्ये पर्यावरणाची ही जाणीव आढळली; पण शासकीय योजकाला मात्र त्याचे सोयर-सुतक नसावे डाग गावाशेजारीच जगल तोडून तत्रशाळा होणार होती. तत्रशाळेचे अर्थातच स्वागत होते; पण जगल तोडून तत्रशाळा उभारण्यास लोकांचा कट्टर विरोध होता. त्यांनी पर्यायी जागा सुचवली; पण सरकारी फायलीच्या जजाळात अडकून फिरणाऱ्या अमल–दाराच्या डोक्यात लौकर प्रकाश पडेल तर शपथ ! जवळच्या कन्सेंट–पोखरी गावातील कर्मकहाणी तशीच. 'मणेरी–भाली जल–विद्युतप्रकल्पा'साठी दगड

पाहिजे होता. भागीरथीच्या पात्रातील दगड परीक्षणाअंती योग्य ठरवण्यात आले तरी शेवटी जवळचा बिड्ड पहाड दगडासाठी फोडणे चालू झाले. कारण ते कमी खर्चाचे होते; पण पहाड कमजोर होऊन त्याखाली गाव बरबाद झाले असते, त्याची कोणाला पर्वा नव्हती! परत गावकऱ्याना आदोलन उभारावे लागले. उत्तरकाशीला शासकीय इमारत आणि अधिकाऱ्यांची निवासस्थाने बांधण्यासाठी शासनाने उपजाऊ जमिनीनाच कब्जा केला. फार काय 'गहू-कापणी होईस्तोवर थांबा' ही लोकाची विनती ठोकरून उभ्या पिकात बुल-डोझर घालून जमीन सपाट करण्यात आली. कन्सेंटमध्ये भरघोस आश्वासने देऊन पॉवरहाउससाठी लोकाची जमीन ताब्यात घेण्यात आली. नोकर–भरती करताना मात्र स्थानिक लोकाना पद्धतशीर डावलण्यात आले. आज डाग–कन्सेंट–पोखरीतले लोक कमालीचे अस्वस्थ आहेत. काय वाटेल ते झाल तरी सरकारला धडा शिकवण्याच्या भडक मन:स्थितीत आहेत. त्यातून कदाचित अविचार घडेल. मग लोक असे रस्त्यावर आले की, सरकार वा इतर शहाजोग माणसे त्याच्या नावाने बोटे मोडतात वा अशा मागण्याची राष्ट्रविरोधी संकुचित प्रादेशिक मागण्या म्हणून वासलात लावतात. आपले सर्व यथासाग असताना भरल्या पोटी करायच्या गोष्टी असतात या, पण एरवी शात-सौम्य असणाऱ्या लोकांवर अशी पाळी का येते याचा कोणी खोलात विचार करत नाही वा विचाराप्रमाणे आचरण करत नाही! विजेंद्रसिंह नावाचा तरुण पहाडातील दगड काढण्याच्या कट्टर विरोधात होता. आम्ही त्याला जरा समजावणीच्या सुरात विचारले की, प्रकल्प राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचा नाही का? तो ताडकन् उसळून म्हणाला, 'प्रॉजेक्ट नॅशनल है तो क्या हम यहाँ के लोग नॅशनल नहीं है?' विजेंद्रसिंहचे उद्गार खूप बोलके आहेत. सूचक आहेत. अर्थात समझनेवालोंको!

डाग व आसपासच्या गावात एक आश्चर्यकारक प्रथा ऐकावयास मिळाली. आता तेथील स्त्रिया जमीनही नागरतात. पूर्वी स्त्रीने नांगराला हात लावणे अशुभ समजले जाई. यातील शुभ-अशुभाचा भाग सोडला तरी घराच्या कामाच्या ओझ्याखाली आधीच गुदमरलेल्या स्त्रीवर नांगर धरण्याचे कष्टप्रद कामही पडू नये असा विवेक असावा; पण आता एक तर बापेमंडळी गाव सोडून गेल्यामुळे वा व्यसनाधीन आळशी झाल्यामुळे बायकांच्या हाती नांगरही आला आहे. अगोदरच चारा–पाण्यासाठी वणवण त्यात ही भर. सिल्यारामध्ये श्रीमती

त्रिमलाजी बहुगुणांशी याबाबत चर्चा करताना त्यानी एक मार्मिक सवाल केला– ' पहाडातील समस्याचा स्त्री–पुरुष जर समान रीतीने मुकाबला करत असतील तर स्त्रियामध्ये आत्महत्येचे प्रमाण जास्त का ? स्त्रिया मानसिकदृष्ट्या कमजोर आहेत म्हणून की पुरुष जास्त निगरगट्ट आहेत म्हणून ? '

आमच्याजवळ खरोखर त्याचे उत्तर नव्हते. किंबहुना उत्तर माहीत असून त्याला सामोरे जाण्याची आमची हिंमत नव्हती !

उत्तराखंडात आल्यापासून किंबहुना अगोदरपासूनच १९७८ च्या भागीरथी दुर्घटनेचे वर्णन खूप ऐकून-वाचून होतो. साहजिकच दुर्घटना घडली ती जागा प्रत्यक्ष पाहण्याची, माहिती समजून घेण्याची उत्सुकता होती. आठ मार्चला उत्तरकाशीहून बस पकडली व गंगोत्रीच्या वाटेवरील गंगनानी गाठले. उत्तर-काशी-गंगनानी अंतर सुमारे पचावन्न किलोमीटर्स आहे. तेथून प्रत्यक्ष दुर्घटनेची जागा पाच–सात किलोमीटर्सवर भागीरथी व कनोडिया गाड ( नाला ) च्या संगमावर आहे. प्रथम सहा ऑगस्ट १९७८ रोजी भागीरथीच्या पात्रात एक कडा नाही तर उभा डोंगरच कोसळून एक मोठा बंधारा तयार झाला. भगी-रथाने भगीरथ प्रयत्नाने आणलेली गंगा खंडित झाली. प्रत्यक्ष गंगा गायब झाली. खालच्या उत्तरकाशी, भटवाडी आदि गावातील भागीरथीचे पात्र आठ तासपर्यंत रिकामे राहिले. सर्वत्र हाहाकार माजला. काही परिणामकारक प्रति-बंधक योजना होण्याअगोदरच हा नैसर्गिक बंधारा फुटला आणि सुसाट वेगाने वाहणाऱ्या या पुराच्या पाण्याने थैमान घातले. गंगनानी गाव होते की नव्हते करून सोडले ! एक हजार हेक्टर जंगलाचा विध्वंस केला. शेकडो एकर शेत - जमीन, गुरेढोरे गिळून टाकली. एवढ्यावरच दुर्दैव संपलं नव्हतं, बर आड-बाजूला कनोडिया नाल्याच्या पात्रातही डोंगर कोसळून प्रचंड जलाशय निर्माण होत होता. आधीच्या दुर्घटनेच्या भरात कोणाच्या लक्षात ही गोष्ट आली नाही, पण दहा ऑगस्टला याचा बांध फुटला आणि आणखी हाहाकार माजला ! भागीरथीचे गढूळ पाणी या नदीच्या पात्रातील आठ-दहा मीटर्स उंचीचे पत्थर–गाळाचे ढिगारे ही मूक निशाणी मागे राहिली. आजही आजू-बाजूच्या परड-डोंगराचे काही खरं वाटत नाही !

भागीरथी दुर्घटनेच्या अनेक आख्यायिका ऐकायला मिळाल्या. अगदी

कलियुगातील पापाच्या डोंगरापासून ते चिनी लोकांनी घातपाताने सुरुंग पेरण्यापर्यंत अनेक आख्याने आहेत; पण सरकारच्या 'भू-सर्वेक्षण' खात्या-कडून झालेल्या चौकशीत असं आढळून आलं की, या दुर्घटनेला जबाबदार कोणतेही मानव-निर्मित कारण नसून कमजोर भूगर्भातील अंतर्गत घडामोडीं-मुळे ही दुर्घटना घडली. पाहणीचे निष्कर्ष योग्य असतील, त्याबद्दल काही म्हणायचे नाही; पण हिमालयाचा भूस्तर दुर्बल आहे हे माहीत असताना मग संरक्षक उपाय म्हणून काय उपाय-योजना करायची? 'ग्यानसू' येथे अविकृत-रीत्या कापून नेलेल्या ५ लाख झाडांचा काय जमा-खर्च मांडायचा? सुंदर-लालजींच्या याबाबतच्या भावना फार तीव्र आहेत. हिमालयाचा भूस्तर मुळातच नाजूक आहे आणि तो डबघाईला येण्यास केवळ वन-विनाश कारणीभूत नाही असा युक्तिवाद कोणी केला की, ते उसळून विचारतात 'भूस्तर नाजूक आहे हे एखादे शाळकरी पोरदेखील सांगेल, ते सावरण्यासाठी तुम्ही काय केले किंवा काय करणार ते बोला! वन-संवर्धन की 'शास्त्रीय' वन-तोड? हिमालयासारख्या पहाडी प्रदेशात साठ टक्के जंगल पाहिजे अशी घोषित राष्ट्रीय वन-नीती असताना उत्तराखंडात चाळीस टक्के जंगल शिल्लक कसे? (प्रत्यक्षात ते आणखी कमी आहे!) हा काय वनखात्याच्या 'शास्त्रीय कार्ययोजनां'चा पुरावा समजायचा का? तीस अंश उतारापेक्षा जास्त उतारावरील जंगल कापू नये म्हणून स्वत:च आपल्या कार्य-योजनेत ( working plan ) दंडक घालून घेतात आणि मग ठेकेदाराशी संगनमत करून तीस नाही तीनशे नाही मनात येईल ते जंगल कापून नेतात! आम्ही अडवले तर वन-विद्येतील तुम्हाला काय समजते म्हणून हिणवतात! ही 'शास्त्रीय' फसवणूक किती दिवस चालणार?'

दुर्घटनेच्या जागेवरून भगेली गावाला गेलो. ही वाटचाल कमालीची थरारक आणि अविस्मरणीय होती. भगेली गाव वर पहाडात सुमारे दहा हजार फुटांवर आहे. अगदी उभी, त्यातून पाऊस-पाण्याने निसरडी झालेली चिंचोळी पायवाट, एका बाजूला प्रचंड खोल दरी आणि दुसऱ्या बाजूला घायकुतीला आलेले ठिसूळ पहाड! त्यामधून जीव मुठीत धरून चाललेले आम्ही धाडसी वीर! पण काय गमत आहे-सीताराम एरव्ही पहाडांना टरकणारा; पण आता-पर्यंत तो प्रति तेनसिंग झाला होता! आमच्यातील पुण्याची सुनीता भाटवडेकर हिमालय काय, पुण्याच्या पर्वतीच्याही वाटेला गेली नव्हती. या नाजुक-साजुक मुलीला ही मोहीम कशी पेलणार याची अनेकांना चिंता होती; पण भगेलची

विकट वाट काय किंवा जीवघेणी पाऊस-थंडी काय, मुलींचा पाय कधी माघारी आला नाही, की आनंदी चेहरा कधी कोमेजला नाही! कामाच्या-गमतीच्या वेळी ती सर्वांच्या तोंडीस तोंड राहिली. अनेकदा आपण बाह्यरूपाने फसतो वा सवी न मिळाल्याने एखाद्याची पारख होत नाही; पण अशा कठीण प्रसंगी एकेकाच पाणी जोखलं जात.

आम्ही पोचलो तेव्हा भंगेली गाव बर्फाने झाकोळले होते. नतरही बर्फवृष्टी झाली. गाव छोटसच. लोकसख्या दोनशेच्या आसपास, गावातील लोकाच्या पूर्वी फळबागा होत्या. चागली उपजाऊ शेत–जमीन होती; पण १९७८ च्या कोसळ-कड्यानी सर्व बरबाद झाले! लोकानी आमचे प्रेमाने आगत–स्वागत केले. गरमागरम जेवू-खाऊ घातले. थंडीसाठी उबदार कपडे दिले. रात्री गाणी ऐकवली, पण नतर गावकऱ्याशी झालेल्या बातचितीनतर आमची आम्हालाच शरम वाटली. या लोकानी आपल्याला घरात घेतलच कस याच आश्चर्य वाटलं! लोक सागत होते दुर्घटनेनतर गावात खूप लोक येऊन गेले. मदतीची–योजनाची भरघोस आश्वासन मिळाली. अर्ज–विनत्या झाल्या. मदत–नुकसान–भरपाई तर राहूच द्या, बरबाद झालेल्या शेत–जमिनीचा साराही अजून माफ झाला नाही चार वर्षं झाली, अजूनही आमच्याकडून हक्काने सारा वसूल केला जातो!

गावकरी साधे-सरळ आणि आनदी होते. इतके सोसूनही आनदी होते. गावातील सौकारसिग तर आरपार जिवत व्यक्तिमत्त्व. खेड्यातील खडतर जीवनाचा विषय चालला होता. सहज कोणीतरी म्हणाला मग शहरात का जात नाही? बाहेर बर्फ पडला होता. त्यावर चद्राचे शुभ्र चादणे पसरले होते त्याकडे पाहून हळूच डोळे मिचकावीत सौकारसिंग म्हणाला, 'अजि, यहाँ चांदी है चादी! तुम्हारे शहरमें क्या मिलेगा?'

मनात आल शहरातही चांदी आहे चादीच चादी आहे आणि जीवनात फक्त चांदीच उरली आहे!

भगेलीनतरचे दोन दिवस परतीच्या प्रवासात आणि कोसळणाऱ्या पावसात वाहून गेले. पावसाने जरी उघडीप दिली तरी धुळवड असल्याने बाहेर उघडपणे फिरण्याची मुश्कील होती पाऊस आणि धुळवड जरा ओसरल्यावर मग गाठले टेहरी. उत्तरकाशी जिल्ह्यात सुदरलालजींचा व त्याच्या कामाचा थोडा-फार प्रभाव आहे; पण त्याचे खरे प्रभाव–क्षेत्र म्हणजे टेहरी जिल्हा. विशेषत: लम्ब-

गावाविषयी व तेथील आचार्य विद्यादत्त रतौडींच्या कार्याविषयी खूप ऐकले होते. सुदैवाने आम्ही लम्बगावला पोचलो तेव्हा श्री. रतौडीजी हजर होते.

आचार्य रतौडीजींना वन-संवर्धनाबद्दल अतोनात आस्था आहे. वन-संवर्धन-प्रयत्नाची, विचाराची सुरुवात शेंड्यापासून नाही तर अगदी लहान मुलांच्या मनातील सुप्त बीजापासून करावी असा त्यांचा आग्रह आहे. त्यासाठी मुलाकडून नर्सरी वाढविण्याच्या त्याच्या योजना आहेत. ते म्हणाले, 'शाळा-महाविद्यालयातून ( विशेषत. वन-विभागातील ) नुसती 'वन-विद्या' शिकवून उपयोगाची नाही तर अगदी मुळाक्षर-ओळखीपासून-'व' वनातला पासून लहान मुलांच्या मनावर 'वन-संस्कार' व्हायला पाहिजेत तरच वन-संवर्धनाचे प्रयत्न मूळ धरतील !'

श्री. रतौडीजींच्या प्रयत्नानी लम्बगाव व आजूबाजूच्या काही गावातील लोकानी आपल्या गावची वने काळजीपूर्वक जतन केली आहेत. लोक वर्गणी काढून तेथे पहारेकरी नेमतात. गावात वन-पचायत आहे. कोणा गावकऱ्याला लाकूड-चाऱ्याची गरज भासली तर या वन-पचायतीपुढे यावे लागते. वन-पचायतीचे पंच गावातीलच. त्यामुळे मागणाऱ्याची गरज किती खरी-खोटी-मोठी याचा अदाज असतो. ह्याप्रमाणे मागणी मजूर होते. मध्यप्रदेशातील बस्तरच्या आदिवासी भागातही 'वन-पचायती'ची ही पद्धत रूढ होती. त्याबाबतची हकिगत ऐकण्यासारखी आहे.

बस्तरमधील जगदाळपूरजवळ कुरुदी नावाचे गाव आहे. तेथील सालाचे 'किरकोळ' जगल साफ करून चीडचे 'मूल्यवान' जगल लावण्याचा प्रायोगिक प्रकल्प मध्य-प्रदेशच्या वन विकास महामडळाने हाती घेतला आहे. कुरुदी या योजनेचे मुख्य केंद्र आहे. केन्द्रसरकारच्या पर्यावरण विभागातर्फे या प्रकल्पाचा अभ्यास करायला कुरुदी येथे गेलो तेव्हा जाणवले की झपाट्याने नाहीशा होणाऱ्या आपल्या साल जंगलामुळे स्थानिक आदिवासी कमालीचे अस्वस्थ आहेत तर दुसऱ्या बाजूला सर्व अधिकारीवर्ग या आदिवासींना जगलाची काय पर्वा, त्यानीच जगलाची वाट लावली असा सरसकट दोषारोप करत आहेत ! आदिवासी जीवनाची मला थोडी-फार माहिती होती. आदिवासी म्हटला म्हणजे अगदी सद्गुणाचा पुतळा अशी माझी भाबडी समजूत नसली तरी आदिवासी माणूस इतर काही पर्याय असताना आपणहून जगल साफ करेल यावर माझा विश्वास बसण्यासारखा नव्हता. म्हणून अधिकारीवर्गाचे प्रथम

ऐकून घेतले आणि मी आणि शेखरने हळूहळू कुरुदीच्या आसपास भटकायला सुरुवात केली. मग आढळले की, कुरुदीच्या आठ किलोमीटर परिसरात अशी आदिवासी गावं आहेत की, त्यांनी आपल्या वन-पंचायतींद्वारा गावची जंगले शाबूत राखली आहेत. गेल्या अनेक पिढ्या, लोक-वर्गणीतून पहारेकरी नेमले जातात वन-पंचायत लोकांना गरजेनुसार लाकूड-चारा पुरवते. लोकांना जंगलाबद्दल खरी-खुरी लगन आहे. धक्कादायक गोष्ट ही की, ही गावं कुरुदीच्या एवढ्या जवळ असूनही या प्रयत्नाची माहिती वन-खात्याच्या एकाही कर्म-चाऱ्याला नव्हती ! माहिती घेण्याची पर्वा नव्हती वा जरुरी भासत नव्हती आणि ते सरसकट आदिवासींच्या नावाने बोट मोडीत होते !

लम्बगावला मुक्काम ठोकायचा आमचा बेत होता, पण आमची व्यवस्था केली होती जवळच्या नौघरमध्ये. नौघरमध्ये आमचे संमिश्र स्वागत झाले धड प्रेम नाही, धड रागही नाही. मग उलगडा झाला. आम्ही येताना जंगलाची, ' चिपको 'ची गाणी म्हणत आलो होतो. गाव प्रामुख्याने जंगल ठेकेदारांचे. साहजिकच त्यांची प्रतिक्रिया सावध-संमिश्र होती, पण आम्ही जरा गप्पा-गोष्टी केल्यावर त्यांना थोडासा विश्वास वाटला असावा. कारण मग आमची व्यवस्था एका माडीवरच्या घरात ( म्हणजे पहिल्या मजल्यावर, ' गोड ' समज नसावा ! ) झाली. अंग टेकायला मिळाले; पण जेवणाचा पत्ता नाही ! आश्वासन मिळाले होते. विलक्षण भूक लागली होती. पोटात कावळे काय मोर ओरडायला लागले होते; पण कुठेही आशादायक हालचाल दिसेना. ही ठेकेदारमंडळी गनिमीकावा करून आपला भूकबळी देतात की काय, अशी शंका आली. पोट कुरतडत असतानाच गावकरी आले. एकदम गरमागरम फुलके, भाजी आणि डाळ घेऊन. प्रेमाने जेवायला घातले. पोटापासून आग्रह केला. ऐन वेळेला फक्त भाजी-भाकरी खाऊ घालू शकले म्हणून दिलगिरी व्यक्त केली. खरे म्हणजे शरमिंदे झालो होतो आम्ही !

चिपको ' आंदोलनाबद्दल वन-ठेकेदारांच्या प्रतिक्रिया साहजिकच कडवट आहेत. त्यांचं म्हणणं असं की, लोकांना घर-शेती आदि गरजांसाठी लाकूड लागणारच. मग जंगलातील परिपक्व झाड तोडून ठेकेदारी केली तर काय बिघडतं ? नाही तर एका बाजूला लोकांच्या गरजा अधुऱ्या राहतील आणि दुसऱ्या बाजूला ही वनसंपत्ती नुसतीच वाया जाईल. शिवाय धंदा करून पैसा कमविण्यात काय पाप आहे ?

युक्तिवाद खरा असला, वरवर पाहता त्यामध्ये खूप अर्थ वाटत असला तरी मामला इतका सीधा-साधा नाही. लोकांना लाकडाची आवश्यकता भासते तशीच लोकानाच चारा-पाणी-संरक्षणाची पण आवश्यकता भासते. पण एका बाजूला ' लोकांची ' गरज पुढे करून दुसऱ्या बाजूला लोकांनाच अडचणीत आणायचे हा कोणता न्याय झाला ? पण ' लोक ' शब्दात गोम आहे. कारण अनेकदा लाकडाची गरज भासणारे लोक दूर शहरातले असतात आणि जगल गेल्यामुळे ज्याचे नुकसान होते, ते लोक ' खेड्यातले-पहाडातले अशिक्षित-असघटित असतात. त्याच्या गरजाचा, मागण्याचा न्याय्य विचार झाला असता तर ' चिपको ' आदोलन मुळात जन्मलेच नसते ! दुसरी गोष्ट म्हणजे पर्याव-रणाची कदर करून योग्य प्रमाणात जगल-तोड झाली असती तरी लोकाचा विरोध झाला नसता, पण एकंदर अनुभव असा की, चाळीस झाड तोडायचा परवाना काढून जगल-ठेकेदार आणि सरकारी कर्मचारी सगनमताने चारशे झाडे तोडून मोकळे होतात आणि वर नाव मात्र आदिवासी-वनवासींचे ! वन-सवर्धनाचे उपदेश त्यानाच !

जगल-तोडीसबंधी ' चिपको ' आदोलकांची विशेषतः श्री. सुदरलालजींची भूमिका धरसोडीची आहे असा जगल-ठेकेदार मडळींचा, वन-अधिकाऱ्याचा जोरदार आक्षेप आहे. आपल्या आरोपाच्या पुष्ट्यर्थ ते सुदरलालजींचे अनेक लेख वा विधाने आपल्यासमोर ठेवतात. 'वन-श्रमिक' नावाच्या पुस्तिकेत वन-मजूर, वन-कटाईच्या आरा ' यत्राची पूजा सुदरलालजींच्या साक्षीने करत आहेत पुरावे दिले जातात. त्याबाबतचा तपशील समजून घेण्यासारखा आहे.

आज ' चिपको ' आंदोलनाने पर्यावरणाच्या जाणिवेचे व्यापक रूप धारण केले असले तरी त्याचे मूळ स्थानिक माणसावर होणाऱ्या अन्यायामध्ये होते. हा अन्याय दोन प्रकारचा होता. एक तर त्याच्या गरजेचे जगल साफ होऊन सर्व माल दूरदेशी जात होता आणि दुसरी गोष्ट म्हणजे या सर्व प्रक्रियेत मैदानातील बडे जगल-ठेकेदार पहाडी वन-मजुरांचे आर्थिक शोषणही करत होते. सुदरलालजींनी या दुसऱ्या आघाडीवर प्रथम विशेष लक्ष दिले आणि वन-श्रमिक सहकारी सस्थाची स्थापना करून ठेकेदारीला यशस्वी शह देण्याचा प्रयत्न केला. ' वन-विकास निगमा 'च्याद्वारे वन-श्रमिकांना पुरेसे प्रतिनिधित्व व योग्य मोबदला मिळेल या सरकारी आश्वासनावर विसबून ' वन-विकास निगम 'च्या ( Forest Development Corporation ) स्थापनेतही

पुढाकार घेतला, पण समाजवादी सरकारची उक्ती आणि कृती, कागदावरच्या शास्त्रीय कार्य-योजना आणि प्रत्यक्षात घडणारे गैरप्रकार पाहून सुंदरलालजींचा पार भ्रमनिरास झाला आणि आज उत्तराखंडात वन-कटाईला संपूर्ण बंदी घालण्याचा आग्रह त्यांनी धरला आहे.

सुंदरलालजींच्या वा आंदोलकांच्या प्रयत्नामुळे एक झाले-उत्तराखंडातील जंगल-ठेकेदारीतून मैदानातील बडे जंगल-ठेकेदार मागे हटले. अनेक ठिकाणी एके काळी बड्या ठेकेदारांचे दिवाण-मॅनेजर असलेले स्थानिक लोक आता ठेकेदार बनले वा बनविले गेले. टेहरीचा एक आमदार जंगल-ठेकेदार आहे आणि तो साम्यवादी पक्षाचा आहे! आंदोलकांच्या दृष्टीने यात एक पेच उभा राहिला. पूर्वी लढाई मैदानातील बडा ठेकेदार व स्थानिक वन-श्रमिक अशी साफ सुथरी होती. स्थानिक ठेकेदार म्हटल्यावर सगे-सोयरे आले. छोटे-मोठे हितसंबंध आले. त्यामुळे मामला गुंतागुंतीचा झाला. अर्थात असे सर्व अडथळे ओलांडूनच आंदोलन पुढे जात असते.



सुंदरलालजींच्या मागण्याचा विपर्यास करून त्याच्यावर डाव उलटण्याचा पद्धतशीर प्रयत्न काही वेळा सरकारी यत्रणा–ठेकेदारानी केला आहे. श्रीनगर-जवळील बढ्यारगडच्या जगलात काही वर्षांपूर्वी सुदरलालजींनी उपोषण केले. अगदी चोवीस दिवसाचे खडतर उपोषण केले. व्यापारी जगलतोडीस सपूर्ण बदी ही एक प्रमुख मागणी होती. मात्र त्यानी ' व्यापारी ' जगलतोड ही गोष्ट स्पष्टपणे व जोर देऊन माडली नाही. हितसबधियानी बरोबर डाव साधला. सुंदरलालजींची मागणी आम्ही सपूर्णपणे मान्य करणार आहोत आणि आता यापुढे गावकऱ्याना ' हकहकूक 'चा ( निस्तार हक्कानुसार मिळणारा ) लाकूड-फाटाही मिळणार नाही असा प्रभावी आणि मतलबी प्रचार त्यानी सुरू केला. लोक गोंधळले. कारण दैनदिन गरजेचा प्रश्न होता. अखेर आदोलनाच्या बाजूने असलेले लोक केवळ तटस्थ नाही तरी विरोधात जाऊ लागले. ' मी हक-हकूकच्या नाही, तर व्यापारी तोडीच्या विरोधात आहे ' हे नतर सुदरलाल-जींनी लोकाना समजावून सागण्याचा प्रयत्न केला तरी आदोलनाच्या दृष्टीने संदिग्धता जरा महागातच पडली.

चडीप्रसादजींची याबाबतची भूमिका फार यथार्थ आहे. ते म्हणतात आपल्या मागण्याबद्दल आदोलकानी अगदी स्पष्ट आणि वास्तव असले पाहिजे. नाहीतर उगीचच गोंधळ उडतो. मला वाटते यामध्ये व्यक्तिमत्त्वाबरोबरच ज्या तऱ्हेने नेतृत्व उभे राहते आणि वाढते त्याचाही परिणाम होतो. कारण सिल्यारा आणि गोपेश्वर येथील दोन्ही आदोलनकेंद्रे सर्वोदयी विचाराच्या प्रभावाखाली असली तरी चळवळीच्या दृष्टीकोनातून पाहता दोन्हीकडच्या विचारधारेत, कार्यपद्धतीत फरक आहे. पहिल्या ठिकाणी संघटनात्मक पाया फार अपुरा आहे. आणि एका झझावाती व्यक्तिमत्त्वाच्या नेतृत्वाखाली पुऱ्या उत्तराखंडाच्या मागण्या पुढे रेटल्या जात आहेत, तर दुसरे, सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या सामूहिक नेतृत्वाखाली, नेमक्या मागण्या घेऊन आस्ते पण निश्चित वाटचाल करीत आहे वैयक्तिक पुरुषार्थाचा आदर करणारे, पण त्याचबरोबर अपरिहार्य-पणे येणारे गुणावदोष ओळखून सर्वसमत कार्यक्रमाला प्राधान्य देणारे आहे.

सुदरलालजींची भूमिका भावनिक आणि तात्त्विक अशी दोन्ही आहे. पुऱ्या उत्तराखडात पन्नास वर्षेपर्यंत जगलतोडीस बंदी घालून शुद्धपातळीवरून वनी-करणाची मोहीम हाती घ्यावी व व्यापारी वनाऐवजी स्थानिक लोकाच्या गरजेच्या ' पचजीवनवृक्षांना ' ( म्हणजे खाद्य, चारा, इधन, खत व धागा पुरवि-

णाऱ्या बाझ, बुराझ, पमनी, मोहरु, खरसु आदि रुदपर्णी वृक्षाना ) प्राधान्य द्यावे अशी त्याची मागणी आहे. भारतासारख्या कृषि-प्रधान देशात जल व मृद् सवारण हेच जंगलाचे आद्य कर्तव्य मानले पाहिजे, अशी त्याची धारणा आहे सर्वोदयी तत्त्वज्ञानाची व्यापक बैठक असल्यामुळे तत्कालीन वननीती, कायदेकानू याच्याही पलीकडे जाऊन निसर्गाशी फारकत घेतलेल्या भोगवादी वृत्तीशी त्याचा लढा आहे. अल्पजीवी विनाशकारी अर्थ-व्यवस्थेच्या विरोधात स्थायी अर्थ-व्यवस्था ( economy of permanance ) उभारण्याचा निश्चय आहे. चडीप्रसादजी तात्त्विक पातळीवर ही भूमिका मान्य करतात; पण संघटनात्मक पातळीवर जोर असल्याने मागण्या माडताना एकदम पुऱ्या उत्तराखडाच्या नाही तर आपली सघटना मजबूत असलेल्या विभागाच्या मागण्या प्रथम माडतात आणि त्या खात्रीशीरपणे पदरात पाडून घेतात! हे सर्व बारकावे समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे. असो.

नौघरजवळील रौणिया या गावी प्राचार्य रतौडी आम्हाला परत भेटणार होते. त्यानी या भागात जोरदार कार्य केले आहे. महिला मुक्ती व संघटन यासाठी खेड्यापाड्यांत हिंडून बरेच परिश्रम घेतले आहेत. शराब-बदी, कन्या-विक्रय-बदी, वन-सरक्षण आदि प्रश्नावर स्त्रियाची अधिवेशने घेतली आहेत. रौणियाचे महिला मडळ खूप प्रभावी वाटले. महिलानी सभेमध्ये प्यायच्या पाण्याचा प्रश्न आणि स्थलातराचा प्रश्न अगदी तळमळीने मांडला. रौणियामध्ये पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाने बिकट रूप धारण केले आहे. काही वर्षांपूर्वी अशी परिस्थिती नव्हती. अगदी दुर्भिक्षाच्या काळामध्येही गावाजवळच्या झऱ्यामध्येही पाणी राहत असे, पण पाण्याचा मुख्य स्रोत असलेल्या बाझ-बुराझ वृक्षाचे जंगल कटले आणि भयानक दुर्भिक्षास सुरुवात झाली. आता उन्हाळ्यात सात किलोमीटर्सवरून पाणी आणावे लागते. हा अपवाद नाही. हिमालयातील अनेक गावामध्ये पिण्याच्या पाण्याचे कमालीचे दुर्भिक्ष आहे. सरकारने अनेक ठिकाणी जल-योजना आखल्या आहेत, पण ज्या पाण्याच्या प्रवाहावर या योजना अवलबून आहेत, ते प्रवाहच दिवसेदिवस आटत आहेत. उदाहरणार्थ, चंबानगरसाठी १९७० साली पेय-जल योजना तयार करण्यात आली तेव्हा त्या जल-स्रोतातून प्रतिमिनिट तीनशे साठ लिटर पाणी मिळत होते, आता ते दीडशे

लिटरपर्यंत घटले आहे! पौडी शहराला पाणीपुरवठा करण्याच्या योजनेची हालत अशीच आहे. हिमालयात प्यायच्या पाण्याची हालत ही कल्पनाच आम्हाला अशक्य वाटत होती; पण आज ती वस्तुस्थिती आहे. त्याबाबत एक घटना समजली.

जगलकटाईने पाण्याचे दुर्भिक्ष होते, म्हणून जगलकटाई थावत्रा अशी विनंती करण्यासाठी एकदा महिला, वनअधिकाऱ्यांकडे मोर्चा घेऊन गेल्या. वन-अधिकारी बिचारा त्याना आपल्या वन-कटाईच्या 'कार्य-योजना' किती शास्त्रीय असतात वगैरे तपशीलवार सांगू लागला. मध्येच एक महिला कडाडली, 'चुलीत घाला तुमच्या शास्त्रीय योजना! साहेब, एकदा आमच्याबरोबर राहून पाहा म्हणजे कळेल! तुम्ही तुमच्या पोराना जेवढे दूध पाजता तेवढे आम्ही आमच्या पोराना पाणी पण पाजू शकत नाही!'

बाई रागाच्या भरात एक फार मोठं सत्य सागून गेली. ज्याच पोळत त्यालाच दुःख कळत. खूप वेळा वाटत, या बड्या सरकारी अंमलदारांना त्याच्या बायका-पोरासकट किमान सहा महिने खेड्यामध्ये ठेवाव. विहिरीच पाणी शेंदायला लावाव वा दोन-चार फर्लांगावरून घागर-घागर पाणी आणायला लावावं, ओल्या लाकडाची चूल पेटवायला लावावी, दिवस-दिवस एस.टी.साठी नाही तर सातबाराच्या उताऱ्यासाठी रखडायला लावाव. मग कुठे याच्या विचार, योजनाचे पाय जरा जमिनीला टेकतील!

पाण्याच्या दुर्भिक्षतेमुळे किती वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या निर्माण होतात! गगी नावाच्या खेड्यात आपली मुलगी द्यायला कोणी तयार होत नाही. कारण पाणी शेंदून-शेंदून पोरीचा जीव जाईल म्हणून! आज तिथे पन्नास-पचावन्न वर्षांचे ब्रह्मचारी असल्याचे समजते! काहींनी नाइलाजाने नात्यागोत्यात वा सगोत्र विवाह जुळवले आहेत!

खुरेत गावची कहाणी आणखीनच न्यारी! गावच्या तोंडचा घास नाही तर घोट वळवून दुसऱ्याच शहरी नेण्यात येत होता आणि गावकऱ्यांना मात्र दीड किलोमीटर उचीच्या पहाडावरून पाणी आणावे लागत होते. शेवटी स्त्रियांनी पुढाकार घेऊन पप-हाऊसवर मोर्चा नेला आणि कुदळी-फावड्यानी पाण्याचा प्रवाह सरळ करून गावाकडे वळवला! 'Direct action' घेतल्यावर मग मात्र सरकारी यत्रणेच्या तोंडचे पाणी पळाले!

रैणिया काय किंवा उत्तराखड काय स्थलातरिताचा प्रश्न फारच विकट

आहे. अगोदरच स्थानिक रोजगार कमी, त्यातून जंगलाचा आधार गेल्याने शेतीवर व वन-आधारित उपजीविकेवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. गावातले धडधाकट लोक दूर शहरातून चाकरमाने झाले वा पहाडातील आपली शेती-भाती विकून खाली मैदानाकडे आले. शहरातले चाकरमाने पहारेकरी–वेटर–कुली वगैरेसारखी मिळतील ती काम करतात. नशीबवान असतील ते फौजेत भरती होतात आणि गावाकडे मनीऑर्डरी पाठवीत राहतात! वळ्यारगडसारखी केवळ मनीऑर्डर्सवरती जगणारी किती तरी गाव आहेत! पूर्वी मनीऑर्डर्स बाहेरून यायच्या, विकत घेतलेले धान्य मात्र स्थानिकच असायचे. आता दोन्हीही बाहेरून येतात! नवरा वर्षा-दोन वर्षाकाठी कधी तरी दोन-चार दिवसासाठी घराकडे परततो व आपली निशाणी मागे ठेवून जातो. नवरा–बायकोच्या अशा बिदाईचे प्रसग पाहिले की अक्षरशः पोटात कालवते! एखाद्या आडवळणावर बस थांबते. तो–ती व एक-दोन पोर. हातातले सामान-सुमान घेऊन जेमतेम तो बसमध्ये चढतो, निरोपाचे काही तरी पुटपुटतो आणि पदरा-आड दडलेल्या हुदक्यामध्ये बस सुसाट निघते! डबडबल्या डोळ्यांनी तो मागे वळून-वळून पाहत असतो आणि ती थिजल्यासारखी जागच्या जागी उभी असते. हात उचलून निरोप देण्याचे त्राणही तिच्यात उरलेले नसते. त्याच्या कपाळी कुंकवाचा मळवट भरलेला असतो आणि तिच्या कपाळी पुढील वर्षा-दोन वर्षा-साठी तो नावापुरताच उरलेला असतो. कसलं हे जिणं!

'पहाड कू बामू, कूल कू नासू' अशी एक म्हण गढवालींमध्ये आहे. पहाडातल्या खडतर जिण्यापेक्षा हल्ली काहीजण खाली मैदानामध्ये वा पहाड व मैदान यामधील तराई भागात राहणे पसत करतात. यासाठी अनेकदा आपले पहाडातील घरदार सर्व विकून टाकतात. तराईची हवा रोगट असली तरी जमीन तशी सुपीक आहे, मात्र हल्ली 'तराई' प्रदेशात विशेषतः नैनिताल–तराई प्रदेशात कब्जा केलेल्या बेकायदा जमिनीची खरेदी-विक्री करणारे एक मोठे रॅकेट निर्माण झाले आहे आणि त्याला मोठमोठ्या राजकीय पक्षाचे आशीर्वाद आहेत. आपले घरदार विकून आलेला पहाडी माणूस अनेकदा अशा या लांडग्यांच्या तावडीत सापडतो आणि सर्वार्थाने नंगा होतो!

'चिपको' आंदोलनामुळे वन-आधारित कामे थांबल्याने (मुख्यतः कटाई, वाहतूक वगैरे) जो काही स्थानिक रोजगार उपलब्ध होत होता, तोही खतम झाला असा एक जोरदार आक्षेप घेण्यात येतो. डेहराडूनच्या अरण्यपालांच्या

मते तर यामुळे चाळीस हजार वन-मजुरावर बेकारीची कुऱ्हाड ओढवली आहे! भोलासिंग नावाच्या एका स्थानिक मजुराला याबाबत छेडले असता ताडकन् उसळून तो म्हणाला, 'बता तो कहाँ है यहाँ के वन-श्रमिक? सब के सब नेपाली–तिबती तो रहते हैं!'

आज उत्तराखंडात वन-मजुरात स्थानिक गढवाली-कुमाऊँ मजुराचे प्रमाण अतिशय कमी आहे ही वस्तुस्थिती आहे. एक तर तुटपुंज्या वन मजुरीवर राबण्यापेक्षा लोक खाली मैदानात जाणे पसंत करतात. (सक्त मेहनत करून तयार केलेल्या बारा फूट लांब, दहा इंच रुंद आणि पाच इंच जाडीच्या चौंडच्या स्लीपरचे फक्त अडीच रुपये मिळतात!) शिवाय ठेकेदारानाही स्थानिक मजूर नको असतात. एक तर त्यांची ओढ घरादाराकडे असते व ते संघटित होऊन आपल्या मागण्या रेटण्याचा संभव जास्त असतो. याउलट अगावर थोडे पैसे देऊन, दलालामार्फत नेपाळी–तिबेटी मजूर एकदा जंगलात आणून फसवले की मग काही फिकीर नसते. कारण अतोनात दारिद्र्यामुळे ते कमी मजुरीत काम करतात आणि काही मजुरी अडकवून ठेवली की पळूनही जाता येत नाही! मध्यप्रदेश–बिहारच्या आदिवासी भागातूनही अशा वेठ-बिगार मजुराचा सर्रास व्यापार चालतो!

रौणियाहून कूच केले पोखरीला. ही दुसरी पोखरी. पहिली उत्तरकाशी जिल्ह्यातील, तर ही टेहरी जिल्ह्यामधील. पोखरीच्या सभोवार चागल्यापैकी जगल आहे. बाँझ बुराँशबरोबरच बबूल, ढाक, झाऊ, अर्जुन, मौलसरी, उतीस, किडमोडा, घिघारु, भीमल आदि सरपण, चारा, फळ, फूल देणारे वृक्ष जगलात–दरीत हारीने मौजूद आहेत. भीमल तर येथील कल्पवृक्ष आहे! भीमलचा पाला जनावराना खूप आवडतो. दूध आणि मास वाढविण्यासाठीही तो उपयुक्त आहे. पशूंची गर्भधारणक्षमताही या प्रथिनयुक्त पाल्याने सुधारते. शिवाय पाना-पासून धागा बनतो व बारीक फांद्यापासून छोट्या-मोठ्या टोपल्या विणता येतात. फळ औषधी आहे. शॅम्पूसारखा केस धुवायलाही त्याचा उपयोग होतो. साहजिकच शेता-भाताच्या आसपास, बांधावर भीमलची आवर्जून लागवड केली जाते.

पोखरीच्या गावकऱ्यानी जंगलाचे चार भाग केले आहेत. लोकांची गरज व

झाडांची वाढ लक्षात घेऊन क्रमवार तोड होते. लम्बगावप्रमाणे इथेही वन-पचायत आहे वन-पचायतीकडून वन-उत्पादनाचे वाटप होते काही गावकऱ्या-कडून एक निराशाजनक गोष्ट समजली. काही लोक गावचे जगल शाबूत राखतात. मात्र आजूबाजूच्या सरकारी जगलातून तोड करतात, त्यामुळे बाजूचे सरकारी जगल बोडके होत आहे. कारण काही असोत वा छोट्या प्रमाणावर ही तोड होत असो, गोष्ट नक्कीच निषेधार्ह आहे. हे खरेखुरे वन-सवर्धन नव्हे! पण यासाठी गावकऱ्याच्या गरजा व उपलब्ध वनउपज यांचा वस्तुनिष्ठ विचार व्हायला पाहिजे. सरकारने मजूर केलेले 'हक-हकूक' वा 'निस्तार-अधिकार' इतके जुने-पुराणे आहेत की, त्याचा उपयोग नाही, पण या भागातील आंदो-लकानीही या प्रश्नाचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला आहे असे जाणवल नाही अमुक एका लोकवस्तीच्या गावाला किती आणि कोणत्या प्रकारचे जगल लागेल, ते कसे वाढवता येईल अशासारख्या प्रश्नाना ते समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. अर्थात दोष त्याचा नाही. आपल्या सर्वांचाच आहे. आपण आजवर जगल 'गृहीत'च ( taken for granted ) धरत गेलो. निसर्गाने निर्माण करत जायचे आणि आपण फक्त तोडत राहायचे! वन-खात्याने रोपवनं उभारली, पण ती सागाची आणि बहुताश सागाचीच. खरी समस्या आहे सर-पणाच्या लाकडाची, पण त्याला ते कधी सामोरे गेलेच नाहीत. परिणामी आज साग चुलीत घालायची वेळ आली आहे. अर्थात चोरी-मारीचाच. ठाणे जिल्ह्यात वन-खाते व वन-विकास महामडळानी सागाची रोपवने लावली आहेत, लावत आहेत. अनेक जागी ही रोपवने लावताना लोकाना चारा-सरपण पुरविणारी जगल साफ केली जात आहेत. एकदा याबाबत एका वरिष्ठ वन अधिकाऱ्यांना विचारले की,

'सरपण नाही मिळाले तर लोक काय करतील?'

'आमची सागाची झाडे जाळतील! त्यांच्यापुढे दुसरा पर्यायच नाही.'

'मग सागाची रोपवनं लावण्याचा नस्ता उद्योग तुम्ही का करता?'

'असं आहे, बजेट असत, ते खर्च व्हाव लागत. आम्हाला पगार मिळतो, त्यामुळे काही तरी काम करीत राहाव लागत. वेळ-श्रम-पैसा वाया गेला तरी बोलायच नसत; कारण ऐकणार कोण?'

आता काय बोलायच आणि ऐकायच?

पोखराच्या महिला मडळाने मात्र कमाल केली आहे! त्यानी महिलाना घर-

कामातून आठवड्यातून चक्क एक हक्काची सुट्टी पदरात पाडून घेतली आहे. सुट्टीचा वापर आपल्या मर्जीनुसार करायचा! घरकाम करणाऱ्या महिलांना हक्काची साप्ताहिक रजा ही कल्पनाच इतकी क्रांतिकारी होती की आमच्यातील क्रांतिकारी महिलाही ह्यापुढे चाट पडल्या! क्रांतिकारी पुरुष–साथीदारांनाही त्याचे खूप अप्रूप वाटले. मात्र त्यांनी–विशेषतः लग्न झालेल्यांनी संगनमताने एक ठरवलं– ही गोष्ट गुप्त ठेवायची. उद्या उगाच आफत यायची! म्हणजे, आपली नाही पण एकूण समाजाची धारणा उचावेपर्यंत. अशा क्रांतिकारी कल्पना समाजाला पचनी पडणे कठीण वगैरे वगैरे!

आता गाठायचे सिल्यारा! सुंदरलाल– विमलाजींचे आणि आमच्या इतर साथीदारांचे! कारण, वादा होता सिल्याराच्या मुलाकतीचा!

५ मार्च डेहराडूनला निघालो. वाटेत हृषिकेषला उरलीसुरली खरेदी केली आणि उत्तरकाशीला जाणारी बस पकडली. उत्तरकाशी विभागात जाणारा दुसरा गट आम्हाला वाटेत खाडीत सोडून (म्हणजे, खाडी नावाच्या गावात सोडून) पुढे जाणार होता. दुपारी बाराच्या सुमारास खाडीला पोचलो. खाडी गाव, गाव असे नव्हतेच. अधूनमधून जाग येणारा रस्ता आणि त्याबरोबर जागी होणारी एक-दोन हॉटेल, दुकान, सभोवार उंच उंच डोंगर, भुरभुरणारा पाऊस आणि भरदुपारीही जाणवणारा थंडीचा कडाका! सुरुवातीला खूप उदासी आली. आमच्यातील जिजा तर घर सोडून पहिल्यांदाच इतक्या दूर आली होती. आठवणींची रिमझिम सुरू होती. बाकीच्यांची हालतही वेगळी नव्हती; पण उदासी, बेचैनी फार वेळ टिकली नाही. आमचा साथीदार प्रताप शिखर आणि त्याचे 'युवक संघा'चे इतर कार्यकर्ते मित्र समाचाराला आले. त्यांच्याशी गप्पागोष्टी करण्यात सर्व उदासी-मळाठा पळून गेला!


प्रताप शिखर खाडीलाच राहतो. त्याची पत्नी शिक्षिका आहे. स्वतः शिखर एम. ए. आहे. हुशार आहे. चांगले व्यक्तिमत्त्व आहे. मनात आणलं तर उत्तम नोकरी मिळवू शकेल; पण प्रताप, विजय जडधारी, कुँवर प्रसून, कुँवर सजवाण असे एकाहून एक उत्तम कार्यकर्ते लष्करच्या भाकऱ्या भाजण्यात मग्न आहेत! अपनी मर्जीसे– कुठे कसला बडेजाव नाही, उसना आवेश नाही. संपूर्ण क्रांती–सर्वोदयी विचाराची निश्चित दिशा आहे; पण कसलीही झापड वा बाह्य अवडंबर

नाही. आमचा मुक्काम प्रतापच्याच घर–कम्– ' युवक सघा 'च्या कार्यालयात होता. हे मुख्य ठाणे ठेवून आम्ही हेवलघाटीत– हेवलीकानदीच्या खोऱ्यात भटकणार होतो प्रताप, दयालसिंग, कुँवरने आम्हाला परिसराची भौगोलिक– सामाजिक– आर्थिक परिस्थिती, लोकाचे व्यवसाय- अडीअडचणी वगैरेची माहिती दिली. मोहिमेचा मार्ग– गाव ठरवून दिली. यामधली काही गाव– जाजलबेमुडा, टेहरी, ग्वाडी खोऱ्यात तर रामपूर, पाली, अदवानी, शैंड, ल्हासी दूर डोंगरात सहा–सात हजार फूट उंचीवर होती. आम्ही बाहेर पडण्यास उत्सुक होतो, पण ते पावसाचा उत्साह कमी होण्यावर अवलबून होत.

सहा मार्चची सकाळ उजाडली. पावसाचा उत्साह कमी होण्याची चिन्ह नव्हती. उलट असा धुँवाधार बरसत होता की वाटल जगाच्या अतापर्यंत हा असा पडतच राहणार ! आता काय करणार ? ब्लँकेट गुरफटून घेतली आणि गरमागरम चहा ढोसत, गप्पा हाणत खोलीत बसून राहिलो. एवढ्यात बाहेर मुलांचा आरडाओरडा ऐकू आला–' बरफ गिरने लगी, बरफ गिरने लगी– ! ' आमच्यातील बहुतेकजणानी ' बरफ ' बैलगाडीवर लादलेल्या लाद्यांच्या रूपातच पाहिला होता. त्यामुळे दचकून की कुतूहलाने सर्वजण बाहेर धावलो. बाहेरचा देखावा केवळ अफलातून होता ! आभाळावर पिंजारलेली पाढरी फुल खाली पडत होती– रस्त्यावर, घरावर, झाडावर, झाडाच्या शेंड्यावर, डोंगरावर, डोंगराच्या माथ्यावर, वाऱ्याच्या झोताबरोबर आणि जोराबरोबर पखरण कमी–जास्त, इर्थ–तिथ व्हायची, पण मग फुलांचा सडा बरसत राहायचा. बघता बघता सर्व काही शुभ्र–धवल झाल ! मोटारींचे टपही ! मग जागेपणीच स्वप्न पाहता–पाहता वितळूनही गेल ! डोंगरमाथ्यावरच्या बर्फाच्या टोप्या सोडून आम्ही बाहेर सटकलो. नदीकडे येणारे खळाळते ओहळ ओलाडत पाणचक्क्या बघायला.

पवनचक्क्या आणि पाणचक्क्यांबद्दल मनात एक कायम कुतूहल असायच. पवनचक्की आणि त्यावर तुटून पडणारा डॉन क्विझोट् निदान पुस्तकातून पाहिला वाचला होता, पण ही पाणचक्कीची भानगड डोळ्यांसमोर येत नव्हती. ही भानगड अगदी साधी–सोपी होती. आपण वाळूमध्ये चिमणीचे घर बाधतो त्या आकाराचे दगडाचे खोपे नदीकाठी केले होते आणि नदीचे पाणी अडवून पाटाने बाजूला आणून उचावरून खोप्यातील लाकडी चाकावर सोडले होते. फिरणाऱ्या चाकाच्या शक्तीचा वापर करून पिठाची गिरणी वा तेलाचा घाणा चालवायचा. चक्की नेहमी उघडीच असते. कुणीही यावे, पाट खोदायचा आणि

आपले धान्य दळून घ्यायचे. कोणा मालकाची जागा असली तर थोडे पीठ त्याच्यासाठी बाजूला काढून ठेवायचे. अनेक वर्षांची परपरा आहे ही! या एवढ्या जागेत दोन-चार पाणचक्क्या होत्या, पण आपल्या सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्यात इतके नदीनाले असून एकही पाणचक्की कधी दिसली नाही! खर तर खेड्यापाड्यातील लोकांची किती गरज भागेल-- पण करणार कोण ? तोंडच्या वाफेच्या जोरावर जर काही करायच ठरवलं तर चक्कया काय गिरण्या चालतील. असो!



पाणचक्की

पाणशक्तीचा पुरेपूर वापर करण्यासाठी सरकारनेही काही ठिकाणी 'हायड्रम' योजना सुरू केली आहे. या योजनेत एका मोठ्या पाइपने पाणी उंचावरून खाली एका टाकीत आणतात आणि सायफनच्या तत्त्वाचा वापर करून छोट्या-छोट्या पाइपने जागोजाग पोचवतात. सध्या या योजनेनुसार खाडीगावच्या हरिजन कुटुंबाना शेतीसाठी पाणी पुरविले जाते; पण एवढे पाणी हाताशी असून लोक त्याचा हुशारीने वापर करताना आढळले नाहीत. इतर साधन-सामुग्रीची, भांडवलाची अडचण अशी कारणे अनेक असतील; पण परिस्थिती मात्र ही होती. एक गोष्ट मात्र जाणवली. इथल्या स्पृश्य-अस्पृश्यात भेदभाव आढळला नाही. दोन्हीकडे सारखीच आर्थिक सुबत्ता. किंबहुना आर्थिक

सुबत्तेचा सारखाच अभाव हे कदाचित त्याचे कारण असावे, पण हे या गावा-पुरतेच. एरवी कुठेही आणि कशीही आपली 'जात' जात नाही! आणखी एक गोष्ट आढळली. अगदी एखाद-दुसरा अपवाद सोडता, फारच थोड्या लोकांना ( अगदी दलितांतीलही ) आंबेडकरांचे नाव माहीत होते. खरं म्हणजे बाबासाहेब म्हणजे संपूर्ण भारताच्या दबलेल्या अस्मितेचा मूर्तिमंत हुंकार, पण आपला देशच असा अाडमाप आणि अफाट आहे की, एखादा गांधीबाबा ( आणि अमिताभ बच्चन !! ) सोडला तर देशभर ज्याचे नाव माहीत असेल असा माणूस विरळा !

दुपारी जेवण आटपून जवळच्या जाजल गावी जाण्याच्या तयारीत होतो, इतक्यात प्रताप आला आणि त्यानं सांगितलं, कोणाकडे तरी चोरटी दारू पकडली आहे. बाहेर बैठक होत आहे. चला ! बाहेर सडकेशेजारी दगड रचून एक ओटा बनवला होता. कुँवर प्रसून त्यावर उभा राहून जोरजोरात भाषण करीत होता. घरा-दारात अंगणात-छपरावर उभे राहून शंभरएक माणसं भाषण ऐकत होती. कडवाल नावाच्या बडतर्फ चौकीदाराने काही वैद्यकीय माहिती नसताना एक दवाखाना उघडला होता. स्त्रीरोग-तज्ज्ञ म्हणून तो मिरवत होता. शिवाय स्वतःला कॉंग्रेसआयचा प्रदेशाध्यक्षही म्हणवत होता. 'लाख दुखोंकी एक दवा' चोरून-चोरून विकत होता. कुँवरने त्याच्या पापाचा पाढा वाचला. दारूमुळे गावावर होणाऱ्या घातक परिणामाची माहिती सांगितली आणि सभेचा कौल मागितला.

मला आमच्या नागेपल्लीच्या 'दारुबंदी'ची आठवण आली. चंद्रपूर जिल्ह्यातील या छोट्या गावी मी आणि माझी पत्नी-गीता अनौपचारिक शिक्षणाचे काम करत होतो. गाव, इतर ग्रामीण भाग आणि आदिवासी जग यांच्या उंबर-ठ्यावरचे. जुनी घडी विस्कटलेले, नवी न बसलेले. कारण गावोगावचे लोक इथे हंगामात मजुरीला येत. घरगुती 'महुवा'चा जमाना संपला होता, 'तुफान', 'रॉकेट'ची चलती होती. रविवारी बाजाराचा दिवस आणि पगाराचाही. त्यामुळे रविवारची रात्र म्हणजे धमाल हंगामा असायचा. सगळे अमर आत्मे नश्वर देहाच्या आपल्या बायका-पोरांना झोडायचे. आमचा आठवड्यातून एखादा दिवस दारू पिण्याला विरोध नव्हता. क्वचित् 'टाइट्' झाला तरी समजू शकत होतो; पण दुनियेभरची नाटकं आणि मारझोड आम्हाला साफ नामंजूर होती. मग आम्ही जवान साथीदारांना घेऊन एक नशाबंदी मंडळ

काढल. गावातले मुख्य तळीराम गाठले. पिऊन त्यांनी धादल सुरू केली की, पहिले दोन रविवार त्याच्या घरासमोर घोषणा द्यायच्या, धरण धरायच आणि इशारा ओळखला नाही तर तिसऱ्या रविवारी सरळ उचलबांगडी करून ग्राम-पचायतीसमोर आणायचा. दोघा-चौघांनी धरून ठेवायच आणि विहिरीच्या थड पाण्याची बादली बोडक्यावर ओतायची! पहिल्यादा त्या तळीरामाला त्यातही मजा वाटायची. आपण सर्वांना कसं आपल्याभोवती नाचवतो म्हणून; पण मग तिसरी-चौथी बादली पधरा-पंधरा मिनिटाच्या अतराने त्याला स्वत'लाच



गावकरी आणि प्रताप शिखर ह्याच्याशी बातचीत करताना जगदीश गोडबोले

काढायला लावायची. हे 'मध्यतर' फारच झोंबायचे. हळूहळू उतरायची. पहिल्या वेळी नाही तर दुसऱ्या-तिसऱ्या वेळी नक्कीच. मग आमच्या चर्चा रगायच्या. काही कार्यकर्ते म्हणायचे, बायकोला मारण ठीक आहे; पण दारू पिऊन बायकोला मारण वाईट. मग गीता चिडून म्हणायची, बायका दारू पिऊन नवऱ्याला मारतील तेव्हा समजेल! तेव्हा स्त्री-मुक्ती होईल. एकेकाची एकेक तऱ्हा! एकदा आदल्या रात्री शिक्षा झालेल्या 'तळीरामा'ची बायको

आली आणि अगदी मनापासून म्हणाली, ' जगदीशभाऊ, नवरा दारू पिऊन आपल्याच बायकोला मारणार नाही तर कोणाच्या बायकोला? ' आम्ही अवाक् झालो. भारतीय स्त्रीचा सारा भाबडेपणा–अडाणीपणा असहायता तिच्या तोंडातून बोलत होती. *तळीरामापेक्षा ही आव्हानं मोठी असायची!*

खाडीच्या सभेनेही कौल दिला– दारूच्या बाटल्या जागच्या जागी फोडून *टाकण्याचा! कडवाल्याला गावातून हुसकून लावण्याचा.* लोकानी भराभर लपवलेल्या दारूच्या बाटल्या हुडकून काढल्या आणि दणादण फोडून टाकल्या. लोकाची जागृत मनं, एकी, निर्धार आम्हाला खूप काही शिकवून गेला. एक मात्र खरं. वाया गेलेल्या दारूबद्दल वाईटही वाटल कारण कोणतीही गोष्ट अशी वाया जाणं वाईटच! असो.

सात मार्चची सकाळ सोन्याच्या पावलांनी उगवली. आकाश साफ निवळलं होत आणि सोनेरी सूर्यकिरण दबकत-दबकत हेवल घाटीत शिरत होती, वर्गात उशिरा येणाऱ्या मुलासारखे अपराधी आणि खोडकर दोन्ही भाव मनात घेऊन!

आम्हाला जाजलजवळच्या बेमुंडाला जायच होत. वाटेत नदीकाठी एक शिवमंदिर लागल. स्वच्छ–सुंदर आवार, नेटकी बाग, नेटके मंदिर आणि आत मृगाजिनावर बसलेले प्रसन्न–तेजस्वी स्वामी मंगलानंद! माझी मंदिर म्हणून एक कल्पना असते. चित्र असते. हे मंदिर त्यातले होते. तशी मंदिरे कित्येक असतात. स्वच्छ–सुंदर भव्य–दिव्य असतात. आत देवही असतात; पण असा प्रसन्न साधक भेटत नाही. एरवीचे साधु-साधक खूप राख–बिख फासतात. कफन्या-बिफन्या चढवतात. दंड कमंडलु मिरवतात. स्वानंद-परमानंद बोलतात. पण स्वामी मंगलानंदासारख्या एखाद्यालाच तो गवसलेला असतो. प्रसन्न–निरामय चेहऱ्यावर तो विलसत असतो. आपला दाह शमवत असतो आणि असले साधक केवळ मंदिरातच नसतात. जीवनातल्या कुठल्याही क्षेत्रात भेटतात. अगदी अवचित. बांगलादेशाच्या युद्धानंतरची गोष्ट. खुलन्याजवळच्या एका तळ्याकाठी अनेक बायकांना बलात्कार करून मारून फेकून दिले होते. त्याचे कपडे, केस, पाण्यात अर्धवट फुगलेली प्रेत अस्ताव्यस्त पसरली होती. कुत्री ओरबाडून खात होती, मी माहिती घेत, फोटो काढत फिरत होतो. वरवर सफाईने काम निपटत होतो, पण आत खोलवर पार उद्ध्वस्त होत होतो. इतक्यात लष्कराचा एक काफिला आला. एक जवान कॅप्टन खाली उतरला.

शांतपणे सिगरेट ओढत समोरचं दृश्य बघत राहिला. माझी अस्वस्थता त्याला जाणवली असावी. मला सिगरेट दिली. खांद्यावर हात ठेवला आणि म्हणाला, 'आम्ही माणसं मारली. त्यांनी मारली. पूर्वी घडलं आणि हे असंच घडत राहणार ! कुठवर ? तू अन् मी विचार केला पाहिजे – एक माणूस म्हणून ! '

आम्ही नुसते मेलेले मुडदेच बघितले होते, पण याने जित्या–जागत्या माणसांना मुडदे होताना पाहिलं होतं. अगदी जुळून पाहिलं होतं. जित्या–जागत्या माणसांचे मुडदे केलेही होते; पण वियोगाचे वैफल्य वा वीरश्रीचा कैफ आवाजात–बोलण्यात–नजरेत नव्हता, तर अपूर्ण मानवाचं अपूर्णत्व ओळखण्याची आणि पूर्णत्वाकडे वाटचाल करणारी साधकाची स्थिरचित्तता त्याच्याकडे होती, थोडा वेळच त्याच्याशी बोललो असेन. नजरेला नजर मिळवली असेल; पण सारी वादळ, झंझावात शमवून गेला तो !

वेमुडाच्या वाटेवर पिपळोद गाव लागतं. तेथील हरिजनाचा लाकडाची कोरीव भांडी बनविण्याचा उद्योग आहे. पाणशक्तीचा उपयोग करून ते ही दही–दूध–ताकासाठी भांडी बनवतात. परेडी, परोडी, पुरा, पसरा अशी सुबक भांड्यांची सुबक नावं. पूर्वी त्यासाठी लागणारे लाकूड जवळच्या जंगलात मिळायचे. आता उलटे हृषिकेशहून आणावे लागते ! कोकणात नारळ न्हाया मुंबई जातो तसा ! वनखाते आत्तापर्यंत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करत होते. पण लोकांच्या गरजेची झाडं लावेल तर शपथ ! 'चिपको' आंदोलनानंतर जरा जाग आली आहे. हेही नसे थोडके ! रुडकी विश्वविद्यालयाने तेथील पाणचक्क्यांच्या आराखड्यात संशोधनपूर्ण बदल केले आहेत. त्यामुळे त्याचा वेग वाढला आहे. या पाण्यावर घरगुती वापरासाठी वीज बनविण्याचे प्रयोगही चालू आहेत.

दुपारनंतर सारे सामान पाठीवर बांधले आणि आम्ही पहाडावरील रामपूरला निघालो. पहाडावरील पदयात्रेचा पहिलाच दिवस. पाठीशी गठुडे, पावसामुळे निसरड्या झालेल्या पायवाटा आणि बेभरवशाचा डोंगर. त्यामुळे सुरुवातीला मनात सारखं धाकधूक होई. त्यातून एका दिशेला जायचं अन् पुन्हा उलट्या दिशेने थोडी उंची गाठून मागे यायचे. पण नितांत–सुंदर मोसम, खळाळणारे निर्झर, गाणारे पक्षी यांच्या सहवासात वाट कधी संपली, समजलंच नाही. एका विशाल पिंपळाच्या झाडाच्या आसपास दहापंधरा घरांचे रामपूर विसावले होते.

गावात पोचल्यावर ढोलक-नगारा व इतर साथीदारांनी गाणी म्हणत आमच्या आगमनाची नांदी दिली. गावातील महिला-मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती ज्ञानदेवीच्या घरी आम्हाला मानाचा पाहुणचार झाला. घरच्यासारखे अगदी खूप आग्रहाने-प्रेमाने त्यांनी आम्हाला जेवायला घातल. ओसरीतच बैठक झाली. बैठकीला जोरदार प्रतिसाद मिळाला. गावातील बहुतेक बायका हजर होत्या. निर्भीडपणे बोलत होत्या. ' चिपको ' आंदोलनाचे किस्से सांगत होत्या.

१९७७ मध्ये नरेंद्रनगर येथे होणाऱ्या लाकडाच्या लिलावावर कार्यकर्त्यांनी बहिष्कार टाकायचे ठरवले होते. पोलिसांनी सर्व कार्यकर्त्यांना अटक केली. ही बातमी समजताच रामपुरातील ज्ञानदेवी, सुदेशादेवी, शांतीदेवी व इतर महिला तातडीने नरेंद्रनगरला गेल्या व पोलिसांचे कडे तोडून त्यांनी सत्याग्रह केला. सर्व जणींना १५ दिवसांचा तुरुंगवास घडला. सुदेशादेवी सांगत होत्या, 'माझ्या नवऱ्याने धमकावले होते या आंदोलनाच्या भानगडीत पडशील तर परत आल्यावर घरात घेणार नाही; पण आम्ही पोलिसांना डरलो नाही तर असल्या धमक्यांना भीक घालतो होय ! '

रामपूरच्या महिलांनी अदवानी गावचे जंगल वाचविण्यात खूप पुढाकार घेतला होता कारण त्यांना स्वतःला जाग येईपर्यंत त्यांच्या गावचे जंगल साफ झाले होते. त्यामुळे त्यांना सरपण-चारा चार-पाच मैलांवरून आणावा लागतो. खूप हाल होतात. पूर्वी गाई, म्हशी-बकऱ्या असा खूप पसारा असायचा. जंगल कमी होऊ लागले तसे गाय-म्हशी जाऊन बकऱ्या उरल्यात. या उरलेल्या बकऱ्यांनी आणखी जंगल फस्त करायला सुरुवात केली. चारा-टंचाईच्या हालतमध्ये आणखी एक संकट लोकांपुढे उभे राहिले आहे. पावसाळा संपला की मैदानावरचे फिरस्ते गुजर आपल्या जनावरांचे कळप घेऊन वर पहाडाकडे येतात. हे कळप उरला-सुरला चारा फस्त करून टाकतात, हे गुजर संघटित असतात, आक्रमक असतात. वरपर्यंत त्यांचे हात पोचलेले असतात ( स्थानिक *लोकांच्या शब्दात 'बड़े-बड़े लोगोंतक उनकी 'घी-लाइन' चलती है।' म्हणजे मोठमोठ्या पुढाऱ्या-अमलदारांकडे ते शुद्ध तुपाचे डबे पोचते करतात* ) आपल्याकडे अमरावतीच्या मेळघाटमध्ये काठेवाडी गवळ्यांनी हीच समस्या निर्माण केली आहे, परिस्थितीचा गुंता वाढतो आहे. तेढ वाढते आहे. देश सर्वांचाच आहे, पण स्थानिक माणसाच्या तोंडचा घास काढून देशाच्या एकात्मतेच्या गप्पा करता येणार नाहीत. धोका वेळीच ओळखला नाही तर

परिस्थिती स्फोटक बनेल अशी भीती वाटते !

रामपूरहून खाडीला परत येऊन अदवानी गावाकडे निघालो. अदवानी दूर डोंगरात सुमारे पाच हजार फुटावर. रस्ता अतिशय कच्चा आणि अरुंद. एका वेळी जेमतेम एक गाडी जाऊ शकेल एवढा; पण ड्रायव्हर बिनधास्त गाडी हाकत होता. समोरून गाडी आली की, खर्रकन ब्रेक मारायचा. मग जागा-वळण जसं असेल तसं हा किंवा तो ड्रायव्हर गाडी मागे-पुढे काढायचे, पासिंगच्या तेवढ्या घालमेलीतही एकमेकाना रामराम, सुख-दु:खाचा एखाद-दुसरा शब्द झडायचा की रस्ता धरायचा ! ड्रायव्हर, तसे आतले पब्लिक आणि कंडक्टरही बिनधास्त ! मुंबईचं पब्लिक जसं 'आदतसे मजबूर' म्हणून डब्यात भरपूर जागा असतानाही लोंबकळत, तसं इथले पब्लिक आत जागा असली तरीही वर टपावर जाऊन बसतं ! बस जीवनमरणाच्या सीमेवर वळण घेत असते, रस्ता खराब असेल तर यथेच्छ डोलत असते; पण कंडक्टर पठ्ठ्या मात्र चालत्या गाडीमध्ये खालून वर आणि वरून खाली लीलया फिरून पॅसें-जर्सकडून तिकिटाचे पैसे वसूल करत असतो. सुरुवाती सुरुवातीला आपल्या जिवाची प्रचंड घालमेल होते, खाली आ वासलेली दरी आणि बाजूला 'आत्ता पडतो' म्हणणारा डोंगर ! त्यातून एकदा मी आणि पापा टपावरून प्रवास करताना बाजूचा पॅसेंजर ब्रेक्स् फेल झाल्याच्या दर्दभऱ्या कहाण्या सांगू लागला. आमची पळता भुई थोडी ! बाकी हे टपावर बसून, विशेषत: लोक-लच्या टपावर वा खिडकीवर उभे राहून प्रवास करण्याचा 'शोध' ज्याने लावला त्याला आपण कोलंबस वा वास्को-द-गामापेक्षा जास्त मानतो.

अदवानीला साल-भीमल-चीड आदि वृक्षांचे सुंदर जंगल आहे; पण हे जंगल असं सुखासुखी टिकलेलं नाही. इतर जंगलांप्रमाणे याचेही मुंडण होणार होते; पण अदवानी व आजूबाजूच्या गावातील लोकांनी कडवा प्रतिकार करून आपले हे जंगल वाचवले. दुपारी गावकरी आम्हाला साल-चीडच्या रानात घेऊन गेले आणि आपल्या लढ्याची कहाणी त्यांनी मोठ्या अभिमानाने सांगितली.

एका जंगल-ठेकेदाराला अदवानीच्या जंगलातील सहाशे चाळीस चीड व सालची झाडं तोडायचा परवाना मिळाला होता. त्याप्रमाणे झाडावर मार्किंग

( निशाण्या ) करायला सुरुवात झाली. गावकऱ्याना हे समजताच त्यानी विरोध दर्शविला. सुदरलालजी, प्रताप शिखर आदि कार्यकर्ते तिथे पोचले. झाड तोडल्यामुळे गावाचे काय नुकसान होईल हे त्यानी वन-अधिकारी, वन-ठेके-दाराला समजावून देण्याचा प्रयत्न केला, पण ते हट्टाला पेटले होते. झाल. सशस्त्र राखीव दलाचे शभर जवान बदुकी परजत मुख्य रस्त्यावरील जाजलला दाखल झाले. लोकाना डोस देण्यासाठी त्यानी जाजलच्या रस्त्यावरून जोरदार परेड-बिरेड केली. १ फेब्रुवारी १९७७ ला हा सगळा काफिला अदवानीच्या जगलात पोचला. आजूबाजूच्या परिसरातील हजार-बाराशे स्त्री-पुरुष, लहान पोरं आपल जगल वाचविण्यासाठी निधड्या छातीने जमा झाले होते. घोषणा गर्जत होत्या—

भले कुल्हाडी चमकेगी
हम पेडोंसे चिपकेंगे
आज हिमालय जागेगा
क्रूर कुल्हाडा भागेगा !

नुसत्या घोषणा नाहीत, तर ठेकेदाराचे मजूर झाड तोडायला गेले की, बायका-पोर झाडाला फटाफट मिठ्या मारून बसत ! तास-दोन तास ही धमाल चालली होती. पोलिसानाही काही करता येईना. कारण असल्या रानात इतक्या लोकांना- तेही बहुसख्य बायका-पोराना अटक करून घेऊन जाणं मुश्कील होते. शिवाय बळाचा वापरही मुश्कील. कारण लोक निःशस्त्र होते आणि घोषणा देत होते हमला चाहे जैसे होगा । हाथ हमारा नहीं उठेगा ।' एवढच नाही तर ' पोलिस हमारे भाई-भाई । उनसे हमारी नहीं लडाई 'चे नारेही उठत होते. नैतिक ताकद व डावपेच या दोन्ही बाबतीत सरकार कमजोर पडल होत. अखेर त्याने ' सन्माननीय माघार ' घेतली ! जाता-जाता काही भाईबद पोलीस गावकऱ्याचे अभिनदन करायला विसरले नाहीत !

' चिपको 'प्रमाणे लोक- जागृती करणाऱ्या आदोलकाच्या आयडियाही नामी आहेत. कापण्यासाठी झाडावर मार्किंग झाल्यापासून प्रत्यक्ष झाड कापे-पर्यंत पाच-सहा महिन्याचा कालावधी जातो. अगोदर लिलाव जाहीर होतात. लिलाव रोकण्यासाठी आदोलक निदर्शने करतात. मग ज्या झाडांवर ' निशाणी ' ( मार्किंग ) झाले असेल, त्या झाडाना गावोगावच्या बायका मिरवणुकीने जाऊन ' राखी ' बाधतात आपले रक्षण करणाऱ्या बंधुराजाचे रक्षण करण्याचा निर्धार

व्यक्त करण्यासाठी. गफलतीने काही झाडे तुटलीच, तर त्या झाडाना सद्गती मिळावी म्हणून 'चिपको'वाले जगलात तिथल्या तिथेच श्रीमद्भागवताच्या सप्ताहाला सुरुवात करतात. भाविक बायकांची तोबा गर्दी लोटते. मग 'दशकूप समावापि दशवापि समोह्रदः। दशह्रदः समःपुत्रो दशपुत्रो समो द्रुमः' आदि भागवत--अग्निपुराणातले दाखले देत, भागवतकार जगलाचे महत्त्व, त्याचे रक्षण करण्याचे मार्ग याचे निरूपण करतात. अदवानीचे जंगल वाचल्याबद्दल गावकऱ्यांनी भागवतसप्ताह केला होता. अक्षरशः शेकडो लोक सप्ताहाला लोटले होते. श्रीमती इंदुताई टिकेकराचा भागवत-सप्ताह फार लोकप्रिय आहे. कवी घनःश्याम रतौडी या लोकप्रिय कवीची गाणी हुडक्यावर (पहाडी वाद्य) दऱ्या-खोऱ्यात घुमतात. चीडची राळ काढण्यासाठी त्याला ठराविक लाबी-रुदी खोलीचे मोजके घाव घालायचे असतात; पण लोभी ठेकेदार झाडाच्या उरी-पोटी आणि तेही भारंभार घाव घालून झाडाचा जीवच धोक्यात आणतात. अशा झाडाचे घाव, आदोलक झाडाना चिखल पाण्याची मलम-पाणी करून पट्टी बांधून ठेवतात. शुश्रुषेचे--आपलेपणाचे प्रतीक म्हणून! अलमोरा-नैनिताळच्या साम्यवादी आदोलक--मित्राचा भागवत-राखी आदि प्रकारावर राग दिसला. झाडाला राखी बाधून क्राती होत नसते हे सत्य असले, तरी अशा कल्पकतेने बाया-माणसं वन-संरक्षणाला, पर्यायाने आंदोलनाला बांधली जातात ही गोष्ट तेही नाकारू शकत नव्हते !

उत्तराखडात चीडच्या झाडापासून 'लिसा' (राळ) जमा करण्याचा उद्योग मोठ्या प्रमाणावर चालतो. अनेकाचे अनेक प्रकारे हात त्यामध्ये गुतलेले किंवा बरबरटलेले आहेत. चीडच्या झाडाला इजा न होता सातत्याने राळ मिळत राहण्यासाठी काही ठराविक 'लाबी रुदी-खोली' चे (१०" × ४" × १") घाव घालायचे असतात. कत्राटदाराकडे हे काम सोपवले असले तरी वन-खात्याने त्याच्याकडे लक्ष ठेवायचे असते, पण वन-खाते आणि कत्राटदार सगनमताने बारेमाप घाव घालून सोन्याच अंड देणारी कोंबडीच कापून खात आहेत अशी लोकाची तक्रार होती. बारेमाप घावानी कमजोर झालेली चीडची झाडे साध्यासुध्या वाऱ्याने मोडून पडत आहेत अस लोकाच म्हणण होतं. काही ठिकाणी 'चुकून' जास्त घाव घातले गेले असं सुरुवातीला मानभावीपणे वन-खात्यानं कबूल केलं तरी आंदोलकानी सरकारला जेव्हा 'लिसा जाँच समिती' नेमायला लावली तेव्हा अनेक धक्कादायक गोष्टी बाहेर आल्या. 'राष्ट्रीय वन-

अनुसंधान ' संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णमुरारी तिवारींचीच ती एक-सदस्य समिती होती. त्यांनी आपल्या अहवालात निःसंदिग्धपणे लिहिले आहे,

' चक्राता, यमुना व टॉनस् वन-विभागातील झाडांची पाहणी केल्यानंतर असं आढळून आलं की, घावाची संख्या आणि आकार या सर्वच बाबतीत शंभर टक्के गैर-प्रकार घडले आहेत आम्ही कुठेही गेलो तरी संबंधित वन-अधिकारी असे एकही झाड-एकही घाव दाखवू शकला नाही की, जो नियमानुसार घातला गेला आहे! काही प्रकार तर इतके भयानक होते की, त्याची आम्ही कल्पना पण करू शकलो नसतो! उदाहरणार्थ दोन घावामध्ये फक्त एक सेंटिमीटर अंतर ठेवणे! रस्त्याजवळच्या जंगलामध्ये ही स्थिती तर आत जंगलात काय हालत असेल 'जंगलावरचा बलात्कार' याशिवाय त्याला दुसरे शब्द नाहीत!'

अदवानीची एकूण वस्ती चाळीस कुटुंबांची. त्यातील सहा हरिजनांची, दोन ब्राह्मणाची, बाकी रजपुताची. प्रत्येक जातीची वस्ती जवळपास; पण अलग-अलग. जातिभेद फारसे पाळले जात नाहीत; पण काही वेळा छोट्या छोट्या गोष्टींतून प्रतीत होतात. आम्ही गावच्या सरपंचाच्या घरी गप्पा मारत बसलो होतो. एवढ्यात त्याचा मुलगा प्रेमसिंग घाई-घाईने जाताना दिसला. विचारलं तर म्हणाला, ' गावात एकाची म्हैस मेली आहे आणि आमचा रिवाज आहे की, सर्वांनी मिळून ती उचलून टाकायची.' आम्ही सहज विचारलं, ' हरिजनाकडचं जनावर मेलं तर सर्वजण जमून टाकतात का?' उत्तर मिळालं. ' त्याचं त्यांनी टाकावं!' अर्थात माणसाच्या महायात्रेच्या वेळीही जात आडवी येते, तर जनावरांच्या वेळेला काय!

मेलेल्या म्हशीवरून आठवण झाली. चंद्रपूर जिल्ह्यातील भमरागड या आदिवासी भागात श्री. बाबा आमटे यांच्याबरोबर कादोडी या गावी आम्ही मुक्कामाला होतो. गावच्या विहिरीजवळ एक हल्या (रेडा) मरून पडला होता. हळूहळू दुर्गंधी पसरायला सुरुवात झाली होती, विहिरीचे पाणीही दूषित होण्याचा धोका होता म्हणून आम्ही हल्याच्या मालकाला हल्या दूरवर नेऊन गाडायला दोन-तीनदा सांगितले. तो आत्ता नेतो-मग नेतो म्हणत होता. शेवटी आम्ही तो मुडदा जीपला बांधला आणि फरफटत दूर जंगलात नेऊन टाकला. दुसऱ्या दिवशी रेड्याचा मालक फणफणत आला, आम्ही त्याची एवढी डोकेदुखी दूर केली तरी हा आमच्यावरच का संतापला हे सुरुवातीला

लक्षात येईना, पण नतर लक्षात आलं– रेडा माझ्या शेतात राब-राब राबला. आता मेल्यावर मी त्याला उचलून इतमानाने नेऊन गाडणार होतो. त्यासाठी लोक बोलावले होते आणि तुम्ही त्याला असं कृतघ्नपणं फरफटत नेलं! काही माणुसकी तुमच्यात–'

काय बोलणार?

अदवानीला खबर लागली, खालच्या गगसारला दुल्हन घेऊन बारात परत आली आहे. रात्र-जेवण आहे, नाच आहे. चलो! आम्ही काय, बेगाने शादीमे अब्दुल्ला दिवाना! आमची घोडी गगसारकडे! चीड-सालचे घनदाट जगल, पहाडातील मस्त विझती सध्याकाळ, उगवणारा पुनवेचा चाँद आणि बारातीचा मूड! परिणाम अटळ होता–रस्ता चुकणे! रस्ता चुकला आणि मस्तपैकी भरकटत निघालो. जगलात एक तर सगळ्या वाटा सारख्या वाटतात आणि कातरवेळचं असं अनोखं जंगल आणखीनच भुलभुलय्याचं! प्रत्येकजण आत्म-विश्वासाने वाट शोधून काढत होता आणि भल-भलत्या ठिकाणी नेऊन पोचवत होता. खरंच, जगलामध्ये वाट हरवण्यासारखं सुख नसलं! मी हा आनंद पुरेपूर लुटला आहे. भमरागडच्या जंगलात, बस्तरच्या जगलात. भमरागडच्या जगलात तर आग्या मधमाश्यांनी उभा फोडला होता. धावपळीत पाय सुजला होता. अगावरच्या कपड्याच्या चिंध्या झाल्या होत्या आणि अस्वलांना कधी गुदगुल्या करायला येतील याची शाश्वती नव्हती! लेकिन उसमें भी मझा आया. जंगल काय किंवा जीवन काय, वाटा चुकून सापडतात! परत हरवण्यासाठी!

नेहमीप्रमाणे आमची घोडी वरातीमागून गावात पोचली; पण विशेष काही बिघडले नाही. खुल्या हवेत भात-डाळीची आमटी आणि गोड भाताचे भरपेट आग्रहाचे जेवण झाले आणि जरा आराम करेतो बाराती नाचासाठी–'मन्नाड' साठी बोलवायला आले. आम्हाला ओळख–पाळखीची विशेष अडचण यायचीच नाही. शिवाय आमच्यातील अंजली आपल्या लाघवी स्वभावाने जाईल तिथे फटाफट दोस्ती करायची! अगदी कडेवरच्या पोरीपासून ते ऐंशी वर्षांच्या बुढीपर्यंत अजली 'देवी' सर्वांची मैत्रीण बनायची! भाषेचा वांदा आम्हाला कोणालाच यायचा नाही. कारण 'बेधडक भाषा' ही सर्वात उत्तम भाषा हा आमचा ठाम विश्वास आणि 'मन्नाड'सारख्या भन्नाट नाचाला तर भाषा

नाहीच! पोटभर मन्साड नाचलो की जाणवतं पांढरपेशा नागरी समाज किती प्रचंड सुखाला पारखा झाला आहे तो! संकोचाची, लाजे-काजेची दोन पावलं ठोकरून लावायची की बस्स. ताल-सुराची-बेहोषीची दुनिया तुम्हाला मिठीत घ्यायला उत्सुक असते!



सर्वांची मैत्रीण अंजलीदेवी- एका बुढीशी गप्पा मारताना

गंगासारहून खाडीला परतून सामान-सुमान घेऊन टेहरीला जायचं होतं; पण आज धुलवड! प्रतापनं सांगितलं टेहरी आणि खाली खाडीमध्ये पण धमाल असेल. जरा सबुरीने दुपारी गावात पोचू या! धुलवडीचा शौक आम्हालाही

होता, पण हिमालयातील या थंडीत आणि तेही अधूनमधून पाऊस पडत असताना चिखल-पाणी-रंगाची आरपार धुळवड खेळण्याची जिगर आमच्यात नव्हती. आम्ही गुपचुप पहाडामध्ये वेळ काढला आणि दुपारी गडबड कमी झाल्यावर खाडीला परतलो. मात्र वाटेत एक नदी आडवी आल्यावर प्रदीप गोरख या पट्ठेबहाद्दुरानी त्या थंडीतही आपली आवोळीची-पोहोण्याची हौस पुरी करून घेतली !

छोट्या हेवलिकेचा निरोप घेऊन अकरा मार्चला सकाळी आम्ही टेहरी गावाकडे रवाना झालो. टेहरी हे टेहरी–गढवाल जिल्ह्याचे मुख्य ठाणे आणि या भागातील एक प्रमुख बाजारपेठ. भिलगना आणि भागीरथीच्या संगमावर ते वसले आहे. आता एका प्रचंड धरणाखाली त्याला जलसमाधी मिळणार आहे. टेहरीला प्रामुख्याने त्याचीच माहिती घ्यायची होती.

टेहरी बधारा टेहरी गावाजवळच होणार आहे आणि २४६ मीटर उंची असलेल्या या प्रचंड धरणातून ६०० मेगॅवॅट वीज मिळेल व २·७० लाख हेक्टर जमिनीला पाणी मिळणार आहे. या प्रचंड धरणाचे प्रचंड फायदे सकृ-दर्शनी दिसत असले तरी स्थानिक लोकांचा धरणाला जोरदार विरोध आहे. 'टेहरी–बाध विरोधी संघर्ष समिती' स्थापून लोकानी आपला लढा जारी ठेवला आहे. ॲड. वीरेंद्र सकलानी समितीचे अध्यक्ष आहेत आणि पेशाने वकील असलेल्या या माणसाने धरण-प्रश्नाचाच एकूण अभ्यास करण्यासाठी खूप परिश्रम घेतल्याचे त्याच्याशी बोलताना जाणवले. टेहरीच्या धरणाला पुढील कारणासाठी समितीचा विरोध आहे—

( १ ) टेहरी-धरणाची जागा भूकंपक्षम कक्षेत येते व तेथील भू–भौतिक परिस्थिती ( भूकंप–अभियांत्रिकी परिस्थिती ) गुतागुतीची आहे. टेहरीधरणाची जागा कागडा भूकंपाच्या ७ व ८ भूकंपरेखा मध्ये मानली जाते, १९०५ मध्ये झालेल्या कागडा भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ८० इतकी होती व ही तीव्रता मोठी मानली जाते. ( कोयनेचा १९६७ चा भूकंप ६·७ तीव्रतेचा असूनही केवढा हाहाकार उडाला होता आणि तेही कोयना दख्खनच्या काळ्या पत्थरावर वसलेले असूनसुद्धा ! )

एखादी जागा भूगर्भदृष्ट्या मजबूत असेल तर ती भूकंपकक्षेत असली तरीही

धरण बांधता येते. उदाहरणार्थ रशियातील न्यूरेक धरण; पण टेहरीमध्ये तशीही परिस्थिती नाही.

( २ ) भागीरथीनदीच्या पात्रातील अनेक खडकामध्ये ओपन जॉइटस्–भूदोष असलेले पट्टे आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी झिरपून धरणाला धोका उत्पन्न होईल

( ३ ) भूस्खलन आणि भू–क्षारणामुळे धरणाला कल्पनातीत धोका आहे आणि धरण फार अल्पायुषी ठरणार आहे.

मोठ्या धरणाचा अभ्यास करणाऱ्या आतरराष्ट्रीय मंडळाने १९७३ मध्ये केलेल्या एका पाहणीनुसार जगातील विविध भागात बांधलेल्या १०,००० धरणापैकी ४६६ धरण–अपघात झाले, १४० धरणे सपूर्ण फसली आणि प्रचड नुकसान झाले, उदाहरणार्थ पेरूमधील फायल आर्च धरण, स्पेनमधील द व्हेगा–टेरा धरण, भारतातील पानशेत, मोरवी इत्यादि दुर्घटना ताज्या आहेत. टेहरीचे धरण एवढे प्रचड आहे की, दुर्दैवाने काही दुर्घटना घडलीच तर गगेच्या काठचे सर्व जीवनच उद्ध्वस्त होईल अशी भीती वाटते. हिमालयातील विशिष्ट भूगर्भपरिस्थितीमुळे आणि बेसुमार जगलतोडीमुळे भागीरथीच्या पात्रातील भूक्षारणाचे प्रमाण प्रचड आहे, त्यामुळे करोडो रुपये खर्चून (१९७४ च्या हिशोबाप्रमाणे तीनशे पाच कोटी रुपये ) बाधण्यात येणारे हे धरण अल्पावधीतच अक्षरशः गाळात जाईल !

( ४ ) धरणामुळे हजारो एकर उपजाऊ जमीन पाण्याखाली जाणार आहे. ७०,००० पेक्षा अधिक लोकाना स्थलातर करण्याची वेळ येणार आहे. त्यांच्या पुनर्वसनासाठी ‘ डून ’ दरीतील मौल्यवान जंगल नष्ट होणार आहे.

श्री. सकलानी व ‘ समिती ’ची भूमिका केवळ नकारात्मक नाही, तर एका प्रचड धरणापेक्षा छोटी–छोटी धरणे बाधली जावीत, कुठे बाधली जावीत याबाबत त्यानी सरकारला अनेक पर्याय सुचवले आहेत. पण ‘ छोटे सुंदर असले तरी मोठे महाविलक्षण असते. ’ (Small is beautiful, but big is wonderful !) अशी आपली एकूणच धारणा असल्यामुळे लक्षात कोण घेतो !

पण हा केवळ एका विष्णूप्रयाग, टेहरी धरणाचा किंवा लहान–विरुद्ध मोठी धरणे एवढाच प्रश्न नाही तर एकूणच आपण या प्रश्नाला डोळसपणे सामोरे जाणार की नाही असा प्रश्न आहे ! राष्ट्राचा विकास म्हणजे प्रचड धरणे रस्ते–कालवे कारखाने इत्यादि दृश्य स्थावरजगम मालमत्ता अस साधं

सुटसुटीत समीकरण आपल्या मनात पक्क बसलेलं, पण विकास खरोखरच किती शाश्वत-निरंतर आहे, विकास कोणाचा, कोणाच्या जिवावर, काय किंमतीला या प्रश्नाचा आपण फारसा विचार केलेला नसतो. शिवाय विकास आणि पर्यावरण यांचा परस्पर-संबंध काय, त्याच्यात अंगभूत विरोध आहे की सुसंवाद आहे, आर्थिक-भौतिक विकासासाठी पर्यावरणाचा विनाश अपरिहार्य आहे काय, पर्यावरण-रक्षणाची तथाकथित 'चैन' भारतासारख्या गरीब देशाला परवडणार आहे का याचाही आपण फारसा विचार केलेला नसतो; पण आपण विचार केलेला नसला म्हणून निसर्ग-चक्र, समाज-चक्र फिरायचे थांबत नाही.

आज भारतात आणि महाराष्ट्रात अनेक प्रचंड धरणे बांधली जात आहेत. प्रत्येक ठिकाणी जंगल आणि आदिवासी गावे पाण्याखाली जाणार आहेत. जंगल आणि वनवासी-आदिवासी गावे नेमकी धरणभागातच येतात हा जसा इतर समाजाचा दोष नाही, तसाच तो त्यांचाही गुन्हा नाही. धरण-प्रकल्पाच्या नफा-तोट्यात आपण या सामाजिक, पर्यावरणाच्या समस्यांचे वस्तुनिष्ठ मूल्य-मापन करणार आहोत, की त्या 'गृहीत' धरणार आहोत हा खरा सवाल आहे!

ॲड. सकलानींनी अगदी पोट-तिडकीने धरणासंबंधीची सर्व माहिती दिली. नंतर जंगलासंबंधीची माहिती घ्यायला तेथील वन-निगमाचे मुख्य अधिकारी श्री. बिष्ट यांची भेट घेतली, त्यांनी मात्र निराशा केली. 'वन-निगम'ची स्थापना म्हणजे 'चिपको' आंदोलनाला सरकारने दिलेला प्रतिसाद आहे. त्यामुळे मजुरांचे शोषण थांबले आहे, पण वनसंवर्धनाबद्दल काय योजना आहेत वगैरे ढोबळ माहिती वा तपशील ते देऊ शकले नाहीत.

टेहरीला अचानक श्री. विभूते नावाच्या मराठी माणसाची गाठ पडली. ते तेथील कॉलेजचे प्राचार्य आहेत. अशी उंबरठ्याबाहेर पडलेली मराठी माणसं भेटली की मनस्वी आनंद होतो. श्री. विभूत्यांचे कॉलेज मात्र पत्र्याच्या शेडमध्ये आहे, कारण काही पक्कं बांधकाम करायचं म्हटलं की लगेच विचार येतो हे सगळं पाण्याखाली जाणार तर उगीचच खर्च का? केवळ कॉलेजच नाही तर संपूर्ण टेहरी गावावरच अनिश्चिततेची एक उदासवाणी छाया दाटलेली जाणवली. देशोधडीला लागलेल्या माणसाला कुठे तरी आशा असते, आपल्या भूमीत परतायची; पण राहते घर वा गाव अथवा काळ्या आईची साथ-संगत अशी कायमची सुटणाऱ्या माणसाचं दुःख आपल्याला कधीच कळायचे नाही!

टेहरीहून सुंदरलालजींचे सिल्यारा गाठले. बालगंगेच्या किनारी एका उभ्या टेकाडावर त्यांचा देखणा 'नवजीवन आश्रम' आहे चीडच्या सुम्य रानात हरवलेला. श्री. सुंदरलालजी वन-जागृतीसाठी काश्मीर ते कोहिमाच्या पदयात्रेवर होते; पण श्रीमती विमलाजी बहुगुणा व त्यांच्या आश्रमशाळेच्या विद्यार्थिनींनी आमचे प्रसन्न स्वागत केले. विमलाजींची शांत-सोज्ज्वळ-प्रसन्न मूर्ती पाहताना सारखी साधनाताई आमट्यांची आठवण यायची. तसेच एक तेजते व्यक्तिमत्त्व. शांत-निरामय. पण साधनाताईंना बाबाचा निदान खूपसा सहवास तरी लाभतो; सुंदरलाल ही मनस्वी घुमक्कड वल्ली. पाठीवर पिट्टू ( रॅकसॅकला त्यांचा आवडता शब्द ) टाकून देशभर दौरे करत असते, उपोषणे करत असते आणि विमलाजी सिल्याराच्या पहाडावर आश्रमाची, कामाची, आल्या-गेल्याची सर्व उस्तवार शांत समर्थपणे सांभाळत असतात. या आमटे, बहुगुणा वा आरोळे अशासारख्या मंडळींचे अप्रूप वाटत. कामाच्याबरोबर ते आपल्यासारख्या येणाऱ्या-जाणाऱ्या पाहुण्यांची आघाडी किती सहजतेने पेलतात !

सिल्याऱ्याच्या आश्रमाच्या या नितांत-रमणीय परिसरात मी खूप भटकलो आहे. दऱ्या-खोऱ्या, रावा-पाखरं यांचा खूप आनंद लुटला आहे; पण अनुभवलेल्या एका प्रसंगाची जखम अजूनही सुकलेली नाही. अजूनही सलते आहे- मी, पापा आणि अशोक पहिल्यांदा इथं आलो तेव्हाची !

सिल्याऱ्या-घनसालीच्या पहाडी मुलखात प्रताप शिखरला घेऊन मुशाफिरीला सुरुवात केली होती. बालगंगेला डावीकडे ठेवून पहाड चढत आठ हजार फूट उंचीवरील लस्यालगावला पडाव ठोकायचा होता. तिथला ग्रामप्रधान दलीबसिंह एके काळचा ठेकेदार; पण आता आंदोलनाचा खंदा पाठीराखा असल्याची माहिती समजली होती.

दलीबसिंह प्रधानाच्या प्रशस्त वाड्यावर गेलो तेव्हा पाहुण्यांच्या स्वागतासाठी गावकरी जमले. चहा-हुक्का झाला; पण वातावरणात काही तरी तणाव दिसत होता. जाणारा-येणारा वाड्यापाशी थांबून काही तरी कुजबुजत होता. मुख्य म्हणजे आम्हाला येऊन अर्धा-पाऊण तास लोटला तरी दलीबसिंह भेटायला आले नव्हते. त्यामुळे जरा अवघडल्यासारखे झाले होते. इतक्यात दलीबसिंह बाहेर आले आणि हसतमुखाने स्वागत करून म्हणाले, 'बेटी की

तबियत कुछ ठीक नहीं है, जरा उसके पास बैठा था। चलिये उपर चलके आराम कीजिए!' दलिबसिंहबरोबर आम्ही वर वाड्यात गेलो. प्रशस्त लाकडी वाडा, समोर ऐसपैस सज्जा आणि अंधारात निवत जाणारे आजूबाजूचे दऱ्या-डोंगर. आमचे सामान आवरेपर्यंत प्रताप आणि दलीव खालच्या आवाजात काही तरी बोलत होते. मुलीला 'शनिपात' झाला असून गेले तीन-चार दिवस ती बेफाम झाली होती, एवढे अधुकसे आम्हाला समजले. थोड्या वेळाने वेळाने प्रताप दानाची- त्या मुलीची खबरबात घ्यायला गेला. 'दाना' नव-जीवन आश्रमाच्या शाळेत शिकलेली. आदोलनात जोरदार भाग घेतलेली, साहजिकच प्रताप तिच्या चांगल्या परिचयाचा होता. प्रताप गेला आणि एकदम गंभीर चेहऱ्याने अशोक आणि पापाला बोलवायला माघारी आला. या दोघाना डॉक्टरकीमधली बऱ्यापैकी गती होती. आम्ही बरीचशी औषधेही आणली होती. अशोक, पापा गेले आणि घाईघाईने परत येऊन पापा काही तरी घेऊन गेला. सगळ्यानी गर्दी करणे चांगले दिसणार नाही म्हणून मी त्या मुलीच्या खोलीत नुसता डोकावून आलो. खोलीत परत येऊन अंथरुणावर पडून राहिलो. प्रकरण किती गंभीर आहे याचा अंदाज येत नव्हता. हळूहळू बायकांचा कोलाहल वाढल्याची जाणीव झाली. अस्पष्ट हुंदके ऐकू येऊ लागले आणि अचानक 'दाना ऽऽ' म्हणून कोणी तरी काळीज कापीत जाणारी आर्त किंकाळी मारली! अंधारात ठेचकाळत मी त्या पलीकडच्या खोलीत पोचलो. बापाच्या मांडीवर डोके ठेवून दाना विसावली होती. निस्तेज चेहरा, शून्य नजर! अशोकच्या हातात पाण्याचा ग्लास होता. त्याने नजरेनेच खुणावले, 'कारभार आटोपला आहे!' आम्ही सुन्न मनाने खोलीत येऊन बसलो. बाहेर आक्रोश वाढत होता. बायका कपाळ बडवून घेत होत्या. लहान-लहान पोरी-बाळी ओक्साबोक्शी रडत होत्या. आम्ही आलो काय आणि घटकाभरातच हे सर्व झाले काय, आमचे आम्हालाच समजत नव्हते. आता अशा परिस्थितीत घर सोडताही येत नव्हते आणि तिथे राहताही येत नव्हते. खोलीचे दार लोटून घेऊन आम्ही तिथेच कसे तरी आडवे झालो. दिवसभराच्या वाटचालीने अगोदर सपाटून भूक लागली होती; पण आता तहान-भूक काय कशाचीच इच्छा नव्हती. मृत्यूच्या या अचानक दर्शनामुळे, जीवन-मृत्यूचे घुसमटणारे विचार मन बेचैन करीत होते. महिन्यापूर्वी लग्न झालेली दाना हाताची मेंहदी वाळायच्या आत सारा सारीपाट उधळून गेली होती; दोन-तीन दिवसाच्या

मामुली दुखण्यातून. इतके हे क्षणभंगुर जीवन कापरासारखे भर्रकन उडणारे आणि हे सुखदु:ख एकाने दुसऱ्याकरता केलेले. या अखेरच्या क्षणी कोणी-कोणाचा असण्याचा तरी अर्थ काय? ज्याचा तो एकटा जाणारा-उरणारा-उरलेलाही जाणारच असतो

' भाईसाहब, उठिये, खाना तयार है।' कोणी तरी हलवून उठवत म्हणत होत. प्रथम वाटलं भास झाला. नंतर अंधारात डोळे फाडून बघितल. दलीबसिंह आम्हाला जेवायला उठवत होते. आमची खाण्याची वासना पार मेली होती. आम्हाला भूक नाही, आमची फिकिर करू नका अस आम्ही वारंवार सांगितल तरी, ' आप थके हुये हैं, खाली पेट सो जायेंगे तो हमें बहुत दुख होगा। जो होना था वह हो गया।' अस म्हणून दलीब जेवायला चलण्याविषयी परत-परत विनवत होते. सुतकाच्या आशंकेने कदाचित आम्ही त्यांच्याकडे जेवणार नाही या विचाराने त्यांनी आमची जेवणाची व्यवस्थाही गावातील बिगरनात्या-गोत्याच्या एका माणसाकडे केली होती. आम्ही ऐकत नाही म्हटल्यावर त्यांनी जेवणच आमच्या खोलीवर पाठविण्यास सांगितले. मग मात्र आम्ही निमूटपणे उठलो आणि चार घास खाऊन मुकाट अंथरुणावर येऊन पडलो. रात्री मध्येच जाग आली, दानाचा बाप डोक्यावरून पांघरूण घेऊन मुसमुसून रडत होता!

सकाळी जाग येताच गरम चहाचे प्याले समोर आले. आता चहा प्यायचा आणि एकदम चालू पडायचे, या हिशोबाने आम्ही सामानाची आवरा-आवर केली. तेवढ्यात दलीबसिंह तेथे आले. आमची निघण्याची घाई ओळखून म्हणाले, ' ज्या कामासाठी आला आहात, ते काम सोडून जाऊ नका! डोंगरावरच्या तुटणाऱ्या जंगलामुळे रांडे-रोडे गावावर कोसळत आहेत. शेत खचत आहेत. गावचा झरा दसपट मोठा झाला; पण पाणी मात्र आठ महिनेही टिकत नाही. लोकांची ही दु:खं मोठी आहेत. त्यांची माहिती-फोटो घ्या! सरकारला पाठवा. पेपरमध्ये छापा! माझं दु:ख मला सहन करायलाच पाहिजे. श्रावणाच्या आई-बापाचं दु:ख तर किती तरी मोठं होत! ' अतिशय सहज-पणे दलीबसिंह बोलत होते. दु:खात अगतिकता नव्हती की मनोधैर्यात उसने अवसान नव्हते. सर्व दु:ख जाणतेपणे पेलण्याची एक विलक्षण ताकद या माणसात होती! आम्ही निमूटपणे कामाला घराबाहेर पडलो.

लस्यालगावच्या कोसळणाऱ्या घरा-शेताची पहाणी करून माघारी फिरलो.

लोक म्हणत होते, ' माईसाहब, अगले समय आओगे तो हमारे खेतोंका क्या पुरे गाव का नामोनिशाना नहीं मिलेगा ! आप भी हमें भूल जाओगे ! '

वाड्यात, अंगणात महायात्रेची तयारी पूर्ण झाली होती. महिन्यापूर्वीच्या लग्नाच्या पताका तशाच होत्या. प्रेत सासरी न्यायचे होते. आघाताने पार उद्ध्वस्त झालेला नवरा पुढे झाला. महिन्यापूर्वी बारात घेऊन गेला होता. आज जनाजा घेऊन चालला होता ! गावकऱ्यानी शव उचलले आणि परत एकच हलकल्लोळ झाला ! आम्ही दूर कोपऱ्यात उभे होतो. दानाचा आजा आला आणि अशोकचा हात हातात घेऊन रुद्ध कंठाने म्हणाला, ' कोण कुठले आपण ! काल संध्याकाळपर्यंत ओळखही नव्हती; पण माझ्या लाडक्या नातीला पाण्याचा शेवटचा घोट तुम्ही पाजला ! परमेश्वर तुम्हाला सुखी ठेवो ! '

सिल्याराचा आणखी एक प्रसंग बापजन्मात विसरणार नाही ! तेरा मार्चला दुसरा गट आम्हाला सिल्याराला येऊन भेटणार होता. दिवसभर त्याचा पत्ता नव्हता. संध्याकाळ आली-गेली. रात्रीचे दहा वाजले. आता त्याच्या येण्याची शक्यता नव्हती म्हणून आम्ही झोपायच्या तयारीत होतो. एवढ्यात पहाडा-खाली अंधारातून अधुकशा घोषणा ऐकू आल्या. ' जंगल बचावऽ मानव बचाव-ऽ चिपको आंदोलन झिंदाबाद ! ' पहिल्यांदा आम्हाला वाटलं काही तरी भास झाला. एवढ्या अंधारात आणि थंडीत कोण कडमडायला येईल ! पण हळूहळू आवाज स्पष्ट होत गेला. उल्हास-विजय आणि त्याचे साथीदार पहाड चढून वर येत होते. बहाद्दरांनी एका दिवसात वीस-बावीस किलोमीटर अंतर-तेही पहाडावरचे काटले होते. शेवटी अंधारात काट्या-कुट्यांत, नदी-नाल्यात धडपडले होते. सगळेजण प्रचंड थकले होते. पाय सुजले होते; पण बाजी मारल्याचा एक विलक्षण आनंद-मस्ती प्रत्येकाच्या चेहऱ्यावर होती ! त्याच्या आणि असे बहाद्दर साथीदार मिळाल्याबद्दल आमच्या ! खरंच अशा क्षणाची बेहोषी काही वेगळीच असते. उल्हास-किशोर-मधु आणि कपर्नीने मोहिमेच्या नेत्याकडून हक्काने एक सेवा बजावून घेतली-मालिश करण्याची आणि त्यासारखी आनंदाची-अभिमानाची दुसरी गोष्ट नव्हती.

पंधरा मार्चला टेहरी-गढवालमधील श्रीनगरला सर्व गटानी एकत्र यायचे ठरले होते. श्रीनगर मध्यवर्ती ठिकाणी आहे आणि तिथे गढवाल विश्वविद्यालय

व ' इन्स्टिटयूट ऑफ हिमालयन स्टडीज अँड रिजनल डेव्हलपमेंट ' ही संस्था आहे. श्रीनगरच्या दोन दिवसांच्या मुक्कामात गट-अहवाल सादर करणे व वरील दोन संस्थातील प्राध्यापक-विद्यार्थ्यांशी चर्चा असा कार्यक्रम होता. ठरल्याप्रमाणे एकेक गट श्रीनगरला जमा व्हायला सुरुवात झाली. खूप दिवसानी सर्वजण एकमेकाना भेटत होते.

आयुष्यातले काही क्षण जर मला परत मिळाले तर मी पहिल्या प्रथम श्रीनगरची ती रात्र मागेन ! सर्वजण जमेपर्यंत संध्याकाळ झाली. जेवण झाली. सर्वजण खूप उत्साहात होते, जोशात होते या जोशाला-या आनंदाला मुक्त वाट मिळण फार जरुरीचे होते. म्हणून तबला-पेटीचा बंदोबस्त केला होता. प्रदीप हाडाचा कलाकार ! तबला-पेटी पाहिल्यावर तो हरपला. पेटील त्याने सूर धरला. अहिरेने तबला ताब्यात घेतला आणि पुढे दोन-तीन तास जो तुफान जल्लोष झाला त्याला तोड नाही ! बहारू-सीताराम-काळूराम-आलमगीर -गोरख आमचे हुकमी एक्के ! बहारू तर असा बढिया कलाकार की त्याचे ' कोहो रे कोहकी रे कोहरे कोकी ' हे भिल्लोरी गाणे पन्नास वेळा पेश केले तरी प्रत्येक वेळी त्याची अदाकारी अलग असायची. स्वरांची-लयीची किंवा नुसता भाव खाण्याचीही ! सीताराम आपल्या वंजारी गाण्यानी आणि लोक-गिताच्या अस्सल हेलकाव्यानी मैफलीला झुलवीत असे, पण त्या रात्रीच्या मैफलीचा बादशहा कोण असेल तर अमरावतीचा मुन्ना अवस्थी. मुन्ना म्हणजे वऱ्हाडी भाबडेपणा आणि टारगटपणा यांचे नामी मिश्रण. मुन्ना आणि त्याचे गुरु हरिभाऊ. मुन्नाने सुरुवातीला उगीचच आढ्यावेढ्याची नाटक करुन एकदम ठाय लयीतील ' कृष्णा मजकडे पाहू नको, माझी घागर गेली फुटून ' ला हात घातला आणि कोणाला काही कळायच्या आतच सगळे ' गोकुळ ' देहभान हरपून या गवळणीत सामील झाले !

सोळा मार्चला सकाळी प्रत्येक गटप्रमुखाने आपल्या साथीदारांसह गट-अहवाल सादर करण्यास सुरुवात केली. प्रत्येक गट-प्रमुखाने प्रश्नावलीनुसार गट-अहवाल तयार केला होता. शिवाय प्रत्येक सभासदाला नोंद-वही दिलेली होती. अहवाल सादर केल्यानतर त्याच्या अनुषगाने प्रश्नोत्तरे-चर्चा होत. या प्रश्नोत्तरांतून, चर्चेतून प्रत्येक गटाने, गटातील प्रत्येक सभासदाने किती मेहन-तीने-डोळसपणे माहिती मिळविली ते जाणवत होते. गटक्रमांक चार आणि पाचला विशिष्ट परिस्थितीमुळे मनासारखी पाहणी करता आली नव्हती. तरीही

कुसुम--बहारू--सेठ--नीलम--पालेकर यानी आहे त्या परिस्थितीत शक्य तेवढी माहिती जमा केल्याचे जाणवत होते. सेठसराचे ' रिपोर्टिंग ' अनेक बारकावे व तपशिलामुळे त्याच्यासारखेच खूप जिवत, रसरशीत वाटले, तर गटक्रमांक दोनच्या सुरेश पराजपे याचे रिपोर्टिंग मुद्देसूद आणि रोखठोक होते. या महत्त्वाच्या कार्यक्रमाला आमच्या महाराष्ट्र मानव-विज्ञान-परिषदेचे कार्यवाह प्रा. मुटाटकर मुद्दामहून येऊन हजर राहिले होते. त्याच्या उपस्थितीमुळे आणि मार्गदर्शनामुळे अनेक मुद्दयांची--प्रश्नांची उकल करणे अधिक सोपे गेले.

चर्चेबरोबरच हिमालय संशोधन संस्थेचे प्रमुख डॉ. तेजवीर सिंग याचे भाषण व स्लाइड-शो होता. डॉक्टरसाहेबानी आपल्या खास लखनवी लाजबाब उर्दू--हिंदीत हिमालयातील सौंदर्याचा फुलोरा आणि त्याचबरोबर टेहरीसारख्या डुबणाऱ्या नगरीची दर्दभरी दास्ताँ पेश केली. हिमालयातील पाना--फुला--फळांच्या त्याच्या स्लाइडसही त्यांच्या भाषेप्रमाणे सौंदर्याच लेण मिरवीत आल्या होत्या, पण गहिऱ्या मथितार्थाच्या दृष्टीने खास भाषण झालं ते गढवाल विश्वविद्यालयाच्या सामाजिक वनीकरण विभागाचे प्रमुख डॉ. नौट्याल या जवान प्राध्यापकाचे. डॉ. नौट्यालजींनी सामाजिक वनीकरणाची संकल्पना थोडक्यात समजावून सांगितली आणि मग आपण जोवर अतिरिक्त भोगवादी व्यवस्था आणि मूल्य सोडत नाही तोवर पर्यावरण, निसर्ग-सतुलन आदि सर्व गोष्टी करण कसं फोल आहे हे सागून चर्चेला एका वेगळ्या उंचीवर नेलं !

गढवाल विश्व--विद्यालयातील चर्चा मात्र काहीशी निराशाजनक झाली. आम्ही सर्वजण मिरवणुकीने विश्व-विद्यालयात गेलो. विश्व-विद्यालयातील प्राध्यापक--छात्रगण यांनी समेला चागला प्रतिसाद दिला; पण एकदर चर्चेचा सूर ' तुम्ही इतक्या दुरून येऊन आमच्या समस्याची इतकी आपलेपणाने माहिती घेतली वगैरे वगैरे ' असा होता. हिमालयातील समस्या ह्याची--त्याची नाही तर आपल्या सर्वांचीच आहे अशी जाण, अशी भावना त्यातून कुठे प्रतीत होत नव्हती. एका विद्यार्थ्याने तर ' चिपको 'वाल्यांवर कडक टीका करणारे व वन-ठेकेदाराची बाजू घेणारे जोरदार भाषण ठोकले; पण त्याने केलेल्या आरोपाचे तपशील--पुरावे विचारायच्या आतच पढ़ठ्या मंत्र्याप्रमाणे भाषण ठोकून सरळ चालू पडला !

हिमालयातील मुशाफिरी संपत आली होती. प्रताप--विजय--कुँवर आणि हिमालयाच्या कुशीतील मणगोताला अलविदा करून पहाड उतरायला सुरुवात

केली कधी एकदा सपाट मैदान डोळे भरून पाहू असं झाल होतं. हरिद्वार-हृषिकेषनतर बस मैदानातून धावू लागली. मैदानाची नवलाई संपली आणि मग नजर दूरवर मागे सरकणाऱ्या पहाडाकडे परत-परत वळू लागली. जीव कुठे तरी गुतला होता. हिमालयातील या साध्या-सुध्या लोकांनी आपल्या पराक्रमाने आणि निर्व्याज प्रेमाने कुठे तरी तार छेडली होती. या साध्या-सुध्या लोकांच्या अखंड प्रयत्नातून निसर्ग-रक्षणाचा, निसर्गप्रेमाचा एक स्रोत हिमालयात उगम पावला होता. आता आम्हाला आमच्या अथक प्रयत्नातून-पराक्रमातून या स्रोताला साथ द्यायची होती. गंगौघ घडवायचा होता.

आणि आम्ही तो घडवू असा विश्वास आहे. निर्धार आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# प्रश्नावली

- गावाचे नाव – जिल्हा – पोस्टाचा पत्ता
- गावाची समुद्रसपाटीपासून उंची – हमरस्त्यापासूनचे अंतर – शाळा, पोस्ट, बँक, वीज, बस इत्यादि सोयी.
- गावाची लोकसंख्या – कुटुंब संख्या – प्रमुख जातींची नावे – गावाच्या वस्तीची रचना व विभागणी – घराचे प्रकार, आतील व्यवस्था.
- गावातील सरासरी जमीन धारणा – प्रमुख पिके व हंगाम – पाटबंधाऱ्याच्या सोयी – शेतीमधील सरासरी उत्पन्न – गेल्या दहा वर्षातील चढउतार – कारणे – नैसर्गिक, मानवी वा इतर काही ? शेतमजुरी – जमीनदार ( असल्यास ) – शेतमजूर संबंध – गावातील इतर प्रमुख व्यवसाय – विशेषतः जंगलाशी संबंधित व्यवसाय.
- घरातील सरासरी जनावरांची संख्या – प्रकार – गेल्या दहा वर्षातील बदल – कारणे ( उदाहरणार्थ महाराष्ट्रातील गवळी, धनगर )
- गाव व जंगल परस्पर संबंध – गावाभोवती जंगल होते / आहे काय ? कोणत्या प्रकारचे – उदाहरणार्थ सूचिपर्णी – रुंदपर्णी – लोकांच्या उपयोगाची झाडे – पूर्वी त्यापासून मिळणारे उत्पन्न – जंगलाची आजची स्थिती – जंगलनाश होत असल्यास त्याला जबाबदार कोण ? याबाबत तपशिलासह उदाहरणे.
- गेल्या दहा वर्षात गावावर ओढवलेल्या नैसर्गिक आपत्ती – उदाहरणार्थ पूर, कडे कोसळणे इत्यादि. ( जागांना शक्यतो भेट द्यावी ) – लोकांच्या मते आपत्तीची कारणे.
- जळण, चारा, पाणी मिळण्याच्या जागा, अंतरे, अडचणी – गेल्या शतकातील बदल – गावकऱ्यांच्या मते त्याची कारणे – कार्यकर्त्यांचा आपल्या भागातील अनुभव.
- गावातील स्थलांतरितांचा प्रश्न – स्थलांतर कोण करतात, कुठे करतात ? कारणे – गेल्या दशकातील परिस्थिती – स्थलांतरित व जंगले यामध्ये काही संबंध ? कार्यकर्त्यांचा याबाबत आपल्या भागातील अनुभव – कारणमीमांसा.
- गावामध्ये पुरुष – स्त्रिया – म्हातारे – लहान मुले – जास्त कोण आढळले ? कारणे ? स्त्रिया कोणती कामे करतात ? गेल्या दशकातील कामाच्या स्वरूपात व प्रकारात बदल – कारणे – स्त्रीचे समाजातील एकूण स्थान – खास प्रश्न – जागृती.

- 'चिपको' आंदोलनाची लोकाना माहिती आहे काय ? केव्हा व कशी झाली ? नेमके काय घडले ? लोकाचा सहभाग किती व कोणत्या प्रकारचा ? लोकाच्या दृष्टिकोनातून 'चिपको' आंदोलनाचे मूल्यमापन – आंदोलनाने सोडवलेले व न सोडवलेले प्रश्न. स्त्रियाचा 'चिपको' आंदोलनाबाबतचा दृष्टिकोन – सहभाग कसा व कोणत्या प्रकारचा ? गावकऱ्याना विशेषतः स्त्रियाना आंदोलनाकडे आकर्षित करणारी खास तंत्रे – स्त्रियानी संघटित होऊन सोडवलेले प्रश्न – न सुटलेले प्रश्न – कारणे.
- गावातील वन कर्मचारी, वन-मजूर व जंगल ठेकेदार याचा आंदोलनाकडे बघण्याचा दृष्टिकोन – वन-संवर्धनाबाबतचे त्याचे विचार.
- वन संवर्धनाबाबत गावकऱ्याकडून होणारे प्रयत्न – सरकारतर्फे होणारे प्रयत्न – कोणत्या प्रकारचे ? लोकाचा सहभाग – लोकाच्या दैनंदिन गरजा उदाहरणार्थ जळण, चारा, भाकरीचा प्रश्न, राष्ट्रीय गरजा व वनसंवर्धन यामध्ये कसा मेळ घालता येईल ? लोकाचे विचार व नेमक्या योजना तुमचे विचार व नेमक्या योजना.
- गावातील वास्तव्याचा काळ – केव्हा पोचला – निघाला – विशेष घटना – कार्यक्रम.

# मोहिमेत भाग घेतलेल्या साथीदारांची नावे, पत्ता आणि संस्था / संघटना

| | |
|---|---|
| १. **आलमगीर मुलाणी**<br>द्वारा राईरकर आबराई कॅम्प,<br>८८४, डे. जिमखाना, पुणे ४ | गरीब डोंगरी संघटना |
| २. **सिताराम बाजारे**<br>८८४ डे. जिमखाना, पुणे ४ | गरीब डोंगरी संघटना |
| ३. **पुरुषोत्तम उगरचंद सेठ**<br>९२९ शनिवार पेठ, सातारा | लोकविज्ञान संघटना,<br>लालबहादूरशास्त्री विद्यालय |
| ४. **सखरसिंग मोग्या पटले**<br>मु. कुसुमवाडे, पो. फत्तेपूर, शाहादे, जि. धुळे | आदिवासी सातपुडा<br>शिक्षण प्रसारक मंडळ, धडगाव |
| ५. **बबन गुलाब सपकाळ**<br>सरदार पटेल हायस्कूल, अणे, ता. जुन्नर | " |
| ६. **नरेन वासुदेवराव जाधव**<br>मधु-मिलन जॉय आइस्क्रीम्स, पेण, जि. रायगड | " |
| ७ **नागू गायकवाड**<br>मु. नायगाव, पो. कामशेत, ता. मावळ, जि. पुणे | लोकजागृती वाचनालय |
| ८. **विनायक गोपाळ अहिरे**<br>मु. शिलाटणे, पो. काली, ता. मावळ जि. पुणे | " |
| ९. **नामदेव ईश्वर ओव्हाळ**<br>मु. नायगाव, पो. कामशेत, ता. मावळ, जि. पुणे | " |
| १०. **जीवन सोमाऱ्या शेलार**<br>भूमिसेना कार्यालय, मु. पो. मनोर<br>ता. पालघर, जि. ठाणे | भूमिसेना |
| ११. **भीमसिंग गिरासे**<br>भूमिसेना कार्यालय, मु. पो. मनोर<br>ता. पालघर, जि. ठाणे | भूमिसेना |

| | |
|---|---|
| १२. रवींद्र मधुकर यादव<br>द्वारा डॉ. बी. आर. यादव<br>१०३३, सांगली १६ | रिव्हर व्हॅली एक्सपिडिशन ॲन्ड<br>रिसर्च सोसायटी ऑफ इंडिया<br>मिरज |
| १३. किशोर व देशपांडे<br>डी–२० जमुना मित्र चौकी, मालाड, पश्चिम मुंबई | वन–निकेतन |
| १४. नीलम परुळेकर<br>'रघुकुल' पालघर, जि. ठाणे | भूमिसेना |
| १५. प्रदीप बसाजी गायकवाड<br>मार्गाची वाडी, पो. पाथरज<br>ता. कर्जत, जि. रायगड | जागृत भाऊबंदी संघटना |
| १६. जिजा कमळू रेरे<br>मार्गाची वाडी, पो. पाथरज<br>ता. कर्जत जि. रायगड | " |
| १७. वाहरु सोनवणे<br>श्रमिक संघटना, मोहिदे रस्ता, शाहदे, जि. धुळे | श्रमिक संघटना |
| १८. सरस्वती शेवाळे<br>श्रमिक संघटना, शाहदे | श्रमिक संघटना |
| १९. नारायण रामचंद्र खुळे<br>श्री. भैरवनाथ सह. दूध संस्था फुलगाव,<br>ता. हवेली, जि. पुणे | श्री. भैरवनाथ सह. दूध<br>संस्था फुलगाव |
| २०. काशीनाथ शंकर तांबे<br>मौजे भावडी, पो. वाघोली ता. हवेली, जि. पुणे | विकास तरुण मंडळ भावडी |
| २१. शोभा कोठारवार<br>मु. पो. आलापल्ली, एलगूर रोड<br>ता. अहेरी, जि. चंद्रपूर | जागृत आदिवासी संघटना |
| २२. विमल मारोती कुसराम<br>मु. पो. अहेरी, गोंड मोहल्ला, जि. चंद्रपूर | " |
| २३. सुनीता नरहर भाटवडेकर<br>१४२६ सदाशिव पेठ, पुणे ३० | — |
| २४. अंजली गोखले<br>१२२ शनिवार पेठ, पुणे ३० | — |

| | |
|---|---|
| २५. कुसुम कर्णिक<br>मु. पो. नारोडी, ता. आंबेगाव जि. पुणे | (भीमाशंकर प्रकल्प) |
| २६. सुरेश प्रभाकर परांजपे<br>५/६६ विष्णूप्रसाद सोसायटी<br>विलेपार्ले, पूर्व मुंबई ५७ | — |
| २७. मधुकर घाटपांडे<br>ध्रुवतारा सोसायटी, अरण्येश्वर, पुणे ९ | — |
| २८ अलका कुलकर्णी<br>बी १०७-४ शासकीय वसाहत,<br>वांद्रे पूर्व, मुंबई ५१ | राष्ट्रीय सेवा योजना |
| २९. दामोदर पांडू ठाकरे<br>मु. सटाणा, जि. नाशिक | डांगसौंदाणे विभाग<br>आदिवासी जंगल सोसायटी |
| ३०. उल्हास राजस<br>५ अ, महात्मा फुले कॉलनी,<br>कलामंदिरजवळ, धुळे | महात्मा फुले ग्रामीण विकास मंडळ |
| ३१. हिरामण बनकर देवरे<br>मु. कोंढावळ, पो वडाळी,<br>ता. शहादे, जि. धुळे | — |
| ३२. भय्या तुकाराम माळी<br>मु. कोंढावळ, पो. वडाळी,<br>ता. शहादे, जि. धुळे | — |
| ३३. सिताराम देवराव पवार<br>पुरोगामी मित्र मंडळ,<br>द्वारा शेती सल्ला केंद्र, ता. मुखेड जि. नांदेड | पुरोगामी मित्र मंडळ |
| ३४. डॉ. अेस. अेस. सहस्रबुद्धे<br>मेन रोड, पाटण, जि. सातारा | धन्वंतरी सहकारी वनौषधी उत्पादक संस्था लि. पाटण |
| ३५. चंद्रशेखर अवस्थी<br>नमूना, अमरावती | — |
| ३६. हरिहर धोंडोपंत पुरोहित<br>पुरोहित ब्रदर्स, राजकमल चौक, अमरावती | — |

| | |
|---|---|
| ३७ **गोरखनाथ नामदेव कांबळे**<br>कर्मा प्रकल्प, ३५२, समर्थनगर, दहिवली<br>कर्जत, जि. रायगड ४१० २०१ | कर्जत ॲग्रिकल्चरल रुरल मॅनेजमेंट असिस्टन्स |
| ३८. **मंगल होनराव**<br>काका मनोहर चाळ, पेण रायगड | भाकर |
| ३९. **राजू जोशी**<br>काका मनोहर चाळ, पेण | कर्मा |
| ४० **विद्या खोपकर**<br>गणेशखिंड, औंध, पुणे | भाकर |
| ४१ **आर. पी. पालेकर**<br>ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स,<br>मु. पो. कशेळे, कर्जत | ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स |
| ४२. **दत्तात्रय मल्हार बिडकर**<br>डाग सेवा मंडळ, शरणपूर रोड, नासिक | डाग सेवा मंडळ, नासिक |
| ४३ **जगदीश गोडबोले**<br>सीमा, ब–७, शिरोळे मार्ग, पुणे ४ | महाराष्ट्र मानवविज्ञान परिषद, पुणे |
| ४४. **काळूराम धांगडा**<br>मु. शिसने. पो. धुंदलवाडी,<br>ता. डहाणू, जि. ठाणे | कष्टकरी संघटना |
| ४५. **गोपाळ वोदले**<br>मु. शिसने, पो. धुंदलवाडी,<br>ता. डहाणू, जि. ठाणे | ,, |
| ४६. **प्रकाश भावे**<br>दहिवली (नीड) ता. कर्जत, जि. रायगड | — |
| ४७. **बी. व्ही. शेखर**<br>मु. पो. नागेपल्ली, ता. अहेरी, जि. चंद्रपूर | — |

जंगल बचाव
मानव बचाव